# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २०/२/२००७

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/२/२००७ रोजीच्या**
**सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार दिनांक २०/२/२००७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. उप—महापौर, श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर :—श्री. तलरेजा विनोद चंदीराम

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती जावळे संगिता रमेश | २६. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल |
| ३. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | २७. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| ४. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | २८. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| ५. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | २९. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ६. | श्री. गायकवाड दिलीप | ३०. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ७. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३१. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ८. | श्री. एडके गणपत गोविंद | ३२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ९. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३३. | श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास |
| १०. | श्री. उमाप रामदास राघोजी | ३४. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| ११. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ३५. | श्री. मनवानी अन्नु (सनमुख) |
| १२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ३६. | श्रीमती पंजाबी दिपा नारायण |
| १३ | श्री. पवार नाना आनंदा | ३७. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| १४. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ३८. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास |
| १५. | श्री. जग्यासी राजु किशनचंद | ३९. | श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग |
| १६. | श्री. निकम शांताराम ओंकार | ४०. | डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश |
| १७. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ४१. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| १८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४२. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| १९. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ४३. | श्रीमती दासानी मिनु राजकुमार |
| २०. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ४४. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २१. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ४५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २२. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ४६. | श्री. माखिजा हरदास सन्मुखदास |
| २३. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ४७ | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| २४. | श्री. जेसवानी सतरामदास पुनमदास | ४८. | श्री. वधारिया राजेश नानिकराम |
| २५. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | | |

तर,

मा. महापौर :— १. श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश, मा. सदस्य / सदस्या २. श्री. सोनवणे नथु काशीराम, ३. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर, ४. श्री. वाघे शामु बाबु, ५. श्रीमती मोकल सीमा चंदाराम, ६. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ७. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल, ८. श्री. यादव लालबिहारी बुझारत, ९. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, १०. श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र, ११. श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा, १२. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास, १३. श्रीमती खिलनानी भावना रवी, १४. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग, १५.श्री. चव्हाण रमेश महादेव, १६. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ, १७. श्री. जाधव सुरेश मधुकर, १८. श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल, १९. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश, २०. श्री. भालेराव गौतम यशवंत, २१.श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती, २२-श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, २३. श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद, २४. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास, २५.श्रीमती माखिजा किरण लखी, २६.श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम, २७. श्रीमती छाब्रिया भारती पहलाज, २८. श्री. बठीजा संजय रामचंद्र , २९. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ३०. डॉ. (श्रीमती) साधवानी जया हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

मा.आयुक्त श्री. सदाशिव कांबळे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या स्थानी श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते. तसेच खाली दर्शविलेले अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
२. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
३. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
४. श्री. एस.के.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
५. श्री. अनुप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. बी.सुंदरेश्वरन, प्रभारी शहर अभियंता
७. श्री.मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग
८. श्री आर.आर.सावकारे, कार्यकारी अभियंता, (पापु)
९. डॉ. के.आर खरात, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
१०. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
११. श्री एस.बी.सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
१२. डॉ. राजा रिझवानी, वैदयकिय अधिकारी

सांयकाळी ४.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्तरे.......यावेळेस एक सुध्दा प्रश्न प्रलंबित नसल्याने हा विषय घेतला जाणार नाही.

उल्हासनगर जिल्हा कॉंग्रेस (आय) च्या अध्यक्षांचे पत्र प्राप्त झाले आहे. त्यानुसार श्री. मोहन साधवानी यांना कॉंग्रेस आय पक्षाचे गटनेते म्हणुन निवडण्यात आले आहे. त्यांच्या नेमणुकीस मा. पीठासीन अधिका–यांनी स्विकृती दिली आहे. श्री. मोहन साधवानी आपले अभिनंदन करुन आपणांस शुभेच्छा देतो.

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> श्री. मोहन साधवानीजी, आपल्या गटनेता नेमणुकीबाबत आपले हार्दिक अभिनंदन व आपणांस हार्दिक शुभेच्छा.

<u>मा. सचिव :–</u> तीन लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

**पहिली लक्षवेधी सुचना आहे जीचे सुचक आहेत श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व अनुमोदक आहेत श्री. राजेंद्र चौधरी**

**विषय** :– संत साधु वासवानी उद्यानाचे (गोल मैदान) प्रवेशद्वार कायमस्वरुपी बंद असल्याकारणाने नागरीकांना होणा–या गैरसोयीबाबत व सदर उद्यानाचे प्रवेशद्वार त्वरीत नागरीकांसाठी खुले करण्याबाबत.

**दुसरी लक्षवेधी सूचना आहे जीचे सुचक आहेत श्री. सतरामदास जेसवानी व अनुमोदक आहेत श्रीमती भावना खिलनानी.**

**विषय** :– उल्हासनगर महानगरपालिकेच्यावतीने उल्हासनगर वाशियांना मुलभुत सुविधा मिळत नसल्याने येथिल नागरीक व व्यापारी अत्यंत त्रस्त आहेत. महापालिका ठेकेदारांकडुन, जकात ठेकेदारांकडुन निवासी विभागांमध्ये, घरांमध्ये अनाधिकृतपणे दुकाने व कारखाने उभारल्याने शहरातील कित्येक शहरवाशी शहर सोडुन जाण्यास लाचार झाले आहेत.

**तिसरीजी लक्षवेधी आहे ती निर्धारीत वेळेनंतर प्राप्त झाली आहे जीचे सुचक आहेत, श्री. किशोर वनवारी व अनुमोदक आहेत श्री. दिलीप लालवानी. ही लक्षवेधी सुचना श्री. युवराज भदाणे यांच्या नियुक्तीबाबत खुलासा मागण्याबाबतची आहे.**

**विषय** :– श्री. युवराज भदाणे यांच्या नियुक्तीबाबत.
यामधील दोन लक्षवेधी सूचना आपणांस मान्य करायच्या आहेत.

मा.उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– महाराज भुल्लर यांची जी लक्षवेधी सुचना आहे तिच्याबाबत उप–आयुक्त, मालमत्ता यांनी लेखी उत्तर दिले आहे. व अतिरिक्त आयुक्तांनी याचा खुलासा करावा असे मी त्यांना निर्देश देत आहे.

मा. सचिव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर हे आपली लक्षवेधी मागे घेत आहेत.

मा.उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर हे आपली लक्षवेधी मागे घेत आहेत.

श्री. नाना रौराळे, (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):– सन्माननिय महापौरजी व सर्व सन्माननिय सदस्य, मा. सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी जी लक्षवेधी सूचना दिली आहे त्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे खुलासा करु इच्छितो.

संत साधु वासवानी उद्यान, गोल मैदान,उल्हासनगर–१ हे महानगरपालिकेच्या मालकीचे उद्यान आहे. सदरच्या उद्यानामधील (३५४० चौ.मिटर + १०९६८ चौ. मिटर) एवढी जागा प्रजापती ब्रम्हकुमारी या खाजगी संस्थेस १० वर्षाच्या कालावधीसाठी '' वापर व हस्तांतरीत तत्वाने'' उल्हासनगर महानगरपालिका ठराव क्र. १०४, दिनांक २०/११/२००३ अन्वये देण्यात आलेली आहे.

सदर उद्यानाच्या गैरवापराबाबतच्या बातम्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाल्याने दिनांक १/११/२००६ रोजीच्या आदेशान्वये सदर उद्यानातील सर्व दरवाजे रात्री १०.०० नंतर उद्यानात प्रवेश देवू नये, तसेच मैदान प्रवेश करणे व बाहेर जाण्यासाठी फक्त मुख्य दोन दरवाजांचा वापर करावा असे निर्देश देण्यात आले होते. तद्नंतर दिनांक ७/१२/२००६ च्या आदेशान्वये १) साधू वासवानी पुतळयाजवळ असलेला दरवाजा तसेच २) भगवती नावानी स्टेजजवळील दरवाजा (आतिल बाजूस असलेला दरवाजा) बंद करण्याचे आदेशित करुन तसे सुचना फलक प्रदर्शित करण्यासाठी निर्देश दिले होते.

दिनांक १३/१२/२००६ अन्वये प्रजापित ईश्वरील विश्वविद्यालय, उल्हासनगर–२ यांना पत्र देवून सदर उद्यानातील दोन मुख्य दरवाजे सकाळी ६.०० ते १०.०० व सायंकाळी ५.०० ते १०.०० या कालावधीसाठी जनतेच्या हिताच्या दृष्टीने उघडे ठेवण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि, इतर कोणत्याही प्रकारचे आदेश मालमत्ता विभागामार्फत पारीत करण्यात आलेले नाहीत.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–मा. महापौर महोदय, आम्हांला काय वाटते दरवाजे उघडणारी प्रजापिता ईश्वरीय विश्व विद्यालय ही संस्था कोण होते? ते आश्रमवाले कोण होतात ज्यांना यांनी आदेश दिले आहेत की, दरवाजे उघडा म्हणुन ती जागा त्यांना दिली आहे काय?आपण म्हणता की लक्षवेधी सूचना मागे घ्या, आपण लिहून एक देता व येथे एक बोलता? पेटीच्या बाहेर काही, पेटीच्या आत काही असे थोड चालते?

मा.उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–ज्या गोष्टीबाबत श्री. भुल्लर महाराज यांचा आक्षेप आहे, त्याबाबीचा आपण खुलासा करा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–महासभा संपल्यानंतर आपण अधिकारी बरोबर घ्या. तेथे जावून दोन्ही दरवाजे उघडे करुन ठेवु. ब्रम्हकुमारीला आपण ही जागा विकली असेल तर तसे सांगा. साधु वासवानीचा पुतळा आपण त्यांना विकला आहे काय?

मा.उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–भुल्लर महाराज जी, त्यांना खुलासा करु दया.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–लोकांना रस्त्यावरुन दर्शन घ्यावे लागते. आत जावु शकत नाहीत.

श्री. मिलींद सावंत (उप–आयुक्त, मालमत्ता):–मा. महापौरजी, आताच आम्ही जे लेखी उत्तर दिले आहे त्याच्यात दिसून येईल का आम्ही सील करण्याचे आदेश दिलेले नव्हते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–साहेब, आपण काय म्हटले आहे, ब्रम्हकुमारीवाल्यांना आपण सांगितले आहे. सकाळी ६.०० ते १०.०० व सायंकाळी ५.०० ते १०.०० या वेळेमध्ये दरवाजे उघडावे. आता महासभा संपल्यानंतर आपण चला आणि दरवाजे उघडुन दया.

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मालमत्ता):–ठिक आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:— महापौर महोदय, शिवसेनेचे वरीष्ठ नेते श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी हा जो प्रश्न येथे उपस्थित केला आहे, फक्त मुख्य दरवाजा बंद केला आहे हिरवळीवर चालण्याचे गरोदर महिलांना डॉक्टरांकडुन सल्ला दिला जातो या उद्यानामध्ये जी हिरवळ आहे त्या हिरवळीवर त्या महिलांना चालु दिले जात नाही. दरवाजे वेळे अगोदरच बंद केले जातात. ती जी हिरवळ लावली जाते ती कश्यासाठी लावली जाते? हिरवळ गुरांना चरण्यासाठी लावली जाते की माणसांना चालण्यासाठी लावली जाते व आपण जसे म्हणता की, दरवाजे बंद करण्याचे आदेश दिले नाही तर मग येथे जे आदेश असतात ते कश्यासाठी असतात? या महानगरपालिकेचे प्रशासन काम तरी काय करत आहे? आपण घर दुरुस्तीची परवानगी देतात प्रत्यक्षात मात्र तेथे पक्के बांधकाम होते. घर दुरुस्ती परवानगी न देताही घर दुरुस्ती केली जाते. आपले जे आदेश असतात त्यांवर कुणीही कार्यवाही करत नाहीत. शेवटी या महानगरपालिकेत चालले तरी काय? राम भरोसे हिंदु हॉटेल चालले आहे काय? आपण त्यांना आदेश दयाल की हे जे उद्यान आहे त्यातील सुयोग्य देखभाल करण्यासाठी आपणांस दिले आहे. दरवाजे बंद करण्यासाठी दिलेले नाही. महापौर महोदय, आपण अधिनिर्णय दया, शहरातील नागरीकांना या उद्यानापासुन वंचित ठेवण्याचा आपणांस काही अधिकार प्राप्त होत नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—महाराज भुल्लर आणि श्री. दिलीप लालवानी यांच्या मुद्दयाशी मी सहमत आहे. माझा दुसरा असा मुद्दा आहे की, आताच मला माहित पडले की, आपणांस लेखी उत्तर दिले आहे. ते लेखी उत्तर फक्त महाराज भुल्लर यांनाच का देण्यात आले? जेव्हा सभागृहात लक्षवेधी सूचना मांडली जाते ती संपुर्ण सभागृहाची मिळकत होते. तेव्हा ती केवळ मांडणा—या सदस्याची राहत नाही. म्हणुन या बाबतीत जे काही उत्तर दिले जाते ते सर्व सदस्यांना दिले पाहिजे. तर मी हे विचारु इच्छितो की ते उत्तर सर्वांना प्रस्तृत का करण्यात आले नाही? फक्त महाराज भुल्लर यांच्याकडे उत्तराची प्रत आहे. आम्हांकुणाकडेही उत्तराची प्रत नाही.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर/श्री. दिलीप लालवानी :— त्या उत्तराची प्रत सर्वांना वितरीत केली जावी.

मा. सचिव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर हे आपली लक्षवेधी सूचना मागे घेवु इच्छित होते म्हणुन त्या लक्षवेधीचे उत्तर सर्व सन्माननिय सदस्यांना प्रस्तृत करण्यात आले नाही.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :—परंतु त्यांनी ती सभागृहात दिल्यामुळे ती सभागृहाची मिळकत झाली आहे ना?

मा. सचिव :— जोपर्यंत ती स्विकृत होत नाही तोपर्यंत ती सभागृहाची मिळकत झाली असे म्हणता येणार नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— त्यांना जर उत्तर दिले आहे तर ते सर्वांना वितरीत झाले पाहिजे.

मा. सचिव :— त्यांचे समाधान झाल्याने ते लक्षवेधी सूचना मागे घेवु इच्छित होते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—परंतु सभागृहाचे मत आहे की, त्या उत्तराची प्रत सर्वांना वितरीत केली जावी. मा. महापौरजी, मी जो प्रश्न उपस्थित केला होता त्यावर आपण अधिनिर्णय दया.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :— त्या उद्यानाच्या गेट बाबत शहरवाशियांची जी हरकत आहे, ती लक्षात घेता ते गेट आज सांयकाळीच उघडले पाहिजे. तसेच पुतळयाचा जो काही मुद्दा आहे तो सुध्दा आजच निकालात काढला पाहिजे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— हिरवळीवर चालण्यास मनाई केली जावु नये.

श्री. नाना रौराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—या आदेशाचे आजच पालन केले जाईल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—धन्यवाद.

**<u>मा. सचिव:—</u>**या व्यतिरिक्त ज्या दोन लक्षवेधी सूचना आल्या आहेत त्यास मा. पीठासीन अधिका—यांनी स्विकृती दिली आहे. पहिली लक्षवेधी सुचना जी आहे जीचे सुचक आहेत श्री. सतरामदास जेसवानी व अनुमोदक आहेत श्रीमती भावना खिलनानी. त्यांनी कृपया आपली लक्षवेधी सुचना मांडावी.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.....................

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक १</u>

सुचकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती भावना खिलनानी.

**विषय** :— उल्हासनगर महानगरपालिकेच्यावतीने उल्हासनगर वाशियांना मुलभुत सुविधा मिळत नसल्याने येथिल नागरीक व व्यापारी अत्यंत त्रस्त आहेत. महापालिका ठेकेदारांकडुन, जकात ठेकेदारांकडुन निवासी विभागांमध्ये, घरांमध्ये अनाधिकृतपणे दुकाने व कारखाने उभारल्याने शहरातील कित्येक शहरवाशी शहर सोडुन जाण्यास लाचार झाले आहेत.

उल्हासनगर शहर में रहते नागरीकों की यह शिकायत रही है की, शहर मे कचरे के खथे कई जगह कई दिनों तक भरे देखे जा रहे है, मच्छर मार दवाईयों का उपयोग जिस नयी मशीन टेक्टर द्वारा किया जा रहा था अब अचानक बंद किया गया देखा जा रहा है जिसे शहर में मच्छरो की समस्या बडी हुयी है, गल्लीयो में, रोडो में कुत्ते ज्यादा अंदाज में घुमते रहने से कई बार नागरीको काटने की शिकायत मिलती रही है शासकिय इस्पताल में कुत्ते काटने पर दवाईयों का, इंजेक्शनों का अभाव होनेसे भी नागरिक परेशान है, घरो के पिछे व घरो के बिच रोडो पर, अंडर ग्राउंड गटर लाईने जो महापालिका की और बनाई हुयी है चोकअप हो जाने व रखे ठेकेदार ने सही काम सही समय पर न किये जाने से नागरीका के घरों में रोडो पर गंदगी जमा व बहती नजर आ रही है । घरों व दुकानो की जमिन मालकी हक्क होते जरुरत पडने पर मरमत किये जाने की परवानगी मांग करने पर महिनो तक भटकाया जाता रहा है । शहर के व्यापारियों की यह शिकायत रही है की, बाहर से जब माल शहर में लाते है सभ जरुरी कागजपत्र बिल नियमो के तहत होने पर भी यहॉ का जकात ठेकेदार नियमों को तात् में रखकर अपने मन माने ढंग से जकात व तिघणी व चौघणी वसुल करते है व्यापारी लाचार इस अन्याय को सहन करते है । शहर के लिये पाणी भरपुर शासन की और से मंजुर कर मिला हुआ है सही अंदाज में सही समय पर नलोद्वारा पाणी यहां के नागरीको के घरो तक पहूंच पाए ऐसी व्यवस्था, ऐसा वितरण हो पाए। शहर के बडे नाले जिनसे बरसात का पाणी व पुरे वर्ष भर घरो व दुकानो का पाणी बहते रहता है व पुराने नाले कई जगह टुटे नजर आ रहे है संबंधीत अधिकारी वर्ग को बार बार लिखे जाने पर भी मरमत करना बाकी बरसात के समय इन टुटे नालो के कारण पाणी आसपास के घरो में घुसकर नागरीको के जानमाल की नुकसान होती रही है ।

इन सभी समस्याओं की महासभा में इस लक्षविधीद्वारा चर्चा कर सही व्यवस्था हो पाए सहयोग करें विनंती. धन्यवाद।

---

<u>मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>श्री. सतरामदास जेसवानीजी आपण जी लक्षवेधी सूचना मांडली आहे तिच्यामध्ये अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत. खरेतर एका लक्षवेधी सूचनेमध्ये एकच मुद्दा असला पाहिजे. आपण या लक्षवेधीमध्ये सहा—सात मुद्दे मांडले आहेत तर कृपया आपण कुठल्या तरी एकाच मुद्दयावर चर्चा करावी.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u> मा. महापौरजी, नगरसेवक जो असतो त्यास शहरातील सर्व समस्यांचे समाधान शोधायचे असते. जर आपण लक्षवेधीद्वारे एकच मुद्दा ऐकुन घेवु इच्छित असाल तर मी एकाच मुद्दयावर बोलेन बाकी विषयांवर मी हरकतीच्या मुद्दयाद्वारे बोलेन. नगरसेवक कश्यासाठी असतो? मी २००२ पासुन सारखी ओरड करत आहे. २००३ मध्ये स्पष्टपणे लिहून दिले आहे की, उल्हासनगर महानगरपालिका ही मुकी, बहिरी, नेत्रहिन महानगरपालिका आहे. आयुक्त साहेबांच्या नावाने मी पत्र दिले होते

त्याचा संपुर्ण तपशिल सचिव साहेबांकडे उपलब्ध असेल. खरोखरच मी असे लिहून दिले होते किंवा नाही? येथे जे काही नगरसेवक बसले होते त्यांनी ऐकले सुध्दा होते, पाहिले होते व अनुभवले सुध्दा होते. तर हे जे मी आता बोलणार आहे ते बराचसा अनुभव घेतल्यानंतर लाचारीने, अतिशय विवश होवून बोलत आहे. मी एक–एक मुद्दा लक्षवेधी सूचनांच्या माध्यमातुन आपणांस लिहून दिला आहे. तर मेहरबानी करुन ज्या अत्यावश्यक सुविधा आहेत त्या दिल्या जाव्यात. एक खास मुद्दा व्यापा–यांविषयीचा लिहिला आहे. जसे आमच्या श्री. भुल्लर महाराजांनी आता आताच सांगितले आहे की आम्ही जे गोल मैदान दिले आहे ते देखभाल दुरुस्तीसाठी दिले आहे. लोकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणुन देखभाल दुरुस्तीसाठी त्या संस्थेला दिले आहे. त्याच पध्दतीने जकातीचा ठेका आम्ही चांगल्या सुविधांसाठी दिलेला आहे. जेणेकरुन व्यापा–यांना चांगल्यात चांगली सेवा मिळावी. व्यापा–यांना अधिकाधिक चांगली सुविधा उपलब्ध व्हावी. मध्यवर्ती नाक्यावर लुटमार होण्यासाठी आम्ही जकातीचा ठेका दिला नाही. नियमानुसार मध्यवर्ती जकात नाक्यावर तक्रार नोंदविण्यासाठी एक तक्रार पुस्तक असले पाहिजे. जे प्रत्येक विभागामध्ये ठेवले जाते. ते पुस्तक तेथे ठेवले आहे काय? शहरातील सर्व समस्यांच्या मुद्दयांचे निवारण करण्यासाठी नगरसेवकास निवडुन दिले जाते. कुण्या एका मुद्दयाच्या निवारणासाठी आम्हांस लोकांनी निवडुन दिलेले नाही. तर मेहरबानी करुन मी जे जे काही लिहून दिले आहे त्याबाबतीत मी आणखी काही बोलु इच्छित नाही. बोलण्याची काही आवश्यकताच नाही. परंतु ज्या काही अत्यावश्यक सेवा आहेत त्या पुरविणे, नागरीकांना ज्या काही समस्या आहेत त्यांचे निवारण करणे हे आयुक्तांचे कर्तव्य आहे. एक व्यक्ती घरदुरुस्ती परवानगी मिळविण्यासाठी महानगरपालिकेमध्ये दिड दोन महिन्यापासून फे–या मारत आहे, त्याच्याकडे आवश्यक ती सर्व कागदपत्रे आहेत. त्यास घरदुरुस्ती परवानगी दिली जात नाही. यास काय महानगरपालिका म्हणायचे? यांना काय आयुक्त म्हणायचे? आपल्या आरोग्य विभागाबाबतीत मी काय लिहून आणले आहे? स्वच्छता निरीक्षकांनी वारंवार लिहून दिल्यानंतरही आयुक्त साहेब लक्ष देत नाहीत, उपायुक्त लक्ष देत नाहीत. हा काय प्रकार आहे? ही महानगरपालिका आहे की आणखी दुसरे काही आहे? विद्युत विभाग सोडुन एखादा विभाग दाखवा ज्याचे काम चांगले आहे. विद्युत विभाग सोडुन सर्वत्र अंधारच अंधार आहे. ज्या विभागामध्ये योग्य प्रकारचे काम होत आहे. असा एकतरी विभाग दाखवा. त्याचे उदाहरण म्हणुन मी आपणांस एक पत्र देत आहे. हे पहा ज्या विभागाने अतिशय सर्तक असले पाहिजे. त्या विभागामध्ये काय होत आहे ते? हे आपण पहा. स्वच्छता निरिक्षकाने आपणांस लिहून पाठविले आहे की, खत्त्यावरुन कचरा उचलला जात नाही. मच्छर मारण्यासाठी जी जंतुनाशके वापरली जात होती. ती जंतुनाशके कुठे आहेत? हा पहा चेक, चेकवर दोन–दोन अधिका–यांनी स्वाक्ष–या केल्या आहेत परंतु तारीख लिहिली आहे काय? या चेकवर तारीख नाही, महिना नाही, वर्षही नाही. आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये दोन मार्गाने पैसा येतो. त्यातील पहिला मार्ग आहे जकात विभाग, जकात विभाग आपल्या महानगरपालिकेचे अधिकारी व्यवस्थितपणे चालवु शकले नाही. म्हणुन महानगरपालिका शासन आणि प्रशासनास या विभागाचे काम खाजगी ठेकेदारास दयावे लागेल. व जो घरपट्टी विभाग आहे तो कसा चालतो तेही आपण पहा. नगरसेवकास सुरुवातीपासुन शेवटपर्यंत आपण लोकांनी भिकारी बनवुन ठेवले आहे. सकाळ झाल्यावर तो आरोग्य विभागाकडे भिक मागायला जाईल, त्यानंतर पाणी पुरवठा विभागात टॅकर मागण्यासाठी जाईल, तर हे नगरसेवक पद आहे की, भिकारी पद आहे? प्रशासन काय करत आहे? सचिव साहेब, मी आता जो आपणाकडे चेक दिला त्यावर तारीख लिहिली आहे काय? आयुक्त साहेबांना दाखवा, त्यावर दोन–दोन अधिका–यांच्या स्वाक्ष–या आहेत. म्हणजेच विद्युत विभाग सोडुन कोणत्या विभागाकडे आपल्या कामाचा प्रकाश आहे? ते मला सांगितले तर मी माझ्या जागेवर बसुन घेईन. कोणत्या विभागाकडे योग्य अशी सेवा मिळत आहे? असा कोणता विभाग आहे जो आम्हांस योग्य प्रकारची सेवा देत आहे? आमचे मन प्रसन्न करत आहे. असा एखादा विभाग सांगा. घरपट्टी विभागात अशी काही प्रकरणे आहेत की ज्यांनी एक–एक, दिड–दिड लाख रुपये घरपट्टी भरावयास पाहिजे होती ते अकराशे रुपये घरपट्टी भरत आहेत. म्हणुन मी सांगु इच्छितो की, कोणत्या विभागात योग्य प्रकारे काम सुरु आहे त्या विभागाचे नाव सांगा. आपण निवडणूकीच्या मतदार यादया पहा माझ्या घरासमोर प्रभाराम अपार्टमेंट व श्रीकृष्णा अपार्टमेंट आहे या दोन्ही इमारतीतील मतदारांची नावे मतदार यादीतुन गायब आहेत. आमचे अधिकारी काय करत आहेत? सफाई विभागातील अधिकारी काय करत आहेत? उपायुक्त–मुख्यालय काय करत आहेत? आयुक्त साहेब काय करत आहेत? याचाच अर्थ सर्वजण डोळे बंद करुन बसले आहेत, फक्त नगरसेवकाने लोकांच्या शिव्या शाप खावेत. जकात विभागाचे आता मी जे आपणांस बिल दिले ते पक्के बिल आहे त्यावर वजन लिहिलेले आहे. त्या बिलावर ९ हजार रुपये जकात जास्त घेतले जात आहे. हे ९ हजार रुपये किती व्यापार केल्यानंतर व्यापारी कमवु शकेल? तेथे जकात नाक्यावर बसलेले जे मालक आहेत ते किती उध्दटपणे बोलत आहेत आणि गुंडगिरी करत आहेत? काय त्यांना गुंडागिरी करण्याची सुट दिली आहे? आमचे व्यापारी त्यांना विकले आहेत? हे काय होत आहे? ही केवळ माझ्या एकटयाची जबाबदारी नाही. जेवढे काही नगरसेवक निवडुन आले आहेत त्या सर्वांची जबाबदारी आहे. उल्हासनगर कॅम्प ५ येथिल व्यापारी असोशिएनचा मी उपाध्यक्ष असल्यामुळे माझ्याकडे तो व्यापारी तक्रार घेवुन आला ती तक्रार मी दिली आहे. जेव्हा मी महसुल समितीचा सभापती तेव्हा मला एक टेलिग्राम मिळाला होता,

आयुक्त साहेबांना सुध्दा एक टेलिग्राम मिळाला होता, सर्व नगरसेवकांना टेलिग्राम मिळाले होते. त्यामध्ये जकात विभागामध्ये काय–काय अन्याय होत आहे हे लिहिले होते. त्या टेलिग्रामची प्रत महानगरपालिकेमध्ये आहे नसेल तर मला सांगा मी ती आणुन देईन. आम्हां नगरसेवकांना मानधन बैठक भत्ता दिला जातो. अधिकारी लोक मोठ मोठया रक्कमांचे पगार घेतात. त्यानंतरही ते काही करु शकत नाहीत? याचा खुलासा करा. मी आपणांस जकातीचे बिल दिले आहे ते जकात विभागाच्या उपायुक्तांना दाखवा त्यामध्ये किती रुपये जास्त घेतले आहेत? व ते जे बिल दिले आहे ते मान्य आहे किंवा नाही? नसेल तर त्याबाबतीत सुध्दा त्यांनी खुलासा केला पाहिजे ना? उपायुक्त जकात हे आज आले नाहीत काय? ते सुट्टीवर आहेत काय?

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> श्री. सतरामदासजी आपण आपले भाषण पुर्ण करा म्हणजे उत्तर देता येईल.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u> मी माझे भाषण पुर्ण करतो व बसुन घेतो. मी लक्षवेधीत उपस्थित केल्याप्रमाणे मुलभुत सुविधा आम्हांला उपलब्ध करुन दिल्या जाव्यात. धन्यवाद ।

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u>महापौर महोदय, आयुक्त साहेब, सचिव साहेब, श्री. सतरामदास जेसवानी यांनी येथे जो विषय उपस्थित केला आज ५ वर्षानंतर जे दु:ख आज त्यांच्या मनातुन बाहेर आले आहे. याबाबत मराठीत एक गाणे आहे, '' अरे संसार–संसार, दोन जिवांचा विचार. आधी बसतो चटका मग मिळते भाकर'' याचा अर्थ असा होतो की, कोणताही कारभार शासन आणि प्रशासन यांच्या विचाराने चालतो मग भलेही ती नगरपालिका असो, महानगरपालिका असो, विधानसभा असो किंवा लोकसभा असो, ५ वर्षे यांनी कोणत्या विचारधारेने शासन आणि प्रशासन चालविले? त्याचा अर्थ आज उघड झाला. जकातीच्या बाबतीत त्यांचे म्हणणे आहे की, ठेकेदाराकडुन जुलुम होतात, व्यापा–यांना त्रास होतो. या सर्व गोष्टी ५ वर्षापासुन होत आल्या आहेत व त्या यांनीच केल्या आहेत. जकातीचे खाजगीकरण जे झाले ते यांच्याच सत्ता कालावधीत झाले आहे. यांचे असे म्हणणे आहे की, कोणत्याही विभागाचा कारभार बरोबर नाही मग तो कर विभाग असो किंवा पाणी पुरवठा विभाग असो किंवा आरोग्य विभाग असो तर या गोष्टी यांच्या आताच कशा लक्षात आल्या हेच मला समजुन येत नाही.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u> हरकतीच्या मुद्दयांद्वारे मी बोलु इच्छितो.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u>श्री. सतरामदासजी माझे बोलणे पुर्ण होवु दया, मग आपण बोला. हे पहा, येथे आपण जेवढे काही आक्षेप नोंदविले आहेत, ज्या काही अडचणी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत त्या शासन आणि प्रशासनाच्या आहेत, विरोधी पक्षाच्या नाहीत. आम्ही ज्या वेळेस या विषयावर आवाज उठवत होतो त्यावेळेस यांनी आम्हांस सहकार्य दिले नाही. त्यावेळेस सहकार्य दिले असते तर यामध्ये सुधारणा झाल्या असत्या व अशा तक्रारी करण्याची परिस्थिती उद्भवली नसती. तर माझे असे म्हणणे आहे की, या ज्या हरकती येथे प्रस्तृत केल्या आहेत त्या फार उशिराने उपस्थित केल्या आहेत. यावर काहीही उपाय नाही. शेवटी निवडणुकीनंतर जी नविन महानगरपालिका अस्तित्वात येईल तीच यावर विचार करेल. एवढेच बोलुन मी माझे दोन शब्द संपवितो.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>हरकतीच्या मुद्दयांन्वये मी बोलु इच्छितो. आपण पहा आणि विचार करा. श्री. उमाप साहेब, सतरामदास यांनी याबाबत पहिल्यांदाच आवाज उठविला नाही. लोकांच्या ज्या समस्या आहे, त्या सोडविण्यासाठी सभागृहात जमिनीवर बसुन सतरामदास यांनीच आवाज उठविला होता. उल्हासनगर महानगरपालिकेत तसे पहिल्यांदाच झालेले असेल. २००२–२००३ पासुनचा उल्हासनगर महापालिकेचा अहवाल पाहुन तो चांगला नसल्याबाबत २००३ मध्ये श्री. पोखरकर साहेब असतांना मी त्याबाबतीत आवाज उठविला होता. उल्हासनगर महानगरपालिकेचा जो कारभार चालु आहे तो मुका, बहिरा, नेत्रहिन व अपंग महानगरपालिकेसारखा आहे. महानगरपालिकेमध्ये माझी जी पत्रे पडुन आहेत त्याची प्रत श्री. उमाप साहेब आपण घेवु शकता व आता सुध्दा मी सांगतो की, सतरादास जेसवानी यांचा अ.क्र. ६९ जो प्रभाग आरक्षित होता त्या प्रभागातुन श्रीमती मंजु ईश्वर पोपटानी या निवडून आल्या आहेत. त्यांच्यासमोर जेवढे काही उमेदवार उभे होते त्या सर्वांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. सतरामदास ही काही कमकुवत व्यक्ती नाही. सतरामदास ही सेवा कार्यात मग्न असलेली व्यक्ती आहे. माझ्या प्रभागातील लोकांचा माझ्यावर पुर्णपणे विश्वास आहे आणि त्यांचे मला सहकार्य आहे. आता मी माजी नगरसेवक फक्त नावाचा आहे. परंतु तो जो प्रभाग आहे तो अजुनही माझ्याकडेच आहे. त्या प्रभागातील समस्यांबाबत माझ्या नंतर श्रीमती मंजु ईश्वर पोपटानी या आवाज उठवत राहतील.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—**मा. महापौर महोदय, आपण धन्यवादास पात्र आहात. आपण ही लक्षवेधी स्विकृत केल्याने महापौर महोदय आपण धन्यवादास पात्र आहात व त्याही पेक्षा धन्यवादास जास्त पात्र आहेत श्री. सतरादास जेसवानी ज्यांनी ही लक्षवेधी सुचना सभागृहात मांडली. ही लक्षवेधी वाचल्यानंतर आपण म्हटलात की यातील कोणताही एक मुद्दा मांडा. तर महापौर महोदय, ही लक्षवेधी सूचना एकाच मुद्दयावर आहे आणि तो मुद्दा असा आहे की, ही महानगरपालिका आंधळी आहे. श्री. सतरामदास जेसवानी यांनी ही जी लक्षवेधी सूचना मांडली आहे त्यामध्ये त्यांनी या मुद्दयाचा समावेश केला आहे की, उल्हासनगरमध्ये लोकांना कुत्रे चावतात. त्यावेळेस त्यांना श्वानदंशावरील इंजेक्शन मिळत नाही. महानगरपालिकेच्या निवडणूकीत आम्ही हे सर्व मुद्दे उपस्थित केले होते व या अगोदरच्या महासभेत सुध्दा वारंवार हे मुद्दे उपस्थित केले होते की, उल्हासनगर मध्ये कुत्रे खुप झाले आहेत. परंतु हे कुत्रे जेव्हा चावतात तेव्हा त्यांवरील इंजेक्शने मिळत नाहीत. हे कुत्रे जेव्हा चावतात तेव्हा त्यावरील इंजेक्शन मिळत नाहीत. व मध्यवर्ती रुग्णालयातील लोक म्हणतात की, आपण ही इंजेक्शन बाहेरुन घेवुन या आम्ही टोचुन देवु. मला तर असे वाटते की, इंजेक्शन दिल्यानंतर त्यांच्या नोंदी ठेवुन ते काही गडबड करतील की काय हे सांगाता येत नाही. रेबीजची इंजेक्शन का मिळत नाहीत त्यावर आयुक्तांनी प्रकाश टाकावा. या लक्षवेधीमध्ये या मुद्दयांचाही आपण विचार केला पाहिजे ज्यांनी ज्यास स्पर्श केला नाही तो मुद्दा असा आहे की, शहरामध्ये गटाराची स्थिती काय आहे? या मुद्दयाकडे सुध्दा लक्ष दिले पाहिजे. लक्षवेधीमध्ये याचाही उल्लेख केला आहे की, शहरामध्ये किती कचरा साठला आहे, किती मच्छर झाले आहेत, किती रोगराई पसरली आहे, परंतु या मुद्दयाबाबतही आपण काहीही म्हटले नाही. महापौर महोदय, हेच मुद्दे आहेत ज्या मुद्दयांबाबत उल्हासनगरमधील लोकांनी आपला जनादेश दिला आहे. तो असा जनादेश जो सत्ताधारी पक्षाला फार मोठा झटका आहे. सत्ताधारी पक्षाची जी नैतिक जबाबदारी आहे ती पुर्ण करण्यामध्ये सत्ताधारी पक्ष निष्फळ ठरला आहे. आज आमच्या श्री. सतरादास जेसवानी यांनी म्हटले की, उल्हासनगर महानगरपालिकेतील विद्युत विभाग वगळता सर्वच विभागात अंधार आहे. विद्युत विभागाच्या या प्रकाशात हे सारे भ्रष्टाचार, अकार्यक्षमता हे सर्व स्पष्टपणे पाहिले जावु शकते. या महानगरपालिकेचे प्रशासन आंधळे, बहिरे आहे. व त्याही पुढे जावुन मी असे म्हणु इच्छितो की, मंद बुध्दिचे आहे. शहराची अशी अवस्था केल्यानंतर आणि या शहरास शेकडो कोटी रुपयाचे कर्जबाजारी केल्यानंतरही हे प्रशासन नागरीकांना नळाद्वारे पाणी देवु शकत नाही, टॅकरांद्वारे पाणी पुरवठा करत आहे. सव्वा लाख रुपये प्रतिदिन या हिशोबाने कचरा उचलण्याचा ठेका दिल्यानंतरही कचरा उचलला जात नाही. डीडीटी पावडर, काळे तेल असे न जाणे कित्येक बाबींवरील खर्च कुणाच्या खिश्यात जात आहे? प्रत्येक ठिकाणी अंधकार आणि भ्रष्टाचार या शिवाय काही दिसत नाही. महापौर महोदय, जनतेने जो जनादेश दिला आहे तो पाहता मा. महापौरांनी राजीनामा दिला पाहिजे. हा जनतेचा आवाज आहे. या १३ चौरस किलोमिटर क्षेत्रासाठी लाखो, करोडो रुपये खर्च करुन सुध्दा जे प्रशासन नागरीकांना मुलभुत नागरी सुविधा पुरवु शकत नाही व माफ करा, मी असे काही शब्द बोलत आहे, एक प्रशासन आम्हांला मुतारी देवु शकत नाही. सार्वजनिक शौचालय सुध्दा देवु शकत नाही. पिण्याचे पाणी देवु शकत नाही. कचरा उचलु शकत नाही. रुग्णवाहिका देवु शकत नाही. समजा ७—८ माळयावर आग लागली तर ती विझवु शकणार नाही कारण चार माळयाच्यावरील आग विझविण्याची क्षमता आपल्या अग्निशमन विभागाकडे नाही. आपण कोणत्या प्रकारचे शासन करीत आहात? आणि आपले अधिकारी काय करीत आहेत? या सर्व गोष्टीस कोण जबाबदार आहे? काय आम्ही या सभागृहामध्ये फक्त ओरडण्यासाठी आहोत. आता आमच्या एका सहका—याने म्हटले की, आम्हांस भिकारी समजले जाते. फरक फक्त एवढाच आहे की आमच्या हातामध्ये कटोरा नाही. भिका—यासारखी तर आमची स्थिती केली आहे? एका नगरसेवकाची मर्यादा काय असते ते आम्ही जाणतो. परंतु एका लोकप्रतिनिधीबरोबर कश्याप्रकारचे वर्तन केले पाहिजे हे आपले प्रशासन जाणत नाही. महापौर महोदय, हे जे चालले आहे त्याविरुध्द आवाजा उठवावा लागेल आणि माफ करा, आवाजाने जर भागले नाही तर आघात करावा लागेल. मग त्याचे परिणाम काय होतील हे सुध्दा आपण समजावुन घेतले पाहिजे. उल्हासनगर मधील जनता आपल्याच पक्षाच्या सदस्यांच्या लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातुन आपणांस असा प्रश्न करत आहे की या नागरी सुविधा कश्या दिल्या जातील? या महासभेस अर्ध्या तासाचा तमाशा समजले जात आहे काय? शेवटी यावर मार्ग तरी काय आहे? हे समजुन घेण्याची आपणांस आवश्यकता आहे की नाही? की आपण समजुन घेवु इच्छित नाही? आयुक्त महोदय, आपण जबाबदार पदावर बसला आहात. म्हणुन आपण थोडया जबाबदारीने काम करा. व आजच्या महासभेमध्ये जी लक्षवेधी उपस्थित करण्यात आली आहे त्यामधील मुद्दयांवर आपले प्रशासन काय करणार आहे? महासभेच्या दिवशी अर्ध्या तासाची ही कसरत करुन विसरुन जाणे हीच आजवरची आपली भूमिका राहिली आहे. व आपल्या या भुमिकेचा आम्ही जोरदारपणे निषेध करतो व आजच्या या महासभेत आम्ही अशी मागणी करतो की, मेहरबानी करुन रॅबीज इंजेक्शनचा बंदोबस्त केला जावा. शहरातील कचरा नियमितपणे उचलला जावा. फिनेल व डास मारण्याचे तेल यांची नियमितपणे फवारणी केली जावी व शहरवाशियांना मुलभुत त्या सेवा दिल्या जाव्यात. अन्यथा ज्याप्रमाणे शासनास त्यांच्या

खुर्चीवर बसण्याचा अधिकार नाही तो प्रशासनासही नाही. लोकप्रतिनिधी या नात्याने जनतेचा आवाज या लक्षवेधीच्या माध्यमातुन आपणापर्यंत पोहचवु इच्छितो. जय हिंद, जय महाराष्ट्र, जय भिम आणि जय झुलेलाल।

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>या लक्षवेधीच्या माध्यमातुन आम्ही प्रशासनाचे लक्ष वेधु इच्छितो. श्री. सतरामदास जेसवानी यांनी जी लक्षवेधी सूचना मांडली तिच्यात बरीचशी सत्यता आहे. जेथपर्यंत प्रशासनाचा मुद्दा आहे, महानगरपालिकेतील प्रशासन ठप्प झाले आहे, यामध्ये कोणतेही दुमत नाही. जे अधिकारी आहेत ते वेळेवर महापालिकेत येत नाहीत. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा अधिका–यांनी आदर ठेवला पाहिजे व त्यांच्याशी सन्मानपुर्वक वर्तन केले पाहिजे. म्हणून मी सर्व अधिका–यांना सांगु इच्छितो की, त्यांनी याबाबत दुस–या महापालिकेमध्ये जावुन पाहणी करावी तेथे अधिका–यांकडुन लोकप्रतिनिधींना कश्याप्रकारची वागणुक दिली जात आहे याबाबीकडे सुध्दा लक्ष दिले जावे. या व्यतिरिक्त श्री. सतरामदास जेसवानी यांनी या लक्षवेधीमध्ये ज्या काही शिफारशी केल्या आहेत त्याबाबतीत आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ असलेल्या अतिरिक्त आयुक्त यांना मी आदेश देतो की, या बाबत सर्व सन्माननिय सदस्यांना पुढील महासभेत लेखी उत्तर दिले जावे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>उत्तराबरोबरच कार्यवाही सुध्दा झाली पाहिजे.

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>श्री. दिलीप लालवानी यांनी म्हटल्याप्रमाणे रेबिजची इंजेक्शने कुठेही उपलब्ध नाहीत. गरीब लोक त्यासाठी भटकत आहेत. आज रेबिजची इंजेक्शने खरेदी करण्याची महानगरपालिकेची आर्थिक स्थिती नाही का? रेबिजची इंजेक्शने लवकरात लवकर खरेदी केली जावीत. व या लक्षवेधीमध्ये श्री. सतरामदास जेसवानी यांनी जे–जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबाबत पुढील महासभेत सर्व सदस्यांना लेखी उत्तरे दिली जावीत.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>महापौर महोदय, सन्माननिय महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी जे आदेश दिले होते जसे की, अंत्यविधीसाठी गरीबांना मोफत लाकडांचा पुरवठा. असा आदेश असतांना सुध्दा प्रशासन डोळे बंद करुन बसले आहे. त्या आदेशाची अंमलबजावणी व्हावी यासाठी सर्व संबंधीतांना ताकिद देण्यात यावी. अत्यावश्यक सेवांबाबत सर्व विभागप्रमुखांना आयुक्तांनी त्वरीत आदेश दिले पाहिजेत याबाबतीत आपण त्यांना आदेश दया.

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>होय, मी याबाबत अतिरिक्त आयुक्तांना आदेश देतो की, या अगोदरच्या महासभांमध्ये जे काही निर्णय झाले आहे त्यांची लवकरात लवकर अंमलबजावणी झाली पाहिजे. याबाबतीत अतिरिक्त आयुक्तांनी खुलासा करावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>खुलासा करण्याअगोदर एक गोष्ट लक्षात घ्या, आज रेबिजचा हा जो मुद्दा उपस्थित झाला याबाबत श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी मुद्दा मांडला होता त्यानंतर किती इंजेक्शन खरेदी केली? किती वापरली? आणि किती शिल्लक आहेत? याबाबतीत जरा माहिती दया.

<u>डॉ. के.आर. खरात (वैदयकीय आरोग्य अधिकारी):–</u>मा. महापौरजी, .......

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>आपण जे आश्वासन दयाल त्याची पुर्तता होईल ना? की हे सुध्दा एक आश्वासनच राहिल?

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>जकात विभागाच्या उपायुक्तांना माहिती देण्यास सांगा की जकात नाक्यावर एक तक्रार नोंद, रजिस्टर ठेवले जावे. तसेच मी आपणांस एक बिल दिले आहे ते पाहुन त्याबाबतीत त्यांनी निर्णय दिला पाहिजे. या बिलाबाबत किती जकात रक्कम भरली पाहिजे? त्याच्याकडुन जी जकात जास्त घेण्यात आली आहे ती कशी परत करणार? त्याची सुध्दा माहिती दिली जावी.

<u>डॉ. के.आर. खरात (वैदयकीय आरोग्य अधिकारी):–</u>रेबिज इंजेक्शनसाठी शासनाचा दर प्रती इंजेक्शन २७० रुपये असा आहे. व बाजारात याच इंजेक्शनची किंमत ३३० रुपये आहे. यामुळे कंपनीमध्ये या इंजेक्शनाची जेवढी निर्मीती होते ती सर्व इंजेक्शने स्थानिक बाजारपेठेत विक्रीसाठी ठेवली जातात. मागील महिन्यामध्ये आम्ही तीन वेळा कंपनीकडे इंजेक्शनाची मागणी करुनही त्यांनी आपणांस इंजेक्शनचा पुरवठा केला नाही. यासाठी

आता निविदा मागवुन इंजेक्शने खरेदी करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्या प्रस्तावास मान्यता मिळताच टेंडर मागवुन इंजेक्शने मागविली जातील. धन्यवाद.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– हे पहा, या अगोदरसुध्दा निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु ठेकेदाराने इंजेक्शने पुरविली नाहीत. त्याचे कारण काय होते? तो सर्वात लघुत्तम दराचा निविदाकार होता. न्युनत्तम दराचा निविदाकार होता त्याने इंजेक्शने पुरविली नाहीत त्याच्या बाबतीत डॉक्टर साहेब तुम्ही खुलासा करा.

डॉ. के.आर. खरात (वैदयकीय आरोग्य अधिकारी):–त्या ठेकेदारास सुध्दा आम्ही पत्र दिले आहे की यानंतर जेव्हा कधी आमच्याकडुन निविदा निघतील तेव्हा आपली निविदा स्विकृत केली जाणार नाही.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– नाही, त्यांच्यावर आपण कारवाई काय करणार? त्यांनी कमी दराची निविदा भरली होती परंतु त्याने इंजेक्शनाचा पुरवठा केला नाही. कारण त्याने निविदेमध्ये खुपच कमी दर लिहिले होते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–इंजेक्शनाचा पुरवठा न करता लोकांच्या जिविताशी खेळणा–या लोकांचा केवळ ठेका स्विकृत न करता त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. त्यांना काळया यादीमध्ये का टाकत नाहीत? बिल देण्यासाठी त्यास मोकळे ठेवले आहे काय? याचा खुलासा करावा.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– अशा ठेकेदारास महापालिकेने कामच देता कामा नये.

डॉ. के.आर. खरात (वैदयकीय आरोग्य अधिकारी):–त्यांना काळया यादीत टाकु. शिवाय त्यांची निविदाही स्विकृत करणार नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–मागच्या वेळेस निविदा भरणा–या त्या निविदाकाराचे नाव काय आहे ते लोकांना समजु दया.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :–मागच्या वेळेस या कामी निविदा कोणी भरली होती त्या निविदाकाराचे नाव सांगा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–त्याची अर्नेस्ट मनी आपण परत केली आहे काय? ही अतिशय गंभीर अशी बाब आहे. त्याने निविदा भरली इंजेक्शनचा पुरवठा केला नाही तर...................

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–त्याची अनामत रक्कम त्यास परत केली आहे काय?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–त्या निविदाकाराचे नाव सांगा, आपण ते लपवित आहात, काही सेटिंग आहे काय?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–त्या निविदाकाराचे अनामत रक्कम परत केली आहे काय? आपण ती जर परत केली असेल तर आपणावर कारवाई झाली पाहिजे.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:–निविदाकाराचे नाव सांगा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–सभागृहाच्या भावनांशी खेळत आहात काय? की येथे मजाक–मस्करी करण्यासाठी आला आहात? निविदाकाराचे नाव सांगा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–मा. महापौर, आयुक्त साहेब या अधिका–यांची आता आम्हांला लाज वाटु लागली आहे. डॉक्टर साहेब, अडचण काय आहे? या रेबिजचा प्रश्न या सभागृहामध्ये एवढा गाजला, त्याचा निविदाकार कोण आहे? त्याचे नाव सुध्दा लक्षात नाही? कनिष्ठ स्तरावरील सफाई कामगार वगैरे अशा कुणाला आम्ही विचारत नाही? तुम्ही एक वरीष्ठ अधिकारी आहात तुम्हांस आम्ही हा प्रश्न विचारत आहोत.

मा. सदस्या श्रीमती मीना सोंडे :—फाईल आताच मागवुन घ्याव्यात आणि उत्तर लवकरात लवकर दयावे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—फाईल आताच मागवा. तुम्ही गंभीरतेने घेंत नाहीत काय? नक्की काय गौडबंगाल आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—यांनी त्यांना कार्यादेश दिले होते काय? हे त्यांना विचारा. यांनी त्यांना कार्यादेशच दिलेले नव्हते. तर तो मालाचा पुरवठा कसा करेल? अशा या माणसाची महापालिकेतुन हाकालपट्टी झाली पाहिजे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—गंभीरतेने घेत नाहीत. जबाबदारीची जाणीव नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— खुलासा केला जावा व दिघे साहेबांनी कृपया व्यासपिठावर यावे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—त्यांना कार्यादेश दिला आहे काय? महासभा झाल्यावर सर्व सदयांना कार्यादेशाची प्रत दया. ही सभा त्यानंतरच संपेल. कार्यादेशाची प्रत पाहिल्यानंतरच महासभा संपेल.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—निविदा मागविता की असाच टेबलाखालुन व्यवहार चालतो?

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—लोकांच्या जीवीताशी खेळण्यास येथे आला आहेत काय? सर्व उल्हासनगरवाशियांना मारायचे आहे काय?

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—सर्वच विभागामध्ये अशाच प्रकारचा घोटाळा चालु आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— हा मुद्दा अतिशय गंभीर आहे.

डॉ. खरात (वैद्यकीय अधिकारी):— महापौर महोदय, माझ्या विभागात फक्त एकच लिपिक कार्यरत आहे व नुकतेच काही दिवसापुर्वी त्याच्या भावाचा अपघात झाल्याने तो रुग्णालयात गेला आहे. गेल्या दोन दिवसापासुन तो गैरहजर आहे. त्यामुळे येथे फाईल मागवुन तुम्हांला आजच्या आज उत्तर देणे शक्य नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आम्ही आपणांस चार दिवसाची वेळ देण्यास तयार आहोत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—यापेक्षा आरोग्य विभाग बंद करा, बंद करा तो विभाग त्या विभागाचा काही उपयोग नाही.

मा. सदस्या श्रीमती निना नाथानी व श्रीमती निता अहुजा सभागृहातुन बाहेर गेल्या.

श्री. नाना रैराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—डॉ. खरात यांच्या विषयीचा आपला जो मुद्दा आहे, त्या संदर्भात आपण जे काही प्रश्न उपस्थित केले आहे त्या अनुषंगाने संपुर्ण माहिती आपणांस उपलब्ध करुन देण्यात येईल. परंतु आज त्यांच्याकडे नस्ती शोधण्यासाठी लिपिक नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—नाही, नाही हे चुकीचे आहे.

श्री. नाना रैराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):— त्यांच्याकडे लिपिक नसल्यामुळे आज फाईल शोधणे कठिण जाईल आणि आपण जे म्हणत आहात ती संपुर्ण माहिती आपणांस लेखी उपलब्ध करुन देण्यात येईल. आपण जे म्हणत आहात ती माहिती पुढील महासभेत उपलब्ध करुन देण्यात येईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आपण त्यांना कार्यादेश दिले होते का? यांनी कार्यादेश दिले नाहीत? पुढील महासभेच्या अगोदर आम्हांस याबाबतीत माहिती मिळाली पाहिजे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—पुढील महासभा एक महिन्याने होईल तोपर्यंत असेच राहायचे काय? त्यांची अनामत रक्कम परत दिली काय?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— कुत्रा चावल्यामुळे जर कोणी निधन पावले तर त्याबाबतीत यांच्यावर भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात यावा.

श्री. नाना रौराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):— आज त्यांच्याकडे फाईल शोधणे त्यांच्याकडे लिपिक नसल्यामुळे पुढील महासभेत आपणांस याबाबतीत संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—पुढील महासभेस एक महिना आहे. या दरम्यान कुणास कुत्रा चावुन जर तो निधन पावला तर त्याबाबतीत यांच्यावर कलम ३०२ खाली गुन्हा दाखल झाला पाहिजे.

श्री. नाना रौराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):— निविदेची प्रक्रिया चालु आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आयुक्त साहेब, महापौर महोदय, मागील एका वेळेस या विषयावर चर्चा झाली होती. त्यावेळेस त्यांनी जे उत्तर दिले होते ते चुकीचे होते. महासभेची दिशाभुल केली, आणि आता असे जर असेल तर त्यावेळचे त्यांचे म्हणणे चुकीचे होते.

डॉ. खरात (वैद्यकीय अधिकारी):—त्यावेळेस जी इंजेक्शने आली होती ती मध्यवर्ती रुग्णालयाकडुन आली होती, म्हणजेच शासनाकडुन आली होती. आपल्या महानगरपालिकेच्या वतीने खरेदी करण्यात आलेली नव्हती.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—महापालिकेच्यावतीने ही इंजेक्शने मागविली जातील असे आपण म्हटले होते. व त्यावेळी आयुक्त साहेबांनी सुध्दा सहमती दर्शविली होती व म्हटले होते की, आम्ही ही इंजेक्शने मागविली आहेत. व ती मध्यवर्ती रुग्णालयास पुरवु. मागील महासभेचे आपण इतिवृत्त काढुन वाचा.

डॉ. खरात (वैद्यकीय अधिकारी):—मागणी नोंदविली होती. दोन वेळेस मागणी नोंदवुनही कंपनीने त्या इंजेक्शनाचा आपणांस पुरवठा केला नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—दोन वेळा निविदा भरल्यानंतर व कार्यादेश दिल्यानंतर सुध्दा त्या कंपनीचे नाव आपणांस आठवत नाही? आपण वैद्यकीय अधिकारी आहात.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—शंकपुष्पी कॅप्सुल घ्या.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—मागील वेळेस या विषयावर जो आवाज उठविण्यात आला होता त्यावेळेस आपण हे प्रकरण गंभीरतेने घेतले नाही.

डॉ. खरात (वैद्यकीय अधिकारी):—शासनाची निविदा ॲव्हेन्टी या कंपनीस मिळाली आहे. ॲव्हेन्टी कंपनीकडे दोन वेळा मागणी नोंदवुनही त्यांनी मालाचा पुरवठा केला नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— ज्या कंपनीने निविदा भरली होती त्या कंपनीस आपण कार्यादेश दिला होता काय?

डॉ. खरात (वैद्यकीय अधिकारी):—होय.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—तुम्ही जो पगार घेता त्याचे काहीतरी बाळगा ना?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आयुक्त साहेब, याबाबतची फाईल आजच आपण आपल्या ताब्यात घ्या. नाहीतर हे मागील तारखेचा कार्यादेश तयार करुन त्या फाईलमध्ये टाकतील.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—** व्यासपिठावर बसुन आपण खोटे बोलु नका. खरे तेच बोला. सभागृहाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न करु नका.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—**मला वाटते या विषयामध्ये घोटाळा आहे. हे बरोबर उत्तर देवु शकत नाहीत. यांना निविदाकाराचे नाव माहित नाही. अनामत रक्कम परत केली आहे किंवा नाही हे सुध्दा यांना माहित नाही. मला असे वाटते की, हा मुद्दा गंभीरतेने घेतला जावा. वयाबाबतची जी फाईल आहे ती अतिरिक्त आयुक्तांनी ताब्यात घ्यावी. यांचे दालन सिलबंद करावे व चौकशी करुन संपुर्ण अहवाल सभागृहासमोर आला पाहिजे. याबाबत महापौर महोदय, आपण अतिरिक्त आयुक्तांना आदेश दया.

**मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**श्री. लाल पंजाबीजी माझी अशी सुचना आहे की, हा अतिशय गंभीर असा विषय आहे याबाबत श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी हा विषय सभागृहामध्ये मांडला होता. हा अतिशय गंभीर असा विषय आहे. मला असे वाटते की, याबाबतीत चौकशी करण्यासाठी एक सर्व दलिय चौकशी समिती नेमली जावी. सर्व गटनेते, सभागृह नेता यांची एक समिती तयार करु.

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—** महापौर महोदय, जकात विभागाच्या उपायुक्तांना बोलवा.

**मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**जकातीची जी आपण पावती दिली होती, त्याबाबतीत आपले जे म्हणणे होते की, व्यापा—याकडुन जकातीची जी रक्कम घेण्यात आली आहे ती पावती मी अतिरिक्त आयुक्तांना दिली आहे. अतिरिक्त आयुक्त स्वत: चौकशी करुन आपणांस अहवाल देतील.

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—** धन्यवाद ।

**मा. सचिव:—**लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. किशोर वनवारी व अनुमोदक आहेत श्री. दिलीप लालवानी.

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

**सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप लालवानी**

**विषय :—** श्री. युवराज भदाणे यांच्या नियुक्तीबाबत.

श्री. युवराज भदाणे यांना शैक्षणिक अर्हता व पर्याप्त अनुभव नसून त्यांना तात्पूर्ती जनसंपर्क अधिकारी या पदावर नमेणुक करणेत आली. त्यांना नंतर त्यांचे काम समाधानकारक नसून त्यांची परिविक्षाधीन कालावधी (Probation Period) दोन वर्षापर्यंत वाढविण्यात आले.

उल्हासनगर—१ पोलिस स्टेशनात त्याचे विरुध्द काही गंभीर गुन्हे दाखल असून त्याबाबत प्रशासनाने चौकशी न करता, त्यांना थेट कामावर रुजु करणेत आहे. या व्यतिरिक्त त्यांच्या विरुध्द काही महिला कर्मचा—यांनी अश्लील गैरवर्तन बाबत तक्रारी केली असून त्याची चौकशी जाणिवपुर्वक प्रशासन टाळत आहे. कारण त्यांना आयुक्तांचा भरपूर पाठिंबा आहे.

नुकतेच त्यांना श्री. काटे हयांच्या जागी अतिरिक्त प्रभाग अधिकारी म्हणून कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

वरील पार्श्वभूमि पाहता व त्यांचा परिविक्षाधीन कालावधी (Probation Period) संपल्यानंतर त्यांना सेवेत का ठेवण्यात आले?

वरील बाबी करीता प्रशासनाने सविस्तर खुलासा घ्यावा.

---

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मा. महापौरजी, मी जी लक्षवेधी सूचना मांडली आहे ती सर्व सभागृहासमोर आहे. तिच्याबाबतीत खुलासा झाला पाहिजे व त्याबाबतीत लेखी उत्तर मिळाले पाहिजे. त्या लक्षवेधीमध्ये लिहिले आहे की, चौकशी झाली पाहिजे. या बाबतीत आयुक्तांनी खुलासा करावा व लेखी उत्तर मिळाले पाहिजे.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—श्री. बागेश्वर साहेब, आपण या लक्षवेधीचे उत्तर दयावे.

श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त, मुख्यालय):—मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य महोदयांनी जी लक्षवेधी सूचना दिली आहे. श्री. युवराज भदाणे यांची चौकशी चालु आहे. त्यांच्याबाबतीत महिलांनी जी तक्रार केली होती, त्याबाबतीत मा. अतिरिक्त आयुक्त हे चौकशी करत आहेत. व दुसरे असे की, पोलिस ठाण्यामध्ये त्यांच्यावर जे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याचे म्हटले आहे. याबाबतीत पोलिस स्टेशनला चौकशी केली जाईल व त्यांचा जो अहवाल येईल त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—आता तर त्यांची प्रभाग अधिकारी म्हणुन नेमणुक केली आहे? त्यांना त्या पदावरुन हटविले जावे.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—श्री. विनोद ठाकुरजी प्रथम श्री. बागेश्वर साहेबांना याबाबतीत खुलासा करु दया.

श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त, मुख्यालय):—सन्माननिय सदस्य महोदयांनी आता जो प्रश्न उपस्थित केला आहे की श्री. भदाणे यांना अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे. प्रभाग क्र. ३ चे जे प्रभाग अधिकारी होते श्री. काटे यांना मा. आयुक्त महोदयांनी कार्यमुक्त केले आहे. व त्यांच्या जागेचा व पदाचा कार्यभार श्री. भदाणे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार म्हणुन सोपविला आहे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—त्यांच्यावर गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल आहे. अशा व्यक्तीस आपण अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे. अगोदरच ते त्यांच्या पदाचे काम बरोबर करत नाहीत असे असतांना आपण त्यांच्याकडे दुसरा पदभार सोपविला आहे.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सर्वात प्रथम त्यांची जी नेमणुक आहे ती महासभेच्या मंजुरीविना केली आहे काय? प्रथम तर या मुद्दयाचा खुलासा झाला पाहिजे ना?

श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त, मुख्यालय):—अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे. त्याबाबतीत मा. आयुक्त महोदयांनी निर्णय घेतला आहे. त्यासाठी महासभेच्या मंजुरीची आवश्यकता नाही. कारण की हा अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—अतिरिक्त कार्यभाराबाबत नाही, त्यांचे जे पद आहे, त्यास अगोदर सहा महिने पुर्ण झाले होते. त्यानंतर जी मुदत वाढविण्यात आली. ती महासभेच्या मंजुरीविना वाढविली काय? व त्यास महासभेच्या मंजुरीची आवश्यकता नाही काय? महासभेची मंजुरी पाहिजे किंवा नाही? नेमके काय?

श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त, मुख्यालय):—मा. महापौरजी, श्री. भदाणे यांचा जो परिविक्षाधीन कालावधी होता. तो दोन वर्षाचा होता. व तो नोव्हेंबर मध्ये समाप्त झाला आहे.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—कायम करण्यासाठी महासभेपुढे आला पाहिजे ना?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आपण काय म्हणत आहात? प्रथम त्यांची सहा महिन्यासाठी नियुक्ती केली होती. त्यानंतर आपण त्यांना मुदतवाढ दिली होती ना.? श्री. भदाणे यांना नेमणुकीचा पहिला आदेश किती महिन्यासाठी दिला होता? जेव्हा आपण त्यांची नेमणुक केली तेव्हा आपण ती सहा महिन्यासाठी केली होती. ना ?

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :— त्यानंतरचा आदेश कायम करण्यासाठी महासभेपुढे आला पाहिजे ना?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—पहिल्या नेमणुकीचे सहा महिने कधी पुर्ण झाले? पहिली जी नेमणुक आपण त्यांना दिली ती किती कालावधीसाठी दिली? सहा महिन्यासाठी की सहा वर्षासाठी? ते प्रथम सांगा. सहा महिन्यानंतर जर मुदतवाढ होत असेल तर त्यास महासभेची मंजुरी पाहिजे किंवा नाही?

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—मी अतिरिक्त आयुक्तांना आदेश देतो की, यांच्या कायमतेचा जो प्रस्ताव येणार आहे तो येणा—या महासभेपुढे आणला जावा. तसेच त्यांच्या विरुध्द जी चौकशी चालु आहे ती सुध्दा पुर्ण करुन तिचा अहवाल पुढील महासभेत आणला जावा.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:—जनसंपर्क अधिकारी कोणत्या संवर्गात येतो? त्यांची शैक्षणीक पात्रता काय असली पाहिजे? त्यांना कोणता अनुभव असला पाहिजे?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—त्यांच्या नियुक्तीची तारीख काय आहे?

श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त, मुख्यालय):—मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य महोदयांनी जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर माझ्याकडे नाही. याबाबत पुर्ण चौकशी करुन मी सभागृहासमोर ठेवेन.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आपणांस हे तर माहित असेल ना? त्याची नेमणुक कधी केली आहे? आपण म्हणता की नोव्हेंबर महिन्यामध्ये त्यांचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झाला? आपण म्हणता नोव्हेंबरमध्ये कालावधी पुर्ण झाला हा जो कालावधी आहे तो सहा महिन्याचा आहे की दोन वर्षाचा आहे?

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—आपण मुख्यालयाचे उपायुक्त आहात ना?

श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त, मुख्यालय):—मा. महापौरजी, अदयापपर्यंत परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झालेला नाही. परिविक्षाधीन कालावधी दोन वर्षाचा आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—परिविक्षाधीन कालावधी सहा महिन्याचा असतो आपण दोन वर्ष कसे म्हणालात?

श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त, मुख्यालय):—सेवेत कायम करतांना परिविक्षाधीन कालावधी दोन वर्षाचा असतो.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :—परिविक्षाधीन कालावधी एकतर एक वर्षाचा असतो नाहीतर सहा महिन्याचा असतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— नियुक्तीस मुदतवाढ देण्याचा अधिकार आयुक्तांना आहे काय? सहा महिन्यानंतर महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्ताव आणावा लागतो तो आपण आणला काय? ते सांगा.

मा. सचिव :—श्री. भदाणे यांना प्रथम जी नियुक्ती दिली होती ती आयुक्तांनी सहा महिन्यासाठी दिली होती. त्यानंतर या महासभेमध्ये एक प्रस्ताव आला होता त्यांना दोन वर्षासाठी परिविक्षाधीन कालावधीवर ठेवण्याबाबतचा. त्याबाबत याच महासभेने ठराव केला होता. दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाला आहे. पुढील जी काही कार्यवाही करायची आहे ती यांनी करायची आहे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—त्यांना दोन्ही पदावरुन हटविण्यात यावे. ज्या व्यक्तीवर पोलिस स्टेशनमध्ये गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत अशा व्यक्तीस पदावरुन हटविले जावे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आता आपण काय करत आहात? नोव्हेंबरमध्ये त्यांचा कालावधी समाप्त झाला. आता फेब्रुवारी चालु आहे, आतापर्यंत आपण काय केले? तीन महिन्यामध्ये आपण काय केले? यापुढे आपण काय करणार आहात?

श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त, मुख्यालय):—मा. महापौरजी, त्यांचा परिविक्षाधीन कालावधी नोव्हेंबरमध्ये पुर्ण झाला आहे. त्यांच्या विरोधात चौकशी चालु आहे, चौकशी पुर्ण झाल्यानंतरच त्यांच्याबाबतीत कार्यवाही केली जाईल.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. महापौरजी, तोपर्यंत त्यांना दोन्ही पदांवरुन हटविले जावे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— जर त्यांची चौकशी चालु आहे तर त्यांना प्रभाग अधिका—याचा अतिरिक्त कार्यभार कसा दिला? त्यांची चौकशी चालु आहे असे आपण स्वत: सांगता आणि चौकशी चालु असलेल्या अधिका—याकडे दोन—दोन पदे? हे आपण कसे केले?

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—त्यांना दोन्ही पदांवरुन हटविले जावे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—नोव्हेंबर मध्ये त्यांचा कालावधी पुर्ण झाला तेव्हा त्यास ठेवायचे होते किंवा काढायचे होते? ते आपण सांगा? ते आपण केले नाही. नोव्हेंबर ते फेब्रुवारी या तीन महिन्याच्या दरम्यान आपण त्यांना दुस—या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिला. सद्या त्यांच्याकडे दोन—दोन कार्यभार आहेत.ज्या व्यक्तीची चौकशी चालु आहे त्यांच्याकडे दोन—दोन पदाचे कार्यभार?

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—त्यांच्या विरोधात एक महिला कर्मचारी तक्रार करते. अशा अधिका—यास आपण आणखी एक पदभार देता? म्हणुन त्यांना दोन्हीही पदांवरुन हटविले जावे. त्वरीत आदेश दया आणि त्यांना दोन्ही पदांवरुन हटविले जावे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:—मा. महापौरजी, मी असे सांगु इच्छितो की, श्री. बागेश्वर साहेब हे मुख्यालयाचे प्रमुख आहते. एका अधिका—याचा नोव्हेंबर मध्ये कालावधी पुर्ण होतो व तो अधिकारी सलगपणे सेवेत राहतो असे कसे? व त्यानंतर आयुक्त साहेब त्यांना आणखी अतिरिक्त कार्यभार देतात, तर असे कसे? हे काही मला समजुन आले नाही. मला असे वाटते की, हे जे काही कामकाज चालले आहे ते बरोबर नाही. यामध्ये चुका आहेत. असे किती अधिकारी आहेत? आजच्या तारखेला असे किती अधिकारी व कर्मचारी आहेत ज्यांचा कालावधी पुर्ण झाला आहे तरीही ते सलग सेवेमध्ये आहेत, याची चौकशी झाली पाहिजे.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :— बागेश्वर साहेब, सर्वात प्रथम तर यांना प्रभाग समिती क्र. ३ चे प्रभाग अधिकारी म्हणुन अतिरिक्त कार्यभार दिला आहे. ते प्रभाग अधिकारी बनु शकतात काय? तेवढी शैक्षणिक अर्हता त्यांच्याकडे आहे काय?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— ही पदोन्नती देण्यामागे कारण काय?

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—एक अधिकारी एका महिल्याबरोबर अश्लिल हावभाव करतो. आणि हे सर्व माहित असतांनाही त्यांना प्रभाग अधिका—याचा अतिरिक्त कार्यभार दिला जातो. म्हणजे महिलांचा अपमान आहे ना?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—मा. महापौरजी, माझे आपणांस निवेदन आहे की, मा. आयुक्तांनी त्यांना जो काही अतिरिक्त कार्यभार दिला आहे तो त्यांनी कोणत्या आधारावर दिला आहे? यासाठी आयुक्त साहेब आल्यानंतरच या बाबतीत निर्णय घेतला जावा अशी माझी विनंती आहे.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा.महापौरजी, येथे असा एक ठराव पारीत केला जावा की, त्यांना आताच्या आता नोकरीवरुन कमी केले जावे. त्यांचा कालावधी नोव्हेंबरमध्ये समाप्त झाला आहे. जसे की, एखादा नगरसेवक निवडुन आला नाही तर तो एप्रिल नंतर सभागृहात येवु शकत नाही. तसेच यांचा कालावधी जर नोव्हेंबर मध्ये पुर्ण झाला असेल तर यांना नोकरीवरुन काढुन टाका.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:—जनसंपर्क अधिकारी या पदावर कार्यरत असतांना महिलेची छेड काढणा—या अधिका—यास महिलांची आणखी छेड काढण्यासाठी कार्यभार दिला आहे काय?

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– सर्वात प्रथम तर त्यांची प्रभाग अधिकारी म्हणुन नियुक्ती होता कामा नये. दुसरी गोष्ट अशी की त्यांच्या विरोधात जी चौकशी चालु आहे..........

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :–तो पर्यंत त्यांना घरी बसवा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–हे तर पहा की त्यांच्या बाजुने कोणी आहे की नाही? ते तरी पाहिले जावे.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :–नाहीतर त्यांना बिन खात्याचा अधिकारी म्हणुन ठेवले जावे.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– यांच्या विरोधात जी चौकशी चालु आहे तिचा अहवाल व यांच्या कायमते बाबतचा प्रस्ताव पुढील महासभेत आणला जावा.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :–प्रभाग समिती क्र. ३ च्या प्रभाग अधिका–याचा त्यांच्याकडील कार्यभार काढुन घेतला जावा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी/श्री. विनोद ठाकुर :– प्रभाग समिती क्र. ३ च्या प्रभाग अधिका–याचा त्यांच्याकडील कार्यभार काढुन घेतला जावा.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– प्रभाग समितीचा कार्यभार काढुन घेतला जाईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–कालावधी पुर्ण झाल्यानंतर त्यांना पगार कसा मिळत आहे?

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :–मा. महापौर, आता आपण जो आदेश दिला आहे त्याचे पालन झाले पाहिजे.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– बिल्कुल होईल, आता होईल.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :–आता होईल? खुलासा करा.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, इथे बसलेले सर्व सन्माननिय सदस्य, श्री. युवराज भदाणे, पीआरओ, पब्लीक रिलेशन ऑफीसर यांच्या संदर्भात आज जी लक्षवेधी सूचना आलेली आहे त्या लक्षवेधी सूचनेमुळे या महानगरपालिकेचे एक चित्र स्पष्ट झाले आहे. संपुर्ण ठाणे जिल्हयामध्ये, अंबरनाथ सारख्या नगरपालिकेत सुध्दा पब्लीक रिलेशन ऑफीसर, पीआरओ हा पत्रकारांना कश्या पध्दतीने वागणुक देतो, साध्या ग्रामपंचायतीमध्ये जरी गेलात तरी तेथे पत्रकारांना कश्याप्रकारची वागणूक दिली जाते, हे जर तुम्ही पाहिले तर संपुर्ण ठाणे जिल्हयातील पत्रकारांमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेची प्रतिमा खराब आहे. आणि हाच मुद्दा गेल्या दोन–चार वर्षामध्ये आम्ही वारंवार उचलला. या उल्हासनगर महानगरपालिकेच्या इमारतीतील पत्रकार कक्ष जर तुम्ही बघितला त्या कक्षात जर बाहेरचे लोक जर भेटायला आले तर महानगरपालिकेची स्थिती किती खराब आहे हे चित्र लोकांच्या लक्षात येईल. आणि म्हणुन माझी पहिली विनंती अशी आहे की, पत्रकार कक्ष अद्यायावत असावा. त्यांना फॅक्सच्या आणि इतर सुविधा ताबडतोब आणि चांगल्या पध्दतीने पुरविण्यात याव्यात. तसेच पब्लीक रिलेशन ऑफिसरने सुध्दा त्यांच्याशी सतत संपर्कात राहून आपल्या महानगरपालिकेची होणारी वाटचाल त्या पत्रकारांपर्यंत पोहचवावी. एवढी एक माफक अपेक्षा जनसंपर्क अधिका–यांकडुन असते.आणि म्हणुन या लक्षवेधी सुचनेद्वारे श्री. भदाणे यांच्यावर जे आरोप झाले आहेत त्याची रितसर चौकशी होवुन ताबडतोब त्यावर कारवाई करावी. तसेच या महानगरपालिकेच्या महासभेत जे महापौर बसले आहेत त्यांनी ताबडतोब पत्रकार कक्ष अद्यावत करण्याचे आदेश आयुक्तांना दयावेत धन्यवाद ।

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–मा. महापौरजी, मी जो प्रश्न उपस्थित केला होता, नोव्हेंबर पासुन आजपर्यंत श्री. भदाणे यांना पगार कसा मिळत आहे? कुणाच्या सांगण्यावरुन मिळत आहे? जेव्हा त्यांचा कालावधी पुर्ण झाला आहे.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– हे पहा, याबाबत मी खुलासा करतो. एकतर यांच्या विरोधात जी चौकशी चालु आहे व यांची नेमणुक कायम करण्याचा प्रस्ताव महासभेत आलेला नाही. पुढील महासभेत चौकशीचा अहवाल व कायमतेचा प्रस्ताव आला पाहिजे.

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–**मा. महापौरजी, मी आपणांस एक विचारु इच्छितो की, ज्या कर्मचा–याच्या नेमणुकीची मुदत नोव्हेंबरमध्ये पुर्ण झाली आहे, त्यास सेवेमध्ये राहण्याची परवानगी कोणी दिली? आजपर्यंत तीन महिने तो सेवेत कसा आहे? त्यास पगार कसा मिळतो. असे होते का नोव्हेंबर मध्ये नियुक्ती कालावधी संपल्यानंतरही आजपर्यंत फेब्रुवारी पर्यंत तो कामावर सलगपणे आहे व त्यास पगार दिला जातो. त्यास आजपर्यंत कामावर कोणी ठेवले?

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–**मा. महापौरजी, ही जी लक्षवेधी मांडली आहे ती मी मांडली आहे. या लक्षवेधीबाबत आपण जो निर्णय दिला. आमचे मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचे म्हणणे सुध्दा बरोबर आहे. आजच्या परिस्थितीत आदेशाविना कुणीही कोणत्याही खुर्चीवर बसु शकत नाही. जसे श्री. मोहन साधवानी यांनी सांगितले की, आज जे नगरसेवक निवडणूका हारले आहेत ते एप्रिलमध्ये पुन्हा येवु शकतात काय? बिल्कुल येवु शकत नाहीत. त्याचप्रकारे ज्या अधिका–याचा नियुक्ती कालावधी नोव्हेंबरमध्ये पुर्ण झाला त्यास डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी या महिन्यांमध्ये कोणत्या अधिकारान्वये आयुक्तांनी कामावर ठेवले? या अधिका–याचा पगार आयुक्तांच्या पगारातुन दिला जावा. कायदा असा आहे की, ज्यास मुदतवाढ आहे त्यासच पगार मिळतो. तसेच लक्षवेधीमध्ये उपस्थित केलेल्या ज्या काही चौकश्या आहेत त्या पुढील महिन्यापर्यंत पुर्ण करुन त्यांचा अहवाल पुढील महिन्याच्या महासभेत ठेवण्यात यावा तसेच त्यांची नियुक्ती कायम करण्याविषयीचा प्रस्तावही पुढील महासभेत ठेवला जावा असे आपण प्रशासनास निर्णय दिले आहेतच. त्यांच्या नियुक्तीस तीन महिन्यापर्यंत मुदतवाढ घेतलेली नाही त्यास जबाबदार कोण आहे? व मुदतवाढ नसतांनाही त्यांना पगार कोणत्या अधिका–याने कोणत्या अधिकारान्वये दिला आहे. याची सुध्दा चौकशी होवुन संपुर्ण अहवाल आला पाहिजे. त्याच बरोबर दुसरे असे एक सांगु इच्छितो की, दुस–या सार्वत्रिक निवडणुकीत निवडुन आलेल्या महापालिकेने मागासवर्गीयांचा नोकरीतील अनुशेष भरुन काढला आहे. परंतु प्रत्येक वेळेस महासभेमध्ये अधिका–यांनी आमच्यासमोर जो–जो प्रस्ताव आणला त्यास आम्ही मंजुरी दिली व मंजुरी देतांना आम्ही लोकांनी म्हंटले होते की, त्यांच्या जाती दाखल्याची वैद्यता होते, न होते, कागदपत्र बरोबर आहेत, नाही आहेत, त्यास आपल्या अधिका–यांची जी समिती आहे ती जबाबदार राहिल. निवडून आलेले लोकप्रतिनिधी त्यास जबाबदार राहणार नाहीत. या पाच वर्षामध्ये हे ब–याचवेळा ऐकण्यात आले की, अमुक–अमुक नगरसेवकाचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले परंतु नोकर भरतीतील एका उमेदवाराकडे तर त्यावेळेसच प्रमाणपत्र नव्हते. त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर तो मी आत्महत्या करेल अशी धमकी देत होता तर असे किती घोटाळे पाच वर्षामध्ये झाले? जसे नगरसेवकाचे जात प्रमाणपत्र अवैध ठरते तेव्हा त्या जागेवर पोट निवडणूक होते. त्याप्रमाणे किती कर्मचा–यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता प्राप्त झाली नाही. आज आपण हे सांगत आहात की, परिविक्षाधीन कालावधी दोन वर्षाचा आहे. नविन नेमणुक केलेल्या कर्मचा–यांपैकी काहींना दोन वर्ष झाली तर काहींना चार वर्ष झाली आहेत. त्यांचे वैधता न झालेले जातप्रमाणपत्र आपण दाबुन तर ठेवले नाही? त्याची मुदत काय होती? व अशी किती प्रकरणे आहेत? या सर्वांची माहिती याच लोकप्रतिनिधीच्या समोर आली पाहिजे. आम्ही जो अनुशेष भरला आहे तो इमानदारीने भरला आहे. व आणखीही जी पदे रिक्त आहेत त्याबाबत जेव्हा जेव्हा हे लोक प्रस्ताव आणतील तेव्हा आम्ही ती पदे भरु. परंतु त्या लोकांची प्रमाणपत्रे बरोबर आहेत काय? परंतु जेव्हा नगरसेवकांचे जातप्रमाणपत्र अवैध ठरते त्याचवेळी सचिव साहेबांचे त्यास पत्र प्राप्त होते की आजपासुन आपण सदस्य नाहीत त्यानंतर गुन्हा दाखल होतो त्या जागेवर पोटनिवडणूक होते. म्हणुन ज्या लोकांनी गैरफायदा घेवुन येथे नियुक्ती घेतली आहे, अशी जी काही प्रकरणे प्रलंबित असतील त्या बाबतीत याच लोकप्रतिनिधींच्या कालावधीत निर्णय झाला पाहिजे. कारण की या लोकप्रतिनिधींवर आरोप लागु नये. याबाबतीत आम्ही नेहमीच खुलासा केला आहे की, प्रमाणपत्र पडताळणीची जबाबदारी अधिका–यांच्या निवडसमितीची राहील.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–**महापौर महोदय, सर्वात शेवटी मी बोलत आहे. महापौर महोदय, मला एक आठवण झाली. विधान परिषदेमध्ये जेव्हा एक लक्षवेधी सूचना उपस्थित झाली होती तेव्हा सभापतींच्या आसनावर आमचे उपसभापती श्री. वसंत डावखरे साहेब आसनस्थ होते. व आज या सभागृहामध्ये ही एक लक्षवेधी सूचना उपस्थित झाली आहे तेव्हा उपमहापौर महापौरांच्या आसनावर आसनस्थ आहेत. त्यावेळच्या लक्षवेधीमध्ये ८५५ इमारतींबाबत निर्णय झाला ज्या निर्णयामुळे आमचे शहर उध्दवस्त होण्यापासुन वाचले. येथे एक लक्षवेधी अशी उपस्थित झाली ज्या बाबतीत संपुर्ण सभागृहाचे एकमत आहे. प्रशासन स्वत: मान्य करत आहे की, चुक झाली आहे परंतु त्यानंतरही त्या अधिका–यास पदोन्नती दिली आहे. आपल्या जबाबदारीमध्ये पुर्णपणे अपयशी ठरल्यानंतरही, इतके आरोप व प्रत्यारोप लावल्यानंतरही त्या अधिका–यास मुदतवाढ तर नाही परंतु पदोन्नती आहे. पीआरओ, पब्लीक रिलेशन ऑफिसर, पब्लीकशी त्यांचे रिलेशन कसे आहे हे यावरुन दिसुन येते की, सभागृहामध्ये एक सुध्दा सदस्य त्यांच्या बाजूने बोलत नाही. परंतु मला असे वाटते की, त्यांनी फक्त आयुक्तांशीच संपर्क ठेवला आहे. जनतेशी संपर्क ठेवलेला नाही. याच कारणामुळे त्यास पदोन्नती दिली.

त्यास अतिरिक्त कामे देण्यात आली. महानगरपालिकेमध्ये जे काही चालले आहे त्याची माहिती आपणांस करुन देण्यासाठी ही लक्षवेधी सूचना मांडली आहे. आता–आता आमच्या श्री. प्रमोद टाले यांनी सांगितले की, पत्रकार कक्षाची स्थिती काय आहे? आमच्या पत्रकारांना कोण–कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. व जी व्यक्ती जनसंपर्क अधिका–यांचा कक्ष बरोबर सांभाळु शकत नाही त्या व्यक्तीस प्रभाग समितीचा प्रभाग अधिकारी म्हणुन बसविले जाते? तर आज आयुक्त साहेब रजेवर असतांना श्री. रौराळे साहेबांना बसविले असतांना अशा या श्रेष्ठ अधिका–यास का बसविले नाही? मला तर असे वाटते की श्री. रौराळे साहेबांपेक्षा श्री. युवराज भदाणे हेच आयुक्तांच्या जास्त जवळ आहेत. त्यांनाच आजच्या महासभेत आयुक्तांच्या स्थानी बसवायचे होते? तर हे काय चालले आहे? सभेमध्ये आवाज उठविणे हेच आमचे कर्तव्य आहे की, चर्चेतुन काहीतरी परिणाम काढणे हे आमचे काम आहे. त्यांना मुदतवाढ दयायची आहे, त्यांच्या विरुध्दची चौकशी पुर्ण व्हायची आहे. तरीही ते पदावर राहतील, ते पदावर का राहतील? सभागृहातील एकही सदस्य त्यांच्या बाजुने बोलण्यास तयार नाही. भले मग तो कोणत्याही पक्षाचा असो. इथपर्यंतच की, त्यांच्या विरुध्द येथे मुद्दे उपस्थित होत असतांना पत्रकार कक्षातील पत्रकार टाळयांचा कडकडाट करत आहेत. हे तर या गोष्टीचे सुचक आहे की, ते आपल्या कामामध्ये किती कुशल आहेत? महापौर महोदय, आपल्यासमोर ती वेळ आली आहे जी श्री. वसंत डावखरे साहेबांसमोर आली होती. त्या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातुन त्यांनी जो निर्णय घेतला व आपल्या उल्हासनगर शहरास वाचविले तसा हा ठोस निर्णय आपणांस घ्यायचा आहे. पुढील महासभेपर्यंत आम्ही का थांबायचे? आम्हांला आजच या बाबतीत परिणाम पाहिजे. येथे लोकांनी आम्हांला निवडुन दिले आहे. नैतिकतेची टालमटोळ बंद करा. त्वरीत निर्णय घ्या. टालमटोळ करु नका.

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> या लक्षवेधी सूचनेबाबत श्री. दिलीप लालवानी व श्री. प्रमोद टाले यांनी ज्या सुचना केल्या. त्याबाबत असे म्हणावे लागत आहे की, जनसंपर्क अधिकारी हे आपले पद बरोबर सांभाळत नाहीत, ही दु:खाची गोष्ट आहे. आजपासुन तीन–चार महिन्यापुर्वी पत्रकारांचे अध्यक्ष श्री. दिलीप मिश्राजी मा. महापौरांकडे आले होते व म्हणत होते की आमच्याकडे पत्रकार कक्ष नाही. त्यावेळी महापौरांनी त्वरीत जनसंपर्क अधिका–यांना बोलावुन आदेश दिला की पत्रकारांना सर्व सोयी–सुविधा दिल्या पाहिजेत. श्री. दिलीप मिश्राजी माझ्याकडे दोन–चार वेळा आले होते. त्यानंतर तीन–चार वेळा मी सुध्दा जनसंपर्क अधिका–यांना विचारणा केली की, अदयापपर्यंत पत्रकारांना कक्ष का मिळाला नाही? त्यावेळी त्यांनी सांगितले की, तरणतलाव येथे रंगरंगोटीचे काम चालु आहे. दुरुस्तीचे काम चालु आहे. परंतु दु:खाने म्हणावे लागत आहे की आजपर्यंत पत्रकार बंधु–भगिनींना कक्ष मिळाला नाही. व त्यांना जी टेलिफोन व फॅक्सची सुविधा मिळाली पाहिजे, ती सुध्दा मिळत नाही. ही अतिशय दु:खदायक बाब आहे. त्यामुळे जनसंपर्क अधिकारी यास पदावर राहण्याचा हक्क नाही. त्यामुळे अतिरिक्त आयुक्तांना माझे निवेदन आहे की, पत्रकारांना कक्ष, टेलिफोन फॅक्स, पिण्याचे पाणी या सुविधा मिळाल्या पाहिजेत त्याचबरोबर लक्षवेधी सूचनेबाबत खुलासा दया.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>सभागृहाच्या भावना लक्षात घेता त्यांना पदावरुन हटविले जावे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>त्वरीत हटविले जावे. आयुक्त साहेब, याबाबतीत आपला निर्णय दया.

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> यांच्याबाबतीत जी चौकशी चालु आहे तीचा अहवाल व कायमतेसंबंधीचा प्रस्ताव पुढील महासभेत आला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी/ श्री. विनोद ठाकुर :–</u>तोपर्यंत त्यांच्याकडे कुठल्याही विभागाचा कार्यभार असता कामा नये.

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> ठिक आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी:–</u>बिन खात्याचा अधिकारी म्हणुन त्यांना ठेवले जावे. कोणत्याही खात्याचे काम त्यांना देवु नये.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>मा. महापौरजी, सभागृहाची भावना लक्षात घेवुन निर्णय घ्या. सभागृहांच्या भावनांशी खेळू नका. उल्हासनगरमधील जनता आपले कष्टाचे पैसे कराच्या रुपाने देते त्या पैश्यातुन हे अधिकारी पगार घेतात. त्या पैश्याचा दुरुपयोग करु नका.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>निर्णय घेणारे आम्ही आहोत. व सभागृहाने एकमताने निर्णय घेतला आहे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—लोकप्रतिनिधींच्या भावनांचा आदर राखला जावा. श्री. भदाणेंना पदमुक्त केले जावे.

श्री. नाना रौराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—मा. महापौर, सन्माननिय सदस्य, जनसंपर्क अधिकारी श्री. युवराज भदाणे यांच्याबाबतीत जे मुद्दे उपस्थित केले आहेत. श्री. भदाणेंच्या बाबतीत काही महिलांचे आरोप आहेत, त्याबाबत माझ्याकडे त्यांची चौकशी चालु आहे. दहा दिवसामध्ये चौकशी पुर्ण केली जाईल. चौकशीचा व त्यांच्या कायमतेसंबंधीचा प्रस्ताव २८ तारखेच्या अगोदर मा. आयुक्तांच्या समोर सादर केला जाईल. व प्रशासनाच्या वतीने पुढील महासभेमध्ये हे दोन्ही प्रस्ताव आणले जातील.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—तोपर्यंत त्यांच्याकडे कोणत्याही विभागाचा कार्यभार सोपवु नये.

श्री. नाना रौराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—मा. महासभेच्या भावनांचा आदर करुन या सर्व बाबी उदया मा. आयुक्त साहेबांसमोर ठेवल्या जातील.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी /श्री. लाल पंजाबी :—आयुक्तांच्या स्थानी आपण बसला आहात. आज आपण आयुक्त आहात. महापौरांच्या आदेशाचे पालन व्हावे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—श्री. भदाणे विषयी काही खास नातेसंबंध आहे काय? आयुक्तांच्या आसनावर बसल्यानंतरही निर्णय घेण्याचा काही अधिकार नसेल तर आपण त्या आसनावर बसलातच का? याबाबतीत उत्तर दया. महापौरांच्या आदेशाची अवहेलना करु नका. त्यांचा अपमान करु नका.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आपण आयुक्तांच्या आसनावर बसलात ना?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—मा. महापौरजी, माझे असे निवेदन आहे की, श्री. प्रकाशजी यांनी याबाबीवर प्रकाश टाकावा.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—आयुक्त साहेब, तुम्ही महासभेचा अपमान करत आहात.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—आयुक्त साहेब, तुम्ही महासभेचा अपमान करत आहात.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—नाहीतर आजची सभा स्थगित करा. याबाबीचा निर्णय झाल्यानंतरच सभा समाप्त होईल.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :—महापौरजी, जर आपण या विषयावर निर्णय घेवु शकत नसाल तर याबाबतीत सन्माननिय सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी जी सूचना केली आहे त्यानुसार आपण सभेचे कामकाज दहा दिवसासाठी स्थगित करा. अहवाल आल्यानंतरच यावर निर्णय घ्या.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :—आठ दिवसानंतरही आयुक्त साहेब आले नाहीत तर महासभेत त्यांच्या आसनावर श्री. रौराळे साहेबांनाच बसावे लागेल. ज्या—ज्या वेळी महासभेमध्ये असे मुद्दे येतात त्या—त्या वेळी आयुक्त साहेब रजेवर जातात.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—सभागृहाला सभागृहासारखे ठेवा बाजार बनवु नका.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—मा. महापौर महोदय, माझी एक विनंती आहे की, अधिका—यांनी सभागृहामध्ये येतांना तयारीनीशी येण्याचे आदेश सर्व अधिका—यांना दया. सभागृहाचा दर्जा खालावत चालला आहे. सभागृहातील सदस्य कितीही अभ्यास करुन आले तरी अधिका—यांकडुन त्यांचे उत्तर मिळत नाही. ही बाब दगडावर डोके आपटण्यासारखी आहे. आणि मग प्रश्न उपस्थित करायचे कश्यासाठी अशी सदस्यांमध्ये भावना निर्माण होत आहे. एकाही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळत नाही. याचमुळे या महापालिकेचे नाव खराब झाले आहे. म्हणुन अधिका—यांना विनंती आहे की, तुम्ही जे हुशार आहात तुमची ती हुशारी महासभेत दिसु

दया. माहिती बिनचुक असु दया आणि प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आम्ही जबाबदारीने देवु अशी तुमची भावना व इच्छाशक्ती असु दया. ही जाणीव आयुक्तांपासुन सर्वांनी करावी. अन्यथा येथे एक उद्रेक होईल. सभागृहाच्या सदस्याची जर ही भावना असेल तर लोकांचे काय? तुम्ही जर उत्तरच देवु शकत नसाल तर, रेबिज इंजेंक्शन पुरवठयाचा ठेका कुणी घेतला आहे हे जर उच्च पदाच्या अधिका—याला माहित नाही. एका अधिका—याची नियुक्ती कधी झाली आहे? त्यास सेवेतुन कधी काढायचे आहे? त्याची मुदतवाढ कधी झाली? हे मुख्यालयाच्या उपायुक्तांना माहित नाही. आयुक्तांच्या स्थानी बसलेल्या अतिरिक्त आयुक्तांना माहित नाही ते म्हणतात की ही बाब मी आयुक्तांच्या निदर्शनास आणुन देईन. म्हणजे हे काय चालले आहे? आयुक्तांच्या स्थानी बसलेले आयुक्त म्हणतात की, याबाबतीत मी आयुक्तांशी चर्चा करेन. यापेक्षा मोठे दुर्देव काय? अशाप्रकारचे सभागृह चालले तर लोकांनी विकासकामांची कितीही स्वप्न पाहिली तरी ती कधीही पुर्ण होणार नाहीत. आणि केवळ अधिका—यांच्या उदासिनपणामुळे व हलगर्जीपणामुळे उल्हासनगर रसातळाला गेले आहे. आम्ही सत्ताधा—यांना दोष देत होतो परंतु येथे केवळ जो दोष आहे तो प्रशासनातील अधिका—यांचा. तर कृपया तुम्ही तुमचे धडे घ्या, कार्यशाळा घ्या, नाहीतर विभागांमध्ये बदल करायचे असतील ते करा. परंतु आम्हांस जो परिणाम पाहिजे असेल तो दया नाहीतर तुमचे काही खरे नाही. महापौर महोदय, या महानगरपालिकेचे चित्र काही बरोबर दिसत नाही. छोटे—छोटे मुद्दे आहेत परंतु त्यांचे समाधानकारक उत्तर आयुक्तांपासुन उपायुक्त, वैदयकीय अधिकारी कुणीही देवु शकले नाही. उत्तर देवु शकत नसाल तर तुम्ही महापालिका काय चालविणार? यासाठी श्री. माखिजा साहेबांनी सांगितल्याप्रमाणे आठ दिवसासाठी सभा तहकुब करा या विषयाबाबत चौकशी करुन अहवाल सादर करावा. यासाठी बाकी सर्व कामे सोडुन दिली तरी चालतील अशी वेळ आलेली आहे. पत्रकार कक्षामध्ये पत्रकार बसले आहेत त्यांनी जर कामकाजाची अशाप्रकारची वृत्ते संकलीत केली तर काय होईल? सभागृहाचा कोणता स्तर आपण राखत आहात? एकदम बी ग्रेड, सी ग्रेड, डी ग्रेडच्या खाली प्रशासन चालले आहे. कुणालाही काहीही माहिती नाही, काहीही तयारी नाही. आम्ही कितीही तयारी करुन आलो तरी फायदा काय? भिंतीवर डोके आपटुन घेण्यासारखी स्थिती. हे सर्व चुकीचे आहे आम्ही लोकांना काय सेवा देणार? शिफारस करणे आमचे काम आहे, अंमलबजावणी करणे आपले काम आहे. परंतु आपणांस सुध्दा काही माहिती पाहिजे. इच्छाशक्ती पाहिजे. परंतु ती काहीही नाही, शुन्य—शुन्य—शुन्य........... महापौर महोदय, आठ दिवसासाठी सभा स्थगित करा व या महासभेमध्ये जे—जे मुद्दे उपस्थित झाले आहेत त्यांची सविस्तर माहिती, भलेही कायदा काहीही असो शासन व प्रशासन यांना जर वाटत असेल तर श्री. सतरामदास जेसवानी व आम्ही उपस्थित केलेल्या मुद्दयांची सविस्तर माहिती पुढील महासभेत दिली जावी. ही सभा आठ दिवसासाठी स्थगित करुन पुढील महासभेत माहिती दिली जावी.

<u>मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>विरोधी पक्ष नेता श्री. धनंजय बोडारे यांनी म्हटले की, अधिकारी लोकप्रतिनिधींच्या प्रश्नांना योग्य ती उत्तरे देत नाहीत हे सत्य आहे. तसेच या अगोदर मी म्हटल्याप्रमाणे लोकप्रतिनिधींना सन्मानपुर्वक वागणुक दिली जात नाही हेही सत्य आहे. यासाठी सर्व अधिका—यांना विनंती आहे की, विरोधी पक्ष नेत्यांनी जे काही मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबाबतीत आपण योग्य ती कार्यवाही करावी.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>मा. महापौर महोदय, कित्येक नगरसेवकांच्या प्रभागातील रस्ते, चौक नगर इत्यादींच्या नामकरणाचे प्रस्ताव कित्येक दिवसांपासून प्रलंबित आहेत. पुढील महासभेत ते सर्व प्रस्ताव ठेवुन त्यास मंजुरी देण्याचे प्रयत्न केले जावेत. धन्यवाद ।

<u>श्री. नाना रौराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>मा. महापौरांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>मा. आयुक्त साहेब, काय कारवाई करण्यात येईल ते स्पष्ट करा.

<u>श्री. नाना रौराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>श्री. युवराज भदाणे यांच्या संदर्भात, ते चौकशीच्या संदर्भात व कायमते संदर्भातील सर्व प्रकरण पुढील महासभेत ठेवण्यात येईल. त्यावेळेस मा. महासभा योग्य तो निर्णय घेण्यास सक्षम राहिल.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u> मा. आयुक्त साहेब पुढील महासभेपर्यंत? तो पर्यंत त्यांच्याकडे दोन्ही पदे असतील काय?

मा. सदस्य श्री. राजु टेकचंदानी व श्यामसुंदर रोहडा हे सभागृहातुन बाहेर गेले.

श्री. नाना रौराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—अतिरिक्त कार्यभार काढण्यासाठी यापूर्वीच मा. महापौरांनी आदेश दिले आहेत.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम, श्री. नाना पवार हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—महापौरांनी आपणांस दिलेल्या आदेशाचा आम्हांस खुलासा करावा.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—तोपर्यंत त्यांच्याकडे कोणतेही पद राहणार नाही.

मा. सचिव :—लक्षवेधीवरील निवेदन समाप्त झाले. ठिक आहे?

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. २ :— मागील विशेष महासभेचे दिनांक २४/११/२००६ (त्यात दि. २/१२/२००६, ७/१२/२००६) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:—मा. महापौरजी, दिनांक २४/११, २/१२, ७/१२ या सभांची कार्यप्रणाली ज्या पध्दतीने चालविण्यात आली त्याबाबतीत आमची अशी एक हरकत आहे की, याबाबत उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करण्यात आलेली आहे. त्यामुळे माझी आपणांस अशी विनंती आहे की, हे इतिवृत्त प्रलंबित ठेवले जावे. त्यात उच्च न्यायालयाचा काही निर्णय आला तर त्याचा परिणाम या इतिवृत्तावर होईलच होईल. म्हणुन माझे असे निवेदन आहे की, हे इतिवृत्त प्रलंबित ठेवले जावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मा. महापौरजी, उच्च न्यायालयाचा जो निर्णय असतो तो सर्वोच्च असतो. त्यासाठी कुणाची हरकत असण्याची गरज नाही. इतिवृत्त कायम केले जावु नये असा उच्चत्तम न्यायालयाचा कोणताही निर्णय नाही किंवा आदेश नाही. प्रत्येक महिन्यास महासभेची सर्वसाधारण महासभा असते व प्रत्येक महिन्यास महासभा होते तिचे इतिवृत्त कायम करावेच लागते. मी उदाहरण देवु इच्छितो की, या तिन्ही सभांचे इतिवृत्त आक्षेपार्ह होते तर महापौरांनी ते कायम करण्यासाठी ठेवावयासच नको होते. परंतु ही एक नियमित प्रक्रिया आहे. कारण की हे जे इतिवृत्त आहे ते जेव्हा सभा सुचना निघते तेव्हा त्यावरील पहिला विषय इतिवृत्ताचा असतो. त्यावर पहिला विषय मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा असतो. आज आमच्या समोर तीन्ही सभांचे इतिवृत्त कायम करण्याचा जो विषय आला आहे, हे इतिवृत्त कायम केल्याने उच्च न्यायालयाच्या निर्णयावर कोणताही परिणाम होणार नाही. व इतिवृत्त कायम करतांना सभेमध्ये एक बोलले गेले असेल आणि लिहिले वेगळेच असेल तर त्याची दुरुस्ती केली जाते. व दुसरी कोणतीच गोष्ट नसते. मला असे वाटते की, सभागृहासमोर कायम करण्यासाठी जे इतिवृत्त आले आहे ते कायम करण्यास काहीही हरकत नाही.

मा. सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—पास—पास...............

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—मा. महापौरजी, मी एक गोष्ट आणखी जोडु इच्छितो की, या सभांमध्ये जेथपर्यंत आम्ही उपस्थित होतो तेथपर्यंत तर ठिक आहे परंतु त्यानंतर बरीचशी कार्यवाही चालविण्यात आली आहे, इतिवृत्तांत बरीचशी पाने जोडली आहेत त्यामध्ये अशा ब—याचशा गोष्टी आहेत ज्या आमच्यासाठी आक्षेपार्ह अशा आहेत.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मतदान घेतले जावे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—महापौर महोदय, सचिव कार्यालयास भारतीय मानक संघद्वारा आयएसओ—९००१:२००० हा पुरस्कार मिळालेला आहे. मानांकन मिळाले आहे. त्यांचा कारभार स्वच्छ आणि निटनेटकी आहे. इतिवृत्तामध्ये जे काही लिहिले आहे ते शब्द न शब्द बरोबर आहे. त्याचे साक्षीदार आम्ही सर्व लोक येथे आहोत. यासाठी इतिवृत्त कायम करण्यामध्ये काही अडचण आहे असे मला वाटत नाही. त्यावेळेस जे गैरहजर होते त्यांचा तर काही प्रश्नच उद्‌भवत नाही, संबंधच येत नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—आमचा विरोध आहे, भलेही मतदान घ्या.

मा. सचिव :—आपला विरोध कशासाठी आहे? २४/११/२००६ रोजीचे इतिवृत्त आपण मान्य करत आहात. दिनांक २/१२ व ७/१२ चे इतिवृत्त आपण मान्य करत नाहीत? पहिली सभा २४/११/०६ रोजी होती.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— २४/११/०६ ची अर्धी सभा. मा. महापौरांनी .............

मा. सचिव :—आपण लोक सभेतुन बाहेर गेल्यानंतर?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—त्या नंतरच्या सभेच्या इतिवृत्तास आमची हरकत आहे.

मा. सदस्य श्री.होशियारसिंह लबाना हे सभागृहातुन बाहेर गेले. 

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—सचिव कार्यालयावर आरोप लावणे योग्य नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—हे निघून गेल्यानंतर सभेत काय झाले हे यांना कसे माहित?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—बरोबर आहे, मी ते इतिवृत्त वाचले आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—इतिवृत्तामध्ये गडबड कशी होवु शकेल?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— असे आरोप लावणे चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी:—मला असे म्हणायचे आहे की, मतदान करण्याचा अधिकार ...............

मा. सचिव :— जे सदस्य इतिवृत्त पान क्र. १ ते १३ पर्यंत मान्य करायचे नाही व पुर्णच्या पुर्ण इतिवृत्त पृष्ठ क्र. १ ते ५५ पर्यंतचे इतिवृत्त मान्य करण्यास जे सदस्य तयार आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

## पृष्ठ क्र. १ ते ५५ पर्यंतचे इतिवृत्त कायम करण्याचे बाजुने २४ सदस्य

१. श्री. मोहन साधवानी
२. श्री. अशोक ठाकुर
३. श्री. किशोर वनवारी,
४. श्रीमती मालती करोतिया
५. श्रीमती बेबी वसिटा
६. श्रीमती कोमल बठिजा
७. श्रीमती दिपा पंजाबी
८. श्रीमती रेखा कारीरा
९. श्रीमती मोना वनवारी
१०. श्री. अन्नु मनवानी
११. श्री. धनंजय बोडारे
१२. श्री. दिलीप गायकवाड
१३. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
१४. श्रीमती ससाणे लक्ष्मी
१५. श्री. विश्वनाथ पाटील

१६. श्री. ईश्वर पमनानी
१७. श्री. प्रमोद टाले
१८. श्री. गोविंदराम लुंड
१९. श्री. अशोक ठाकुर
२०. श्री. बच्चाराम रुपचंदानी
२१. श्री. उमाप रामदास
२२. श्रीमती संगिता जावळे
२३. श्री. विनोद ठाकुर
२४. श्रीमती मिना सोंडे

**मा. सचिव :–** व जे सन्माननिय सदस्य, त्यातील काही भागापर्यंतचे इतिवृत्त कायम करु इच्छितात, सत्ताधारी पक्षाचे सदस्य जेथपर्यंत सभेत उपस्थित होते तेथपर्यंतची जी कार्यवाही झालेली आहे ते आणि त्यानंतर जी कार्यवाही झाली आहे ते इतिवृत्त मान्य करु इच्छित नाहीत अशा सदस्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–**पृष्ठ क्र. १३ नंतरचे....

**मा. सचिव :–**आपले म्हणणे मला समजले. मा. महापौरांनी जेथे सभा समाप्त झाल्याचे घोषित केले त्यानंतरचे इतिवृत्त आपण मान्य करु इच्छित नाहीत.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–**जनगणमन नंतरचे इतिवृत्त मान्य करु इच्छित नाही.

**मा. सचिव :–**मी समजलो. तर आपल्या म्हणण्यानुसार जे सन्माननिय सदस्य आपले मत नोंदवु इच्छितात त्यांनी कृपया आपले हात वर करावेत, म्हणजे जे सन्माननिय सदस्य पानक्र. १ ते १३ पर्यंत इतिवृत्त कायम करण्यास इच्छुक आहे व पान क्र. १४ ते पान क्र. ५५ पर्यंत पुर्णपणे जसे आहे तसे इतिवृत्त कायम करण्यास तयार नाही त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

११ सदस्य

१. श्री. राजू जग्यासी
२. श्री. सतरामदास जेसवानी
३. श्री. गणपत एडके
४. श्री. सुरेश गायकवाड
५. श्री. प्रभुनाथ गुप्ता
६. श्री. चंदाराम मोकल
७. श्री. देवेंद्रसिंह खेमाणी
८. श्रीमती मिनु दासानी
९. श्रीमती कमला शर्मा
१०. श्रीमती सुजाता रिजवानी
११. श्री. विनोद तलरेजा

मा. सचिव :— इतिवृत्त कायम करण्याच्या बाजुने २४ आणि विरोधात ११ मते.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :— मागील सभेचे दिनांक २४/११/२००६ (त्यात दि. २/१२/२००६, ७/१२/२००६) रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे बहुमताने कायम करण्यात येत आहे.

---

सूचक : श्री. धनंजय बोडारे

अनुमोदक : श्री. किशोर वनवारी

महासभा ठराव क्र. २९ अ — दिनांक : २०/२/२००७

ही महासभा दिनांक २४/११/२००६ (त्यात २/१२/०६, ७/१२/०६) रोजीच्या महासभेच्या इतिवृत्तांतातील सचिवांनी प्रस्तृत केलेल्या पृष्ठ क्र. १ ते ५५ पर्यंत जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

बहुमताने

उप—महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

मा. सदस्य श्री. टेकचंदानी राजु यांनी सभागृहात प्रवेश केला.

---

⇨ **विषय क्र. ३:–** श्री मनोहर तोतलानी व श्री. जॉर्ज साळवे, मुकादम (सध्या सेवानिवृत्त) या कर्मचा–यांना सेवानिवृत्ती वेतनपात्र सेवाकालावधी कमतरता क्षमापित करण्यास मान्यता देणे.

---

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–**या विषयास आमचा विरोध नाही. अशी माहिती आहे की, असे बरेचसे कर्मचारी आहेत, १९९६ मध्ये ज्यांच्या नेमणुका झाल्या आहेत त्यांच्या बाबतीतील प्रस्ताव अदयाप महासभेतआणलेला नाही. आमची अशी विनंती आहे की, अशी जी काही प्रकरणे प्रलंबित आहेत ती सुध्दा आणली जावीत. असे म्हटले जाते की, प्रशासन काही लोकांची बाजु घेते. त्यांचे प्रस्ताव महासभेपुढे येतात. इतरांचे प्रस्ताव येत नाहीत. मला असे वाटते की, प्रलंबित असलेले अशा प्रकारचे सर्व विषय पुढील महासभेत आले पाहिजेत.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–**सर्वांचे प्रस्ताव एकाच वेळेस आले पाहिजेत.

**मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**बाकीचे जे काही अशा प्रकारचे प्रस्ताव प्रलंबित आहेत ते सर्व आले पाहिजेत.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–**अशा प्रकारचे बाकीचे जे प्रस्ताव राहून गेले आहेत ते सुध्दा आले पाहिजेत.

**मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**या बाबतीत आयुक्त साहेबांना निर्देश दिले आहेत.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–**हा विषय पारीत केला जावा. यानंतर अशा प्रकारचे जेवढे प्रस्ताव प्रलंबित आहेत ते सर्व पुढील महासभेत आणले जावेत.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–**मा. महापौरजी, हा जो दोन कर्मचा–यांचा प्रस्ताव ठेवला आहे, या व्यतिरिक्त जे काही प्रस्ताव प्रलंबित आहेत ते सुध्दा आणले पाहिजेत.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–** पुढील महासभेत आणले जावेत.

**मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**ज्याची ज्या तारखेपासुन नियुक्ती झाली आहे त्या तारखेपासुन त्यास हे फायदे मिळाले पाहिजेत. व जे प्रस्ताव राहिले आहेत ते पुढील महासभेत आणले जावेत व त्यांना सर्व, लाभ मिळाले पाहिजेत.

**श्री. अशोक बागेश्वर (उप–आयुक्त, मुख्यालय):–**मा. महापौरजी, श्री. मनोहर तोतलाणी हे दिनांक ३१/७/२००६ रोजी व श्री. जॉर्ज साळवे हे दिनांक ३१/८/२००६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना भविष्यनिर्वाहनिधीचा फायदा मिळणार नव्हता. म्हणुन ही दोन प्रकरणे महासभेपुढे आणली आहेत. आणखी ज्या काही केसेस आहेत त्याही आम्ही महासभेपुढे आणणार आहोत.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–**पुढील महासभेमध्ये? मार्च महिन्याच्या महासभेमध्ये?

**मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**पुढील महासभेमध्ये आले पाहिजेत. रोजंदारीवरील सेवा ग्राहय धरुन सर्वांची सेवाजेष्ठता ग्राहय धरली पाहिजे. त्याचबरोबर सर्व फायदे मिळाले पाहिजेत. पुढील महासभेत हे प्रस्ताव आणले जावेत अशा माझा आदेश आहे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–**मा. महापौरजी, पुढील महासभा ही शेवटची महासभा असल्याने त्यावेळेस दुपारच्या भोजनाचीही व्यवस्था केली जावी.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–बुधवारी महासभा घेण्याचा प्रयत्न करु.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– निवडणूक हारलेल्यांचाही सन्मान करा. मी सुध्दा दोन सदस्य निवडून आणले आहेत. ते सुध्दा आमच्या विभागाचे प्रतिनीधीत्व करतील.

काही सदस्य :–पास–पास......

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे. 

---

☑

**विषय क्र. ३:–** श्री मनोहर तोतलानी व श्री. जॉर्ज साळवे, मुकादम (सध्या सेवानिवृत्त) या कर्मचा–यांना सेवानिवृत्ती वेतनपात्र सेवाकालावधी कमतरता क्षमापित करण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये श्री. मनोहर तोतलाणी व श्री. जॉर्ज साळवे हे दिनांक २/११/१९९६ पासून ''मुकादम'' या अस्थायी पदावर कार्यरत होते. श्री. मनोहर तोतलाणी हे दिनांक ३१/७/२००६ रोजी व श्री. जॉर्ज साळवे हे दिनांक ३१/८/२००६ रोजी नियम वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

शासकीय कर्मचा–यास निवृत्ती उपदान आणि कुटुंब निवृत्ती वेतन मिळण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ चे नियम ३० मध्ये अर्हताकारी सेवेचा कालावधी कमीत कमी १० वर्ष होणे आवश्यक आहे, अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ चे नियम ५४ (२) मध्ये सेवेतील कमतरता क्षमापित करणेसाठी सेवानिवृत्त होणा–या कर्मचा–याने निवृत्ती वेतनासाठी केलेल्या अर्हताकारी भर घालू शकेल व ती निवृत्ती वेतनासाठी हिशोबात धरली जाईल, अशी तरतुद आहे.

त्या अनुषंगाने श्री. साळवे व श्री. तोतलाणी यांची नियुक्ती पासून सेवानिवृत्ती पर्यंतचा कालावधी, अर्हताप्राप्त सेवा, व सेवेतील कमतरता क्षमापित करण्याचा कालावधी इत्यादी तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचा–यांचे नाव | पदनाम | नियुक्ती दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | एकुण सेवेचा कालावधी | सेवातील कमतरता क्षमापित करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. मनोहर तोतलाणी | मुकादम | २/११/१९९६ | ३१/७/२००६ | ९ वर्ष ८ महिने २९ दिवस | ३ महिने १ दिवस |
| २. | श्री. जॉर्ज साळवे | मुकादम | २/११/१९९६ | ३१/८/२००६ | ९ वर्ष ९ महिने २९ दिवस | २ महिने १ दिवस |

निवृत्ती वेतनपात्र सेवाकालावधी पूर्ण करण्यास श्री. मनोहर तोतलाणी, मुकादम यांना ३ महिने १ दिवस व श्री. जॉर्ज साळवे, मुकादम यांना २ महिने १ दिवस इतका सेवा कालावधीची आवश्यकता आहे. महाराष्ट्र

नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ चे नियम ५४(२) अन्वये सेवेतील कमतरता क्षमापित करणेसाठी नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा असल्याने सदर कर्मचारी श्री. मनोहर तोतलाणी व श्री. जॉर्ज साळवे, मुकादम यांच्या सेवेतील कमतरता क्षमापित करण्याच्या कालावधीस मान्यता मिळणेसाठी सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित करणेत येत आहे.

महासभा ठराव क्र: ३० | दिनांक:—२०/२/२००७

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे श्री. मनोहर तोतलानी व श्री. जॉर्ज साळवे, मुकादम (सद्या सेवानिवृत्त) या कर्मचा—यांना सेवानिवृत्ती वेतनपात्र अर्हताकारी सेवा कालावधी कमतरता क्षमापित करीत आहे आणि त्यांना निवृत्ती वेतनासाठी पात्र ठरवत आहे.

कारण ——

दिनांक २/११/१९९६ पूर्वी त्यांनी कित्येक वर्ष रोजंदारीवर काम केले आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.४५ वाजता मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. विनोद तलरेजा यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २०/३/२००७

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/३/२००७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार दिनांक २०/३/२००७ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.उप—महापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर :—श्री. तलरेजा विनोद चंदीराम

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | २४. | श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग |
| ३. | श्री. गायकवाड दिलीप | २५. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ४. | श्री. एडके गणपत गोविंद | २६. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | २७. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| ६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | २८. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| ७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | २९. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| ८. | श्री. पवार नाना आनंदा | ३०. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम |
| ९. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३१. | श्री. बठीजा संजय रामचंद्र |
| १०. | श्री. जग्यासी राजु किशनचंद | ३२. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल |
| ११. | श्री. निकम शांताराम ओंकार | ३३. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १२. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ३४. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १३ | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ३५. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १४. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ३६. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १५. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ३७. | श्री. मनवानी अन्नु (सनमुख) |
| १६. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ३८. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| १७. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ३९. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास |
| १८. | श्री. जेसवानी सतरामदास पुनमदास | ४०. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| १९. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ४१. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| २०. | श्री. वाघे शामु बाबु | ४२. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २१. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४३. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २२. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४४. | श्री. माखिजा हरदास सन्मुखदास |
| २३. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४५. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा. महापौर :— १. श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश, मा. सदस्य / सदस्या २. श्रीमती जावळे संगिता रमेश, ३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन), ४. श्री. मोकल चंदाराम विठोबा, ५. श्री. उमाप रामदास राघोजी, ६. श्रीमती आहुजा निता प्रकाश, ७. श्री. टाले प्रमोद नामदेवराव, ८. श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह, ९. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल, १०. श्री. पाटील विश्वनाथ गौतम, ११. श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास, १२. श्रीमती पंजाबी दिपा नारायण, १३. श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग, १४. डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश, १५. श्रीमती दासानी मिनु राजकुमार, १६. श्री. वधारिया राजेश नानिकराम, १७. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर, १८. श्रीमती मोकल सीमा चंदाराम, १९. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, २०. श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र, २१. श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा, २२. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास, २३. श्रीमती खिलनानी भावना रवी, २४. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ, २५. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश, २६. श्री. भालेराव गौतम यशवंत, २७. श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद, २८. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास, २९.श्रीमती माखिजा किरण लखी, ३०. श्रीमती छाब्रिया भारती पहलाज, ३१. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ३२. डॉ. (श्रीमती) साधवानी जया, ३३. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

मा.आयुक्त श्री. सदाशिव कांबळे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या स्थानी श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते. तसेच खाली दर्शविलेले अधिकारी सभेस हजर होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१३. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
१४. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
१५. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
१६. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
१७. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१८. श्री. आर.बी. शिर्के, प्रभारी कार्यकारी अभियंता, सार्व.बांध. विभाग
१९. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

दुपारी १२.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–मा. महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्यांना चेटीचंद व गुढीपाडवा या सणानिमित्त हार्दिक शुभेच्छा देतो.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–सन्माननिय महापौरजी, सर्वांना गुढीपाडवा व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा ।

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–मा. महापौरजी, दोन अडीच महिन्यापुर्वी मालमत्ता करामध्ये कपात करण्याबाबत विशेष महासभा आयोजित करण्यासाठी एक पत्र देण्यात आले होते. परंतु त्यानंतर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकी निमीत्त आदर्श आचारसंहिता लागु झाल्याने विशेष महासभा लावण्यात आली नाही. आता सार्वत्रिक निवडणूका पार पाडल्या असून आदर्श आचारसंहिता संपली असल्याने या बाबतची सभा ३१ मार्च पुर्वी लावण्यात यावी. काही लोक म्हणत होते की, आजच्या सभेत आयुक्त साहेब नसल्याने ही सभा स्थगित करुन २९ तारखेस सांयकाळी ४.०० वाजता ठेवली जावी. आजच्या सभेमध्ये माझा अशासकिय प्रस्ताव घेण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे श्री. रमेश चव्हाण यांचाही अशासकिय प्रस्ताव घेण्यात आलेला नाही. याचबरोबर आम्ही जवळजवळ २१ सदस्यांनी सहया करुन विशेष महासभेची मागणी करणारी नोटीस दिलेली आहे. त्यानुसार आयोजित करावयाची विशेष महासभा सुध्दा अदयाप आयोजित केलेली नाही. त्या नोटिसमध्ये शहरातील कर आकारणी निमीत्त जे करयोग्य मुल्य आकारण्यात आलेले आहे ते अतिशय जास्त आकारण्यात आल्याने ते कमी करण्याबाबत एक प्रस्ताव आहे त्याचबरोबर शहरातील कचरा उचलणे कामी मे. ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलींग यांना जो ठेका दिला आहे त्या ठेक्यानुसार ते योग्य प्रमाणे काम करत नसल्याने तो ठेका रद्द करण्याबाबतचा एक प्रस्ताव आहे. तसेच शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करण्याकरीता आणि त्या संबंधीत नियमात दंड आकारणी सुचविली आहे ती कमी करण्यासंदर्भात शासनास सुधारणा सुचविण्या संदर्भातील प्रस्ताव होता. अशाप्रकारे शहराच्या हिताचे प्रस्ताव आम्ही लोकांनी दिले होते. व महापालिका सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागु होण्यापुर्वी याबाबत विशेष महासभा आयोजित करण्याची आम्ही मागणी केली होती. याबाबत लवकरच महासभा आयोजित केली जाईल असे महापौरांनी सांगितले होते परंतु प्रत्यक्षात त्यांनी ती महासभा आयोजित केली नाही. यासाठी माझी एक विनंती आहे की, याबाबत ३१ मार्चपुर्वी विशेष महासभा बोलावली जावी. किंवा २९ तारखेस सांयकाळी ४.०० वाजता सभा बोलावली जावी.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी आता सभेमध्ये जे मुद्दे उपस्थित केले त्याबाबत विशेष महासभा २९/३/२००७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात यावी असे सर्व सदस्यांचे म्हणणे आहे. याकामी सचिव साहेबांना निर्देश दिले जातील. त्याप्रमाणे ते या सभेसाठी सभा सूचना काढतील.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–मा. महापौरजी, शहरातील रस्ते, चौक, विभाग इत्यादींचे नामकरण करण्याबाबत ब–याचशा नगरसेवकांना आपले प्रस्ताव दिले आहे आणि ते प्रदिर्घ काळापासुन प्रलंबित आहेत. नामकरणाचे प्रस्तावही महासभेपुढे आले पाहिजेत. तसेच माझ्या पॅनल क्र.१२ मध्ये पाण्याची अतिशय दिक्कत समस्या आहे. पाण्यासाठी जी वेळ निश्चित करुन दिले आहे त्यावेळेसच नेमकी लाईट जात असल्याने माझ्या प्रभागात पाणी येत नाही. संपुर्ण दिवसात जेमतेम एक दिड तास पाणी येते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:–मा. महापौरजी, संपुर्ण शहरास चेटीचांद व गुढीपाडव्या निमित्त हार्दिक शुभकामना । आयुक्त साहेब प्रत्येक महिन्यास २० तारखेस होणा–या महासभेच्या वेळेस अनुपस्थित राहतात. मागील सात–आठ महासभांना ते अनुपस्थितीत आहेत. प्रत्येक महासभेच्या वेळेस त्यांच्या घरातील कुणतरी आजारी पडते आणि ते महासभांना उपस्थित राहत नाहीत. मला तर असे वाटते की आयुक्त साहेब हे नाटक

करत आहेत व ते महासभेस सुध्दा नाटक समजत आहेत. त्यांना महासभेच्या मानमर्यादांचे काही पडले नाही. आम्हांला असे वाटले की, आजची ही महासभा शेवटची महासभा आहे. परंतु आयुक्त आज येथे उपस्थित नसल्यामुळे ही सभा स्थगित करुन दोन–तीन दिवसांनी ठेवली जावी जेणेकरुन आम्हांला पुन्हा एकदा महासभेस यावे लागेल. आयुक्तांच्या जागी अतिरिक्त आयुक्त श्री. नाना रौराळे यांना बसविले जाते. परंतु त्यांना आयुक्त म्हणुन निर्णय घेण्याचा काही अधिकार आहे काय? त्यांना निर्णय घेण्याचा कोणताही अधिकार नसल्यामुळे त्यांना महासभेत आयुक्तांच्या स्थानी बसवुन महासभेस एक प्रकारे अपमानित केले जाते. प्रत्येक महासभेमध्ये निर्णय होतो परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. महासभेच्या बैठकीस तमाशा मानले जात आहे. व आयुक्त जाणीवपुर्वक महासभेस गैरहजर राहतात. आजच्या या महासभेत दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे त्यामुळे आम्ही सर्व नगरसेवक खुष आहोत. त्याचबरोबर आमचा कार्यकाळही समाप्त होत आहे. या ५ वर्षाच्या कार्यकाळात आम्ही शहरास काय दिले? शहरातील दारिद्रिय रेषेखालील लोकांचा मालमत्ता कर माफ करण्याचा एक अतिशय महत्वपुर्ण असा निर्णय श्रीमती ज्योती कालानी यांनी घेतला होता. त्यानुसार गरीबांचा मालमत्ता कर माफ होणार होता. यासाठी ज्यांनी अर्ज केले आहेत त्यांचा मालमत्ता कर माफ झाला काय? लोकशाहीची मजाक का उडविली जात आहे? शहरातील रस्ते, चौक यांच्या नामकरणासाठी ब–याचशा सन्माननिय सदस्यांनी प्रस्ताव दिले आहेत. महासभेत याबाबत वेळोवेळी आवाज उठविला आहे. परंतु त्यास प्रतिसाद दिला जात नाही. तदर्थ समितीची बैठक बोलावली जात नाही. त्याचे कारण काय? त्यामुळे रस्ते, चौकांच्या नामकरणाबाबतचे नगरसेवकांचे कित्येक प्रस्ताव प्रदिर्घ काळापासुन प्रलंबित आहेत. उल्हासनगर व शहाड रेल्वे स्टेशनच्या बाहेर वाहनांची पार्किंग केली जात आहे व त्यापोटी अवैधपणे पैश्यांची वसुली केली जात आहे. या दोन्ही ठिकाणची पार्किंग व्यवस्था महापालिकेने स्वतः ताब्यात घेवुन ठेके पध्दतीने चालविण्यामध्ये महापालिकेचे काय जाते ? यामुळे महानगरपालिकेचे फार मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. शेवटी महानगरपालिका करत तरी काय आहे? पत्रकारांना एक चांगला कक्ष देण्याचे गेल्या दोन–तीन महासभांपासुन महापौरांनी सांगितले होते परंतु अदयाप ते सुध्दा दिले गेले नाही. श्वान दंशावरील इंजेक्शने सुध्दा आपल्याकडे उपलब्ध नाहीत. ना फेरीवाला क्षेत्रामध्ये घुसून फेरीवाले जो फेरीचा व्यवसाय करतात तो त्यांनी करावयास नको. कारण त्यामुळे नागरीकांना त्रास होत असतो व रहदारीस अडथळा होत आहे. शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमित करुन घेण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने १८ महिन्याची मुदत दिली होती. तसेच यापुढे अनाधिकृत बांधकामे होवु नये असेही निर्देश दिले असतांना शहरात अनाधिकृत बांधकामे मोठया प्रमाणावर होत आहेत. आपण महासभेमध्ये जे काही ठराव पारीत करतो किंवा मा. महापौर जो काही अधिनिर्णय देतात त्यावर कार्यवाही झाली पाहिजे परंतु ती होत नाही. ती का होत नाही? महानगरपालिकेस कोणते नियम, अधिनियम लागु आहेत?

<u>मा. सदस्या श्रीमती कमला शर्मा :–</u>सर्व सदस्यांच्या टेबलवर बीस्लरी पाण्याच्या बाटल्या ठेवण्यात आल्या आहेत परंतु आम्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या सदस्यांच्या टेबलावर बीस्लरी पाण्याच्या बाटल्या ठेवलेल्या नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>मला तर असे वाटते की, महापालिका प्रशासन हे आंधळे, बहिरे आणि मुके आहे. विधवा महिलांना दोन–दोन हजार रुपये देण्याचे मा. महापौर महोदयांनी जाहिर केले आहे असा ठराव पारीत केला आहे काय? असेल तर तो केव्हा? व जे काही महासभा प्रश्न आहेत ते आजच पुर्ण केले जावेत. कारण की, यानंतर जुन्या नगरसेवकांची महासभा बैठक होणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>माझ्या प्रभागामध्ये पाणी येत नाही. व याबाबत मी एक लक्षवेधी सुचना देवुनही काही कार्यवाही झालेली नाही.

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u> ही जी सभा २९ मार्च रोजी सांयकाळी ४.०० वाजता आपण ठेवु इच्छित आहात तर आताच आम्हांस वृक्ष प्राधिकरणाची सभा सुचना प्राप्त झाली असुन त्यामध्ये २९ मार्च रोजी सांयकाळी ४.०० ते ४.१५ दरम्यान दोन–तीन सभा आयोजित करण्यात आलेल्या असल्याने या सभेसाठी दुसरी वेळ निश्चित केली जावी.

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>आताच सन्माननिय सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी सांगितले की, २९ मार्च रोजी सांयकाळी ४.०० वाजता वृक्ष प्राधिकरणाची सभा असल्याने आजची ही सभा स्थगित करुन २९ मार्च रोजी त्या सभेनंतर ठेवली जावी.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>घरदुरुस्ती परवानगी देण्याची काहीही तरतुद नाही. असे नगरररचनाकारांनी एका व्यक्तीस लेखी पत्र दिले आहे. त्या पत्राची प्रत सध्या माझ्याकडे आहे.

श्री. अ.पा.गुरगुळे (नगररचनाकार):— घरदुरुस्ती परवानगी देण्याची कायदयात काहीही तरतुद नाही. परंतु तत्कालीन आयुक्तांनी आपल्या विशेष अधिकारामध्ये घरदुरुस्तीच्या काही परवानग्या दिल्या आहेत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आपल्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, घरदुरुस्ती परवानगीची काही आवश्यकता नाही. शहरातील लोक घरदुरुस्ती परवानगी न घेता ही आपल्या घराची दुरुस्ती करु शकतात.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—कायदयामध्ये घरदुरुस्ती परवानगी देण्याची तरतुद नाही तर जेव्हा लोक आपल्या घरांच्या दुरुस्तीची कामे करतात तेव्हा आपल्या महापालिकेतील अनाधिकृत बांधकाम विभागाचे कर्मचारी अशा लोकांना त्रास देण्यासाठी का जातात?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—यापुर्वीचे आयुक्त श्री. आर.के. सोनवणे यांनी म्हटले होते की, घरदुरुस्ती परवानगी देण्याची कायदयामध्ये तरतुद नाही. तरतुद नाही तर अनाधिकृत बांधकाम विभागाचे कर्मचारी अशा लोकांना त्रास देण्यासाठी का जातात? यासाठी मा. महापौरांनी त्यांना आदेश दयावेत की त्यांनी लोकांना त्रास देण्यासाठी अशा ठिकाणी जावु नये.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया:— जेव्हा माझ्या प्रभागातील काही लोक बांधकाम करण्यास घेतात तेव्हा अनाधिकृत बांधकाम विभागाचे कर्मचारी तेथे जावुन त्या लोकांना त्रास देतात. त्याबाबत मी येथे ब—याच वेळा तक्रार केली आहे.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :— माजी महापौरांनी तक्रार करुनही त्याबाबत अदयाप काहीही कारवाई केली नाही ही अतिशय शरमेची गोष्ट आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—काय आम्ही असे समजायचे की या सभेनंतर घर दुरुस्ती परवानगीची आवश्यकता नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—आजच्या नंतर घरदुरुस्ती परवानगीची आवश्यकता नाही याबाबत प्रशासनाच्या वतीने लेखी पत्र काढले जावे. मी तर समजतो की, महानगरपालिका प्रशासन शहराचा नविन विकास आराखडा आपण तयार करु शकलो नाही. घर दुरुस्ती परवानगी आपण देवु शकत नाही. शेवटी महापालिकेत चालले तरी काय? गांधीगिरी करुन करुन आम्ही थकलो आहोत.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—बांधकाम परवानगी बाबत एखादे प्रकरण सादर केल्यानंतर किती दिवसामध्ये मंजुरी मिळाली पाहिजे? तेवढया दिवसामध्ये जर बांधकाम परवानगी मिळाली नाही तर विकासकर्त्याने काय केले पाहिजे?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—सन्माननिय सदस्य श्री. विनोद ठाकुर यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्यानुसार असे समजते की, घरदूरुस्ती परवानगी मिळण्याबाबतचे बरेचशे प्रस्ताव स्वाक्षरीसाठी आयुक्तांकडे प्रलंबित आहेत. या अगोदर घरदुरुस्ती परवानगी देण्याचे अधिकार नगररचनाकार यांच्याकडे होते. परंतु या आयुक्तांनी सर्वच विभागांचे अधिकार काढुन घेवुन ते स्वत:कडे ठेवले आहेत.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—ही महासभा आयुक्तांना जे आदेश देते त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार किती दिवसामध्ये बांधकाम परवानगीचा नकाशा मंजुर केला पाहिजे?

श्री. अ.पा.गुरगुळे, (नगररचनाकार):—सर्व कागदपत्रांची आणि बाबींची पुर्तता करुन जर प्रकरण सादर केले असेल तर ६० दिवसाच्या आत परवानगी दिली पाहिजे. परंतु शे—यांची पुर्तता करण्यामध्ये वेळ जातो. तसेच जागेची पाहणी करण्यामध्ये वेळ जातो.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—परंतु तीन चार महिन्यांपासुन असे किती बांधकाम नकाशे मंजुरीसाठी प्रलंबित आहेत? जर एखादयाने बांधकाम परवानगीसाठी प्रकरण सादर केले असेल तर त्यास किती दिवसामध्ये परवानगी दिली पाहिजे. ती सुध्दा दिली जात नाही. प्रत्येक प्रकरणावर जागेची पाहणी करायची आहे असा आयुक्त साहेब शेरा मारतात. विकास शुल्क भरुन ५—५, ६—६ महिने झाल्यानंतर सुध्दा इमारतीची बांधकाम परवानगी मंजुर केली जात नाही. व आयुक्त साहेबांच्या मनात येईल त्याच प्रकरणाची पाहणी होते. व नंतर परवानगी मंजुर होते. तर आयुक्त साहेबांनी आम्हांस हे सांगावे की, सहपाहणीचा अर्थ काय होतो? ती किती महिन्यामध्ये होते? ४ महिने? ५ महिने? ६ महिने?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— लेखी आदेश सर्वांना वितरीत केला जावा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— श्री. विनोद ठाकुर यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत खुलासा करण्यासाठी आपण नगररचनाकारांना व्यासपिठावर बोलवावे.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—नगररचनाकार, श्री. विनोद ठाकुर यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाचा खुलासा करावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, घरदुरुस्ती परवानगी बंदच होईल ना? आम्ही तर असे ऐकले आहे की, घर दुरुस्ती परवानगीबाबतची प्रकरणे आयुक्तांकडे प्रलंबित आहेत.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :— हे पहा, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये कुठेही असे लिहिले नाही की, परवानगी घेण्याची आवश्यकता आहे. जे बांधकाम मुळ स्वरुपाचे आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—महाराष्ट्र नगररचना अधिनियमातील कलम ४३ हे अतिशय स्पष्ट आहे. परंतु तरीही दुरुस्ती परवानगी दिली जात नाही. परंतु तरीही आज हे लोक घरदुरुस्ती परवानगीची आवश्यकता नाही असे सांगत नाहीत. म्हणतात की, आयुक्त साहेबांकडे स्वाक्षरीसाठी प्रकरण गेलेले आहे. या अगोदर घरदुरुस्ती परवानगी देण्याचे अधिकार नगररचनाकारांकडे होते. ५०० चौरस फुटापर्यंतचे बांधकामास परवानगी देण्याचे अधिकार नगररचनाकारांकडे होते. त्यापुढील मोठया आकाराच्या बांधकामाचे नकाशे मंजुरीसाठी आयुक्तांकडे जात होते. परंतु या आयुक्तांनी असे आदेश दिले आहे की, भलेही १० चौरस फुटाच्या बांधकामाचा जरी प्लान असला तरी ते प्रकरण माझ्याकडे पाठवा. घरदुरुस्ती परवानगीचे प्रकरण असेल तरी तेही माझ्याकडे पाठवा. यामुळेच ही प्रकरणे प्रलंबित पडली आहेत. तर आपण याचा खुलासा करा. यांनी असे म्हटले आहे की, तत्कालीन आयुक्तांनी म्हटले आहे की, घर दुरुस्ती परवानगी रद्द. या आयुक्तांनी सुध्दा घर दुरुस्ती परवानगीच्या ५—६ प्रकरणांना मंजुरी दिली आहे. याबाबत आपण नगररचनाकारांना विचारणा करु शकता. यांच्या अगोदरचे आयुक्त घर दुरुस्ती परवानग्या रद्द करुन गेल्यानंतर यांनी घरदुरुस्तीच्या काही प्रकरणांना मंजुरी दिली आहे.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—याबाबत महासभेत आज आपण निर्णय घेवुन आयुक्तांना निर्देश देवु या की, याची अंमलबजावणी झाली पाहिजे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—लेखी आदेश दया. लेखी आदेश प्रस्तृत करा. जेणेकरुन पुन्हा जर असे काही झाले तर आपण न्यायालयात जावु शकु. कारण की हा महासभेचा आदेश आहे, महापौरांनी म्हटले आहे, आयुक्तांनी आदेश काढले आहे. काही अधिकारी बांधकाम चालु असलेल्या जागेवर जावुन बांधकामधारकांकडुन हप्ता वसुलीसाठी त्यांना दमदाटी देतात. यासाठी लेखी आदेश काढा. आजच्या महासभेतुन काहीतरी परिणाम निघाला पाहिजे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. महापौरजी, मी आयुक्त साहेबांना एक प्रश्न विचारु इच्छितो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार किती दिवसामध्ये बांधकाम परवानगी मंजुर केली पाहिजे? विकास शुल्क भरल्यानंतर किती दिवसामध्ये संबंधीत बांधकामधारकास बांधकाम परवानगी मिळाली पाहिजे?

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—नगररचनाकार, श्री. गुरगुळे साहेब आपण याचा खुलासा करा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—श्री. विनोद ठाकुर यांच्या प्रश्नाचे प्रथम उत्तर दया.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–श्री. विनोद ठाकुर आपण आपला प्रश्न पुन्हा विचारा.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:– मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार किती दिवसामध्ये बांधकाम परवानगी मंजुर केली पाहिजे? विकास शुल्क भरल्यानंतर किती दिवसामध्ये संबंधीत बांधकामधारकास बांधकाम परवानगी मिळाली पाहिजे? बांधकाम परवानगी मंजुर झाली नसेल तर संबंधित विकासकर्त्याने काय केले पाहिजे? बांधकाम चालु केले पाहिजे किंवा नाही?

श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):– मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये अशी तरतुद आहे की, सर्व बाबींची कागदपत्रासह पुर्तता करुन जर आपण बांधकाम परवागनी बाबतचा नकाशा सादर केला तर ६० दिवसाच्या आत बांधकाम परवानगी मंजुर केली पाहिजे. नाहीतर परवानगी दिली आहे अशी तरतुद आहे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:– असे किती प्रकरणे प्रलंबित आहेत ज्यांनी विकास शुल्क भरुन ४–४, ५–५ महिने उलटुन गेले आहे व नकाशे असेच पडुन आहे. त्या प्रकरणांवर आयुक्तांचे शेरे आहेत की, ‘‘स्थळपहाणी करणे. ’’ अशी किती प्रकरणे आहेत ती आपण सांगु शकाल?

श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):– बारा.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:– ती त्यांनी का मंजुर केली नाहीत? त्यांनी बांधकाम चालू केले पाहिजे किंवा नाही?

श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):– या व्यतिरिक्त ती बेचाळीस प्रकरणे आहेत त्यामध्ये सनद व इतर कागदपत्रांच्या पडताळणीसाठी संबंधीत कागदपत्र मागविले आहेत.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:– संबंधीत विकासकर्त्याने काय केले पाहिजे? काम चालु केले पाहिजे किंवा नाही?

श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):–काम चालु करायचे नाही. संबंधीत कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतरच काम चालु करायचे आहे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:– सबंधीत कागदपत्रांची पडताळणी न करता त्यांच्याकडुन विकास शुल्क कसे घेतले?

श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):–ते संपुर्ण प्रकरण जर पुर्ण होत असेल संबंधीत कागदपत्रे व सनदची पडताळणी, त्याचबरोबर स्थळपहाणी व मोजमाप झाले तर परवानगी दिली असे मानन्यात येते. परंतु त्यामध्ये जर काही त्रुटी राहत असेल तर बांधकाम परवानगी दिली आहे असे मानता येणार नाही.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:– बिना कागदपत्रांची अशी किती प्रकरणे प्रलंबित आहेत?

श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):–४२.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:– त्यांचे बांधकाम नकाशे अदयाप का मंजुर झाले नाहीत?

श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):–बांधकाम परवानगी संबंधीचे सर्व अधिकार आयुक्तांकडे आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये अशी स्पष्टपणे तरतुद आहे की, बांधकाम नकाशे मंजुर करण्याचे अधिकार आयुक्तांचे आहेत.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:– त्या संचिकांवर आयुक्तांचे शेरे काय आहेत?

श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):– प्रत्येक संचिकेवर वेगवेगळे शेरे आहेत. ज्या त्रुटी असतात त्याबाबत वेगवेगळे शेरे असतात, सनदची पडताळणी, स्थळदर्शक नकाशा किंवा नकाशामध्ये काही त्रुटी असतात.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:— अधिकतर प्रत्येक प्रकरणांवर लिहिले आहे,स्थळपहाणी—स्थळपहाणी.

श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):—बारा प्रकरणे आहेत त्यांवर स्थळपहाणी बाबत शेरे लिहिले आहेत.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:— बारा ठिकाणांची पाहणी करण्यासाठी आयुक्त साहेबांना किती वेळ लागतो?

श्री. अ.पा. गुरगुळे (नगररचनाकार):—ते माझ्या अधिकारात नाही. आयुक्त साहेब सांगु शकतील.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:— उल्हासनगरमधील १२ ठिकाणांची पाहणी करण्यासाठी किती वेळ लागु शकतो. आयुक्त साहेब, आपण उत्तर दयाल?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:— अनाधिकृत बांधकाम करण्यासाठी आपणच शहरवाशियांना लाचार करत आहात?

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:— याचा अर्थ अनाधिकृत बांधकाम केले पाहिजे. बांधकाम नकाशा मंजुर करुनच घेतला नाही पाहिजे? कारण की आपण बांधकाम परवानगी मंजुरच करत नाहीत. आयुक्त साहेब आपण उत्तर दयाल?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:— साहेब म्हणतील मी आजच सर्व मंजुर करतो?

श्री. नाना रौराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सर्व सन्माननिय सदस्य, बांधकाम नकाशे मंजुर करण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. आजच्या सभेसाठी फक्त माझी नेमणुक केली आहे. बांधकाम नकाशे मंजुर करण्याची बाब आयुक्तांच्या अधिकार क्षेत्रातील आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—यांना काही अधिकार नसल्यामुळे आजच्या या सभेचे कामकाज स्थगित करुन ही सभा २९ मार्च, २००७ रोजी ठेवली जावी.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—फक्त वेळ काढुपणा करत आहेत.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—मा. महापौरजी, आयुक्तांच्या आसनावर आता जे बसले आहेत त्यांना जर अधिकार नसतील तर येथे बसण्यामध्ये काय फायदा आहे? प्रत्येक महासभेत ते म्हणतात की, मला काही अधिकार नाही तर महासभेमध्ये बसण्यात काय फायदा आहे?

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :—मा. महापौरजी, महासभेस जर आयुक्त येत नसतील तर अशी महासभा आयोजित करण्यात अर्थच काय आहे?

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—पुढील महासभेत आयुक्त साहेब उपस्थित असले पाहिजेत. कारण की, प्रत्येक महासभेत त्यांचे उत्तर असते की, याबाबत मला काही माहित नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—यांचा काय वेळ काढुपणा चालला आहे? यांना वेळ काढुपणा करण्यासाठी बसविले आहे काय?

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:— यांना काही अधिकार नसतील तर हे आयुक्तांच्या आसनावर बसलेच का?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—मा. महापौरजी, आयुक्तांचे म्हणणे आहे की, वेळ काढुपणा आहे तर मला तर असे वाटते की, ही सातवी महासभा आहे, ज्या महासभेस आयुक्त उपस्थित नाहीत. यासाठी सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती करतो की, उदया आपण आयुक्तांच्या दालनातच महासभा घेवु या.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—मंजुर, मंजुर................

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आपण सर्वजण आयुक्तांच्या दालनातच बसु. येथे एवढया ज्या काही समस्या आहेत जसे की पाण्याची समस्या आहेत. संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता उपस्थित नाहीत. आयुक्तांना काही माहित नाही. श्री. माखिजा साहेब, अतिशय महत्वाचा असा एक विषय आहे की, जिल्हा

हिवताप अधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयाकडुन महानगरपालिकेस एक पत्र आले आहे. त्या पत्रात त्यांनी असे दर्शविले आहे की, उल्हासनगर कॅम्प नं. ३ या विभागात हाऊस इंडेक्स १३.६३ तसेच ब्रॅटयू इंडेक्स १८.१८ आहे. यावरुन असे दिसुन येते की, कॅम्प नं.३ विभागामध्ये एडिस डास अळीच्या घनतेत वाढ झाली आहे त्यामुळे त्या विभागात भविष्यात चिकुनगुनिया, डेंग्युची साथ उद्‌भवणाची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी उपाययोजना केली पाहिजे म्हणुन जिल्हा हिवताप अधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयाकडुन आपणांस एक पत्र आले आहे. परंतु त्याचे गांभीर्य येथिल आयुक्तांना नाही व वैदयकीय आरोग्य अधिका–यांनाही नाही.

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>हे पत्र कधी आले आहे? कोणत्या तारखेत?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>४/१/२००७ रोजी हे पत्र आले आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>आयुक्तांना वेळ नसेल तर त्यांना येथुन हटवा.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>त्यांनी जे पत्र दिले आहे त्यामध्ये लिहिले आहे की, डेंग्यु व चिकुनगुनिया या रोगांचे रोगजंतुंची मोठयाप्रमाणावर येथे वाढ होत आहे. त्यांवर वेळीच उपाययोजना केली नाही तर ............... ....काय उपाययोजना करायची आहे ते सुध्दा त्यांनी लिहुन दिले आहे. परंतु येथिल आयुक्तांना त्याचे काही पडले नाही. पाण्याची समस्या आहे पाण्यासाठी लोक तडफडत आहेत. त्यावर काय उपाययोजना केली पाहिजे? यावर चर्चा करण्यासाठी पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता येथे उपस्थित नाहीत. मागील १५ दिवसांपासुन फक्त उपअभियंता व कनिष्ठ अभियंता हे दिवसरात्र धावपळ करत आहेत परंतु कार्यकारी अभियंता नाहीत, आयुक्त नाहीत.

<u>मा. सदस्या श्रीमती मिना सोंडे :–</u> मा. महापौरजी गेल्या ४ दिवसांपासुन माझ्या प्रभागात पाणी येत नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–</u>पाण्याची समस्या फार मोठी आहे. तिच्याकडे लक्ष दिले जावे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> सर्व सन्माननिय सदस्यांना माझी विनंती आहे की, ही सभा उदया आयुक्तांच्या दालनामध्ये घेतली जावी.

<u>मा. सदस्या श्रीमती मिना सोंडे :–</u>वेळ सांगा, वेळ.

<u>मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–</u>वेळ सांगा, वेळ.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>मा. महापौर महोदय, येथे आयुक्त नसतांना आपण जो अधिनिर्णय देता त्याला काही अर्थ राहत नाही. म्हणुन ही सभा उदया आयुक्तांच्या दालनात घेतली जावी. जोपर्यंत आयुक्त भेटणार नाही तोपर्यंत तेथे सभा चालु राहील.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>हे फारच चांगले आहे. ही सभा स्थगित करा.

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>आताच श्री. बागेश्वर साहेबांकडुन सूचना प्राप्त झाली आहे की, आयुक्त पत्र देवुन गेले आहेत की ते सुट्टीवर आहेत.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>प्रत्येक महासभेच्या वेळेस त्यांन सुट्टी मिळते काय? ही काय मस्करी चालु आहे काय? प्रत्येक महासभेच्या वेळेस पत्र देवुन सुट्टी घेतात.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मस्करी चालु केली आहे, मस्करी चालु केली आहे. असा आयुक्त कोणत्याही महापालिकेत नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>फुकटचा पगार घेतात, वातानुकुलन यंत्र बसविलेल्या दालनात बसतात, वातानुकुलन यंत्र बसविलेल्या मोटारगाडीतुन फिरतात, त्यांना शरम येत नाही काय?

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>किती दिवस सुट्टीवर आहेत?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—आयुक्तांची दादागिरी चालणार नाही.

मा. सदस्या श्रीमती मिना सोंडे :—त्यांनी कुणाला लेखी पद्‌भार दिला आहे काय?

श्री. नाना रौराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :—एक दिवसाची रजा घेतली आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—ते सात महासभांमध्ये आलेले नाहीत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—महापौर महोदय, माझी आपणांस विनंती आहे की, ही महासभा उदया आयुक्तांच्या दालनामध्ये चालविली पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—पीठासीन अधिकारी म्हणुन उदया आपणांस तेथे यायचे आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—मा. महापौरजी, आपल्या शहरामध्ये पाण्याबाबत जर घनसोली सारखा प्रकार घडला त्यास प्रशासन पुर्णपणे जबाबदार राहील. एका विभागातील लोक दुस—या विभागातुन पाणी आणत आहेत. व येथिल प्रशासन पुर्णपणे निष्क्रीय आहे. सेलवन पासून श्री. विनोद पाटील पर्येत कुणीही काम करत नाहीत.

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—एक मिनिट, श्री. माखिजा साहेबांना बोलु दया.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :—ज्या दिवशी महासभा असते त्यादिवशी आयुक्त साहेब आजारी पडतात. इतर दिवशी मात्र त्यांची प्रकृती चांगली असते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—नियम, अधिनियम, कायदेकानुन या सर्वांची मजाक केली जात आहे. त्यांना काही मर्यादा नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—या विषयावर सर्वांना बोलायचे आहे.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :—मा. महापौरजी, विरोधी पक्ष नेते सन्मा. श्री. धनंजय बोडारे यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, आरोग्य विभागाशी संबंधीत जे पत्र सभागृहासमोर सादर केले आहे हे प्रकरण अतिशय गंभीर असे आहे. यासाठी माझी आपणांस विनंती आहे की, २९ तारखेस आपण जी सभा ठेवत आहात, ही सभा स्थगित करुन त्याच दिवशी ठेवण्यात यावी. ही सभा तेव्हा व्हावी जेव्हा आयुक्त साहेब उपस्थित असतील.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—उदया आयुक्तांच्या दालनामध्ये महासभा होईल. व जर उदया आयुक्त आले नाहीत तर परवा होईल. आणि परवाही जर येणार नसतील तर त्या पुढच्या दिवशी, परंतु ही सभा तेव्हाच होईल जेव्हा आयुक्त साहेब उपस्थित असतील व त्यांच्या समोर होईल. पाहु या आयुक्त साहेब किती दिवस रजा घेतात? फक्त महासभेच्या दिवशी रजा घेतात?

मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—आयुक्त साहेबांनी रजेसाठी जे पत्र दिले ते हे वाचुन दाखवत आहेत.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :—आयुक्त साहेब किती रजा घेत आहेत? लोकांच्या समस्यांचे निवारण कोण करेल? जेव्हा—जेव्हा महासभा असते तेव्हा—तेव्हा ते आजारी पडतात काय?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—महापौर महोदय, मी आपणांस सांगु इच्छितो की, ही सभा उदया आयुक्तांच्या दालनात झाली पाहिजे. उदया झाली नाही, परवा झाली नाही तर तीन दिवस वाट पाहू. तीन दिवसात सभा झाली नाही तर त्यानंतर त्यांना आम्ही महापालिकेत येवु देणार नाही.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– सन्माननिय सदस्यांनी हा जो मुद्दा उपस्थित केला आहे हे अतिशय खेदाने नमुद करावे लागते की, महिन्यातुन एकदा जी आमची महासभा होते त्या महासभेस, सात महासभांना आयुक्त आले नाहीत.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–शहरामध्ये एवढया समस्या असतांना सुध्दा आयुक्त महासभांना येत नाहीत?

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– शहरामध्ये जी पाण्याची समस्या आहे तसेच डेंग्युची जी समस्या आहे ती अतिशय गंभीर अशी समस्या आहे. त्याबाबतीत आपण उदया ४.०० वाजता आयुक्तांच्या दालनामध्ये .........................

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–मा. महापौरजी आपणांस अशी सूचना आहे की, औपचारीकपणे सभा ठेवण्यात यावी. त्यासाठी आपण अशी घोषणा करा की, ही जी सभा आहे ती स्थगित करुन ती उदया सांयकाळी ४.०० वाजता आयुक्तांच्या दालनामध्ये होईल. अशी आमची सूचना आहे याबाबत आपले म्हणणे काय आहे ते स्पष्ट करा. आणि होत नसेल तर पुढे काय करायचे त्याचा विचार आपण उदया करु.
अशी आमची सूचना आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–त्यांना महासभेत यायला वेळ नाही की शरम वाटते?

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– श्री. बोडारे साहेब, हे पहा, ही जी सभा आहे ................

श्री. नाना रौराळे (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :–फक्त आजच्या दिवसांची रजा घेतली आहे.

म. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– श्री. बोडारे साहेब, माझी अशी सूचना आहे की, आजची ही सभा तहकूब करुन २९ तारखेस ठेवु या. व उदया ४.०० वाजता आयुक्तांच्या दालनामध्ये आपण सर्वजण जावु या.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–सभाच तेथे ठेवा. महापौर महोदय, हा फार मोठा अपमान आहे. सात–सात सभांना आयुक्त उपस्थित राहत नाहीत.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:–श्री. बोडारे साहेबांच्या मताशी संपुर्ण सभागृह सहमत आहे. व ही सभा उदया आयुक्तांच्या टेबलवर झाली पाहिजे. उदया जर आयुक्त येणार नसतील तर परवा झाली पाहिजे. आणि तीन दिवसात जर आयुक्त आले नाहीत तर त्यांना महापालिकेत प्रवेश करु देवु नये.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– ठिक आहे, ठिक आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–ही सभा स्थगित करुन सभा ठेवली जावी.मला असे वाटते की, श्री. बोडारे साहेबांनी जी सूचना केली आहे ती अतिशय चांगली सूचना आहे. व आयुक्तांच्या विरोधात यापेक्षा अधिक चांगला प्रोटेस्ट दुसरा कुठला असु शकणार नाही. आपण लोक त्यांच्या विरोधात ठराव करतो ही जी गांधीगिरी आहे त्या ऐवजी प्रोटेस्ट केले तर अधिक चांगले होईल. ही सभा स्थगित करुन औपचारीकपणे त्यांच्या दालनामध्ये सभा घेतली तर ते अधिक चांगले होईल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–आणि ते जर येथे येत नसतील तर त्यांच्या घरी करु?

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– श्री. माखिजा साहेब, उदया ४.०० वाजता आपण सर्वजण आयुक्तांच्या दालनात जावु या. व त्यांना घेवुन सभागृहात येवु या.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–सचिव साहेब सुध्दा तेथे सभा सूचना वाचुन दाखविण्यासाठी उपस्थित राहतील.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– होय, सचिव साहेब सुध्दा उपस्थित राहतील.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—**सचिव साहेब, सभागृहाला माहिती दया. आयुक्त साहेब जर आपल्या दालनामध्ये आले नाहीत तर पाहिजे तर त्यांच्या घरी महासभा घेतली जावी.

**मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** श्री. लाल पंजाबी साहेब, ही सभा उदया ४.०० वाजेपर्यंत तहकुब करु या. याबाबतची लेखी सूचना काढण्यात येणार नाही. आपण सर्वांनी येथे यायचे आहे. आजची सभा उदया ४.०० वाजेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे. व सर्व सन्माननिय सदस्यांना निवेदन आहे की, त्यांनी दुपारचे जेवण करुन जावे. सभेचे कामकाज उदया पर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

**मा. सचिव :—** जाण्याअगोदर सर्व सन्माननिय सदस्यांना, पत्रकारांना, पोलिस अधिका—यांना विनंती आहे की, येथे दुपारच्या भोजणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. कृपया सेवन करुन जावे.

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १.४५ वाजता मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. विनोद तलरेजा यांनी सदरची सभा दिनांक २१/३/२००७ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत असलयाचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २१/३/२००७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २१/३/२००७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार दिनांक २०/३/२००७ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करुन ती बुधवार दिनांक २१/३/२००७ रोजी सायंकाळी ४.०० आयोजित करण्यात आली. सदर सभेत मा. उप—महापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर :—श्री. तलरेजा विनोद चंदीराम

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री. उमाप रामदास राघोजी | १०. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| ३. | श्री. पवार नाना आनंदा | ११. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| ४. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | १२. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| ५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | १३ | श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग |
| ६. | श्री. जेसवानी सतरामदास पुनमदास | १४. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| ७. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | १५. | श्री. माखिजा हरदास सन्मुखदास |
| ८. | श्री. चव्हाण रमेश महादेव | १६. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ९. | श्री. जाधव सुरेश मधुकर | | |

तर,

मा. महापौर :— १. श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश, मा. सदस्य / सदस्या २. श्रीमती जावळे संगिता रमेश, ३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन), ४. श्री. मोकल चंदाराम विठोबा, ५. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास, ६. श्रीमती आहुजा निता प्रकाश, ७. श्री. सोनवणे नथु काशीराम, ८. श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह, ९. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल, १०. श्री. पाटील विश्वनाथ गौतम, ११. श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास, १२. श्रीमती पंजाबी दिपा नारायण, १३. श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल, १४. डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश, १५. श्रीमती दासानी मिनु राजकुमार, १६. श्री. वधारिया राजेश नानिकराम, १७. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर, १८. श्रीमती मोकल सीमा चंदाराम, १९. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, २०. श्रीमती गुप्ता अनिता धर्मेंद्र, २१. श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा, २२. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास, २३. श्रीमती खिलनानी भावना रवी, २४. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ, २५. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश, २६. श्री. भालेराव गौतम यशवंत, २७. श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल, २८. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास, २९. श्रीमती माखिजा किरण लखी, ३०. श्रीमती छाब्रिया भारती पहलाज, ३१. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ३२. डॉ. (श्रीमती) साधवानी जया, ३३. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह, ३४. श्री. गायकवाड दिलीप, ३५. श्री. एडके गणपत गोविंद , ३६. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर, ३७. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल, ३८. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती, ३९. श्री. जग्यासी राजु किशनचंद, ४०. श्री. निकम शांताराम ओंकार, ४१. श्री. ठाकुर विनोद लालसिंग , ४२. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), ४३. श्री. गायकवाड सुरेश नामदेव, ४४. श्रीमती वनवारी मोना अशोक, ४५. श्री. साधवानी मोहन रहंदोमल, ४६. श्री. वाघे शामु बाबु, ४७. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ४८. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल, ४९. श्री. यादव लालबिहारी बुझारत, ५० श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग, ५१. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम, ५२. श्री. बठीजा संजय रामचंद्र, ५३. श्री. ठाकुर अशोक भगवानदास, ५४. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास, ५५. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, ५६. श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास, ५७. श्री. मनवानी अन्नु (सनमुख), ५८. श्रीमती बठीजा कोमल अमृत, ५९. श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास, ६०. श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश, ६१. श्री. इदनानी राजु चंद्रभान, ६२. श्री. पंजाबी लाल देवनदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

मा.आयुक्त श्री. सदाशिव कांबळे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या स्थानी श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते. तसेच खाली दर्शविलेले अधिकारी सभेस हजर होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
२. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त

३. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी

सांयकाळी ४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>मा. महापौरजी, आजच्या सभेचे कामकाज स्थगित केले जावे. आयुक्त साहेब गेल्या सहा–सात सभांना उपस्थित नाहीत. कालतर अतिरिक्त आयुक्त श्री. रौराळे साहेबांनी सांगितले की, आयुक्त साहेब एक दिवसाच्या रजेवर आहेत. परंतु आज ते कामावर येणार आहेत किंवा नाहीत की रजेवर आहेत हे कुणालाही माहित नाही. सकाळपासुन ते आलेले नाहीत. यासाठी ही सभा स्थगित करुन २९ तारखेला जी विशेष महासभा आयोजित करण्यात आली आहे, त्यानंतर लगेचच ही सभा घेतली जावी. तोपर्यंत ही सभा स्थगित केली जावी. कारण की, सध्या गणपुर्तीही नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>मा. महापौर महोदय, सकाळपासुन आयुक्त साहेब आलेले नाहीत. हा संदेश कित्येक नगरसेवकांना मिळाला आहे. यासाठीच नगरसेवक सभेस आले नाहीत. प्रत्यक्षात येथिल नगरसेवक आयुक्तांना प्रश्न विचारु इच्छित आहे. व आताही जर आयुक्त येणार असतील तर १० मिनिटामध्ये सर्व सदस्यांना बोलावुन घेतले जावु शकते. परंतु दुर्भाग्याची गोष्ट आहे, आयुक्त साहेब आज येथे उपस्थित नाहीत. २९ तारखेच्या विशेष महासभेनंतर जर या सभेचे कामकाज चालवायचे असेल तर रात्रीच्या भोजनाची व्यवस्था केली जावी. कारण की, ५.०० वाजता विशेष महासभा चालु होईल त्या सभेमध्ये तीन महत्वपुर्ण विषय आहे. आणि त्यानंतर या सभेचे कामकाजात तर सर्व प्रश्नोत्तरे चालवायची आहेत. यासाठी रात्रीच्या भोजनाची व्यवस्था केली जावी आणि त्या बिलाची रक्कम आयुक्तांच्या पगारातुन कपात करुन घेतली जावी. धन्यवाद ।

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>परिस्थिती पाहुन निर्णय घेतला जाईल.

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>आजची महासभा गणपुर्ती अभावी २९ तारखेपर्यंत स्थगित केली जात आहे व २९ तारखेस जी विशेष महासभा आहे त्या सभेनंतर या सभेचे कामकाज चालविले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>त्या सभेची सभा सूचना सर्वांना पाठविली जावी.

<u>मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>होय सभेची सूचना सर्वांना पाठविली जाईल.

मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. विनोद तलरेजा यांनी सदरची सभा दिनांक २९/३/२००७ रोजीच्या विशेष महासभेपर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २९/३/२००७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २९/३/२००७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार दिनांक २०/३/२००७ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करुन ती बुधवार दिनांक २१/३/२००७ रोजी सायंकाळी ४.०० आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा गणपुर्ती अभावी स्थगित करुन गुरुवार दिनांक २९/३/२००७ रोजीच्या विशेष महासभेनंतर आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री. सोनवणे नथु काशीराम | २३. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ३. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | २४. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ४. | श्री. गायकवाड दिलीप | २५. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| ५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | २६. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| ६. | श्री. उमाप रामदास राघोजी | २७. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | २८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | २९. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ३०. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १०. | श्री. पवार नाना आनंदा | ३१. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| ११. | श्री. जग्यासी राजु किशनचंद | ३२. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १२. | श्री. निकम शांताराम ओंकार | ३३. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| १३ | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ३४. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| १४. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ३५. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास |
| १५. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ३६. | श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग |
| १६. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ३७. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम |
| १७. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ३८. | डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश |
| १८. | श्री. जेसवानी सतरामदास पुनमदास | ३९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| १९. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ४०. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| २०. | श्रीमती खिलनानी भावना रवी | ४१. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २१. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल | ४२. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २२. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास | ४३. | श्री. माखिजा हरदास सन्मुखदास |
| | | ४४. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा. उपमहापौर :—१. श्री. तलरेजा विनोद चंदीराम, व मा.सदस्य / सदस्या २. श्रीमती जावळे संगिता रमेश, ३. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह, ४. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर, ५. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन), ६. श्री. वाघे शामु बाबु, ७. श्रीमती मोकल सीमा चंदाराम, ८. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ९. श्री. मोकल चंदाराम विठोबा, १०. श्री. एडके गणपत गोविंद, ११. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल, १२. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, १३. श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र, १४. श्रीमती आहुजा निता प्रकाश, १५.श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा, १६. श्री. ठाकुर विनोद लालसिंग, १७. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास, १८. श्री. साधवानी मोहन रहंदोमल, १९. डॉ. (श्रीमती) साधवानी जया , २० श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग, २१. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ, २२. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश, २३. श्री. पाटील विश्वनाथ गौतम, २४. श्री. भालेराव गौतम यशवंत, २५. श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास, २६. श्री. मनवानी अन्नु (सनमुख), २७. श्रीमती पंजाबी दिपा नारायण, २८. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास, २९. श्रीमती माखिजा किरण लखी, ३०. श्रीमती छाब्रिया भारती पहलाज, ३१. श्री. बठीजा संजय रामचंद्र, ३२. श्रीमती दासानी मिनु राजकुमार, ३३. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ३४. श्री. वधारिया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

मा.आयुक्त श्री. सदाशिव कांबळे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या स्थानी श्री. नाना रैराळे, अतिरिक्त आयुक्त हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते. तसेच खाली दर्शविलेले अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
२. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
३. श्री. एस.के.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
४. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. बी.सुंदरेश्वरन, प्रभारी शहर अभियंता
६. श्री.मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग
७. श्री. रमेश काजळे, प्र. प्रभाग अधिकारी
८. श्री. तुकाराम तारदाळकर, मुख्य लिपिक

सायंकाळी ६.०० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे व इतिवृत्त कायम करणे जरुरीचे आहे. सर्व प्रश्नोत्तरे ठिक आहेत?

<u>मा. सचिव :–</u> प्रश्न क्र. ५४२ हा श्री. राजु जग्यासी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ५४२ :–</u> उल्हासनगर शहरातील पावसाळयात रस्त्यांना मोठ–मोठे खड्डे पडल्याने शासनाने सदर रस्त्यांची माहिती घेवून शहरातील रस्त्यांना पडलेले खड्डे बुजविणे व डागडुजीकरिता सर्व महापालिकेस अनुदान देण्यात आले आहे.

तरी खालीलप्रमाणे विचारलेली माहिती मिळावी.

१. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कोणकोणते रस्त्यांचे खड्डे व डागडुजी करण्याचे प्रस्तावित केलेल्या कामांची यादी मिळावी?
२. सदर कामाकरीता किती अंदाजित खर्च प्रस्तावित केले होते?
३. त्यानुसार किती अनुदान महापालिकेस प्राप्त झाला आहे?
४. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी किती दिवसाचा होता?
५. त्यानुसार मुदतीत कामे पुर्ण झाली आहे का?
६. मुदतीत पुर्ण न झालेले व अपूर्ण राहिलेल्या कामाची माहिती मिळावी?
७. मुदतीत पूर्ण न करणा–या ठेकेदारांवर कोणती कार्यवाही प्रस्तावित केली आहे का?
८. यापैकी किती ठेकेदारांचे देयक अदा करण्यात आले आहे?
९. आले असल्यास अशाची माहिती मिळावी?
१०. ज्या ठेकेदारांनी काम पूर्ण केले आहे व त्यांचे देयक अदा करण्यात आलेले आहे अशा ठेकेदारांनी काम केल्याचे ठिकाण व देयक रक्कमेसह माहिती मिळावी.

कामाचा दर्जा, किंवा वर्षभरात रस्ते खराब झाल्यास ते संबंधीत ठेकेदाराकडून दुरुस्त करुन घेण्याबाबत कालावधी नमुद केला आहे का?

<u>उत्तर :–</u> १) सोबत यादी जोडली आहे. २) रुपये १,२०,००,०००/– ३) रुपये ५८,००,०००/– ४) १२ महिने (वार्षिक निवदा) ५) होय ६) ८ कामे प्रगतीपथावर आहेत. आणि कामे सुरु झाले आहेत. ७) प्रश्न उद्‌भवत नाही. ८) २३ काम पुर्ण झाले आहेत. परंतु अदयाप ठेकेदारांचे देयके तयार करण्यात येत आहेत. ९) देयके तयार करण्यात येत असल्याने अदयाप अदा करण्यात आलेले नाहीत. अदयापपर्यंत ठेकेदारांचे देयक तयार करण्यात येत असल्याने देयके अदा केलेली नाहीत. तथापी केलेल्या कामांची यादी सोबत जोडली आहे. १०) काम पूर्ण होण्याच्या दिनांकापासून ६ महिने.

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :– ठिक आहे.

मा. सचिव :– प्रश्न क्र. ५४३ हा श्री. राजु जग्यासी यांचा आहे.

प्रश्न क्र. ५४३ :– उल्हासनगर–२ येथिल नाना–नानी पार्क येथिल रस्ता दुरुस्ती तथा बनविणेकरीता सन २००४–२००५ मध्ये प्रस्ताव आला होता का?

१. आला असल्यास सदर काम कोणत्या मजूर संस्थेस देण्यात आले होते व त्यावर अंदाजित खर्च किती येणार होता?
२. घालून दिलेल्या शर्ती व अटीनुसार ठेकेदाराने काम पूर्ण केले आहे का?
३. नसल्यास अदयापपर्यंत का करण्यात आले नाही? त्यावर कोणती कार्यवाही करणार आहात?

उत्तर :– होय
सदर काम गावदेवी मजूर कामगार सहकारी संस्थेस देण्यात आले होते. व या कामावरील अपेक्षित खर्च रुपये २,५०,०००/– इतका येणार होता.
काम सुरु झाले नाही.
सदर कामाचे कार्यारंभ आदेश मे महिन्यात निर्गमित करण्यात आले होते. त्यानंतर पावसाळा सुरु झाल्याने काम सुरु झाले नाही. त्यानंतर संबंधीत ठेकेदारास (मजूर कामगार संस्थेस) लेखी पत्र देवून त्याची डीडीआरकडे प्रत पाठविण्यात आलेली आहे.

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी:– ठिक आहे.

मा. सचिव :– प्रश्न क्र. ५४४ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा असून तो प्रश्न त्यांनी मागे घेतला आहे. त्याची नोंद घेता येणार नाही.

मा. सचिव :– प्रश्न क्र. ५४५ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

प्रश्न क्र. ५४५ :– प्र.क्र. १ अ) दिनांक २०/१०/२००६ रोजीच्या महासभेत लक्षवेधी सुचना क्र. १ च्या अनुषंगाने मा. उप–आयुक्त (मु.) यांनी दिलेल्या उत्तरांची अंमलबजावणी झाली आहे का?

सदर प्रकरणांची अंमलबजावणी न होण्याची कारणे कोणती? सदर प्रकरण निकालात केव्हा काढण्यात येईल?

मा. उप–आयुक्त (मु.) यांनी महासभेत कबूल केल्याप्रमाणे सदर विषयी मार्च, २००७ च्या महासभेपूढे मांडणार आहे काय?

मार्च २००७ च्या महासभेपुढे सदर प्रश्न पुन्हा चर्चेस न आल्यास जबाबदार कोण? मा. आयुक्त / उप–आयुक्त (मु.) जबाबदार राहतील किंवा कसे?

उत्तर :– दिनांक २०/१०/२००६ रोजीच्या महासभेत लक्षवेधी सूचना क्र. १ च्या संदर्भात प्रस्ताव केलेला असून त्यावर अदयाप निर्णय झालेला नाही.

उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक–२००७ ची आचारसंहिता लागु झाल्यामुळे सदर प्रस्तावावर अंमलबजावणी झालेली नाही. परंतु सदर प्रस्तावास मा. आयक्त यांनी अंतिमरित्या मंजुरी प्राप्त झाल्यावर सदर प्रकरण निकालात काढण्यात येईल.

मा. आयुक्त यांचेकडे सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला असता त्यावर मा. आयुक्त यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. सदर मुद्दयांचे निराकरण करुन मा. आयुक्त यांचेकडे सदर प्रस्ताव पाठविण्यात येत आहे. त्यावर अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यावर सदरचा प्रस्ताव महासभेपुढे ठेवण्यात येईल.

**मा. सदस्य श्रीमती जयश्री सुर्वे:—** ठिक आहे.

**मा. सचिव :—** प्रश्न क्र. ५४६ हा श्री.राजु टेकचंदानी यांचा आहे.

**प्रश्न क्र. ५४६ :—** उल्हासनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागात बांधकाम परवानगी व दुरुस्ती परवानगी बाबतीत मनमानी प्रमाणे कारभार चालु आहे. त्याप्रमाणे पुढील प्रश्नाचे येत्या महासभेत उत्तर दयावे.

१) श्री. गेलोमल चांगूलमल या नावाचे व्यक्तीचे वारसदारानी बॅरेक नं. ५१०, रुम नं. ८ वरील जागेचा दुरुस्ती परवानगी मिळणे कामी दिनांक १३/१०/२००६पासुन अर्ज केला आहे आणि अर्जाचा निकाली काढण्याबाबत कुणीही तयार नाही का?

२) मा. आयुक्त सदर जागेचा पहाणी करण्याच्या हेतुने त्यांनी ही फाईल प्रलंबित ठेवली आहे त्यानंतर आलेल्या अर्जाबाबतीत त्यांनी जागेवर जावून पाहणी केली आहे. याबाबत पाहणी करण्यासाठी त्यांना वेळ नाही. जागेची पाहणी न करण्याचे कारण काय?

३) अर्ज निकालात न काढण्यामुळे त्याची जबाबदारी कुणावर ठेवता येईल?

**उत्तर :—** श्री. गेलोमल चांगुमल या नावाच्या व्यक्तीच्या वारसदारांनी बॅ.नं. ५१०, रुम नं. ८ वरील जागेच्या दुरुस्ती परवानगीच्या बाबतीत मा. आयुक्त सो. यांनी स्थळपहाणी करणेबाबत नोंद केलेली आहे. त्यामुळे त्यांचा अर्ज प्रलंबित आहे.

सदर मुद्दयाचा खुलासा या विभागातुन करता येत नाही.

सदर मुद्दयाचा खुलासा या विभागातुन करता येत नाही.

**मा. सदस्य श्री. राजु टेकचंदानी:—** ठिक आहे.

**मा. सचिव :—** प्रश्न क्र. ५४७ ते ५५० हे श्री. किशोर वनवारी यांचे असून ते प्रश्न त्यांनी मागे घेतले आहेत. त्याची नोंद घेता येणार नाही.

प्रश्न क्र. ५५१ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

**प्रश्न क्र. ५५१ :—** प्र.क्र. १ अ) उल्हासनगर महानगरपालिके अंतर्गत ३०५ सफाई कामगारांची पदे शासनाने मंजूर केली असून मा. न्यायालयाने सेवाजेष्ठतेनुसार पदे भरण्यास मान्यता दिली आहे. संबंधित सफाई कामगारांच्या मुलाखतीही घेण्यात आल्या आहेत. तरीही आजतागायत संबंधीत कामगारांच्या नेमणुका का करण्यात आल्या नाहीत? सदरचे प्रकरण प्रलंबित राहणेची कारणे कोणती? संबंधितांचे नेमणुकीचे आदेश कधी पर्यंत निर्गमित करण्यात येतील?

**उत्तर :—** सदर प्रकरणी विविध संघटनेच्या आक्षेप व तक्रारी असल्याने मा. न्यायालय याचिका क्र. ५४१/९८ मधील १७५ कामगार, तसेच मुलाखत घेतलेल्या २२० कामगारापैकी ज्यांनी सन १९८७—१९९३ या कालावधीत काम केले आहे. अशा कामगारांची पगारपत्रकानुसार कामाच्या दिवसाचा तपशील अभिलेखा विभागातुन पडताळणीसाठी स्वच्छता निरिक्षक, सामान्य प्रशासन विभगाातील लिपिक, लेखा विभागातील पिपिक यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार पात्र/अपात्र उमेदवारांची छाननी करुन अहवाल सादर केला आहे. सदर प्रस्तावावर मा. आयुक्तांच्या मंजूरी झाल्यावर मा. महासभेपुढे सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

**मा. सचिव :—** प्रश्न क्र. ५५२ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

**?**

**प्रश्न क्र. ५५२ :—** प्र. क्र. १ ब) शासनाचे आदेशानुसार कर्मचा—यांचे वेतनातील कुंठीतता घालविणेसाठी १२ वर्ष सेवा झाल्यानंतर वेतन वाढ देण्यात येते. परंतु महापालिकेतील विविध पदावर काम करणा—या व १२ वर्ष सेवा पुर्ण झालेल्या बहुतांश कर्मचा—यांना अश्या वेतनवाढी पासून वंचित ठेवण्यात आले आहे. सदचे प्रकरण प्रलंबित राहणेची कारणे कोणती आहेत? संबंधितांना १२ वर्ष वेतनवाढ न देण्याची कारणे काय आहेत? संबंधितांना कधी पर्यंत १२ वर्ष वेतनवाढ देण्यात येईल?

उत्तर :— शासनाच्या आदेशानुसार ज्या कर्मचा—यांना एकाच पदावर नियमित १२ वर्ष सेवापुर्ण झाली आहे अशा कर्मचा—यांना सदर योजनेचा लाभ देणेबाबत महापालिका निवड समितीची दिनांक २७/११/२००६ रोजी झालेल्या बैठकीत विविध संवर्गातील वर्ग—३ मधील एकूण—३६ कर्मचा—यांपैकी २१ कर्मचा—यांचे गोपनिय अहवाल निवड समितीस प्राप्त झाल्यामुळे त्यांना वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देणेबाबत निवड समितीने शिफारस केली असून १५ कर्मचा—यांचे गोपनिय अहवाल अप्राप्त असल्याने त्यांचे गोपनिय अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल व वर्ग—४ मधील एकूण—४८ कर्मचा—यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबत शिफारस केली आहे. दरम्यान कालावधीत सार्वत्रिक निवडणूक—२००७ ची आचारसंहिता सुरु होती. त्यामुळे उपरोक्त निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे मा. आयुक्तांची मान्यता प्राप्त झाल्यावर सदर प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेपुढे सादर करण्यात येईल.

मा. सचिव :— प्रश्न क्र. ५५३ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

**?**

**प्रश्न क्र. ५५३ :—** प्र.क्र. १ क) उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कोणकोणती पदे रिक्त आहेत? व किती? सदरची पदे पदोन्नतीने आजतागायत का भरण्यात आली नाहीत? याची कारणे कोणती? रिक्त पदे पदोन्नतीने कधी पर्यंत भरण्यात येतील?

उत्तर :— महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वर्ग—१ ते वर्ग—४ ची सरळसेवा व पदोन्नतीची एकुण ६४३ पदे रिक्त आहेत. सोबत परिशिष्ट जोडले आहे.

महापालिका आस्थापनेवरील पदोन्नतीची रिक्त पदे भरणेबाबत महापालिका निवड समितीची दिनांक २७/११/२००६ रोजी झालेल्या बैठकीत विविध संवर्गातील कर्मचा—यांना महापालिका सेवा शर्तीनुसार पदोन्नती देणेबाबत निवड समितीने शिफारस केली आहे. दरम्यान कालावधीत सार्वत्रिक निवडणूक—२००७ ची निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे मा. आयुक्ताची मान्यता प्राप्त झाल्यावर सदर प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेपुढे सादर करण्यात येईल.

तसेच शासनाच्या दि. २९/१/२००७ च्या आदेशानुसार सरळसेवा/ पदोन्नतीची रिक्त पदे भरणेबाबत आदेश प्राप्त झाले असुन त्यानुसार आढावा घेवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सचिव :—** प्रश्न क्र. ५५४ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

**प्रश्न क्र. ५५४ :—** प्र.क्र. १ ड) सन २००५ मध्ये अतिवृष्टी व पुर परिस्थितीमुळे अनेक नागरीकांची, कर्मचा—यांची घरेदारे, सामान, बाधीत झाल्याने शासनाने कर्मचा—यांना तिन महिन्याचे अग्रीम वेतन देण्याचे आदेश निर्गमित केले होते. उल्हासनगर महानगरपालिकेत कर्मचा—यांना सदरचे वेतनाचे संपूर्ण वाटप करण्यात आले आहे का? का अदयाप वेतनाचे वाटप करणेचे बाकी आहे? असल्यास किती हप्ते देणेचे बाकी आहे? सदरचे हप्ते कधी पर्यंत कर्मचा—यांना देणेत येतील?

**उत्तर :—** नाही. उल्हासनगर महानगरपालिका कर्मचा—यांना अग्रिम वेतनापोटी दोन हप्ते देण्यात आलेले आहेत.

उर्वरित एक हप्ता देण्याचे बाकी आहे.

सदरचा उर्वरित हप्ता लवकरात लवकर देण्याचा मानस आहे.

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**सचिव साहेब, इतिवृत्त कायम करण्याअगोदर मा. महापौर साहेबांना माझी विनंती आहे की, कित्येक समस्यांबाबत आम्ही जी लक्षवेधी दिली होती, त्याबाबतीत अधिका—यांचे काय म्हणणे आहे? ते या स्थितीमध्ये कुठपर्यंत सुधारणा करु शकतात? ते काय काय सुविधा देतील? जसे की भाटिया परिसरामध्ये पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. तेथे आमदार निधीमधुन कल्पतरु इंजिनिअरींगवाला नविन जलवाहिनी टाकत होता. ते काम अदयापपर्यंत बंद ठेवले आहे. त्या विभागातील पाण्याची समस्या कशी दुर होईल? त्याबाबतीत अधिका—यांनी खुलासा करावा. आणखी काही समस्या होत्या जसे की जेटपंप खराब झाले आहेत, बोअरवेलचे पंप खराब झाले आहेत त्यांची दुरुस्ती कशी केली जाईल? किंवा आपल्याकडे भुयारी गटार योजनेच्या ज्या तीन गाडया आहेत त्यातील एक गाडी कॅम्प नं. १,२,३ साठी दिली जावी दुसरी गाडी ४,५ साठी दिली जावी अशी व्यवस्था अधिकारी कधी करतील? लक्षवेधीमध्ये आम्ही जेवढया समस्यांचा उल्लेख केला होता त्या प्रत्येक समस्येचा संबंधीत विभागाच्या उपायुक्तांनी खुलासा केला पाहिजे. व २००२ पासुन २००७ पर्यंत आम्ही लोकांनी जेवढया काही लक्षवेधी सुचना मांडल्या होत्या त्या लक्षवेधींवर जे निर्णय झाले होते त्याबाबतीत मा. महापौरांनी जे अधिनिर्णय दिले होते त्याची अंमलबजावणी अधिकारी वर्ग कधी करतील? याचा जरा खुलासा करावा. व त्यांची अंमलबजावणी होईल किंवा नाही याबाबतीत महापौर महोदयांनी संबंधितांना आदेश दयावेत. व संबंधितांनी त्याचा खुलासा करावा मी हे एक विनंती पत्र आणले आहे. ते मी मा. महापौर, मा. आयुक्त आणि मा. सचिवांना प्रस्तृत करत आहेत. कृपया त्याचा त्यांनी स्विकार करावा व पाणी पाण्याचे जे टॅंकर पुरविले जातात ते काही विभागांमध्ये मिळत नाहीत. ज्या ज्या विभागांतध्ये पाण्याची समस्या आहे त्या विभागांमध्ये पाण्याचे टॅंकर सहजपणे कसे उपलब्ध होवु शकतील? त्याबाबतीत सुध्दा अधिका—यांनी खुलासा करावा.

**मा. महापौर :—**सभागृहात बसलेले आमचे सर्व सन्माननिय सदस्य जसे श्री. दादा सतरामदास म्हणत आहेत की लक्षवेधीद्वारे उपस्थित केलेले बरेचसे विषय प्रलंबित आहेत. आम्ही आमच्या ५ वर्षाच्या कार्यकाळामध्ये जेवढे काही शक्य होते तेवढे प्रयत्न केले. जणेकरुन पाण्याची समस्या दुर व्हावी. परंतु आता जे नविन सदस्य निवडुन आले आहेत हे जे ओझे आहे ते आम्ही त्यांच्या खांदयावर टाकत आहोत. व मी अपेक्षा व्यक्त करते की, या ज्या समस्या आहेत त्यांचे ते निवारण करतील. तसेच मी सर्व सदस्यांना एक निवेदन करते की, जे काही विषय प्रलंबित आहेत ज्याबाबत आमचे दादा श्री. सतरामदासजी म्हणत आहेत आता सभागृहातील विदयुत पुरवठा खंडित झाला आहे त्यामुळे सभागृहात उकाळा होत आहे. त्यासाठीच हे सर्व प्रश्न निवडून आलेल्या पुढील कमिटीकडे कॅरीफोरवर्ड करत आहोत......................... प्रश्नोत्तराची चर्चा वगळण्यांत येत आहे? ठिक आहे. परंतु दादा सतरामदास जे म्हणत आहेत लक्षवेधी आणि प्रश्नोत्तराच्या माध्यमातुन त्यांनी शहरातील ज्या काही समस्या उपस्थित केल्या आहेत त्यांचे निवारण केले जाईल. व मागील वेळेस स्थायी समिती व महासभेमध्ये आम्ही जेवढे काही प्रस्ताव पारीत केले आहेत आयुक्तांनी त्यांवर अंमलबजावणी करावी. व येणा—या कमिटीस त्यांचे पालन करण्यास सांगितले जावे. यावेळेस आमचा ५ वर्षाचा कालावधी अतिशय चांगल्या पध्दतीने पार पाडला. मी अपेक्षा व्यक्त करते कीयेणा—या ५ वर्षामध्ये शहरातील समस्यांची आपण जबाबदारी स्विकारुन कार्यवाही कराल. असे म्हणुन ही जी सभा आहे ती समाप्त करत आहे. कृपया जनगणमन म्हटले जावे....

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— इतिवृत्त कायम करण्याच्या विषयावर मला बोलायचे आहे. महासभेमध्येच सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी एक लक्षवेधी सूचना मांडली होती.

मा. सचिव :—आपणा सर्वांचे जेवढे काही प्रश्न होते ते आपणांसर्वांच्या समंतीने निकाली काढण्यात आले आहे. व दुसरा जो विषय आहे तो मागील सर्वसाधारण सभेचे दिनांक मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक २०/१२/०६ ( त्यात २०/२/२००७ ) व दिनांक २०/२/२००७ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

आता आपण बोला.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— इतिवृत्त कायम करण्याचा जो विषय आहे, मागील महासभेत श्री. किशोर वनवारी यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. तिच्या चर्चेच्या वेळी मुख्यालयाचे उपायुक्त श्री. बागेश्वर साहेबांनी सांगितले होते की, त्या अधिका—याची चौकशी चालु आहे. त्याच्या विरोधात महिलांनी पोलिस ठाण्यामध्ये गंभीर स्वरुपाची तक्रार दाखल केली आहे. तरीही त्या अधिका—याची प्रभाग अधिकारी म्हणुन नेमणुक केली आहे. त्यांस त्या पदावरुन हटविले जावे. अशी श्री. विनोद ठाकुर यांनी मागणी केली होती. त्यावर प्रशासनाने आश्वासन दिले होते त्याचे काय झाले? त्याचा श्री. बागेश्वर साहेबांनी खुलासा करावा.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—महापौर महोदया, २००४ पासुन उल्हासनगर शहरातील एक नागरीक पाणी पुरवठा विभागामध्ये चकरा मारत आहे. त्यास न्याय मिळत नाही. कृपया याची इतिवृत्तांतात नोंद घेवुन संबंधीत अधिका—यास ताकिद देण्यात यावी की सत्यता लक्षात घेवुन व नियमांनुसार त्या नागरीकांस मदत करावी त्याचप्रमाणे त्यास जे देयक मिळाले होते त्यास जे २२ हजाराचे देयक मिळाले होते त्यानंतर ४३ हजार रुपये त्यानंतर ६५ हजार रुपये प्रत्यक्षात तेथे नळजोडणीच नाही. तो नागरीक २००४ पासुन आजपर्यंत महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात चकरा मारत आहे. त्यास सहकार्य मिळत नाही तर कृपया संबंधित अधिका—यास आदेश दयावेत. तसेच मागील वेळेस मी लक्षवेधी मांडली होते त्या लक्षवेधीचे काय झाले? त्यामध्ये काय होते, पाणी पुरवठा विभागाकडील जी थकबाकी ग्राहकांकडे बाकी होती त्यावर अठरा टक्के व्याज आकारले जात होते. ते व्याज घेणे महानगरपालिकेच्या नियमात बसते काय? जर नियमात बसत नसेल तर नागरीकांकडुन ते का घेतले जात आहे? जेव्हा लोक बिल भरु शकत नाहीत तेव्हाच तर लोकांकडे पाणी बिलाची थकबाकी राहते. त्यांच्याकडे जी पाणी बिलाची रक्कम राहिली आहे त्याच्या चौपट तर व्याज झाले आहे. तर कृपया नियमांचे पालन व्हावे. सचिव साहेबांनी कृपया याचा खुलासा करावा. महापौर महोदयांनी याबाबतीत त्यांना आदेश दयावेत. १८ टक्के व्याज घेतले जावु शकते काय जर घेतले जावु शकत नसेल तर जाता जाता आपण त्यांना न्याय दिला पाहिजे. त्यामध्ये उशिर का करत आहेत? नियमांबाबतीत खुलासा केलात तर धन्यवाद ।

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :—मा. महापौर महोदया, पाणी बिलावरील व्याजाबाबतची निर्भय योजना सर्व ठिकाणी लागु आहे ती आपणाकडे लागु का केली जात नाही. या योजनेनुसार बिल माफ केले तर जेवढे काही बिले प्रलंबित आहेत ती लोक भरतील. येथे तर आपण ओरड करत आहोत की वसुली होत नाही. जेवढे काही वादग्रस्त बिले आहेत त्यांची वसूली होत नाही. व्याज माफ केले तर वसुलीही मिळेल याबाबतीत काहीतरी केले जावे धन्यवाद।

मा. सदस्य श्री. सुरेश जाधव :—श्री. सतरामदास जेसवानी यांनी जी लक्षवेधी सुचना मांडली आहे आणि त्याच्यावर जी चर्चा होत आहे त्याबाबत मी आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ असलेल्या अतिरिक्त आयुक्त साहेबांना एक प्रश्न विचारु इच्छितो की, या प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी ते सक्षम आहेत काय? जसे श्री. राजेंद्र चौधरी यांनी मागणी केली आहे. त्याबाबतीत चर्चा करुन निर्णय घेण्यामध्ये यांना अधिकार आहेत काय? जर असतील तरच चर्चा केली जावी. नसेल तर आमचा आणि त्यांचा वेळ कशासाठी व्यर्थ घालविला जात आहे? येथे जे आयुक्तांच्या स्थानी आता बसले आहेत त्यांना काही एक अधिकार नाहीत. ते आमच्या प्रश्नांवर कार्य निर्णय देतील? जर त्यांना अधिकार नसतील तर त्यांना येथे बसविण्यात काही अर्थच नाही.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** मी काही मागणी केलेली नाही. इतिवृत्तांतामध्ये जी नोंद आली आहे त्याबाबतीत मी बोलु इच्छितो ते बरोबर आहे किंवा नाही?

**मा. सदस्य श्री. सुरेश जाधव :—** श्री. भदाणे यांना सेवेतुन निलंबित करण्याचा जो मुद्दा पुढे येत आहे तर आजच्या सभेत बसलेले हे आयुक्त त्यांना निलंबित करु शकतात काय?

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**मागील सभेच्या पीठासीन अधिका—यांनी जे म्हटले आहे आणि त्याची इतिवृत्तांतात जी नोंद आली आहे त्याबाबतीत मी बोलत आहे.

**श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त, मुख्यालय) :—**काही सन्माननिय सदस्यांनी येथे जे काही मुद्दे उपस्थित केले आहेत श्री. भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांच्या बाबतीत महानगरपालिकेतील काही महिला कर्मचा—यांनी जी तक्रार केली होती त्याची चौकशी श्री. रौराळे साहेबांनी पुर्ण केली आहे व तिचा अहवाल त्यांनी मा. आयुक्त साहेबांना सादर केला आहे. दुसरी गोष्ट अशी की श्री. भदाणे यांच्याकडे जो अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे त्याबाबतीत प्रशासनाचे म्हणणे असे आहे की, अशाप्रकारचे कार्यभार सोपविणे ही पुर्णपणे प्रशासकिय बाब आहे व ती आयुक्त साहेबांच्या अधिकार क्षेत्रात येते. आयुक्त साहेबांनी श्री. भदाणे यांना कार्यभार सोपविणेची जी कार्यवाही केली आहे ती योग्य आहे तसेच महासभेचा निर्णय होता तो साहेबांच्या निदर्शनास आणुन दिला होता साहेबांनी त्यावर चर्चा करणेस लिहिले आहें. चर्चा झाल्यानंतर त्यावर निर्णय घेतला जाईल.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**दुसरी गोष्ट अशी की, आपण असे म्हटले आहे की, श्री. भदाणे यांची जी नेमणुक आहे ती नोव्हेंबर पर्यंतच होती नोव्हेंबरमध्येच ती समाप्त झाली आहे. तर त्यांच्या बाबतीत महासभेची पुन्हा मंजुरी घेणे आवश्यक आहे किंवा नाही? आणि जर घेणे आवश्यक असेल तर ती घेण्यासाठी त्याचा प्रस्ताव अदयापपर्यंत महासभेपुढे का ठेवला नाही? त्यांची जी नेमणुक केली आहे ती समाप्त होते नोव्हेंबर मध्ये. त्यानंतर मुदतवाढ देण्यासाठी महासभेची मंजुरी आवश्यक नाही काय? मुदतवाढ देणे हे आयुक्तांच्या अधिकार क्षेत्रात आहे काय? नोव्हेंबरमध्ये मुदत समाप्त होते आम्हांला हे माहित नव्हते.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—**महापौर महोदया, आर्थिक दारिद्रय रेषेखालील लोकांचा मिळकत कर माफ करण्याचा निर्णय झाला होता त्यावर चर्चा झाली होती, आदेश झाले होते, गरीबांचे मालमत्ता कर माफ झाले काय? स्मशानामध्ये लाकडे निशुल्क देण्याचा ठराव पारीत झाला होता. चर्चा झाली होती. त्याचे काय झाले? येथे काहीच होत नाही. संपुर्ण कार्यकाळ अयशस्वी ठरला.त्याचा आपण स्विकार करा. आमचा जो कार्यकाळ होता तो चांगला गेला नाही. म्हणुन आता जाता जाता आपण ताकीद दया व एक निंदा प्रस्ताव पारीत करा. ज्या प्रशासनाने सभागृहाच्या भावनांचा आदर राखला नाही त्या आयुक्तांच्या विरोधात निंदा प्रस्ताव पारीत केला पाहिजे असे मी सर्व सदस्यांना निवेदन करतो.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—**मा. महापौरजी, आमचे मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले की स्थायी समिती व महासभेमध्ये तर फारच चांगले चांगले निर्णय घेण्यात आले. परंतु त्यांवर अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे ते त्यांनी केले नाही. श्री. दिलीप लालवानी यांनी थोडया वेळापुर्वीच सांगितले की जेव्हा जेव्हा महासभा असते तेव्हा आयुक्तांच्या घरी कुणीतरी गंभीर आजारी असते. ७—८ वेळा त्यांच्या घरातील कुणीतरी गंभीर आजारी पडले. त्यातन त्यात दोन—तीन वेळेसच त्यांनी रजा घेतली आहे. रजा न घेता ते महासभांना गैरहजर राहिले हा महासभेचा अपमान आहे. याबाबतीत श्री. दिलीप लालवानी म्हटले की आयुक्तांविरुध्द निंदा प्रस्ताव पारीत केला पाहिजे. मी त्यांच्या त्या प्रस्तावाचे अनुमोदन करतो. त्याचबरोबर स्थायी समितीमध्ये व महासभेमध्ये जे ठराव पारीत झाले त्यांच्यावर अंमलबजावणी करणे हे सुध्दा प्रशासनाचेच काम आहे. आज एका मुद्दयाबाबतीत उपायुक्त, मुख्यालय यांनी सांगितले की, ही प्रशासकीय बाब आहे. स्थायी समितीमध्ये, महासभेमध्ये जे ठराव पारीत होतात त्यांवर त्वरीत कार्यवाही करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. ठरावांवर कार्यवाही करायची नसेल तर आयुक्तांनी अशा ठरावांबाबत मुं.प्रा.म.अ. १९४९ चे कलम ४५१ नुसार नगरविकास सचिवांकडे ते रद्द करण्यासाठी तीन महिन्याच्या आत पाठवायचे आहे. ज्या ठरावांबाबतीत त्यांनी

आजपर्यंत शासनाला काही लिहिलेले नाही किंवा जे ठराव रद्द केले नाही असे स्थायी समिती व महासभेचे जेवढे काही ठराव पारीत झाले आहेत त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. मला असे वाटते की ते मोजक्या काही विभागांकडे लक्ष देतात जे त्यांना सहकार्य करतात. खास करुन शिक्षण मंडळ आहे. शिक्षण मंडळास ते फारच सहकार्य करतात. सुवर्ण जयंती योजनेमध्ये फारच सहकार्य करतात. त्याचाप्रमाणे इतर विभागांकडेही लक्ष देवुन त्या त्या विभागांच्या ठरावांवर त्यांनी अंमलबजावणी केली पाहिजे ते लागु केले पाहिजे व तसेच सर्व विभागांकडे लक्ष दिले पाहिजे. आज त्यांचे सर्वात कमीत कमी लक्ष सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. प्रत्येक प्राकलनावर लिहितात चर्चा करा. काय चर्चा करायची? आपल्या विभागप्रमुखांवरच त्यांचा विश्वास नाही. सर्वात अगोदरच तर ते प्राकलन तयार करण्यास मंजुरी देतात. जेव्हा प्राकलन तयार करुन पाठविले जाते तेव्हा त्यावर ते लिहितात चर्चा करा. चर्चा करण्यासाठी त्यांना वेळच नाही. त्यांच्या घरी कुणीन कुणी आजारी असते. तीन तीन दिवस रजा घेतात त्यांच आयुष्यच अतिशय व्यस्त आहे. त्यांनी आपले अधिकार अतिरिक्त आयुक्तांना प्रधान केले पाहिजे. उपायुक्त मुख्यालय यांना दिले पाहिजे. आज शहर अभियंतावर सुध्दा त्यांचा भरोसा नाही. कार्यकारी अभियंत्यावर भरोसा नाही. जे लोक प्राकलने तयार करतात प्रत्येक प्राकलना बाबतीज साशेंकता व्यक्त करणे, शेरे, शेरे, शेरे (क्युरी,क्युरी,क्युरी) मारणे,.......यांचे नाव तर क्युरी मास्टर ठेवले पाहिजे. म्हणुन आज जसे श्री. दिलीप लालवानी यांनी म्हटले की त्यांच्या विरोधात निंदा प्रस्ताव पारीत केला पाहिजे. त्यांच्या त्या प्रस्तावास मी अनुमोदन देतो. आयुक्त महासभेत तर सोडाच पण दोन वेळा स्थायी समिती सभेत तर उपस्थित सुध्दा राहिले नाहीत. आज तर महासभा आहे. कालच स्थायी समितीची सभा झाली. त्या सभेत ते उपस्थित नव्हते. तीन दिवस अगोदर झालेल्या स्थायी समिती सभेत सुध्दा ते नव्हते. ते जर एवढे व्यस्त असतील तर त्यांनी अतिरिक्त आयुक्तांना अधिकार प्रदान करुन तीन–चार महिने रजेवर राहुन आपली सर्व घरगुती कामे निकालात काढले पाहिजे. त्यानंतर कामावर आले पाहिजे. यास्तव मा. महापौर व सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की जेजे ठराव पारीत झाले आहेत जसे की स्मशानामध्ये निशुल्क लाकडे पुरवठा करणे. हा प्रस्ताव मीच मांडला होता त्याचा सुचक मीच आहे. जनतेच्या हितासाठी जेवढे काही ठराव आम्ही मांडले त्यांच्यावर अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम होते तर प्रशासन पुर्णपणे अपयशी ठरले आहे. आज श्री. भदाणे यांच्याबाबतीत सांगण्यात आले की त्यांच्याबाबतीत आयुक्तांना अधिकार आहे. महासभेने श्री. भदाणे यांच्या मुदतवाढीस मंजुरी दिलेली नाही. तर आज महासभेत असा ठराव पारीत झाला पाहिजे की श्री. भदाणे यांना जो पगार दिला जातो तो आयुक्तांच्या पगारातुन दिला पाहिजे? जोपर्यंत कुण्याही अधिकारी व कर्मचा–याच्याबाबतीत स्थायी समिती किंवा महासभेचा ठराव पारीत झालेला नसेल तर लेखा विभागाने त्यांना पगार देता कामा नये. यासाठी नोव्हेंबरच्या नंतरच्या कालावधीसाठी महासभेची मंजुरी नसतांना श्री. भदाणे यांना जो पगार दिला जातो तो आयुक्तांच्या पगारातुन दिला पाहिजे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–मा. महापौरजी, पाणी बिलावर व्याज आकारले जावु शकते काय? याबाबतीतील कायदयाची माहिती अधिका–यांकडुन घेतली जावी. कृपया उपायुक्तांनी याचा खुलासा करावा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–इतिवृत्तांताबाबतीत उत्तर दया.

श्री. अशोक बागेश्वर (उपायुक्त, मुख्यालय):–मा. महापौर महोदया, श्री. भदाणे यांचा परिविक्षाधीन कालावधी तो २१/१२/२००५ रोजी संपृष्टात येणार होता. तो कालावधी त्यांचे गोपनिय अहवाल तपासुन १/४/२००४ ते ३१/३/२००५, १/४/२००५ ते ३१/३/२००६ हे जे त्यांचे गोपनिय अहवाल आहेत ते तपासुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. आणि त्यांना जे सेवेत कायम करायचे आहे त्याबाबतचा विषय महासभेसमोर मंजुरीसाठी आणण्यात येईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–नोव्हेंबरच्या नंतरची स्थिती काय आहे? त्यांची मुदत नोव्हेंबर मध्येच संपृष्टात आली आहे त्यांना पगार कोण देते आणि कुणाच्या सांगण्यानुसार?

श्री. अशोक बागेश्वर (उपायुक्त, मुख्यालय):–मा. महापौर महोदया, नेमणुका ज्या होतात त्या दोन प्रकारे होतात. एक तर एकदम कायम पदावर होते दुसरी तात्पुरत्या स्वरुपाची. श्री. भदाणे यांची जी नेमणुक

होती ती कायम स्वरुपाची होती. दोन वर्षासाठी जी नेमणुक करण्यात आली होती ती परिविक्षाधीन कालावधी म्हणुन करण्यात आली होती. परंतु ती कायम पदावरती होती.परिविक्षाधीन कालावधी संपृष्टात आणणे बाबत प्रशासनाचा प्रस्ताव महासभेपुढे येईल. त्यानंतरच परिविक्षाधीन कालावधी संपृष्टात आणला जातो परंतु त्यांच्या सेवेचा कालावधी हा दोन वर्षाचा होता असे काही होत नाही. त्यांची जी नेमणुक केली आहे ती कायम पदावर केलेली आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आपण स्वत: सांगितले की नोव्हेंबर मध्ये त्यांचा कालावधी संपला आहे. तर नोव्हेंबरपासुन आजपर्यंत आपण काय केले? याबाबतीत कुणाला अधिकार आहे आयुक्तांना अधिकार आहे की महासभेला आहे? नोव्हेंबरच्या नंतर त्यांना जे वेतन दिले जाते ते कुणाच्या सांगण्यानुसार दिले जाते? त्याबाबतीत त्यांना कुणी आदेश दिले आहेत? ही काय खाजगी पेढी आहे काय? ज्याला पाहिजे त्याला दया. हे कुणाच्या सांगण्यानुसार दिले जाते? लेखा विभागवाले त्यांना पगार कसे देतात?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—सचिव महोदय, निंदा प्रस्तावाचे काय झाले? मतदान घ्यायचे आहे काय? की सर्वसंमतीने ठराव पारीत करत आहात?

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :— मा. महापौरजी, सभागृहातील सर्व सदस्यांना माझे निवेदन आहे की, कोणत्याही संस्थेची शेवटची जी सभा असते मग ती संस्था ग्रामपंचायत असो, नगरपालिका असो, महानगरपालिका असो, विधानसभा असो किंवा लोकसभा असो ती आभार व्यक्त करण्याची असते. त्यासभेमध्ये सर्वजण अधिका—यांचे आभार व्यक्त करतात.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—शहराचा सत्यनाश केला. आभार कुणाचे व्यक्त करणार?

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:— माझे बंधु श्री. दिलीप लालवानी यांना विनंती करेन की निंदा प्रस्ताव पारीत करण्याऐवजी आभार व्यक्त करणारा प्रस्ताव पारीत केला पाहिजे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—ठिक आहे मतदान घ्या. किती लोक आयुक्तांच्या कारभारावर खुष आहेत.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—निवडुन आलेल्या नविन सदस्यांना काम करण्याची संधी दया.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— शहराचा आणखी किती सत्यनाश करायचा आहे?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—श्री. भदाणे यांना पगार कोण देते?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री. हरदास माखिजा यांनी जे म्हटले त्याच्याशी मी सहमत आहे. ज्या अधिका—यांनी चांगले काम केले त्यांच्याबाबतीत आभार व्यक्त करण्यासाठी उदया आणखी दुसरी एक महासभा आहे. त्या सभेमध्ये अभिनंदन प्रस्ताव पारीत करु. परंतु आज फक्त आयुक्तांबाबतीत निंदा प्रस्ताव पारीत करु या. व ही शेवटची महासभा नसुन उदया आणखी दुसरी महासभा आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—सांगा श्री. भदाणे यांना आपण पगार कसे देत आहात?

श्री. अशोक बागेश्वर(उपायुक्त मुख्यालय):—महापौर महोदया, आता सन्माननिय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला श्री. भदाणे यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त झाला आहे त्यानंतर सुध्दा त्यांना पगार कसा दिला जात आहे? त्याबाबतीत खुलासा करतो की, जी कायम स्वरुपाची पदे असतात त्या पदांवर नेमलेल्या व्यक्तींना पगार देण्याची तरतुद अर्थसंकल्पात केलेली असते. राहिला प्रश्न श्री. भदाणे यांचा नेमणुकीचा जोपर्यंत त्यांचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण होत नाही किंवा त्यांना कायम सेवेत सामावुन घेतले जात नाहीत तोपर्यंत त्यांची नेमणुक त्याच पदावर आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:— आपण म्हणता त्यांची नेमणुक कायम पदावर केलेली आहे. दुसरे म्हणता परिविक्षाधीन कालावधीवर आहे. आपणांस स्वत:लाच कळत नाही आपण काय बोलु इच्छित आहात. दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीनंतर भदाणे यांच्या नेमणुकीस महासभा कायम करेल की आयुक्त कायम करतील? याबाबतचे अधिकार कुणाला आहेत? आपण म्हणता की ते दोन वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीवर होते तसेच कायम पदावर नेमलेल्या कर्मचा—यांच्या पगारासाठी अर्थसंकल्पात तरतुद केलेली असते. नोव्हेंबरमध्ये त्यांचा कालावधी पुर्ण झाला. आता आर्थिक वर्षातील शेवटचा मार्च महिना चालु आहे. त्यांना आपण पगार देता परंतु त्यांची नेमणुक कायम करण्याचा अधिकार कुणाला आहे, महासभेला आहे की आयुक्तांना आहे?

श्री. अशोक बागेश्वर(उपायुक्त मुख्यालय):—महापौर महोदया, जेथपर्यंत कायम करण्याचा प्रश्न आहे त्यांना कायम तर महासभाच करेल. व परिविक्षाधीन कालावधी संपृष्टात आणण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये कोणतीही तरतुद नाही याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियम जे आहेत त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आता आपण स्वत:च म्हणतात की दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी दिलेला आहे. त्यानंतर म्हणतात की अधिनियमामध्ये तरतुद नाही. तर अशा प्रकारे आपण दोन्ही गोष्टी कश्या करत आहात?

श्री. अशोक बागेश्वर(उपायुक्त मुख्यालय):—महापौर महोदया, सदस्य महोदयास मी सांगु इच्छितो की परिविक्षाधीन कालावधी व सेवेत कायम करणे हे दोन वेगवेगळे मुद्दे आहेत हे वेगवेगळे मुद्दे आहेत कायम करणे हा जो मुद्दा आहे याचा अर्थ एखादया कर्मचा—यास सेवेमध्ये कायम करण्याबाबतचा असतो. व परिविक्षाधीन कालावधी जो असतो तो दोन वर्षाचा असतो. परिविक्षाधीन कालावधी संपल्यानंतर सेवेत कायम करण्याबाबतचा प्रस्ताव महासभेपुढे येईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— समजा, त्यांची सेवा नियमित होत नसेल तर त्यांना आजपर्यंत दिलेल्या पगाराची जबाबदारी कोण घेईल? त्यांचे दोन वर्षाचे गोपनिय अहवाल जर खराब असतील तर आजपर्यंत मुदतीनंतर त्यांना देण्यात आलेल्या पगाराची जबाबदारी कोण घेईल? समजा त्यांची सेवा नियमित होत नसेल तर त्याची जबाबदारी कोण घेईल?

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :— मा. महापौरजी व आयुक्त साहेब, ज्या व्यक्तीने महिलांशी गैरवर्तन केले आहे अशा अधिका—यास येथुन हाकलले पाहिजे. त्याची बाजु घेवुन त्यास पदोन्नती कशी दिली जात आहे.? जो व्यक्ती आपल्या महापालिकेचे नाव खराब करत आहे अशा व्यक्तीस एवढया अधिका—याची पदे का देता? आमच्या सन्माननिय सदस्यांनी म्हटले की त्यांची चौकशी झाली पाहिजे ती चौकशी अदयापपर्यंत का होत नाही? आयुक्त महासभांना येत नाहीत. ते त्यांना महासभेविना परवानगी कसे देत आहेत?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— त्यांची मुदत संपल्यानंतरही त्यांना जो पगार दिला जात आहे त्यांची जबाबदारी कोण घेईल?

श्री. अशोक बागेश्वर(उपायुक्त मुख्यालय):—महापौर महोदया, श्री. भदाणे यांच्याविषयीचे दोन तीन वर्षाचे गोपनिय अहवाल मी वाचले आहेत. ते गोपनिय अहवाल बी प्लस आहेत. व त्यानुसार ते पात्र आहेत. व त्यांची सेवा नियमित करण्याचा जो प्रस्ताव आहे तो त्यांचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झाल्यानंतर महासभेपुढे आणला जाईल. भदाणे ज्या पदावर काम करत आहेत व जे पद कायम सेवेचे आहे त्यासया महासभेने व शासनाने सुध्दा मान्यता दिलेली आहे. व अर्थसंकल्पात सुध्दा त्या पदाच्या पगारासाठी तरतुद ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना पगार देणे जरुरीचे आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– त्यांचे गोपनिय अहवाल बी प्लस चे असल्याबाबत आपण वाचले आहे आणि ते आपणाकडे आहे आमच्याकडे तर ते नाहीत आम्ही ते वाचलेले नाही. मला असे वाटते की, निवडून आलेल्या नविन सदस्यांना असे वाटत असेल की यांची सेवा आपण नियमित करायची नाही तर यांच्याबाबतीत जबाबदारी कोण घेईल? आपण घ्याल कि आयुक्त घेतील? जसे आमच्या श्रीमती मालती करोतिया यांनी म्हटले की असे अधिकारी आम्हांला नको आहेत तर अशा अधिका–याची जबाबदारी कोण घेईल?

श्री. अशोक बागेश्वर(उपायुक्त मुख्यालय):–महापौर महोदया, जेथपर्यंत महासभेचा किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिकेच्या अधिनियमाने तयार केलेल्या प्राधिकरणाचा प्रश्न आहे त्यांचा सर्व कारभार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार पार पाडला जातो. श्री. भदाणे किंवा अन्य कोणत्याही अधिका–याचा गोपनिय अहवाल व त्यांचा वार्षिक अहवाल आहे तो चांगला आहे त्यामुळे त्यांना सेवेत कायम करणे जरुरीचे आहे. कायदयाच्या कक्षेबाहेर जावुन नामंजुर करणे असे काही होईल असे मला वाटत नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– हे तर आपणांस माहित आहे ना आम्हांस कुठे माहित आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:– महासभेचा निर्णय तुम्ही घेता काय?

श्री. अशोक बागेश्वर(उपायुक्त मुख्यालय):–महासभेचा निर्णय मी घेत नाही माझे एवढेच म्हणणे आहे की महासभा आणि बाकीची जी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार तयार केलेली प्राधिकरणे आहेत ती सर्व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यभार करतात. आणि त्यानुसार एखादया कर्मचा–याला ज्या तरतुदी लागु आहेत आणि ज्या अटी पुर्ण कराव्या लागत आहेत आणि तो जोपर्यंत त्या अटी पुर्ण करत आहे तोपर्यंत माझे असे कायदेशीर मत होते की, त्या कायदयाच्या बाहेर जावुन कोणतेही प्राधिकारी काम करु शकत नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–गोपनिय अहवाल जरा बाजुला ठेवा. ते ए प्लस आहेत किंवा बी प्लस आहेत

श्री. नाना रौराळे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–श्री. भदाणे यांच्या विरुध्दच्या तक्रारी बाबतचा जो अहवाल आहे तो जवळ जवळ १०–१५ पानांचा अहवाल आहे. तो वाचुन दाखवु काय? मा. महापौर महोदया, मा. विरोधी पक्ष नेता आणि सर्व सन्माननिय सदस्य,

उल्हासनगर महानगरपालिकेमधील जनसंपर्क अधिकारी श्री. युवराज भदाणे यांच्या विरुध्द ज्या महिलांनी तक्रार केली होती. त्या तक्रारीच्या आधारावर चौकशी करण्याचे मा. आयुक्तांनी मला निर्देश दिले होते. व मागील महासभेतच चौकशी पुर्ण करण्याचे मी आपणांस आश्वासन दिले होते. त्यानुसार मी चौकशी पुर्ण केली आहे. चौकशीच्या दरम्यान ज्या लोकांना साक्षीसाठी बोलावणे आवश्यक होते त्यांची साक्ष घेतली आहे. श्री. युवराज भदाणे यांच्याकडुन सुध्दा लेखी घेतलेले आहे. महिलांचे म्हणणे, श्री. भदाणे यांचे म्हणणे व साक्षीदारांचे म्हणणे ऐकुन घेवुन एकंदरित तक्रारदार महिला कर्मचा–यांनी श्री. भदाणे यांच्याबाबतीत केलेली तक्रार, विक्षीतपणे शेरे मारणे, मागासवर्गीय कर्मचा–यांना अपमानास्पद वागणुक देणे अशा प्रकारे केलेली तक्रार ही मानसिक त्रास सहन न झाल्यामुळे केलेली असून याबाबीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. कारण यामुळे सुध्दा पुढे एखादी गंभीर घटना घडु शकते. या संबंधात संबळ पुरावा पुढे आला नसला तरी कामाच्या ठिकाणी होणा–या लैंगीक सतावणुकीस प्रतिबंधक करण्यासाठी १९९२ चा रिट विनंती अर्ज सीआरएन क्रमांक ६६६–७० मधील मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिवाडयातील मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र. मकोच २००६ प्रकरण १५ दिनांक १९ सप्टेंबर, २००६ रोजी लैगिंक छळ वादातील ज्या बाबीचा समावेश करण्यात आला आहे त्याबाबीमध्ये वरील तक्रारीचा समावेश होतो. असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–श्री. रौराळे साहेब आपण त्यांना दोषी ठरविले आहे ना?

श्री. नाना रौराळे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—त्या बाबींचा समावेश होतो असे फक्त म्हटले आहे. आणि हा अहवाल मी मा. आयुक्तांना सादर केला आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—हा तर अतिशय गंभीर असा विषय आहे. आयुक्तांनी तर आता त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे व महासभेसाठी त्यांनी वाट पहाता कामा नये.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—अशा अधिका—यास एक मिनिट सुध्दा ठेवता कामा नये.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—अहवालाची प्रत सर्वांना प्रस्तृत केली पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—त्यांना दोषी ठरविले आहे, हाकलुन टाका.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—त्यानंतर सुध्दा त्यांना कामावर ठेवणार आहात काय?

श्री. अशोक बागेश्वर(उपायुक्त मुख्यालय):—महापौर महोदया, श्री. भदाणे यांच्या विरुध्दची चौकशी झाल्यानंतर जो अहवाल आहे तो मा. अतिरिक्त आयुक्त यांनी मा. आयुक्तांना सादर केला आहे. त्या अहवालाची पुर्णपणे छाननी करुन तो प्रस्ताव आयुक्तांना सादर केला जाईल. व त्यांवर त्यांचा जो निर्णय असेल त्यानुसार कार्यवाही केली जाईल.
मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आपणांस असे वाटते का आयुक्त अतिरिक्त आयुक्तांच्या अहवालामध्ये काही बदल करतील? असे वाटत आहे काय?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—आयुक्त साहेब त्यांना सहकार्य करतील काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. अतिरिक्त आयुक्त साहेब, आपण जे म्हणत आहात त्याचा निर्णय आयुक्त साहेब घेतील. आयुक्त साहेबांनी बरेच मोठे दोन निर्णय घेतलेले आहेत. एक बांधा वापरा व हस्तांतरीत करा याबाबतचा आणि दुसरा जकात वसुलीच्या खाजगी करणाबाबतचा. तिसरा कोणत्याही विषयाकडे ते जास्त लक्ष देत नाहीत. आपणांस तर माहित आहे फारच चांगले चांगले निर्णय त्यांनी घेतले आहे याबाबतचा निर्णय सभागृहासमोर आणा आपण सांगा की आम्ही तो सभागृहासमोर आणु म्हणुन.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— महिलांशी असभ्य वर्णन करणा—या अधिका—यांचा आम्ही निषेध करतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आपण म्हणता की तो अहवाल आयुक्तांना सादर केला आहे त्यानंतर तो महासभेपुढे येईल. आपणांस असे वाटते का आयुक्त त्यामध्ये काही बदल करतील म्हणुन?

श्री. अशोक बागेश्वर(उपायुक्त मुख्यालय):— महापौर महोदया, कोणतीही चौकशी पुर्ण झाल्यानंतर तिच्यामध्ये ज्या बाबी आढळुन आलेल्या असतात,निष्कर्ष काढलेले असतात त्याबाबतीत छाननी होते. त्यानंतर जे सक्षम प्राधिकारी असतात त्यांच्यासमोर तो अहवाल आणला जातो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—आपणांस असे वाटते का त्यांना जे आढळुन आले आहे ते चुकीचे आहे. त्यांनी चौकशी पुर्ण केली आहे. त्यांनी जुलुम केले आहे ते आरोपी आहेत. त्यानंतरही आपण म्हणता की आयुक्तांना अहवाल देवु. आयुक्त त्याची छाननी करतील तर यांना ज्या बाबी आढळुन आल्या त्यामध्ये काही बदल होणार आहे काय?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—मा. महापौरजी मागील वेळेस सुध्दा जेव्हा लोणारे साहेब मुख्यालयाचे उपायुक्त होते त्यावेळेस त्यांनी सुध्दा त्यांच्या विरोधात अशाच प्रकारचा अहवाल तयार केला होता. परंतु त्यावेळेस त्यांच्यावर काही कारवाई झाली नाही. व आज अतिरिक्त आयुक्तांनी जो अहवाल तयार केला आहे तो अतिशय गंभीर असा अहवाल आहे. म्हणुन श्री. भदाणे यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. आणि जर कारवाई केली नाही तर महिलांवर अन्याय केल्यासारखे होईल.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—**आपण जो अहवाल तयार केला आहे त्यावर ठराव पारीत केला जावा. व त्यावर अंमलबजावणी झाली पाहिजे.

**मा. महापौर :—**आपल्या समोर अहवाल यांनी वाचुन दाखविला आहे.  व आपण समजु शकता की अंतिम प्राधिकारी आयुक्त असल्यामुळे ते जोपर्यंत त्यावर स्वाक्षरी करत नाहीत तोपर्यंत त्यावर अंमलबजावणी होणार नाही.  आपण बराचवेळ या विषयावर चर्चा केली म्हणुन त्यांनी याविषयावर माहिती दिली आहे. श्री. भदाणे यांच्याबाबतीत रौराळे साहेब यांच्याकडे जी चौकशी चालु होती तिचा अहवाल त्यांनी आयुक्तांना सादर केला आहे.  व आयुक्त त्याबाबतीत अंतिम निर्णय घेतील.  व सभागृहाच्या भावना लक्षात घेता त्यावर लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यात यावी असे आपण आयुक्तांना सांगा.

**मा. सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २ :–** मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक २०/१२/०६ ( त्यात २०/२/२००७ ) व दिनांक २०/२/२००७ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**मा. महापौर :–** मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक २०/१२/०६ ( त्यात २०/२/२००७ ) व दिनांक २०/२/२००७ रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

**मा. सचिव :–** कृपया लक्ष दया. या सभेचा जो मुख्य विषय आहे तो कब्रस्तान विषयीचा आहे. त्याबाबतीत मा. उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिला आहे. त्यामुळे आजच्या सभेत हा विषय घेतला जाणार नाही.

विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३:–** उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील स.नं.५८ पैकी २ एकर शासकिय जमिन कब्रस्तान वापर प्रयोजनार्थ महापालिकेस हस्तांतरण करणे कामी शासनाकडे मागणी करणे.

---

**मा. महापौर :–** सदरचा प्रस्ताव सर्वानमुते आजच्या कार्यसुचीवरुन वगळण्यांत येत आहे.

---

**विषय क्र. ३:–** उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील स.नं.५८ पैकी २ एकर शासकिय जमिन कब्रस्तान वापर प्रयोजनार्थ महापालिकेस हस्तांतरण करणे कामी शासनाकडे मागणी करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील स.नं. ५८ (पै) रहिवास परिमंडळात समाविष्ट असलेली २ एकर जमीन (मुस्लिम समाजासाठी) कब्रस्थान असा जमिन वापर बदल, एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनाने दिनांक २५.७.०६ रोजीच्या आदेशाप्रमाणे सदर जमातीस २ एकर जागा (आ.नं. ५८ पै.) देण्याबाबत आदेश पारीत केले आहेत.

''मुस्लिम समाजासाठी कब्रस्थान'' असा जमीन वापर बदल शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत व दिनांक २५.२.२००६ रोजीच्या पारित आदेशाप्रमाणे कब्रस्थानाकरीता आरक्षित केलेली शासकिय जमीन, महानगरपालिकेकडे हस्तांतरीत कार्यवाही करणे आवश्यक असल्याने, हस्तांतरीत करणेची कार्यवाही पूर्ण करणेपुर्वी महानगरपालिकेच्या सभेची मंजूरी घेवुन तसा प्रस्ताव शासनास विनाविलंब सादर करणेस संदर्भित अर्धशासकिय पत्रान्वये कळविले आहे.

प्रकरणी प्रस्ताव येत्या महासभेत विचारविनिमय, चर्चा व मंजूरीकरीता, महासभा विषय सूचीमध्ये समाविष्ट करण्यात यावा.

महासभा ठराव क्र: ३१ दिनांक:—२९/३/२००७

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चराम रुपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील स. नं.५८ पैकी दोन एकर शासकिय जमिन कब्रस्तान वापर प्रयोजनार्थ महापालिकेस हस्तांतरण करणे कामी शासनाकडे मागणी करण्याचा प्रस्ताव आजच्या सभेच्या कामकाजातुन वगळण्यात येत आहे.

कारण ——

या प्रस्तावा संदर्भात मा. मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली असुन स्थगिती आदेश प्राप्त झाला आहे.

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर ठरावा अंतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—मा. महापौर महोदया, पाणी बिलावर जे व्याज आकारले जाते त्यावरील खुलाश्याचे काय झाले? अधिका—यांना विचारले जावे.

श्री. आर.आर. सावकारे (कार्यकारी अभियंता, पापुवि):—सन्माननिय महापौरजी व सर्व सन्माननिय सदस्य नगरसेवक श्री. सतरामदास जेसवानी यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता त्याबाबत मी खुलासा करु इच्छितो. पाणी पुरवठयाच्या बिलाच्या थकबाकीवरील व्याज वसुली बाबत विचारणा केली होती. उल्हासनगर महानगरपालिकेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत १९९४ मध्ये पाणी पुरवठा केला जात होता. व पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे होती त्यानंतर ती तत्कालीन उल्हासनगर नगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आली त्यावेळेस जे उपविधी तयार करण्यात आले होते त्याच उपविधींचा आम्ही वापर करत आहोत. त्यावेळची जी बिले थकित आहेत त्यावर १८ टक्के व्याज आकारणेचे उपविधीमध्ये लिहिले आहे. चालु जी बिले आहेत त्यावर अशा प्रकारचे व्याज आकारले जात नाहीत.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—साहेब, महानगरपालिका व्याज वसुल करु शकते का? नियम आहे काय? आपण महापालिकेत बसलो आहोत. आपण महापालिकेचे उपायुक्त आहात.आज जी महासभा आहे ती महानगरपालिकेची आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची नाही. साहेब मी आपणांस काय विचारत आहे. आपणाकडे जे महापालिका अधिनियमाचे पुस्तक आहे ते नियम आपण वाचले आहे किंवा नाही? येथे विधी अधिकारी आहे किंवा नाही? जर ते असतील तर कृपया त्यांच्याकडुन संपुर्ण माहिति घेतली जावी. ही काही सर्वसाधारण बाब नाही. मी आपणांस सांगितले की ज्या लोकांकडे नळजोडणी नाहीच त्यांनी २००४ पासुन शपथपत्र लिहून दिले आहे. विनंती पत्र देत आहेत. महापालिकेत चकरा मारत आहेत. व प्रत्यक्ष जागेवर जावुन पाहणी झाली आहे. फक्त पाणी बिलाच्या रक्कमेमध्ये दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. फक्त रक्कमा वाढवत जायच्या निर्णय काही घ्यायच्या नाही. व जी रक्कम वाढवत चालला आहात ती सुध्दा नियमानुसार नाही. यासाठी कृपया याचा खुलासा करा ना.

आपण महानगरपालिकेत बसलो आहोत. महानगरपालिकेचा नियम काय आहे? तो आम्हांस सांगा. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला जावु दया. १९९४ मध्ये नगरपालिका होती. त्यावेळेस मी सुध्दा नगरसेवक होतो. आज महानगरपालिका आहे. महानगरपालिकेचे नियम सांगा ना?

श्री. आर.आर. सावकारे (कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा) :—नाही, नाही त्यावेळेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जे उपविधी वापरत होते तेच आता आपण वापरत आहोत.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—साहेब, महानगरपालिकेत आपण नगरपालिकेचे नियम का सांगत आहात?

श्री. आर.आर. सावकारे (कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा) :—नाही, ते उपविधी होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे त्यांनी ते तयार केले होते.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—महानगरपालिका होवुन किती वर्ष झाली आहेत? नगरपालिकेचे नियम अदयापपर्यंत का वापरले जात आहेत?

श्री. आर.आर. सावकारे (कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा) :—नाही, नाही त्यावेळेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उपविधी तयार केले होते.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—उपविधी तर तुम्ही आणि मी रोज तयार करत राहु. परंतु जे महानगरपालिका अधिनियमाचे पुस्तक आहे जे शासनाने तयार करुन दिले आहे ते कशासाठी आहे? आपण जे काही काम करतो...............

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौर महोदया, सभागृहामध्ये गणपुर्ती नाही आपण सभेचे कामकाज कसे चालवत आहात? उपस्थित सदस्यांची संख्या कमी झाली आहे आणि आपण कामकाज चालवत आहात?

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—ठिक आहे, धन्यवाद ।

मा. सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.४० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– ५/४/२००७

# विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची पहिली विशेष महासभा गुरुवार दिनांक ५/४/२००७ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेत **मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, श्रीमती वल्सा नायर सिंह** हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३९ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| २ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ४० | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ३ | श्री. गायकवाड दिलीप | ४१ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ४ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४२ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ५ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४३ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्री. यादव रामसागर जनार्दन | ४४ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४५ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ८ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४६ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ९ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४७ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४८ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्री. विजय खंडु सुपळे | ४९ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५० | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ५१ | श्री. शेखर केशव यादव |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५२ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५३ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५४ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५५ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| १८ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५६ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १९ | श्री. राजू जग्यासी | ५७ | श्री. किशोर जग्यासी |
| २० | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५८ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २१ | श्री. केवलरामाणी हीरो चन्दुलाल | ५९ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ६० | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २३ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ६१ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २४ | श्रीमती डॉ. निना प्रकाश नाथानी | ६२ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २५ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ६३ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २६ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ६४ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २७ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६५ | श्री. मोहन साधवाणी |
| २८ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६६ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २९ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६७ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| ३० | श्री. लाल पंजाबी | ६८ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ३१ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६९ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| ३२ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ७० | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३३ | श्रीमती शकुंतला पाटील | ७१ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३४ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ७२ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३५ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ७३ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३६ | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ७४ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३७ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ७५ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३८ | श्री.एडके गणपत गोविंद | | |

खालील अधिकारी सभेस हजर होते.

२०.श्री. सदाशिव कांबळे, आयुक्त

२१. श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त
२२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
२३. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
२४. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
२५. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
२६. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
२७. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
२८. श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
२९. डॉ. के. आर. खरात, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
३०. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
३१. श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
३२. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
३३. श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता, पा.पु.
३४. श्री. सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.विभाग
३५. श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी
३६. श्री. तुकाराम तारदाळकर, मुख्य लिपिक
३७. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

वंदे मातरम् म्हणुन दुपारी १२.०५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> आजच्या या सभागृहामध्ये मा. विभागीय आयुक्त तथा जिल्हा अधिकारी, मुंबई श्रीमती वल्सा नायर सिंह हया पीठासीन अधिकारी म्हणुन सभेचे संचलन करतील व त्यांच्या नियंत्रणाखाली सभेचे कामकाज चालेल. मी मा. महापालिका आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्यांनी त्यांना पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत करावे.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १:–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २००७ सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची (अनुसूचित जाती महिला) महापौर पदासाठी निवड करणे .

---

आजची जी विशेष महासभा आहे तिच्याबाबतीत मा. पीठासीन अधिकारी यांच्या अनुमतीने मी आपणांस काही जरुरीच्या सुचना देवु इच्छितो.

महापौर पदाच्या निवडणूकीसाठी ३० मार्च रोजी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात आली होती. या पदासाठी महानगरपालिका सचिवांना ८ नामनिर्देशनपत्र प्राप्त झाली होती. उमेदवाराचे व त्याच्या सुचक व अनुमोदकांची नावे मी आपणांस वाचुन दाखवितो ती याप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | सौ. संगिता राजेश कंडारे | श्री. गणपत गोविंद एडके | सौ. निलु ठाकुर चांदवानी |
| २. | सौ. वेलकर सुरेखा राजन | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सौ. सुजाता रमेश रिजवानी |
| ३. | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | श्री. दत्तात्रय नारायण पवार | श्री. दिलीप देविदास जग्यासी |
| ४. | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | श्री. राजु (जिवन) इदनानी | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| ५. | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | श्री. रामसागर जे. यादव |
| ६. | श्रीमती निर्मले विद्या विजय | श्री. वानखेडे राजेश देवेंद्र | श्रीमती मिना सोनेजी (सोंडे) |
| ७. | सौ. पवार पंचशिला नाना | सौ. शेळके सुमन गजानन | सौ. निकम लता शांताराम |
| ८. | सौ. मालती राधाचरण करोतिया | श्री. तुलसीदास बद्रीचंन्द वसिटा | सौ. रजनी मोहन महाडिक |

मी सर्व नामनिर्देशनपत्र मा. पीठासीन अधिकारी यांच्याकडे सुपुर्त केली आहेत. मा. पीठासीन अधिकारी यांनी सर्व नामनिर्देशनपत्र वैध ठरविली आहेत. त्यामुळे खालील उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र मा. पीठासीन अधिकारी यांच्याकडुन वैध घोषित करण्यात आली आहेत.

१. सौ. संगिता राजेश कंडारे
२. सौ. वेलकर सुरेखा राजन
३. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान
४. श्रीमती निर्मले विद्या विजय
५. सौ. पवार पंचशिला नाना
६. सौ. मालती राधाचरण करोतिया

प्रथम महापौर पदाची निवडणूक होईल व त्यानंतर उप–महापौर पदाची निवडणूक होईल.

महापौर पदाच्या निवडणूकीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी अनुसार व महापौर, उपमहापौर पदासाठी निवडणूका घेणे नियम २००५–२००६ आणि महापौर, उप–महापौर पदासाठी निवडणूका घेणे सुधारणा नियम २००६ या नियमांच्या आधारे महापौर पदाची निवडणूक घेतली जात आहे. महापौर, उप–महापौर पदाची निवडणूक नियम २००५ नियम ६ पोट नियम ३ च्या नुसार निवडणूक लढविणा–या उमेदवारांची अंतिम यादी तयार करण्यापुर्वी, ज्या–ज्या उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र सादर केले आहे अशा उमेदवारांपैकी जो कोणी आपली उमेदवारी मागे घ्यायची आहे त्यासाठी मा. पीठासीन अधिकारी यांनी त्यास १५ मिनिटाची वेळ दयायची आहे.  त्यानुसार पीठासीन अधिका–यांकडुन या कामी १५ मिनिटांची वेळ दिली जात आहे.  या १५ मिनिटांच्या वेळेत फक्त महापौर पदाचे उमेदवार आपली उमेदवारी मागे घेवु शकतात. व व्यासपीठामागील भिंतीवर जे घडयाळ लावलेले आहे त्यामध्ये यावेळेस दुपारचे १२ वाजुन १२ मिनिटे झाली आहे.  तर १२ वाजुन २७ मिनिटांनी १५ मिनिटांची वेळ समाप्त होईल.  या वेळेच्या आत जर कुणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेवु इच्छित असेल तर त्याबाबतचे फॉर्म माझ्याकडे उपलब्ध आहे तो भरुन मा. पीठासीन अधिकारी यांच्याकडे दयावा लागेल.

कृपया लक्ष दया.  उमेदवारी मागे घेण्याबाबतचे ४ फॉर्म मा. पीठासीन अधिकारी यांना प्राप्त झाले आहेत.  त्या उमेदवारांची नावे याप्रमाणे आहेत...........

१. श्रीमती वेलकर सुरेखा राजन
२. श्रीमती निर्मले विद्या विजय
३. श्रीमती पंचशिला नाना पवार
४. श्रीमती मालती राधाचरण करोतिया

आणखी कुणी उमेदवार जर आपली उमेदवारी मागे घेवु इच्छित असेल तर त्यासाठी दोन मिनिटाची वेळ दिली जात आहे,  कुणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेवु इच्छित नसेल तर पुढील कामकाजास सुरुवात केली जाईल.

उमेदवारी मागे घेण्याची वेळ समाप्त.

मा. पीठासीन अधिका–यांच्या वतीने महापौर पदाची निवडणूक लढविणा–या उमेदवाराची अंतिम यादी जाहिर केली जात आहे .महापौर पदाच्या निवडणूकीसाठी आता केवळ दोन उमेदवार आहेत त्यांची नावे मराठी वर्णमालेनुसार खालील क्रमाने आहेत.

१. श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण
२. सौ. कंडारे संगिता राजेश

या दोघांपैकी कुण्या एकास आपणांस निवडून दयायचे आहे.  ज्या उमेदवारास आपण आपले मत देवु इच्छिता त्याच्या बाजुने आपला हात उंचावुन आपणांस आपले मत दर्शवायचे आहे.

**सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता हे सभागृहातुन बाहेर गेले.** 

महापालिका सचिव कार्यालयाचे कर्मचारी श्री. पतंगराव आपणा समोर उभे आहेत त्यांच्याकडे महापौर पदाचे उमेदवार श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांच्या नावाची एक मतदार यादी आहे.  त्यामध्ये सर्व सदस्यांची नावे मराठी वर्णमालेच्या क्रमाने लिहिलेली आहेत.  त्या यादीवर आपल्या नावासमोर आपणांस स्वाक्षरी करावयाची आहे.  ही स्वाक्षरी करण्याअगोदर आपले हात उंचावुन मत दयायचे आहे

व दुस–या बाजुला महापालिका सचिव कार्यालयाचे कर्मचारी श्री. श्याम शिवनानी हे उभे आहेत. जे सन्माननिय सदस्य महापौर पदाचे उमेदवार सौ. कंडारे संगिता राजेश यांच्या बाजुने मत देवु इच्छितात त्यांनी श्री. श्याम शिवनानी यांच्याकडे जावुन त्यांच्याकडे असलेल्या मतदार यादीतील आपल्या नावासमोर स्वाक्षरी करावयाची आहे.

तसेच जे सन्माननिय सदस्य तटस्थ राहु इच्छितात त्यांनी पुढे यावे त्यांची स्वाक्षरी श्रीमती नर्गिस खान या घेतील.

महापौर पदाचे पहिल्या क्रमांकावरील उमेदवार श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांच्या बाजुने जे सन्माननिय सदस्य आपले मत देवु इच्छितात त्यांनी कृपया एका बाजुस यावे. जेणेकरुन मला गणना करण्यास सुलभ होईल. आपण आपल्या जागेवर उभे राहुन हात वर करावेत.



१ श्री. दत्तात्रय नारायण पवार
२ श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के
३ श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान
४ श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी
५ श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी
६ श्री. मोहन (गारो) रामरख्यानी
७ श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी
८ श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण
९ श्री. सुरेश मधुकर जाधव
१० श्रीमती मनसुलकर शिला सुभा ा
११ श्री. गोविंदराम डोलुमल लुंड
१२ श्री. ठाकूर विनोद लालसिंग
१३ श्रीमती वनवारी मोना अशोक
१४ श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी
१५ श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद
१६ श्री. राम (चार्ली) पारवानी
१७ श्रीमती जया प्रकाश माखीजा
१८ श्रीमती डॉ. निना प्रकाश नाथानी
१९ श्री. आयलानी कुमार उत्तमचंद
२० श्री. लाल पंजाबी
२१ श्रीमती ाकुंतला पाटील
२२ श्री. सुखरामानी महेश (एसिढवाला)
२३ कु. जग्यासी ाकुंतला जीवनलाल
२४ श्री. किशोर जग्यासी
२५ श्री. बच्चाराम रूपचंदानी
२६ श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर
२७ श्री. गायकवाड दिलीप
२८ श्री. यादव रामसागर जनार्दन
२९ श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र
३० श्री. विजय खंडु सुपाळे
३१ श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज)
३२ श्री. बोडारे धनंजय बाबूराव
३३ श्रीमती बोडारे वसुधा धनंजय
३४ श्री. चव्हाण रमेश महादेव

३५ श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे
३६ श्री. शेखर केशव यादव
३७ श्रीमती ज्योती शाम माने
३८ श्री. राजेश देवेंद्र वानखेडे
३९ श्रीमती विद्या विजय निर्मले
४० श्रीमती मीना सोनेजी (सोंडे)
४१ श्री. पाटील प्रधान धर्मा
४२ श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा
४३ श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास
४४ श्रीमती मालती राधाचरण करोतिया
४५ श्री. मोहन साधवानी
४६ श्रीमती रजनी महाडिक
४७ श्री. प्रशांत किशनराव धांडे
४८ श्रीमती निलम प्रेमसिंग रावत
४९ श्री. केवलरामाणी हीरो चन्दुलाल
५० श्रीमती चेनानी ज्योती रमेश
५१ श्री. मुकेश सोहन तेजी

**श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांच्या बाजुने ५१ मते.**

पुढील उमेदवाराबाबतीत मतदान घेण्यापुर्वी आपण आपल्यानावासमोर स्वाक्षरी करावी.

कुण्या एका सदस्याने स्वाक्षरी केलेली नाही. स्वाक्षरी करण्याचा कोणता सदस्य राहिला आहे?

कृपया लक्ष दया जे सन्माननिय सदस्य सौ. कंडारे संगिता राजेश यांच्या बाजुने मत देवु इच्छितात त्यांनी कृपया आपल्या आसनाशेजारी उभे राहुन हात वर करावेत.



१ श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी
२ श्री. लालबिहारी बुझारत यादव
३ श्रीमती संगीता राजेश कंडारे
४ श्री. रविंद्र दशरथ बागूल
५ श्रीमती सुजाता रमेश रिझवानी
६ श्री. राजू जग्यासी
७ श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी
८ श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम
९ श्री. भठीजा (बब्बु) संजय
१० श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी
११ श्री. एडके गणपत गोविंद
१२ श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा
१३ श्रीमती वेलकर सुरेखा राजन

१४ श्री. नीलु ठाकुर चांदवाणी
१५ श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री)
१६ श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई)
१७ श्री. मोरे भानजी भिकाजी
१८ श्री. ढोके जनार्दन किशनराव
१९ श्रीमती पंचशिला नाना पवार
२० श्रीमती सुमन गजानन शेळके
२१ श्रीमती लता शांताराम निकम

२२ श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील

२३ श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे

**श्रीमती कंडारे संगिता राजेश यांच्या बाजुने २३ मते.**

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>आमचा एक सदस्य बाहेर गेला आहे. त्याचीही स्वाक्षरी घेतली जावी.

**<u>महापालिका सचिव :—</u>**स्वाक्षरी घेईपर्यंत ते आल्यास, पीठासीन अधिकारी महोदया तो सदस्य आल्यास त्यास स्वाक्षरी करण्यासाठी आपण परवानगी देवु शकता काय?

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>**किती वेळेच्या आत आल्यास त्यांची स्वाक्षरी घेतली जावु शकते?

**<u>महापालिका सचिव :—</u>**मा. पीठासीन अधिकारीच्या निर्णयाने त्यांना स्वाक्षरी करण्यास अनुमती दिली जाणार नाही व त्याच्या मताची नोंदणी पण करता येणार नाही.

कृपया लक्ष दया. महापौर पदाचे उमेदवार श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांच्या बाजुने ५१ मते पडली आहेत. व महापौर पदाचे दुसरे उमेदवार सौ. कंडारे संगिता राजेश यांच्या बाजुने २३ मते पडली आहेत. अंतिम निर्णय मा. पीठासीन अधिकारी महोदया जाहिर करतील.

**<u>मा. पीठासीन अधिकारी :—</u>** मी वल्सा नायर सिंह विभागीय आयुक्त, कोकण विभाग तथा पीठासीन अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ अन्वये व महापौर व उपमहापौर पदाची निवडणूक नियम २००५ चे नियम ७ अन्वये श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांना उल्हासनगर महानगरपालिकेचे महापौर पदी निवडून आल्याचे घोषित करीत आहे.

---

☑

**विषय क्र. १:—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २००७ सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची (अनुसूचित जाती महिला) महापौर पदासाठी निवड करणे .

<u>प्रस्तावना :</u>

उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नवीन महापौर निवडणेबाबत दिनांक ५/४/२००७ रोजी सभा आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेमध्ये निर्वाचित पालिका सदस्यांमधुन एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १९ च्या तरतुदीप्रमाणे महापौर पदावर निवड करावयाची आहे. या पदासाठी खालील ६ उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केलेली असुन पीठासीन अधिकारी यांनी सदरची नामनिर्देशनपत्रे वैध घोषित केलेली आहेत.

१. **श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण**

२. **सौ. करोतिया मालती राधाचरण**

३. **सौ. कंडारे संगिता राजेश**

४. **सौ. पवार पंचशिला नाना**

५. **श्रीमती निर्मले विद्या विजय**

६. **सौ. वेलकर सुरेखा राजन**

विहीत मुदतीत उपरोक्त उमेदवारांपैकी १. श्रीमती करोतिया मालती राधाचरण, २. श्रीमती वेलकर सुरेखा राजन, ३. श्रीमती पवार पंचशिला नाना, ४. श्रीमती निर्मले विद्या विजय यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण व श्रीमती कंडारे संगिता राजेश हया २ उमेदवार रिंगणात शिल्लक आहेत. त्यामुळे हात उंचावुन मतदानाची पध्द्त अवलंबली जावी व तद्नंतर निवडणूक निकाल जाहीर करणेसाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्रमांक १ दिनांक : ५/४/२००७

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार ७४ पालिका सदस्यांनी हात उंचावुन केलेल्या मतदानाअंती खालील दर्शविलेल्या प्रत्येक उमेदवारासमोरील मिळालेली मते जाहीर करीत आहे व सर्वात जास्त मते प्राप्त केलेल्या उमेदवार **श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण** यांची महापौर पदावर निवड करीत आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नांव | मिळालेली एकुण मते |
|---|---|---|
| १. | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण | ५१ |
| २. | श्रीमती कंडारे संगिता राजेश | २३ |

मतदानाद्वारे मंजुर

विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांना व्यासपीठावर घेवुन येण्यासाठी मी येत आहे. कृपया त्यांनी तयार रहावे.

यावेळी नवनिर्वाचीत मा. महापौर श्रीमती आशान लिलाबाई या व्यासपीठावरील महापौरांच्या आसनावर आसनस्थ झाल्या.

मा. पीठासीन अधिकारी हया नवनिर्वाचीत महापौरांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत करतील. तसेच मा. आयुक्त साहेब पुष्पगुच्छ देवुन मा. महापौरांचे स्वागत करतील. त्याच प्रमाणे महापालिकेच्या वतीने महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा हे मा. महापौरांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत करतील.

पुढील कामकाजाकडे वळायचे का?

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २**:— उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २००७ सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची उप—महापौर पदासाठी निवड करणे .

---

उप—महापौर पदासाठी ३० मार्चला ५ नामनिर्देशनपत्र भरण्यात आली होती. उमेदवारांची व त्यांच्या सुचक, अनुमोदकांची नावे याप्रमाणे आहेत......

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्री. चव्हाण रमेश महादेव | श्री. दिलीप दशरथ गायकवाड | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| २. | श्री. चव्हाण रमेश महादेव | श्री. धनंजय बाबुराव बोडारे | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३. | श्री. ठाकुर विनोद लालसिंह | श्री. सुरेश मधुकर जाधव | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| ४. | श्री. मोरे भानजी भिकारी | श्री. ढोके जनार्दन किसनराव | सौ. निकम लता शांताराम |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | श्री. मोहन रहंदोमल साधवानी | सौ. इंदिरा जमनादास उदासी | सौ. रजनी मोहन महाडिक |

सर्व उमेदवारांची नामनिर्देशनपत्र मा. पीठासीन अधिका—यांकडुन वैध घोषित करण्यात आली आहेत. व खालील उमेदवार वैधरित्याने नामनिर्देशित करण्यात आले आहेत.

१. श्री. चव्हाण रमेश महादेव

२. श्री. ठाकुर विनोद लालसिंह

३. श्री. मोरे भानजी भिकारी

४. श्री. साधवानी मनोज रहंदोमल

ज्याप्रमाणे महापौर पदाच्या निवडणूकीसाठी उमेदवारी मागे घेवु इच्छिणा—या उमेदवारांना १५ मिनिटांची वेळ दिली होती. त्याचपध्दतीने मा. पीठासीन अधिका—यांकडुन उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. व्यासपीठामागील भिंतीवरील घडयाळयाच्या हिशोबाने यावेळेस दुपारचे १.०० वाजला आहे. १ वाजुन १५ मिनिटांनी उमेदवारी मागे घेण्याची वेळ संपेल. ज्यांना आपली उमेदवारी मागे घ्यायची आहे ते उमेदवार या वेळेच्या आत आपली उमेदवारी मागे घेवु शकतात. उमेदवारी मागे घेण्याचे फॉर्म माझ्याकडे उपलब्ध आहेत. ते कुणीही माझ्याकडे येवुन घेवु शकतात.

उमेदवारी मागे घेण्याची वेळ समाप्त......

**मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.**

केवळ दोन उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे त्यांची नावे याप्रमाणे आहेत.

१. श्री. ठाकुर विनोद लालसिंग

२. श्री. साधवानी मोहन रहंदोमल

आता उप—महापौर पदाच्या निवडणूकीसाठी केवळ दोन उमेदवार राहिले आहेत त्यांची नावे मराठी वर्णमालेच्या क्रमाने याप्रमाणे आहेत......

१. श्री. चव्हाण रमेश महादेव

२. श्री. मोरे भानजी भिकारी

उप—महापौर पदाची निवडणूक लढविणा—या उमेदवाराची अंतिम यादी मा. पीठासीन अधिकारी यांचेकडुन घोषित करण्यात आली असून ती याप्रमाणे आहे......

१. श्री. चव्हाण रमेश महादेव

२. श्री. मोरे भानजी भिकारी

जे सन्माननिय सदस्य उप—महापौर पदाचे उमेदवार श्री. चव्हाण रमेश महादेव यांच्या बाजुने मत देवु इच्छितात त्यांनी कृपया आपल्या आसनाशेजारी उभे राहुन हात वर करुन आपले मत दर्शवावे.

**श्री. चव्हाण रमेश महादेव यांच्या बाजुने ५१ मते**

१ श्री. दत्तात्रय नारायण पवार
२ श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के
३ श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान

४ श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी
५ श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी
६ श्री. मोहन (गारो) रामरख्यानी
७ श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी
८ श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण
९ श्री. सुरेश मधुकर जाधव
१० श्रीमती मनसुलकर शिला सुभाष
११ श्री. गोविंदराम डोलुमल लुंड
१२ श्री. ठाकूर विनोद लालसिंग
१३ श्रीमती वनवारी मोना अशोक
१४ श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी
१५ श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद
१६ श्री. राम (चार्ली) पारवानी
१७ श्रीमती जया प्रकाश माखीजा
१८ श्रीमती डॉ. निना प्रकाश नाथानी
१९ श्री. आयलानी कुमार उत्तमचंद
२० श्री. लाल पंजाबी
२१ श्रीमती शकुंतला पाटील
२२ श्री. सुखरामानी महेश (एसिढवाला)
२३ कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल
२४ श्री. किशोर जग्यासी
२५ श्री. बच्चाराम रूपचंदानी
२६ श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर
२७ श्री. गायकवाड दिलीप
२८ श्री. यादव रामसागर जनार्दन
२९ श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र
३० श्री. विजय खंडु सुपाळे
३१ श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज)
३२ श्री. बोडारे धनंजय बाबूराव
३३ श्रीमती बोडारे वसुधा धनंजय
३४ श्री. चव्हाण रमेश महादेव
३५ श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे
३६ श्री. शेखर केशव यादव
३७ श्रीमती ज्योती शाम माने
३८ श्री. राजेश देवेंद्र वानखेडे
३९ श्रीमती विद्या विजय निर्मले
४० श्रीमती मीना सोनेजी (सोंडे)
४१ श्री. पाटील प्रधान धर्मा
४२ श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा
४३ श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास
४४ श्रीमती मालती राधाचरण करोतिया
४५ श्री. मोहन साधवानी
४६ श्रीमती रजनी महाडिक
४७ श्री. प्रशांत किशनराव धांडे
४८ श्रीमती निलम प्रेमसिंग रावत
४९ श्री. केवलरामाणी हीरो चन्दुलाल
५० श्रीमती चेनानी ज्योती रमेश
५१ श्री. मुकेश सोहन तेजी

ज्या दोन सन्माननिय सदस्यांनी स्वाक्षरी केली नाही त्यांनी कृपया आपली स्वाक्षरी करावी.

कृपया लक्ष दया जे सन्माननिय सदस्य उप–महापौर पदाचे उमेदवार श्री. मोरे भानजी भिकारी यांच्या बाजुने आपले मत देवु इच्छितात कुपया त्यांनी आपल्या आसनाशेजारी उभे राहुन हात वर करुन आपले मत दर्शवावे.

**श्री. मोरे भानजी भिकारी यांच्या बाजुने २४ मते.**

१ श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी
२ श्री. लालबिहारी बुझारत यादव
३ श्रीमती संगीता राजेश कंडारे
४ श्री. रविंद्र दशरथ बागूल
५ श्रीमती सुजाता रमेश रिझवानी
६ श्री. राजू जग्यासी
७ श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी
८ श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम
९ श्री. भठीजा (बब्बु) संजय
१० श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती
११ श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी
१२ श्री. एडके गणपत गोविंद
१३ श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा
१४ श्रीमती वेलकर सुरेखा राजन
१५ श्री. नीलु ठाकुर चांदवाणी
१६ श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री)
१७ श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई)
१८ श्री. मोरे भानजी भिकाजी
१९ श्री. ढोके जनार्दन किशनराव
२० श्रीमती पंचशिला नाना पवार
२१ श्रीमती सुमन गजानन शेळके
२२ श्रीमती लता शांताराम निकम
२३ श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील
२४ श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे

कृपया लक्ष दया. उप–महापौर पदाचे उमेदवार श्री. चव्हाण रमेश महादेव यांच्या बाजुने ५१ मते पडली आहेत. व उप–महापौर पदाचे दुसरे उमेदवार श्री. मोरे भानजी भिकारी यांच्या बाजुने २४ मते पडली आहेत. अंतिम निर्णय मा. पीठासीन अधिकारी महोदया जाहिर करतील.

**पीठासीन अधिकारी :–** मी वल्सा नायर सिंह विभागीय आयुक्त, कोकण विभाग तथा पीठासीन अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ अन्वये व महापौर व उपमहापौर पदाची निवडणूक नियम २००५ चे नियम ७ अन्वये श्री. चव्हाण रमेश महादेव यांना उल्हासनगर महानगरपालिकेचे उप–महापौर पदी निवडून आल्याचे घोषित करीत आहे.

---

**विषय क्र. २:–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २००७ सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची उप–महापौर पदासाठी निवड करणे .

**प्रस्तावना :**

उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नवीन उप महापौर निवडणेबाबत दिनांक ५/४/२००७ रोजी सभा आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेमध्ये निर्वाचित पालिका सदस्यांमधुन एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १९ च्या तरतुदीप्रमाणे उप महापौर पदावर निवड करावयाची

आहे. या पदासाठी खालील ४ उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केलेली असुन पीठासीन अधिकारी यांनी सदरची नामनिर्देशनपत्रे वैध घोषित केलेली आहेत.

१. श्री. चव्हाण रमेश महादेव
२. श्री. ठाकुर विनोद लालसिंह
३. श्री. मोरे भानजी भिकारी
४. श्री. साधवानी मोहन रहंदोमल

विहीत मुदतीत उपरोक्त उमेदवारांपैकी १. श्री. विनोद ठाकुर लालसिंह, २. श्री. साधवानी मोहन रहंदोमल यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने श्री. चव्हाण रमेश महादेव व श्री. मोरे भानजी भिकारी हे २ उमेदवार रिंगणात शिल्लक आहेत. त्यामुळे हात उंचावुन मतदानाची पध्द्त अवलंबली जावी व तद्नंतर निवडणूक निकाल जाहीर करणेसाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्रमांक २ — दिनांक : ५/४/२००७

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार ७५ पालिका सदस्यांनी हात उंचावुन केलेल्या मतदानाअंती खालील दर्शविलेल्या प्रत्येक उमेदवारासमोरील मिळालेली मते जाहीर करीत आहे व सर्वात जास्त मते प्राप्त केलेले उमेदवार **श्री. चव्हाण रमेश महादेव** यांची उपमहापौर पदावर निवड करीत आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नांव | मिळालेली एकुण मते |
|---|---|---|
| १. | श्री. चव्हाण रमेश महादेव | ५१ |
| २. | श्री. मोरे भानजी भिकारी | २४ |

मतदानाद्वारे मंजुर

विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—श्री. चव्हाण रमेश महादेव यांना व्यासपीठावर घेवुन येण्यासाठी मी येत आहे. कृपया त्यांनी तयार रहावे.

मा. पीठासीन अधिकारी हया नवनिर्वाचीत उप—महापौरांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत करतील. तसेच मा. आयुक्त साहेब हे उप—महापौरांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत करतील. त्याच प्रमाणे महापालिकेच्या वतीने महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा हे मा. उप—महापौरांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत करतील.

(यावेळी मा. महापौर व उप—महापौरांचे काही पालिका सदस्याकडुन, विशेष अतिथ्यांकडुन पुष्पहार व पुष्पगुच्छ देवुन स्वागत करण्यात आले.)

कृपया लक्ष दया. सभेच्या पुढील कामकाजाचे संचलन नवनिर्वाचीत महापौर करतील. मा. पीठासीन अधिकारी श्रीमती वल्सा नायर सिंह हया आपला निरोप घेतील.

यावेळी नवनिर्वाचीत महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण या पीठासीन अधिकारी स्थानी आसनस्थ झाल्या व पीठासीन अधिकारी श्रीमती वल्सा नायर यांनी सभागृहाचा निरोप घेतला.

कृपया सर्व सन्माननिय सदस्य, पत्रकार वर्ग, पोलिस अधिकारी व महापालिका अधिकारी या सर्वांसाठी दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. कृपया सर्वांनी जेवण करुन जावे.

महापालिका सचिव :—विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३:—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २००७ सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नेमणूक करणे .

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**स्थायी समितीच्या सदस्यांची निवडणूक प्रक्रिया सुरु करण्याअगोदर सर्वात प्रथम नवनिर्वाचीत महापौरांचे व उप—महापौरांचे मी मनापासुन अभिनंदन करतो. उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये एक चांगले पाऊल पडले आहे. सचिव साहेब माझी आपणांस विनंती आहे की, सभेचे पुढील कामकाज स्थगित केले जावे व ते दुपारच्या जेवणानंतर पार पाडले जावेत.

**सदस्य श्री. लाल पंजाबी :—**नवनिर्वाचीत महापौर व उप—महापौरांचे मी स्वागत करतो. व ही सभा सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित केली जावी अशी मी मा. महापौरांना विनंती करतो.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**नवनिर्वाचीत महापौर व उप—महापौरांचे मी हार्दिक स्वागत करतो व सभेचे पुढील कामकाज स्थगित करुन ते दुपारच्या जेवणानंतर पार पाडले जावे अशी मी सभागृहास विनंती करतो.
**महापालिका सचिव :—**उर्वरीत कामकाज जेवणानंतर घ्यायचे काय?

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—**महापौर, उप—महापौर पदाची निवडणूक आता पुर्ण झाली आहे. सभा सुचनेवरील विषय क्र. ३ घेवुन सभेचे कामकाज पुर्ण केले जावे. तुम्ही लोक तर आता निवडून आला आहात. तुम्हांला दुपारच्या जेवणाची आता आवश्यकताही नाही. विषय क्र. ३ साठी पाच—दहा मिनिटे लागणार आहे. या पाच—दहा मिनिटामध्ये हे कामकाज पार पाडुन सभेचे कामकाज पुर्ण करावे नाहीतर ही सभा स्थगित करुन दुपारी ३.०० वाजता घेण्यात यावी.

**महापालिका सचिव :—**दुपारच्या जेवणानंतर सभागृहाची पुन्हा साफसफाई करावी लागेल. यासाठी सांयकाळी ४. ०० वाजता सभा ठेवण्यात यावी.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**हे लोक निवडून आले आहेत ते आम्हांस पुर्ण दिवस येथे बसवु इच्छित आहेत.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे? सर्व संमतीने?
**सदस्य श्री.बी.बी. मोरे:—**उल्हासनगर महानगरपालिकेचे सचिव साहेब श्री. प्रकाश कुकरेजा यांनी कृपया व्यासपीठावर यावे. गंगाजल, शिवसेना या पक्षांचे महापौर व उप—महापौर निवडून आले आहेत त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस, आरपीआय, म.न.से. च्या वतीने आम्ही त्यांचे हार्दिक—हार्दिक अभिनंदन करतो. त्यांचे नुसतेच अभिनंदन करत नाही तर त्यांना भेटण्यासाठी आम्ही जात आहोत त्यासाठी आपण व्यासपीठावर यावे.

**महापालिका सचिव :—**या—या. आपले स्वागतच आहे.

सन्माननिय सदस्यांव्यतिरिक्त इतरांनी सभागृहातुन बाहेर जावे.

**महापौर :—**या सभेचे कामकाज येथेच स्थगित करुन सदरची सभा सांयकाळी ४.०० वाजता सुरु करण्यात येईल.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

सांयकाळी ४.०० वाजता पुन्हा सभा सुरु झाली तेव्हा मा. महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण या पीठासीन अधिकारी स्थानी आसनस्थ होत्या. व खालील सदस्य / सदस्या उपस्थित होते/ होत्या.

१. महापौर–– श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण
२. उप–महापौर –– श्री. चव्हाण रमेश महादेव

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ४१ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ४२ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ४३ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४४ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४५ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ८ | श्री. यादव रामसागर जनार्दन | ४६ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४७ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४८ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४९ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ५० | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १३ | श्री. विजय खंडु सुपळे | ५१ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५२ | श्री. शेखर केशव यादव |
| १५ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ५३ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १६ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५४ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १७ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५५ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १८ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५६ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १९ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५७ | श्री. किशोर जग्यासी |
| २० | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५८ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २१ | श्री. राजू जग्यासी | ५९ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २२ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ६० | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २३ | श्री. केवलरामाणी हीरो चन्दुलाल | ६१ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २४ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ६२ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २५ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ६३ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २६ | श्रीमती डॉ. निना प्रकाश नाथानी | ६४ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २७ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ६५ | श्री. मोहन साधवाणी |
| २८ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ६६ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २९ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६७ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| ३० | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६८ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ३१ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६९ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| ३२ | श्री. लाल पंजाबी | ७० | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३३ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ७१ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३४ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ७२ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३५ | श्रीमती शकुंतला पाटील | ७३ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३६ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ७४ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३७ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ७५ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३८ | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | | |
| ३९ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | | |
| ४० | श्री.एडके गणपत गोविंद | | |

खालील अधिकारी सभेस हजर होते.
१. श्री. सदाशिव कांबळे, आयुक्त

२. श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
५. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
६. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
७. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
८. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
९. श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
१०.डॉ. के. आर. खरात, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
११.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१२.श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
१३.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१४.श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता, पा.पु.
१५.श्री. सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.विभाग
१६.श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी
१७.श्री. तुकाराम तारदाळकर, मुख्य लिपिक
१८.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

सांयकाळी ४.१७ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

महापालिका सचिव :—सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यापुर्वी गटनेता, सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता यांची घोषणा करणे जरुरीचे आहे. त्यासाठी मा. महापौरांना येथे काही प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यानुसार पक्ष आणि त्यांनी प्रस्तावित केलेल्या सदस्यांची नावे मी वाचुन दाखवत आहे ती याप्रमाणे........

लोकभारतीचे गटनेता पदासाठी श्री. जीवन इदनानी
शिवसेनेचे गटनेता पदासाठी श्री. धनंजय बोडारे
भाजपाचे गटनेता पदासाठी श्री. जमनादास पुरस्वानी
कॉग्रेस आय पक्षाचे गटनेता पदासाठी श्री. तुलसीदास वसिटा

सदस्य श्री. राजु जग्यासी :—आमच्या राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या गटनेता नेमणुकीसाठी आम्ही पुढील महासभेत आम्ही पत्र देवु त्याचप्रमाणे म.न.से. गटनेता पदासाठी सुध्दा पुढील महासभेत पत्र दिले जाईल.

महापालिका सचिव :—आरपीआयचे गवई गटाचे विरोधीपक्ष नेता पदासाठी श्री. प्रशांत धांडे
आरपीआय आडवले गटाचे गटनेता पदासाठी श्री. बी.बी. मोरे यांचे नाव प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—सचिव साहेब मनसेच्यावतीने सुध्दा आपणांस पत्र दिले जाईल. आमचे पत्र तयार होवुन आले आहे ते मी आपणांस देतो. आमचे पत्र मी आताच आपणाकडे दिले आहे.

महापालिका सचिव :—मनसेच्या गटनेता पदासाठी मा. विभागीय आयुक्त कोकण भवन यांच्याकडुन पत्र आले आहे त्यामध्ये जे एक नाव आहे त्याची घोषणा करु काय? श्री. नरेंद्र वामन दवणे यांचे नाव प्रस्तावित करण्यात आलेले आहे. राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या गटनेता पदासाठी श्रीमती वेलकर सुरेखा राजन यांचे नाव प्रस्तावित करण्यात आले आहे तर सभागृह नेता पदासाठी श्री. मोहन साधवानी यांचे प्रस्तावित करण्यात आले असून त्यांच्या नावास शिवसेना, भाजपा, लोकभारती आणि कॉग्रेस आय पक्षाचे समर्थन आहे. विरोधी पक्ष नेता पदासाठी श्री. राजकुमार ऊर्फ राजु किशीनचंद जग्यासी यांचे नाव प्रस्तावित करण्यात आले आहे. मा. महापौर कोणकोणत्या नावांना संमती देतात त्याची आता घोषणा होईल.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—सचिव साहेब, केवळ एक जो अपक्ष आहे त्याच्या गटनेता पदासाठी काय केले जाईल?

महापालिका सचिव :— श्री. प्रशांत धांडे यांचे विरोधी पक्ष नेता पदासाठी नाव प्रस्तावित करण्यात आले आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—सचिव साहेब, याचा जरा खुलासा कराल?

महापालिका सचिव :—मा. महापौरांनी सर्व प्रस्तावित गटनेत्यांच्या नावांना मंजुरी दिलेली आहे. सभागृह नेता पदासाठी श्री. मोहन साधवानी यांच्या नावास मंजुरी दिली आहे. विरोधी पक्ष नेता पदासाठी दोन नावे आल्याने त्याबाबतीतील निर्णय प्रलंबित आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—सचिव साहेब, मी आपणाकडुन जाणुन घेवु इच्छितो की, विरोधी पक्ष नेता कायदयानुसार कुणास नेमले जाते? मा. महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेब, आपण सुध्दा याचा खुलासा करावा. विरोधी पक्ष नेता हे पद सभागृहात बसलेल्या सर्वात मोठया विरोधी पक्षाच्या गटास दिले जाते किंवा नाही? मा. आयुक्त साहेब, आपण याचा खुलासा करावा.

उप—महापौर:—मा. सभागृह, मा. महापौरांच्या संमतीने मी बोलत आहे. सर्व गटनेते व सभागृह नेत्यांच्या नावाची घोषणा झालेली आहे. विरोधी पक्ष नेता पदासाठी दोन नावे आल्याने त्या बाबतीतील निर्णय प्रलंबित ठेवला आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मा. उप—महापौरजी, आपल्या माध्यमातुन मी सचिव साहेबांना जो प्रश्न विचारला, सचिव साहेब कायदा काय सांगतो? विरोधी पक्षामध्ये बसलेले जे पक्ष आहेत त्यातील सर्वात मोठा जो पक्ष आहे तोच विरोधी पक्ष समजला जाईल की मा. महापौर विरोधी पक्ष ठरवतात? सचिव साहेब, कृपया करुन आपण याचे उत्तर दयावे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. आयुक्त साहेब, महापौर महोदयांनी आता अधिनिर्णय दिलेला आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—मा. महापौर महोदया, उप—महापौर, आयुक्त तसेच सचिव साहेब, असा प्रकार पुण्यामध्ये सुध्दा झालेला आहे. विरोधी पक्ष नेता सत्ताधारी पक्षातील सुध्दा होवु शकतो. त्यामुळे मा. महापौरांनी जो निर्णय घेतलेला आहे त्यास मी सहमत आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—श्री. धांडेजी आपण जर विरोधी पक्षात बसु इच्छित असाल तर आम्हांला खुपच आनंद होईल. त्याबाबत आमची काही एक हरकत नाही. सचिव साहेब, कायदा काय आहे तो मी आपणाकडुन जाणुन घेवु इच्छितो.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—महापौरांनी अधिनिर्णय दिला आहे त्याचा आदर ठेवा.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—सचिव साहेब, आपण उत्तर दया कायदा काय आहे?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—महापालिका सचिव साहेब, मा. महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे, त्यांचा आदर ठेवा.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त व सचिव साहेब, मला असे वाटते की पहिल्यांदाच अशा प्रकारचा विषय आलेला नाही. या अगोदर सुध्दा कॉंग्रेस पक्षाचा एक असाच प्रकारचा विषय आला होता. त्यावेळेस मा. महापौर, ज्योती कालानी या सुध्दा होत्या.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—तर मग सत्ताधारी पक्षात का बसले आहेत, विरोधी पक्षात बसायला पाहिजे होते ना? ते कोणत्या पक्षात आहेत, सत्ताधारी पक्षात आहे की विरोधी पक्षात आहेत?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—महापालिका सचिव साहेब, मा. महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे, त्यांचा आदर ठेवा.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—मग ते सत्ताधारी पक्षात का बसले आहेत, त्यांनी सत्ताधारी पक्ष सोडुन दयावा. सर्वच पदे आपणांस पाहिजेत काय? सचिव साहेब, आपणांस सभा चालवायची आहे काय की सत्ताधारी पक्षाच्या.................

सदस्य श्री. सुरेश जाधव :—महापालिका सचिव साहेब, मा. महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे, त्यांचा आदर ठेवा.

यावेळेस सन्माननिय सदस्य श्री. सुरेश जाधव व सन्मानिय सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर या जोर–जोरात बोलत होत्या त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–आपणांस सर्व पक्षांच्या बरोबरीने सारखेच चालायचे आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–महापालिका सचिव साहेब, मा. महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे, त्यांचा आदर ठेवा.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–तुम्ही सत्ताधारी पक्षात आहात तर विरोधी पक्ष नेता पद मागण्याचा तुम्हास काही अधिकार नाही. आपणांस शरम वाटली पाहिजे. महापौर, उप–महापौर आपले आहेत, सभागृह नेता आपला आहे असे असतांना विरोधी पक्ष नेता पद मागणेबाबत आपणांस शरम वाटली पाहिजे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–आम्हांस शरम आहे. आपणांस शरम आहे काय?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्यास हे सांगितले जावे की, मा. महापौरांनी निर्णय दिल्यानंतर त्यावर कोणतेही भाष्य केले जात नाही.

महापालिका सचिव :–कृपया लक्ष दया. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे १९ (अ अ) अनुसार विरोधी पक्ष, ज्या पक्षाची सदस्य संख्या जास्त असेल त्यास विरोधी पक्षाच्या नेत्यासाठी मा. महापौरजी मान्यता देतात. व हा अधिकार केवळ त्यांचाच आहे. त्याबाबतीत मान्यता त्याच देतील मी नाही देवु शकणार. त्यांनी याबाबतीतील निर्णय प्रलंबित ठेवला आहे. त्यांनी कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–हे कायदयात आहे काय? मा. महापौरजी, आपण या गोष्टीकडे जरा लक्ष दया. मी आपणाकडुन जाणुन घेवु इच्छितो की, आपण जो निर्णय दिला आहात त्याबाबतीत मी आपणाकडुन जाणुन घेवु इच्छितो की, असे कायदयात आहे काय?

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–असेल तर लिहुन दया आम्हांला.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–ब–याचशा गोष्टी कायदयात नसतात परंतु प्रत्यक्षात ते येथे असतात.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–सन्माननिय महापौरजी, सभागृहात जी परंपरा वर्षानुवर्षे चालत आलेली आहे, विरोधी पक्षातील ज्या पक्षातील सदस्य संख्या जास्त असते त्याच पक्षास विरोधी पक्ष नेता पद दिले जाते. आजच आपण जे करत आहात त्याबाबतीत विरोधी पक्ष नेता हरकत घेत आहेत. हे काही बरोबर नाही. सचिव साहेब व महापौर महोदया, याबाबतचा निर्णय प्रलंबित ठेवु नका याबाबतीत आजच निर्णय झाला पाहिजे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–मा. महापौरजी, पहिल्या दिवसापासुनच आपण कामकाज चालवत आहात ते पत्रकार कक्षातील सर्व लोक पाहत आहेत.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–आजपण पाहत आहेत कालपण पाहत होते.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–सभागृहाचे कामकाज चालविण्याची ही काय पध्दत आहे? शहरातील लोक आपणांस हसतील पहिल्या दिवसापासुनच आपण अशाप्रकारचे कामकाज चालवत आहात.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–उल्हासनगरचे सचिव आहात ना आपण? त्यांनी लिहुन दयावे ना? विरोधी पक्ष नेता नेमण्याचा त्यांना अधिकार आहे काय? याबाबतीत महापौरांनी लिहून दयावे.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :–सचिव साहेब, विरोधी पक्षातील ज्या पक्षातील सदस्य संख्या जास्त आहेत त्या पक्षासच विरोधी पक्ष नेता पद मिळाले पाहिजे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मा. महापौरजी, माझ्या माहितीनुसार आजच्या या सभेचे थेट प्रक्षेपण सारे शहरवाशी बघत आहेत. व संपुर्ण शहरवाशी या गोष्टीचा अंदाज लावत आहेत की पहिल्या दिवसापासुनच आपण कशाप्रकारचे कामकाज चालवत आहात. अहो विरोधी पक्ष नेता सुध्दा आपण घ्याल?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे. व जनतेला माहित आहे आपल्या सत्ताकाळात सुध्दा असेच चालु होते. या अगोदर सुध्दा कामकाज चालविण्याची आपली पध्दत संपुर्ण शहर पाहत होते.

सदस्य श्री. राजु जग्यासी:—आमच्या विरोधाची आपणांस भिती वाटते काय?

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—मा. महापौरजी, मा. उप—महापौरजी विरोधी पक्ष नेता नेमणुकीचा विषय फक्त प्रलंबित ठेवला आहे. मा. सदस्य श्री. राजु जग्यासी यांना विरोधी पक्ष नेता होण्याची किती घाई झाली आहे ते याठिकाणी दिसुन येत आहे. विरोधी पक्षामध्ये बसण्याची त्यांना एवढी घाई झालेली आहे काय? आता आता तर यांनी सत्ता भोगली.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मा. महापौरजी, माझे पुन्हा आपणासं निवेदन आहे की, येथे उपस्थित असलेले सर्व पक्षांचे गटनेते, आमचे सभागृह नेता, आपण ही जी प्रथा चालवत आहात ती पुर्णपणे चुकीची आहे. संपुर्ण शहर आणि प्रचार माध्यमे पाहत आहेत की आपण कश्याप्रकारे खुर्च्यांच्या मागे धावत आहात. अहो, विरोधी पक्षांच्या विरोधास आपण घाबरत आहात काय? विरोधी पक्ष नेता पद सुध्दा आपण घेवु इच्छिता? प्रचार माध्यमे काय विचार करतील? लोकसभा, विधानसभेमध्ये अशी प्रथा असते काय? सभागृहात बसलेल्या विरोधी पक्षातील सर्वात मोठया गटास विरोधी पक्ष नेते पद दिले जाते. काय आपली उल्हासनगर महानगरपालिका विधानसभा, लोकसभेपेक्षा मोठी आहे काय? आपण काय करु इच्छित आहात? अहो राजकारणच करायचे आहे तर त्यासाठी बरेचसे मुद्दे आहे ब—याचशा मुद्दयांवर राजकारण करता येण्यासारखे आहे. ही प्रथा आहे त्या प्रथेनुसार तर आपण चाला. मा. सभागृह नेताजी मी पुन्हा आपणांस निवेदन करतो तसेच मा. महापौरजी या विषयावर हे जे राजकारण खेळत आहात आपण कशाप्रकारे खुर्च्यांच्या आणि पदांच्या मागे धावत आहात ते सारे शहर आपणांस पाहत आहे. विरोधी पक्ष नेत्याची सुध्दा खुर्ची आपणांस पाहिजे? पहिल्या दिवशी आपण महापौर पदाच्या खुर्चीवर बसला आहात आपण काय करत आहात आणि काय करु इच्छित आहात? याबाबत आपण कुणा कुणास उत्तर दयाल? अहो आपण आपल्या मनास विचारा काय हे बरोबर आहे?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—बिल्कुल बरोबर आहे मा. महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे. लोक खुपच खुष आहेत.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मा. महापौरजी व उप—महापौरजी माझे आपणांस निवेदन आहे की, ............

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, माझे आपणांस निवेदन आहे व याप्रकरणी निर्णयाची मी आपणाकडुन अपेक्षा व्यक्त करतो.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—प्रलंबित ठेवा, प्रलंबित........

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे.

सदस्य श्री. तुलसीदास वसिटा :—मा. महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—आपण विचार करुन याबाबतीत निर्णय दयावा तसेच आजच्या आज याबाबतीत निर्णय दयावा. या महासभेत आपले पहिल्यात पहिले हे उत्तर असेल. आपण कोणत्या प्रकारे सभेचे कामकाज चालवित आहात?

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. श्री. राजु जग्यासीजी, मा. महापौरांचा आदर राखा त्यानी हा विषय प्रलंबित ठेवला आहे. दोन—दोन नावे आल्याने हा विषय त्यांनी प्रलंबित ठेवला आहे. आपण जरा लक्षपुर्वक ऐका. आता सभेचे पुढील कामकाज चालविले जावे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—निर्णय प्रलंबित ठेवण्याचे काही कारण असले पाहिजे. सभागृह नेताजी फक्त बोलुन निर्णय प्रलंबित ठेवला जावु शकत नाही.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—विरोधी पक्ष नेता पदासाठी दोन—दोन नावे आल्यामुळे महापौरांनी त्याबाबतीतील निर्णय प्रलंबित ठेवला आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौर महोदया, उप—महापौर महोदय, आयुक्त साहेब, आजचा विरोधी पक्ष नेता बाबतचा जो विषय आहे त्याबाबत श्री. राजु जग्यासी म्हणत आहेत की तो अतिशय महत्वपुर्ण असा विषय आहे. परंतु महापौर महोदयांनी जो अधिनिर्णय दिलेला आहे त्यांनी याबाबतीत कोणताही निर्णय दिलेला नाही किंवा कोणत्याही पक्षाला विरोधी पक्ष नेते पद दिलेले नाही. त्यांच्याकडे दोन पत्र आलेली आहेत. या अगोदर सुध्दा जो कार्यकाळ होता त्यामध्ये एक वेळेस ज्योती कालानी महापौर होत्या. तर मा. श्री. मोहन बेहरानी व श्री. हरदास माखिजा यांच्याबाबतीत कॉंग्रेस पक्षाकडुन दोन वेगवेगळी पत्र महापौर महोदयांकडे आली होती. व अशा परिस्थितीत अचानक निर्णय घेणे महापौरांना शक्य नसते. म्हणुन हा विषय प्रलंबित ठेवला होता. तशीच आज मा. महापौरांच्या समोर स्थिती आहे. यासाठी त्यांनी योग्य तो निर्णय घेण्यासाठी, की ज्या निर्णयामुळे आपले मन दुखविले जावु नये म्हणुन त्यांनी या विषयाबाबत अदयाप निर्णय घेतलेला नाही. व हा विषय प्रलंबित ठेवला आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मा. श्री. जमनु पुरस्वानीजी, मी आपणांस एक गोष्ट सांगु इच्छितो हे जे आपण सांगत आहात तेव्हा ते दोघेही एकाच पक्षाचे होते. येथे तर आपण सत्ताधारी पक्षामध्ये बसुन विरोधी पक्ष नेते पद मागत आहात. अहो ही तर आपणांस हसण्यासारखी गोष्ट आहे. सत्ताधारी पक्षात राहुन विरोधी पक्ष नेत्याच्या खुर्चीची इच्छा ठेवता?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—महापालिका सचिवजी महापौरांच्या निर्णयाचा आदर राखला जावा.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, सभेच्या पुढील कामकाजाची कार्यवाही सुरु करा.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—महापालिका सचिव साहेब, सभेचे पुढील कामकाज चालविले जावे.

उप—महापौर :—मा. महापौरांच्या परवानगीने मी बोलत आहे की हा विषय प्रलंबित ठेवुन स्थायी समितीचे सदस्य निवडीचा विषय घेतला जावा.

महापालिका सचिव :—आपणा सर्वांना गोषवा—याची प्रत प्रस्तुत केली आहे. त्यानुसार लोकभारती पक्षाचे ४ सदस्य निवडले गेले पाहिजेत. शिवसेनेचे ४, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ३, भाजपाचे २, कॉंग्रेसचा १, आरपीआय आठवले गटाचा १, मनसेचा १ अशा प्रकारे सर्व मिळुन होतात १६. आपणा सर्वांना फॉर्मुला दिला आहे त्याबाबत कुणाला काही शंका? काही शंका असेल तर सांगा. हे गणित बरोबर आहे की नाही याबाबत कुणाला काही शंका आहे काय? ठिक आहे? व सर्व पक्षांनी जी नावे प्रस्तावित केली आली आहेत ती मी आपणांस सांगु इच्छितो.
राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटीच्या वतीने १. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, २. श्री. संजय बठिजा, ३. श्रीमती सुजाता रिजवानी हे झाले त्यांचे तीन सदस्य.
भाजपाच्या वतीने १. श्री. राम पारवानी, २. श्री. किशोर जग्यासी हे झाले त्यांचे दोन सदस्य.
लोकभारतीच्या वतीने १. श्री. जीवन इदनानी, २. श्री. गोविंदराम लुंड, ३. श्री. सुरेश जाधव, ४. श्रीमती निलम रावत हे झाले त्यांचे चार सदस्य.
कॉंगेस पक्षाच्या वतीने श्रीमती इंदिरा उदासी.
शिवसेनेच्या वतीने १. श्री. दिलीप गायकवाड, २. सौ. जयश्री सुर्वे, ३. श्री. राजेश वानखेडे, ४. श्री. विजय सुपाळे हे झाले त्यांचे चार सदस्य.
मनसेच्या वतीने श्री. नरेंद्र दवणे.

आरपीआय आठवले गटाच्या वतीने श्रीमती लता निकम.

ठिक आहे?

यावेळी सर्व राजकीय पक्षाचे गटनेतांतर्फे तौलनिक संख्या बळानुसार ज्या ज्या सदस्यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करायचे आहे त्याचे त्यांनी लेखी पत्र मा. महापौरांकडे सादर केले व त्या अनुसार प्रस्ताव सादर केले.

<u>मा. महापौर :—</u> सदरच्या प्रस्तावाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

## ☑ प्रस्तावना

सन—२००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७५ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. महापालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | १७ | १६ | ११ | ५ | ५ | २ | १ |

| ७५ | त्र ४.६८ |
|---|---|
| १६ | |

स्थायी समितीच्या एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण— ४.६८ असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | लोकभारती | १८<br>—— ग १६<br>७५ | त्र ३.८४ | (५) | कॉंग्रेस | ५<br>—— ग १६<br>७५ | त्र १.०६ |
| (२) | शिवसेना | १७<br>—— ग १६<br>७५ | त्र ३.६३ | (६) | आरपीआय | ५<br>—— ग १६<br>७५ | त्र १.०६ |
| (३) | रा.का.पा. | १६<br>—— ग १६<br>७५ | त्र ३.४१ | (७) | म.न.से. | २<br>—— ग १६<br>७५ | त्र ०.४२ |
| (४) | भाजपा | ११<br>—— ग १६<br>७५ | त्र २.३४ | (८) | अपक्ष | १<br>—— ग १६<br>७५ | त्र ०.०२ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय खालील नेमणूका करण्यात येतील.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ३ | ३ | २ | १ | १ | १३ |

यानंतर रिक्त राहणा—या तीन जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल.

त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) लोकभारती | ०.८४ | (२) शिवसेना | ०.६३ | (३) म.न.से | ०.४२ |
| (४) रा.का.पा. | ०.४१ | (५) भा.ज.पा. | ०.३४ | (६) कॉंग्रेस | ०.०६ |
| (७) आरपीआय | ०.०६ | (८) अपक्ष | ०.०२ | | |

वरील परिस्थिती पहाता लोकभारती, शिवसेना व मनसे या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे व त्यामुळे तीन रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक–एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे स्थायी समितीत प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| लोकभारती | शिवसेना | रा.का.पा. | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | ३ | २ | १ | १ | १ | १६ |

**विशेष महासभा ठराव क्र. ३ दिनांक :– ५/४/२००७**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार खालील सोळा सदस्यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करीत आहे.

१. श्री. जीवन इदनानी
२. श्री. गोविंदराम लुंड
३. श्री. सुरेश जाधव
४. श्रीमती निलम रावत
५. श्री. दिलीप दशरथ गायकवाड
६. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे
७. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे
८. श्री. विजय खंडु सुपाळे
९. श्री. नरेंद्र (कुमारी) केवलराम ठाकुर
१०. श्री. संजय रामचंद्र बठिजा
११. श्रीमती सुजाता रमेश रिजवानी
१२. श्री. राम (चार्ली) पारवानी
१३. श्री. किशोर जग्यासी
१४. श्रीमती इंदिरा उदासी
१५. श्रीमती लता शांताराम निकम
१६. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे

इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदरहू ठरावांतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सर्वानुमते मंजुर

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**<u>महापालिका सचिव :—</u>**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.५० वाजता मा. महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २०/४/२००७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/४/२००७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

(२)

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/४/२००७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

२. उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३७ | श्री.एडके गणपत गोविंद |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्री. चहाळ सतिश (बाजीराव) तात्याबा |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३९ | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४० | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४१ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ८ | श्री. यादव रामसागर जनार्दन | ४२ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४३ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४४ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४५ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४६ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १३ | श्री. विजय खंडु सुपळे | ४७ | श्री. शेखर केशव यादव |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४८ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४९ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १६ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५० | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १७ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५१ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १८ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५२ | श्री. किशोर जग्यासी |
| १९ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५३ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २० | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५४ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २१ | श्री. राजू जग्यासी | ५५ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २२ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५६ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५७ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २४ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्रीमती डॉ. निना प्रकाश नाथानी | ५९ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २६ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ६० | श्री. मोहन साधवाणी |
| २७ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ६१ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २८ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६२ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २९ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६३ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ३० | श्री. लाल पंजाबी | ६४ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| ३१ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६५ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३२ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६६ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३३ | श्रीमती शकुंतला पाटील | ६७ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३४ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६८ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३५ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६९ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३६ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे, २. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, ३. श्री. लालबिहारी बुझारत यादव, ४. श्रीमती महाडीक रजनी मोहन, ५. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), ६. **श्री. केवलरामाणी हीरो चन्दुलाल (राजीनामा दिला आहे.)**

खालील अधिकारी सभेस हजर होते.

३८. श्री. सदाशिव कांबळे, आयुक्त
३९. श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त
४०. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४१. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
४२. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
४३. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
४४. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
४५. श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
४६. डॉ. के. आर. खरात, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
४७. श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
४८. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
४९. श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता, पा.पु.
५०. श्री. सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.विभाग
५१. श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी
५२. श्री. तुकाराम तारदाळकर, मुख्य लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी ना. पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.२५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मा. महापौरजी, सभेचे कामकाज सुरु होण्याअगोदर दोन गोष्टींकडे मी आपले लक्ष वेधु इच्छितो सर्वात प्रथम मी आयुक्त साहेबांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत करु इच्छितो. ते ब–याच दिवसानंतर या सभागृहात आले आहेत. शहरामध्ये ब–याचशा समस्या आहेत. मी अपेक्षा व्यक्त करतो की, शहरातील समस्या सोडविण्यासाठी ते आम्हांला योग्य त्या प्रकारचे सहकार्य देतील.

दुसरा विषय असा आहे की, आपले वरीष्ठ नगरसेवक श्री. बी.बी. मोरे यांचा ६४ वा वाढदिवस आहे. मी त्यांना सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन करु इच्छितो.

<u>सदस्य श्री. जर्नादन ढोके :–</u>मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब, आरपीआयचे गटनेते श्री. बी.बी. मोरे साहेबांचा आज ६४ वा वाढदिवस असल्याने या निमित्त सभागृहात मिठाई वाटप करण्यासाठी वेळ व परवानगी दिली जावी.

<u>महापालिका सचिव :–</u> मा. महापौरांनी आपली विनंती मान्य केली आहे. आपण सभागृहात मिठाई वाटप करु शकता.

## अभिनंदन प्रस्ताव :—

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जनार्दन ढोके

उल्हासनगर महापालिकेतील ज्येष्ठ सदस्य व आरपीआयचे गटनेते श्री. बी.बी. मोरे यांचा आज ६४ वा वाढदिवस असल्याने त्यांना सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन करण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ३ अ दिनांक:—२०.४.२००६

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महापालिकेतील ज्येष्ठ सदस्य व आरपीआय चे गटनेते श्री. बी.बी. मोरे यांना त्यांच्या ६४ व्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन करीत आहे.

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

विषय क्र. १ प्रश्नोत्तरे. एकसुध्दा प्रश्न प्राप्त न झाल्यामुळे प्रश्नोत्तराचा विषय चर्चेस घेतला जाणार नाही.

तीन लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्यांचे सुचक, अनुमोदक व विषय या प्रमाणे आहेत.

लक्षवेधी सूचना क्र. १

सुचकाचे नाव :— श्रीमती मिनाताई सोनेजी (सोंडे)

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप दशरथ गायकवाड

विषय :— डेंग्यु सारख्या साथीचे रोगाची लागण होवु नये यासाठी शहरातील सर्व विभागांची नियमित साफसफाई,जंतुनाशक फवारणी, नाल्यांची सफाई होणे व सफाई कामगारांची संख्या अपुरी असतांना खाडाबदली कामगारांना सेवेत का सामावुन घेतले जात नाही? या बाबत.

लक्षवेधी सूचना क्र. २

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. रामसागर जर्नादन यादव

विषय :– शहाडहुन कल्याणमार्गे रेल्वे रुळाखालुन जाणा–या नाल्यातुन एमआयडीसीला १८ इंच व्यासाची जलवाहिनी टाकण्यास परवानगी देण्याबाबत.

लक्षवेधी सूचना क्र. ३

सुचकाचे नाव :– श्री. रविंद्र दशरथ बागुल

अनुमोदकाचे नाव :– सौ. सुरेखा राजन वेलकर

विषय :– उल्हासनगर प्रभाग क्र. ५ येथील गुलशन नगर येथील समस्या सोडविणे बाबत.

यातील फक्त दोन लक्षवेधी सूचनांना मा. महापौरांकडुन स्विकृती दिली जाईल. त्या कोणत्या दोन लक्षवेधी सूचनांना सूचना देतात ते मा. महापौरांना विचारुन नंतर मी आपणांस सांगेन.

मा. महापौरांकडुन फक्त दोन लक्षवेधी सूचनांना स्विकृती देण्यात आली आहे.

लक्षवेधी सूचना क्र. १ ला मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. या लक्षवेधीच्या सुचकाचे नाव श्रीमती मिनाताई सोनेजी (सोंडे) व अनुमोदकाचे नाव श्री. दिलीप दशरथ गायकवाड असे आहे.

व लक्षवेधी सूचना क्र. २ ला मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. जिच्या सुचकाचे नाव श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व अनुमोदकाचे नाव श्री. रामसागर जर्नादन यादव असे आहे.

व तिसरी जी लक्षवेधी सूचना आहे तीला स्विकृती देण्यास नाकारण्यांत आले आहे.

पहिल्या लक्षवेधी सूचनेचे सूचक ज्या आहेत श्रीमती मिनाताई सोनेजी (सोंडे) यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

---

## लक्षवेधी सूचना क्र. १

सुचकाचे नाव :– श्रीमती मिनाताई सोनेजी (सोंडे)

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिलीप दशरथ गायकवाड

विषय :– डेंग्यु सारख्या साथीचे रोगाची लागण होवु नये यासाठी शहरातील सर्व विभागांची नियमित साफसफाई,जंतुनाशक फवारणी, नाल्यांची सफाई होणे व सफाई कामगारांची संख्या अपुरी असतांना खाडाबदली कामगारांना सेवेत का सामावुन घेतले जात नाही? या बाबतची लक्षवेधी.

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत सद्यस्थितीत कच–याचे, घाणीचे, दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. ठिकठिकाणी कचरा व कच–याचे ढिग साचलेले दिसत आहे. यामुळे डास, माश्या व इतर जिवजंतूचा प्रादुर्भाव वाढला आहे. शहरातील नागरीकांची आरोग्य तपासणी केली असता डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे साथीचे रोगाची लागण होवून नागरीकांचे आरोग्यास धोक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी शहरातील सर्व विभागांची नियमित साफसफाई, जंतूनाशक फवारणी, नाल्यांची सफाई होणे आवश्यक असतांना आरोग्य विभागामार्फत दुर्लक्ष व अक्षम्य टाळाटाळ करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. तक्रारी करुनही वेळचेवेळी तक्रार निवारण केले जात नाही. सफाई कामगारांची संख्या अपुरी आहे. नेमणूक केलेल्या सफाई कामगारापैकी मोठया प्रमाणात कर्मचारी गैरहजर

आहेत. ही नित्याची कारणे सांगितली जात आहेत. त्यातच नजिकच्या काळात पावसाळयाचा मौसम सुरु होत असून पावसाळयापूर्वी शहरातील मोठे नाले, नाल्या व कच—यांचे ढिग साफ करणे आवश्यक व गरजेचे आहे. अन्यथा पावसाळयात नाले चोकअप होवून पुरपरिस्थिती निर्माण होवून मोठया नाल्यातील पावसाचे पाणी नागरीकांचे घरात शिरुन मोठया प्रमाणात नुकसान व वित्तहानी होत आहे.

आरोग्य विभागात सफाई कामगारांची संख्या अपुरी असतांना व बरेचशे कर्मचारी पुर्वसुचना न देता विनापरवानगी दिर्घ काल गैरहजर राहत असल्याने, रजेवर जात असल्याने, शहराचे साफसफाईचा बोजबारा उडाला आहे. कामगारांची कमतरता असतांना, कामगार वर्ग कमी पडत असतांना व मा. उच्च न्यायालयाचे खाडाबदली कर्मचा—यांना महापालिकेचे सेवेत सामावून घेण्याचे आदेश दिले असतांनाही संबंधित खाडाबदली कामगारांना आजतागायत सेवेत सामावून घेणेची कारवाई झालेली नाही. उल्हासनगर शहरातील नागरीकांचे निरोगी आरोग्यासाठी तरी संबंधीत कर्मचा—यांना महापालिकेचे सेवेत सामावून घेणे गरजेचे असतांना, आजतागायत सेवेत का सामावून घेण्यात आले नाही? सदर प्रकरण प्रलंबित राहणेची कारणे काय आहेत? विलंबास जबाबदार कोण? संबंधितांना आदेश देवुन महापालिका सेवेत घेतले जाईल का? कधीपर्यंत? इत्यादी बाबत महासभेत चर्चा होवून सविस्तर व समाधानकारक माहिती मिळणेस विनंती आहे.

---

<u>सदस्या श्रीमती मिना सोनेजी (सोंडे):</u>—मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब, हा अतिशय गंभीर असा विषय आहे. प्रत्येक प्रभागामध्ये १५ सफाई कामगार दिले आहेत. त्यातील गैरहजर कामगारांची संख्या जास्त आहे. आज माझ्या प्रभागात १५ सफाई कामगारांपैकी ८ कामगार गैरहजर आहेत आणि जे ७ कामगार उपस्थित होते त्यातील तीन कामगार दुपारच्या सुट्टीनंतर अर्ध्या दिवसाची रजा घेवुन गेले. अशा प्रकारे रोजच समस्या निर्माण होत आहे. ज्यामुळे आम्ही सफाईकडे पुर्णपणे लक्ष देवु शकत नाहीत. दुसरे असे की पावसाळा डोक्यावर येवुन ठेपला आहे. व मागील पावसाळयामध्ये ५९ डेंग्युचे रुग्ण आढळुन आले होते. तर अशाप्रकारचे रुग्ण पुन्हा आढळुन येवु नयेत यासाठी सुध्दा लक्ष दिले जावे. व खाडाबदली कामगारांची भरती करणे खुपच जरुरीचे आहे. आम्हांस जे सफाई कामगार वाटप करण्यात आले ते पुरेसे आहेत. परंतु ते कामावर येत नाहीत. त्यासाठी त्यांच्या जागेवर खाडाबदली कामगार घेणे अतिशय आवश्यक आहे. व याबाबत तक्रार करुन सुध्दा तिच्याकडे दुर्लक्ष केले जाते. याबाबत मी आयुक्तांना निवेदन करते की त्यांनी लक्ष दयावे. आभारी आहे.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :</u>—मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, खाडाबदली सफाई कामगारांच्या नेमणुकीसाठी सन्माननिय सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी लक्षवेधी सूचना दिली आहे. त्याबाबत मी याठिकाणी आवर्जुन सांगेन की २००५ मध्ये या शहरात महापूर आला होता त्यावेळेस डेंग्युच्या साथीबरोबर लेप्टास्पायरीस सारखे आजार शहरात पसरले होते. व या महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त श्री. आर.के. सोनवणे यांना सुध्दा तो आजार जडला होता. या शहरात सार्वजनिक ठिकाणची साफसफाई व्यवस्थित न झाल्यामुळे, दुर्गंधीमुळे व आजार पसरल्यामुळे त्यांना तो आजार झाला आणि त्यांना हिंदुजा रुग्णालयामध्ये दाखल करावे लागले. मा. महापौरजी या शहरामध्ये ७६ प्रभागांची रचना झाली आहे. प्रत्येक प्रभागामध्ये १५ ते १७ सफाई कामगार देण्यात आलेले आहेत. परंतु या ठिकाणी मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, १५ ते १७ कामगारांमधील ८ ते १० कामगार नेहमी गैरहजर असतात. ते सफाई कामगार आजाराने त्रस्त असतात किंवा लग्नाचे कारण दाखवुन किंवा बाहेर गावी जाण्याचे कारण दाखवुन दिर्घ मुदतीच्या रजेवर जातात किंवा काही वेळेस वैदयकिय प्रमाणपत्र देवुन ते गैरहजर राहतात. त्यांच्यावर कुठलेही नियंत्रण नसते. त्यांच्यावर कुठलीही कार्यवाही होत नाही. कारण की वैदयकीय प्रमाणपत्र या ठिकाणी देण्यासाठी त्यांच्याकडे हजर असते. त्यामुळे अधिकारीही हतबल असतात आणि महत्वाचे म्हणजे मागच्याच वर्षी डेंग्युचे ५९ रुग्ण या शहरामध्ये आढळुन आले होते. आता पावसाळा येत असतांना २००७ मध्ये डेंग्युची पुन्हा साथ येवु नये व येथिल नागरीकांना व अधिका—यांना तो आजार होवु नये म्हणुन खाडाबदली कामगार घेण्यासाठी महत्वपुर्ण लक्षवेधी सूचना सन्माननिय सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी मांडली आहे. यासाठी मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती करतो की या लक्षवेधीवर लक्ष देवुन खाडाबदली सफाई कामगार नेमणुकीचे काम लवकरात लवकर चालु करण्यात यावे कारण की जे पुरेसे कामगार आम्हांला दिलेले आहेत त्यातील बरेचसे कामगार गैरहजर राहतात. त्यामुळे उर्वरित प्रभागाची साफसफाई बरोबर होत नाही. त्यामुळे प्रभागामध्ये रोगराई पसरली आहे. प्रभागातील गटारे नाल्या या सर्व तुंबल्या असल्याने शहरामध्ये अति रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येणार नाही म्हणुन मी यासाठी आपणांस विनंती करतो की, खाडाबदली सफाई कामगार लवकरात लवकर भरती करण्यात यावेत. धन्यवाद ।

**<u>सदस्य श्री. मोहन साधवानी</u> :–**मा. महापौर, आमचे सन्माननिय सदस्य श्री. दिलीप गायकवाड व श्रीमती मिना सोनेजी यांनी सांगितले की, खाडाबदली सफाई कामगार नेमणुकीबाबत या अगोदर ब–याच वेळा चर्चा झाली आहे. व उच्च न्यायालयाचेही याबाबतीत आदेश आहेत. व सफाई कामगार फार मोठया संख्येने गैरहजर राहतात. तीन–तीन महिने ते कामावर येत नाहीत. व त्यांच्यावर काहीही कारवाई केली जात नाही. हजेरीपत्रकावर पाहिले तर १७ कामगार आहेत परंतु त्यातील ४–५ कामगार गैरहजर असतात. म्हणजेच १२ ते १३च कामगार कामावर असतात. त्यातील काही कामगार अर्ध्या दिवसाने घरी निघून जातात म्हणुन आयुक्त साहेबांनी हे सांगावे की खाडाबदली सफाई कामगार नेमणुकीमध्ये अडचण काय आहे?

**<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता</u> :–**मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब व सहकारी हो, श्रीमती मिना सोनेजी यांनी सांगितले त्याबाबत आम्ही सहमत आहोत. खाडाबदली कामगार ठेवणे आवश्यक आहे. मी माझ्या प्रभागाबाबत बोलतो की, आमचे उप–आयुक्त साहेब वातानुकुलीत दालनात बसतात. आम्ही कित्येक तक्रारी केल्या नंतर सुध्दा ते प्रभागात साफसफाईची पाहणी करण्यासाठी येत नाहीत. माझा प्रभाग गलिच्छ वस्तीचा आहे. उपायुक्त साहेबांना मी कित्येक वेळा सांगुनही ते म्हणतात की आज माणसे देतो, उदया देतो आता आम्हांला जे नविन कामगार दिले आहेत त्यातील ५ कामगार कामावर येत नाहीत. त्यामुळे आम्हांला खाजगी कामगार नेमावे लागत आहे. यासाठी सन्माननिय महापौरांना माझे निवेदन आहे की खाडाबदली कामगार नेमले जावेत. प्रतिदिनी १ लाख २० हजार या हिशोबाने कचरा उचलण्याचे काम ज्या ठेकेदाराला दिले आहे तो शहरातील साफ सफाई योग्य त्या प्रमाणात करत नाही यासाठी आम्ही त्याचा जोरदारपणे विरोध करत आहोत व आवश्यकता पडली तर आमरण उपोषणास बसण्यास मी तयार आहे. कारण की गरीब जनतेचा पैसा खर्च होत आहे. यासाठी मा. महापौर महोदया पावसाळा जवळ येत असल्याने व साफ सफाई होणे आवश्यक असल्याने खाडाबदली सफाई कामगारांची भरती केली जावी कारण की मागील वर्षी शहरात सर्वीकडे महापुराचे पाणी साठले होते. तसे होवु नये म्हणुन खाडाबदली सफाई कामगारांची नेमणुक केली पाहिजे. व खास करुन उपायुक्त आरोग्य विभाग यांनी प्रत्येक प्रभागातील साफ सफाईची पाहणी करण्यासाठी दौरा आयोजीत केला पाहिजे. केवळ वातानुकुलीत दालनात बसुन राहु नये. धन्यवाद ।

**<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे</u> :–**मा. महापौर, उप–महापौर व सभागृहातील सर्व सहकारी हो, आज श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी एक लक्षवेधी सूचना येथे मांडली आहे. ही लक्षवेधी सत्ताधारी पक्षांच्या सदस्यांऐवजी आम्ही मांडावयास पाहिजे होती. ही जी समस्या त्यांनी मांडली आहे ती सर्वांसाठी आहे. शहराची समस्या आहे. केवळ सत्ताधारी व विरोधी पक्षांची नाही. आरोग्य विभागाचे उपायुक्त श्री. दिपक सावंत साहेब येथे बसलेले आहे त्यांना मी कित्येक वेळा सांगितले आहे की, प्रत्येक प्रभागामध्ये १५–१५, १६–१६ सफाई कामगार दया. १२–१४ सफाई कामगार दिल्यामुळे ज्या ठिकाणी इमारतींचा भाग आहे त्याठिकाणची साफसफाई होवु शकते परंतु जो गलिच्छ वस्तीचा भाग आहे तेथे जास्त करुन नाले सफाईचे काम जास्त असते. कचरा बराचशा असतो. एवढी काही दुर्गंधी असते की त्या बाबतीत विचारुच नका. मागच्या वेळेस जी पॅनल पध्दती होती त्यावेळी एका पॅनल मध्ये १४ कामगार काम करत होते. व त्यावेळेस प्रत्येक दिवशी ५–५, ६–६ सफाई कामगार गैरहजर राहत होते. मुकादमास याबाबतीत नगरसेवक जावुन विचारणा करत असत. त्यावर तो म्हणत असे की काय करायचे? कामगार गैरहजर आहेत तर काय करायचे? मी झाडु मारु का? तर अशा प्रकारे शहरात सारे काही चालले आहे. आज सभागृहात मा. महापौर व उपमहापौरांबरोबर आयुक्त साहेब सुध्दा बसलेले आहेत त्यांचा आज सभागृहाने सत्कारही केला आहे. या आनंददायी घटनेमुळे ते खाडाबदली सफाई कामगार नेमणुकीचे काम लवकरात लवकर करतील. उल्हासनगर शहरास जर स्वच्छ सुंदर आणि नंदनवन करायचे असेल तर या कामी सर्व सदस्यांनी सहकार्य देणे आवश्यक आहे. पावसाळा डोक्यावर येवुन ठाकला आहे. प्रत्येक वर्षी शहरात पुराचे पाणी भरत असते. मागील ४० वर्षापासुन या शहरात कधीही पुराचे पाणी येत नव्हते. परंतु या दोनचार वर्षापासुन प्रत्येक वर्षी पुराच्या पाण्याची समस्या बिकट होत आहे. व प्रत्येक वर्षी झोपडपट्टयांमध्येच नाही तर इमारतींमध्ये सुध्दा दहा–दहा पंधरा–पंधरा फुट पाणी साठत असते. त्यामुळे खुपच बिकट समस्या निर्माण होत असते. यासाठी संपुर्ण सभागृहास माझी विनंती आहे की, खाडाबदली सफाई कामगार नेमणुकीकडे विशेष लक्ष दिले जावे याबाबत मी मा. महापौर, उपमहापौर आणि आयुक्तांना विनंती करतो. जयहिंद ।

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव</u> :–**मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी आज येथे जी लक्षवेधी सूचना मांडली आहे कचरा उचलण्याचा ठेका ज्या ॲन्थोनी ठेकेदारास दिला आहे त्याची या शहरामध्ये पुर्णपणे मनमानी चालली आहे. आणि त्याच्यावर आपले काहीही नियंत्रण नाही. त्याच्या मनात येईल त्यावेळेस तो कचरा उचलतो, नाहीतर ढिग पडलेले आहे. आमच्या येथे जो वीर सावरकर चौक आहे त्याठिकाणी सावरकरांचा पुतळा आहे. कचरा उचलण्याकामी मी अधिका–यांना वारंवार तक्रारी देत

असतो तरीही कचरा उचलला जात नाही. त्याचप्रमाणे उल्हास स्टेशन येथे बौध्दविहार आहे. तेथे तुम्ही कधीही गेला तर तुम्हांला तेथे कचरा आढळून येईल याबाबतची तक्रार अधिकारी आपणांकडे करतात का? व ठेकेदाराची जी मनमानी चालु आहे त्याला केवळ अधिकारी जबाबदार आहेत. त्यांच्याकडे एकही तक्रार जात नसेल आपल्याकडे येत नसेल. सन्माननिय सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी जो विषय आणला आहे त्यावर चर्चा व्हायला पाहिजे. ॲन्थोनीला जो ठेका दिला आहे तो रद्द करण्यात यावा. तसेच दुसरा जो विषय आहे खाडाबदलीचा त्यावर सुध्दा आपण लक्ष दयायला हवे. या विषयाबाबत आम्ही ५–६ वर्षापासुन मागे लागले आहोत. तरी हा विषय हाताळला जात नाही. तरी मा. महापौरांना आम्हां सर्वांची विनंती आहे की त्यांनी खाडाबदली या विषयाबाबत विचार करावा. मा. उपमहापौरजी आपणही महापौरांसोबत बसुन यावर तोडगा काढावा. आपल्या शहरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे त्यावर आळा बसण्यासाठी आपण प्रयत्न करावेत अशी आपणाकडे मागणी आहे. धन्यवाद ।

<u>सदस्य श्री. राजू जग्यासी :—</u>मा महापौरजी, उपमहापौरजी, व आयुक्त साहेब, येथे जो विषय चर्चेस आणला आहे त्यावर मी एक बोलु इच्छितो व आपले लक्ष वेधू इच्छितो की, उल्हास स्टेशन रस्त्यावर आमचे एक संत भंगत कंवराम यांचा पुतळा आहे. आयुक्त साहेब, आपण स्वत: तेथे जावुन पाहणी करावी की त्या पुतळयाजवळ किती कचरा पडलेला असतो. ब—याच वेळा तर असे होते की दोन—दोन, तीन—तीन दिवस तेथुन कचरा उचलला जात नाही. आपण सभा संपल्यानंतर तेथे जावुन पहा, आता सुध्दा तेथे एक ट्रक कचरा साठलेला असेल. गेल्या महिन्यात या महान संताचे जन्मोत्सव होते त्यावेळेस वारंवार फोन करुन सुध्दा कचरा उचलण्यासाठी गाडी वेळेवर आली नाही. तर माझी आपणांस विनंती आहे की, तेथे त्या पुतळयाजवळ जो कच—याची जागा आहे ती बदलली जावी. संत कंवराम चौकापासुन संत नारायणदास हॉस्पीटलचा रस्ता किती वर्षापासुन तसाच्या तसाच आहे. आता पावसाळा येईल त्यावेळेस त्या रस्त्याची स्थिती अशी होईल की कुणीही व्यापारी त्या रस्त्यावरुन ये—जा करणार नाही. कृपया करुन या गोष्टीकडे खास करुन लक्ष दिले जावे की तेथिल पुतळयाजवळचा कचरा हटविला जावा. स्थायी समितीमध्ये जी निविदा संमत केली आहे त्याची प्रसिध्दी करुन मंजूरी देवुन पावसाळयाच्या आदी ते काम पुर्ण केले जावे. धन्यवाद ।

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आमच्या येथिल प्रभाग क्र. ५ येथिल गुलशन नगरमध्ये एक छोटीशी समस्या आहे. ते एक छोटेशे शहर आहे तेथे महानगरपालिकेने गेल्या १० वर्षापासुन ढुंकुन सुध्दा पाहिले नाही. याबाबत मी एक लक्षवेधी टाकली परंतु त्यास का माहित कश्याबद्दल मान्यता दिली नाही? तर आयुक्त साहेबांना मी एक विनंती करतो की, तेथील लोक गरीब आहेत, तेथे नाला वगैर नाही, क ुणी सफाई कामगार तेथे जात नाही, न मुकादम तेथे ठेवलेला आहे. मी तीन वेळा तक्रार करुन देखील तेथे मुकादम दिलेला नाही. दुसरी गोष्ट अशी की शहाड स्टेशनच्या समोर एक चेंबर आहे दर दोन दिवसांनी तो चेंबर भरुन वाहत असतो. त्याबाबतीत मी कितीतरी वेळा तक्रार केली आहे तो चेंबर निष्कासीत करुन तेथे दुसरा चेंबर बांधण्यात यावा किंवा तेथे दुसरी काही उपाययोजना करावी परंतु त्याबाबतीत कुणीही लक्ष देत नाही. कृपया करुन आपण याची दक्षता घ्यावी आणि आमचे हे काम पुर्ण करुन दयावे. धन्यवाद।

<u>आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—</u>मा. महापौर, उपमहापौर, सभागृह नेता, सर्व गटनेते, सर्व सन्माननिय सदस्य पुष्पगुच्छ देवुन आपण माझा सत्कार केलात. त्याबद्दल आपणाला मी धन्यवाद देतो. मी आता पर्यंत सभेला का उपस्थित राहिलो नाही त्याबद्दल मी मुद्दाम येथे खुलासा करतो की माझ्या विरोधात पुर्वीच्या महासभेत अविश्वास ठराव आलेला होता. ज्या अधिकाराच्या विरोधात अविश्वास ठराव आला आहे त्यांनी सभेस उपस्थित राहावे अशी कायदयात कोणतीही तरतुद नाही. ज्या ज्या सभा स्थगित झाल्या होत्या त्या महासभेला मी ४ की ५ वेळा याच कारणासाठी गैरहजर होतो. तसेच दोन महासभेच्या वेळी त्याच दिवशी औरंगाबाद येथे ट्रेनिंग साठी जावे लागले. ते टाळणे शक्य नव्हते. यासाठी मी त्या दोन महासभेला हजर राहू शकलो नाही. सभेस आयुक्त गैरहजर राहण्याचे त्यात कोणतीही जाणीवपुर्वक टाळाटाळ नाही किंवा सहेतु नाही. मी सर्वांना आश्वासन देतो की सर्व बैठकात शासनाकडे एखादी बाब असेल आणि मला तेथे जाणे भाग असेल अशी परिस्थिती सोडुन बाकी सर्व बैठकीस मी हजर राहणार आहे. हजर राहणार म्हणजे मी काही मेहरबानी करत नाही ही माझी जबाबदारी आहे. त्या जबाबदारीची मला जाणीव आहे. पुष्पगुच्छ देवुन आपण माझे जे स्वागत केले त्याबद्दल मी सर्वांना पुन्हा एकदा धन्यवाद देतो. श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी जी लक्षवेधी दिली आहे, ज्याचे अनुमोदन श्री. दिलीप गायकवाड यांनी केले आहे, सदस्याच्या भावना माझ्या समोर आणि सभागृहा समोर आल्या आहेत त्याबाबत मी निवेदन करु इच्छितो. सन २००६ मध्ये उल्हासनगर शहरात डेंग्युचे ५९ रुग्ण आढळून आले असून उपचारानंतर ते बरे झाले आहेत. डेंग्युची साथ ही घरातील किंवा इतर ठिकाणी साठलेल्या अस्वच्छ पाण्यामुळे होते. डेंग्युच्या नाशासाठी आरोग्य शिक्षण व जंतुनाशकाची फवारणी इत्यादी कार्यवाही करण्यात आली आहे व आता सुरु करणार आहोत. डेंग्युच्या निदानासाठी मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर—३ येथे उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे

उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. येत्या पावसाळयापुर्वी नाले सफाईसाठी मंजुरी देण्यात आलेली असून त्यानुसार लवकरच नाले सफाईची कामे सुरु करण्यात येतील. हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यास तयार आहे. आणि तो पहिल्या स्थायी समिति सभेत मंजूर होईल. जे खाडाबदली व हंगामी कर्मचारी आहेत, ३०५ हंगामी कर्मचा—यांची कागदपत्रांची प्राथमिक छाननी केली आहे. त्यापैकी २२० कर्मचारी सकृत दर्शनी पात्र असल्याचे आढळून आलेले आहेत. परंतु आम्हांला तीन—चार संघटनेकडुन काही लोक मृत आहे काही लोक की ज्यांची नावे खोटी आहेत किंवा कागदपत्र अ च्या नावावर ब येणार आहे अशाप्रकारची आमच्याकडे संदिग्ध तक्रार आलेली आहे. त्यावर उपाययोजना म्हणुन आमची डिपार्टमेंटल कमिटी आहे किंवा सिलेक्शन कमिटी आहे त्यांच्या समोर या २२० कर्मचा—यांची कागदपत्र छाननी करुन मुलाखत घेतली जाईल. तसेच याचा प्रस्ताव सुध्दा तयार आहे. या छाननी नंतर हा प्रस्ताव महासभेपुढे ठेवण्याची आमची तयारी आहे. ते साधारणत: १—३ आठवडयात पुर्ण होईल अशी माझी अपेक्षा आहे. आणि निश्चितपणे पुढच्या महासभेमध्ये हा प्रश्न निकाली निघेल. निवडणूक आचारसंहिता असल्यामुळे आपल्याला हे काम पहाता आले नाही. नंतर याबाबत तक्रारी आल्या, प्रस्ताव तयार होता. प्रस्ताव मंजुरीस ठेवण्यापुर्वी ज्या तक्रारी आल्या त्या तक्रारी पुर्वी त्याची छाननी करणे आवश्यक असल्याने या प्रक्रियेला उशिर झालेला आहे. जो उशिर झालेला आहे तो योग्य कारणासाठीच झालेला आहे. हे २२० कर्मचारी आपण निश्चिपणे त्यांची पात्रता बघून आपण त्यांना कामावर घेवु. दरवर्षी आपण पावसाळयापुर्वी ७०० ते ७५० कर्मचारी या कामासाठी घेतो. याचा गोषवारा तयार आहे व तो स्थायी समितीपुढे पाठविलेला आहे. तो प्रस्ताव स्थायी समितीत मंजुर झाल्यानंतर पावसाळयापुर्वी म्हणजे पुढच्या १५ दिवसांत काम सुरु होईल. तसेच शहरात जे घाणीचे साम्राज्य पसरले आहे ते हटविण्यासाठी मी प्रशासनाच्या मागे मी उभा राहून हे काम करुन घेईल. एवढे मी आश्वासन देतो. तसेच ठेकेदाराचा जो विषय आहे याबाबतीत मी महापौर, उप—महापौर व सभागृह नेता यांच्याशी गेल्या ३—४ दिवसापासुन चर्चा करतो आहे. त्याबाबत जे कराराच्या अटी व शर्ती आहेत त्याची आम्ही कायदेशीररित्या छाननी करत आहोत. त्याप्रमाणे त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचे निश्चित केलेले आहे. मी माझ्या व उपायुक्तांच्या सहीने त्याला बरेच मेमो दिले आहेत. कचरा उचलला जात नाही म्हणुन त्यांच्या पेमेंट मधुन फाईन म्हणुन कपात केली आहे. ३० हजार, ५० हजार अशी रक्कम त्यांच्या बिलामधुन कपात केलेली आहे. त्यांना आपण १ लाख २० हजार एवढी रक्कम दररोज देतो या पैश्याचा योग्य विनियोग झाला नाही तर व त्यांनी जर अटी व शर्ती पुर्ण केल्या नाहीत तर त्यांच्या विरुध्द कारवाई केली जाईल. त्यासाठी प्रक्रिया सुरु आहे.

<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया :—</u>मा. महापौरजी व आयुक्त साहेब, प्रत्येक वर्षी जे १०—१० लोक कामावर घेतले जातात त्या २०० लोकांचा मुद्दा आहे की आपण महासभेत ३०५ चा मुद्दा पास केला होता तो आहे.

<u>आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):— </u>३०५ सफाई कामागरांपैकी ज्या कर्मचा—यांचे दस्तऐवज पडताळून खात्री करुन घेण्यात आली आहे अशा कर्मचा—यांची संख्या २२० आहे. त्यांना पहिल्या टप्प्यामध्ये कामावर घेवु व बाकी कामगारांच्या दस्तऐवजाची छाननी होत आहे.

<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया :—</u>३०५ सफाई कामगारांना कामावर घेण्याचा मुद्दा मी महापौर असतांना पारीत केला होता. म्हणुन ३०५ कामगार खाडाबदलीवर घेतले जावेत.

<u>आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—</u> ३०५ सफाई कामगार खाडाबदलीवर घेण्याचा आपला मुद्दा आहे हे बरोबर आहे. परंतु ज्या कामगारांना कामावर घ्यायचे आहे, ज्यांना पगार दिला गेला आहे तसेच २४० दिवस सेवेचा जो मुद्दा आहे या मुद्दयांच्या छाननीमध्ये फक्त २२० कामगारांचाच प्रस्ताव योग्य असा आहे. त्यासाठी पहिले हा प्रस्ताव मंजुर केला जाईल त्यानंतर बाकी कामगारांच्या दस्तऐवजाची छाननी चालु आहे. त्यांच्याबाबतीतील दस्तऐवज मिळत नाहीत. जे जुने दस्तऐवज आहेत ते उपलब्ध होत नाहीत. त्यांच्याकडे जर काही दस्तऐवज असतील तर ते घेवुन त्यांची छाननी करुन त्यांचा सुध्दा विचार करु.

<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया :—</u> तसेच आरोग्य विभागामध्ये जे लोक १०—१०, १२—१२ वर्षापासुन काम करत आहेत त्यांना तर आपण समायोजित करु शकतात ना?

<u>आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—</u>हा जो ३०५ सफाई कामगारांचा मुद्दा आहे त्याबाबतीत मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश आहेत त्याबाबतीत सभागृहात ठराव मंजुर करण्यात आला आहे. त्यांच्याबाबतीतील मुद्दा असल्याने त्याबाबतीत मी निवेदन केले आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—मा. आयुक्त साहेब, ज्यांना डेंग्युचा आजार होतो अशा रुग्णास उपचार करण्यासाठी मध्यवर्ती रुग्णालयात फक्त एकच केंद्र आहे. यासाठी माझी आपणांस अशी विनंती आहे की, कॅम्प नं.१ येथे एक व कॅम्प नं. ५ येथे एक अशी दोन केंद्रे असावीत. सध्या कॅम्प नं. ५ येथिल लोकांना कॅम्प नं. ३येथे एवढया लांब याव्या लागत आहे. तसेच बिर्ला गेट पासुन कॅम्प नं. १ व २ मधील लोकांना कॅम्प नं. ३ येथे येण्यासाठी लांब पडते. म्हणुन यातील एक केंद्र कॅम्प नं.१ येथे असावे व दुसरे कॅम्प नं. ५ येथे असावे. तसेच आणखी एक सूचना आहे. आता आपण सांगितले की, खाडाबदलीवर २२० सफाई कामगार घेणार आहेत तर हे कामगार आपण कधी घेणार आहात? किती कालावधीमध्ये घेणार आहात तेवढे सांगा.

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—मी सांगितले ना, तीन आठवडयाची मुदत घेतली आहे. छाननी झाली की लगेच तो प्रस्ताव पुढील महासभेत येईल. आणि तुम्ही आता जी सूचना केली होती डेंग्युच्या आजारावर उपचार करण्यासाठी दोन केंद्र असावीत. आपणाकडे सहा आरोग्य केंद्र आहेत. त्यातील कॅम्प नं. १ व कॅम्प नं. ५ येथिल केंद्र यासाठी उपलब्ध करुन देता येईल. त्यात काही अडचण नाही.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मा. आयुक्त साहेब, लक्षवेधीचे हे जे आपण उत्तर दिले. तसेच श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी आपणांस जो प्रश्न विचारला या दोघांमध्ये अंतर आहे. आपण ३०५ सफाई कामगारांबाबत बोलतात. या लक्षवेधीमध्ये असे लिहिले आहे की खाडाबदलीवर सफाई कामगार घेतले जावेत. आपण जे म्हटले त्याप्रमाणे २२० कामगार खाडाबदलीवर घेणार आहात. तसेच दरवर्षी प्रत्येक प्रभागासाठी नाले सफाई कामी जे १०—१० सफाई कामगार दिले जातात ते कामगार वेगळे असतील की २२० मधीलच असतील?

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—२२० अधिक ५०० लोक आहेत. नेहमी ७००—७५० कामगार आपण घेणार आहोत हे सर्व कामगार आपण घेणार आहोत. परंतु जे २२० कामगार आहेत त्यांना ठेकेदारीवर नियमित स्वरुपी कामावर घेणार आहोत. त्यांना नियमित करण्याचा जो मुद्दा आहे त्याबाबतीत मी निवेदन केले आहे. पुर्ण ७५० कमगारांना घेतले जाईल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—म्हणजेच २२० कामगार पकडुन एकुण ७५० कामगार घ्याल?

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—७५० मध्ये २२० कामगार आहेतच ना? हे २२० कामगार तर येतीलच.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—३०५ सफाई कामगारांचा मुद्दा राहून गेला जे सेवेत कायम होणार आहेत, आता आपण जे २२० सफाई कामगारांबाबत बोलत आहात ते तर जसे आपण ७५० कामगार घेतो, ७६० कामगार घेतो ते वेगळे असले पाहिजेत. नाला सफाईसाठी आपण जे कामगार घेतो......

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—हे पहा, आपण साधारणत: ७५० कामगार घेतो, हे २२० कामगार आपल्याकडे आल्यानंतर आपली उर्वरित मागणी ५०० ची होईल. ते ५०० कामगार घेतले जातील.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—त्यानंतर २२० कामगारांचे काय कराल? ७५० कामगार जे आपण घेतो ते दोन महिन्यासाठी घेतो. २२० कामगारांना सुध्दा दोन महिन्यासाठीच घेणार आहात का?

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—नाही, महासभा होईपर्यंत त्यांना तात्पुरत्या स्वरुपी घेवु. नंतर त्यांना नियमित करु.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आपण म्हणता की उच्च न्यायालयाचा आदेश आहे त्याप्रमाणे आपण २२० कामगारांची छाननीही केली आहे. ते २२० कामगार पुढे चालु सेवेत कायम होणार आहेत की दोन महिन्यानंतर घरी बसणार आहेत?

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—नाही, परमनंट होतील. २२० कामगारांना आता तात्पुरत्या स्वरुपात घेवु नंतर त्यांचा हक्क बनतो त्यांना नंतर कायम करु. नंतर जादा ५०० कामगार दोन महिन्यानंतर घेवु.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—जे कामगार अनुपस्थित राहतात, ते २२० कामगार मधुन घ्या व ७५० हे कामगार वेगळे घ्या. २२० कामगार खाडाबदलीवर घ्यावेत तेव्हाच आमच्या शहराची सफाई होईल.

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):– कामगारांची जी पदे मंजुर झाली आहेत त्यानुसार आम्ही जास्तीत जास्त ३०० लोकांना कामावर घेवु शकतो. १५०० जी संख्या आहे त्यातुन १२०० आपल्याजवळ आहेत. हे २०० कामगार जेव्हा नियमित होतील. जसे आपण म्हणता की, जे कामगार गैरहजर असतात त्या कामगारांच्या ठिकाणी हे कामगार नेमल्यानंतर कामगारांची संख्या वाढेल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–नाला सफाईसाठी ७६० कामगार आपण वेगळे घ्या. प्रत्येक वर्षी प्रत्येक प्रभागासाठी १० कामगार दिले जातात.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–नाला सफाईसाठी दरवर्षी प्रत्येक नगरसेवकास १०–१० कामगार दिले जातात. व हे जे २२० कामगार नेमायचे आहेत ते जे कायम सेवेतील सफाई कामगार गैरहजर राहतात त्यांच्या जागी यांची नेमणुक करायची आहे. श्री. बच्चाराम यांचे हेच म्हणणे आहे.

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):–यावर्षी तर मी असे सांगेन की, हे जे २२० कामगार आहेत त्यांना अदयाप आम्ही नियमित कामावर घेतलेले नाही. या लोकांना प्रथम तर ७५० कामगारांमध्ये कामावर घेतले जाईल.व पावसाळयानंतर त्यांना नियमित केले जाईल. व ७५० कामगारांचा हा जो मुद्दा आहे, तो पुढच्या वर्षी जेव्हा येईल त्यावेळेस ७५० कामगारांना घेंतले जाईल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–नाले सफाई कामी १०–१० कामगार वेगळे घ्या. आणि जे कामगार सतत गैरहजर राहतात त्यांच्या जागी २२० कामगार वेगळे घ्या.

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):–जोपर्यंत त्यांना नियमितपणे कामावर घेतले जात नाही तोपर्यंत त्यांना गैरहजर कामगारांच्या जागेवर कसे घेता येईल?

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–आयुक्त साहेब, पूढच्या वर्षी तुम्ही ७५० कामगार घेण्यास तयार आहात. हे २२० आणि पुढील वर्षी ७५० हे तर तुम्ही बरोबर म्हणालात? मग या वर्षी का नाही? पुढच्या वर्षीसाठी का करता म्हणजे आवश्यकता आहे?

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):–यावर्षी आपण त्यांना नियमित करणार आहोत. आणि त्याच्या आधी आपणांस त्यांच्या सेवा उपलब्ध करुन घ्यावयाच्या आहेत.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–मुळात मुद्दा हा आहे की, २२० कामगारांना घ्या. आणि जे कामगार रजेवर जातात जसे की काही प्रभागांमध्ये तुम्ही १३ तर काही ठिकाणी १४, काही ठिकाणी १६ सफाई कामगार दिलेले आहेत. आज आमच्या परशूराम पाटील यांच्या प्रभागामध्ये १३ सफाई कामगारांपैकी फक्त ३ च कामगार कामावर आहेत. या तीन लोकांकडुन सफाई काय करुन घेणार? म्हणुन यासाठी तुम्ही २२० सफाई कामगार भरा. आणि बाकी जे हंगामी कामगार आहेत जे नाले सफाईसाठी मे आणि जुन महिन्यामध्ये भरतो जसे मागच्या वर्षी भरले होते तसे तुम्ही पुढल्या वर्षी भरणार आहात. ते यावर्षी भरा.

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):–नाही ते आपण भरणारच आहोत. ते ५०० भरणार व २२० हे कामगार उपलब्ध होणार आहेत.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–२२० कामगारांचा मुद्दा वेगळा आहे.

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):–२२० कामगारांचा मुद्दा निकालात काढण्यासाठी आपणास पुढच्या महासभेत ठराव घ्यावा लागेल. त्यासाठी दोन महिने लागतील. म्हणजे प्रत्यक्षात त्यांना आदेश मिळेपर्यंत. त्यांच्या सेवा फक्त आपणांस मे आणि जुन मध्ये उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. मग त्यावेळेस त्यांना त्याचा फायदा मिळालाच पाहिजे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–घ्या ना? मे, जुन मध्ये ..........

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—मग आपले एकुण १००० कामगार होतील. आर्थिक दृष्टया हा बोजा कसा सहन करता येईल ते मला तपासून पहावे लागेल. त्यानंतर जादा ज्या २५० जागा भरायच्या आहेत. त्याबाबतीत तपास करुन मी आपणांस उत्तर देईल. त्यासाठी आजचे जे गणित आहे ते ७५० म्हणजे २२० अधिक ५०० असेच आहे. आणि त्याच्या आधारेच हे निवेदन मी केले आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—नाही, नाही आयुक्त साहेब, जे १० कामगार दरवर्षी आम्ही नालेसफाईसाठी घेतो, मा. महापौरजी, उप—महापौरजी जरा लक्ष दया. जे १० कामगार दरवर्षी आपण नाले सफाईसाठी घेतो प्रत्येक नगरसेवकास या कामी १०—१० कामगार मिळतात. तसेच हे जे २२० कामगार आपण घेत आहोत ते जे आपले कामगार कायमसेवेत आहेत परंतु ते कामावर येत नाहीत त्यांच्या ऐवजी हे २२० कामगार घ्यायचे आहेत. तर या बाबतीत आपण आयुक्तांना आदेश दया.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—सालाबादप्रमाणे आपण जे नाले सफाईसाठी ७५० कामगार घेतो ते फक्त नाले सफाईसाठी असतात. त्यांचा प्रभागातील सफाईशी काही संबंध नसतो. आणि आता हे जे २२० कामगार घेण्याबाबत जे बोलले जात आहेत ते आपले जे कायम सफाई कामगार आहेत त्यातील जे कामगार कामावर येत नाहीत त्यांच्या ठिकाणी तुम्ही ते घेत आहात. म्हणजे या कामगारांचा २२० सफाई कामगारांशी काहीही संबंध नाही.

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—हे जे २२० कामगार आपण घेतो ते दरवर्षी नाले सफाईसाठीच घेत होतो व खाडाबदली म्हणुन घेत होतो. आता यावर्षी आपणांस मे आणि जुनमध्ये त्यांच्या सेवा उपलब्ध करुन घ्याव्या लागतील. त्या आपण नाला सफाईसाठी घेत आहोत आणि त्यांच्या सेवा नियमित झाल्यानंतर ते नियमित होतील. हा एक भाग आणि मी जे गणित केले आहे त्यानुसार ५०० आणि हे २२० अशाप्रकारे ७५० लोकांचीच पुर्तता केली आहे. जादा २०० घ्यायचे असतील तर ते मला तपासुन घ्यावे लागेल. आणि मग हजार कामगार होतील. हे मी तपासुन त्याप्रमाणे निर्णय घेतो. परंतु आता ७५० ला आपली निश्‍चित मंजुरी झालेली आहे. तसा प्रस्ताव पाठविलेला आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आयुक्त साहेब, मुद्दा असा आहे की मागच्या वर्षी उल्हासनगरमध्ये डेंग्यु आणि चिकुनगुनिया याचा जो आजार आला आणि त्यास प्रतिबंध करण्यास आपण थोडे कमी पडलो यांचे कारण हे की साफसफाई कमी. हे एकमेव कारण होते. हे आजार जास्तीत जास्त पसरले ते जेथे घाणीचे साम्राज्य होते तेथेच. त्याचे कारण म्हणजे साफसफाईसाठी असलेले कर्मचारी कमी. तीन ते चार कर्मचारी ते सुध्दा येणार किंवा येणार नाही अशा परिस्थितीमध्ये आणि या वर्षी या डेंग्युच्या विषाणुंमध्ये वाढ झालेली आहे. हे जिल्हा हिवताप केंद्राने कबुल केलेले आहे आणि उल्हासनगर महानगरपालिकेने याबाबतीत वेळीच उपाययोजना करण्याकामी त्यांनी आदेश दिले आहेत. आणि याबाबतीत जर तुम्ही लक्ष दिले नाही तर साथीचे आजार वाढतील. त्यामुळे याबाबतची संपुर्ण जबाबदारी आपली असेल. म्हणुन रोग होण्याअगोदर काळजी घेतलेली बरी. मागच्या वर्षी सफाई कमी झालेली आहे. सफाई वाढली पाहिजे म्हणुन हे २२० कर्मचारी भरा आणि दरवर्षी नाला सफाईसाठी आपण प्रत्येक प्रभागामध्ये १० कर्मचारी जे नेमतो त्याप्रमाणे ७५० कर्मचारी भरा. जेथे कर्मचा—यांची संख्या कमी असेल तेथेच यामधुन कर्मचारी देता येतील. त्यामुळे साथीचा प्रार्दुभाव होणार नाही. आणि पुढे जो आम्हांला जो बाकीचा खर्च करावा लागतो इंजेक्शन आणा आणि बाकीच्या उपाययोजना करा, त्यावरचा खर्च टळेल. आणि लोकांच्या आरोग्यास बाधा येणार नाही.

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—डेंग्युचा जो आजार होतो तो खरे म्हणजे घाणीच्या साम्राज्यामुळे होत नाही. डेंग्यु हा हे स्वच्छ पाणी आपण साठवतो, जे आपण बदलत नाही, तेथे त्याची वाढ होत असते. आणि ही जी साथ आहे आणि ही एकदा ज्या भागात आली आहे त्या भागात पुन्हा येत नाही. तरी सुध्दा डेंग्यु हा एकच नाही इतर जे साथीचे आजार आहे ते लक्षात घेवुन आपण ७५० कामगारांच्या ठिकाणी १००० कामगार घेवु शकतात का ते मी तपासुन घेतो? परंतु आज या लक्षवेधीवर निवेदन करतांना मी सांगु इच्छितो की हे २२० कामगार धरुन ७५० कामगार तर भरले जातील. जादा कामगारांबाबत तपासणी केल्यानंतर पुर्तता केली जाईल.

महापालिका सचिव:—पुढील लक्षवेधी सूचना जी आहे तिचे सुचक आहेत श्री. राजेंद्रसिंह भुल्लर त्यांनी कृपया आपला प्रस्ताव मांडावा.

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. रामसागर जर्नादन यादव

विषय :— शहाडहुन कल्याणमार्गे रेल्वे रुळाखालुन जाणा—या नाल्यातुन एमआयडीसीला १८ इंच व्यासाची जलवाहिनी टाकण्यास परवानगी देण्याबाबत लक्षवेधी.

शहाड ते सी—ब्लॉक मार्गे एमआयडीसी मोठी भुमिगत जलवाहिनी उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत आहे. शहाड रेल्वे रुळाखालून शहाडहून कल्याणमार्ग जाणारा भुमिगत नाला वाहत आहे. सदरचा नाला उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत आहे. सदर नाल्यातुन वर्षभर गाळ, केरकचरा सांडपाणी वाहत असतो. पावसाळयात सदर नाला दुधडी भरुन वाहतो. अतिवृष्टीमुळे सदर नाल्याचे पाणी रेल्वे रुळावरुन वाहते. तसेच सातत्याने सदर रेल्वे रुळाखालुन वाहणा—या नाल्याच्या सखल भागात असणा—या राजीव गांधीनगर, बाळकृष्णनगर, शहाड फाटक, व्हीपी नाईक कॉलनी व सी—ब्लॉक परिसरात पुरमय परिस्थिती निर्माण होते. सदर परिसर पाण्याखाली येवुन विशेषतः झोपडपट्टी परिसरात राहणा—या नागरीकांचे प्रचंड नुकसान सोसावे लागते. सदर नालयातुन मोठया प्रमाणात सांडपाणी व केरकचरा येत असतो. सदर नाल्यातुन एमआयडीसी कल्याण शहरात १८ इंच जलवाहिनी मार्फत पाणी पुरवठा देणार आहे. त्यांनी कामाला सुरुवात सुध्दा केली होती. परंतु स्थानिक नागरीकांनी सदर काम रोखले आहे. कल्याणला पाणीपुरवठा करावा त्याबाबत आमची कोणत्याही प्रकारची हरकत नाही. परंतु सदर नाल्यातुन जलवाहिनी टाकण्याची परवानगी दिल्यास अगर त्यांनी जलवाहिनी टाकल्यास स्थानिक परिसरातील नागरीक प्रक्षुब्ध होवुन मोठा उद्रेक होवु शकतो. अरुंद नाल्याच्या सांडपाण्यातुन जलवाहिनी टाकल्यास नाल्यातुन वाहणारा गाळ, केरकचरा अडकुन नाल्याचे सांडपाणी नजदिकच्या परिसरात शिरण्याची दाट शक्यता आहे. एमआयडीसी ने पर्याय शोधुन सदरची जलवाहिनी नाल्यातुन न घेता योग्य उपाययोजना करुन वरच्या कडेने घेवुन जावी. नाल्याच्या मधोमध घेवुन गेल्यास पावसाळाच काय भर उन्हाळयातसुध्दा नाल्याचे सांडपाणी नजदिकच्या परिसरात जावुन पुरमयस्थिती निर्माण होईल. सदर नालयातुन जलवाहिनी गेल्यास स्थानिक नागरीक त्याचा विरोध करतील. सदर काम होवुन देणार नाहीत. त्यामुळे अप्रिय घटना घडु शकते. त्यासाठी प्रशासनाने पोलिसांना सर्तक करावे. सदर ठिकाणी तणावग्रस्त स्थिती निर्माण होवु शकते. उल्हासनगर प्रशासनाने सदर नाल्यातुन जलवाहिनी टाकण्यास परवानगी दिल्यास सदर ठिकाणच्या परिसरात पाणी शिरल्यास अगर झोपडपट्टी डुबल्यास त्यास जबाबदार प्रशासन राहिल याची नोंद घ्यावी. प्रशासनाने नाल्यातुन जलवाहिनी टाकण्यास परवानगी देवु नये. सदर नाल्यातुन जलवाहिनी जाणार नाही याबाबत महासभेत ठोस निर्णय द्यावा.

---

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी व आयुक्त साहेब, शहाड फाटक येथे रेल्वे लाईन खालुन एक नाला जातो त्याची उंची ४ फुट व रुंदी ६ फुट आहे. तेथुन एमआयडीसी वाले कल्याणसाठी दिड फुट व्यासाची जलवाहिनी देत आहेत. खेमाणी पासुन संपुर्ण उल्हासनगर शहराचे पाणी या नाल्यामधुन वाहत असते. पावसाळयात एक तासामध्ये संपुर्ण विभागामध्ये हा नाला तुंबल्यास पाणी भरते. त्यांचे म्हणणे असे आहे की आपण त्यांना जलवाहिनी टाकण्यास परवानगी दिली आहे. आपण जर अशी परवानगी दिली असेल तर पावसाळयामध्ये हा नाला तुंबुन आजुबाजुचा परिसरच काय गोल मैदान पर्यंतचा भाग पावसात बुडुन जाईल. म्हणुन मेहरबानी करुन त्यांना परवानगी देवु नका. तसेच पोलिसांना सुध्दा याबाबतीत आपण कळवा. ते पोलिस बंदोबस्त घेवुन कदाचित ते काम पुर्ण करतील. म्हणुन पोलिसांना पत्र देवुन आपण त्यांना कळवा की याकामासाठी पोलिस बंदोबस्त दिला जावु नये व नाल्यामधुन कोणत्याही परिस्थितीत आम्ही जलवाहिनी टाकु देणार नाही.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>आयुक्त साहेब, कृपया हिंदीत बोला.

**आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—**सन्माननिय सदस्य श्री. भुल्लरजी यांची जी लक्षवेधी सुचना आहे, त्यांनी सांगितले की एमआयडीसी जी दिड फुट व्यासाची जलवाहिनी देत आहे. परंतु त्या कामासाठी महानगरपालिकेच्या वतीने कोणताही ना हरकत दाखला त्यांना दिलेला नाही. व कल्याण—डोंबिवली महानगरपालिकेस मी पत्र लिहित आहे त्याच बरोबर पोलिसांना सुध्दा याची माहिती पत्रान्वये देत आहे की, आम्ही या कामासाठी त्यांना ना हरकत दाखला दिलेला नाही. व हे काम सध्या बंद आहे. व बंद ठेवण्यासाठी लेखी सूचना दिली जाईल. आम्ही लोकांनी, कोणत्याही विभागाने त्यांना ना हरकत दाखला दिलेला नाही.

**सदस्य श्री. लाल पंजाबी :—**मध्यंतरी काही काम चालू केले होते का ज्यामुळे सोमवारी संपुर्ण शहरातील मधील पाणीपुरवठा बंद होता.

**आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—** काम सुरु होते ते बंद केले आहे. व आता एमआयडीसी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका व पोलिस विभागास आम्ही लेखी पत्र देत आहोत.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २ :—** मागील विशेष महासभेचे दिनांक ५/४/२००७ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापालिका सचिव :—**इतिवृत्त कायम? सर्वसंमतीने? ठिक आहे?

**महापौर :—** मागील सभेचे दिनांक ५/४/२००७ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

सूचक : श्री. जीवन उर्फ राजु इदनानी

अनुमोदक : श्री. धनंजय बोडारे

<u>महासभा ठराव क्र. ३ ब</u> <u>दिनांक : २०/४/२००७</u>

ही महासभा दिनांक ५/४/२००७ रोजीच्या महासभेचे महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले पृष्ठ क्र. १ ते २२ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:—** श्री. मधुकर उमाळकर, स्वच्छता निरिक्षक यांना आयुक्तांनी बजावलेला निलंबन आदेश कायम करणे.

---

<u>**सदस्य श्री. मोहन साधवानी:—**</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, श्री. उमाळकर यांच्या विरोधात जी खातेनिहाय चौकशी चालु आहे, ती कोणता निरिक्षक करत आहे? त्याबाबत जरा माहिती दयाल बरे होईल. मा. महापौरजी माझी आपणांस विनंती आहे की, श्री. उमाळकरांना निलंबित केल्यानंतर सुध्दा त्यांना ७५ टक्के पगार दिला जातो. म्हणुन मी असे म्हणतो की त्यांना कामावर घ्यावे, परंतु त्यांची चौकशी चालु ठेवावी. आपण त्यांच्याकडुन काम करुन घेवु शकतो, असे पण ते घरी बसले आहेत व ७५ टक्के पगार घेतात. त्यांना कामावर ठेवले जावे.

<u>**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**</u>त्याची कश्याबाबतची चौकशी आहे त्याबाबतचे पत्र आम्हांला सुध्दा मिळायला हवे.

<u>**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**</u>मा. आयुक्त साहेब, श्री. उमाळकर यांचा जो विषय आज येथे आला आहे त्यांना १९ सप्टेंबर, २००६ रोजी निलंबित करण्यात आले आहे व त्यास ७ महिने झाल्यानंतर महासभेपुढे हा प्रस्ताव आणलेला आहे. जो ६ महिन्याच्या आत महासभेपुढे आणावयास पाहिजे होता. यासाठी सभागृहातील सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता त्यांचे निलंबन संपृष्टाात आणुन त्यांना कामावर घेतले जावे.

<u>महापालिका सचिव :—</u>त्यांना कामावर घेतले जावे?

<u>**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—**</u>मा. महापौरजी, श्री. उमाळकर यांना मागील वर्षी निंलबित केले आहे आणि त्यांचे निलंबन कायम करण्यासाठी महासभेपुढे प्रस्ताव आणला आहे त्याबाबतीत मला असे म्हणायचे आहे की महापालिकेमध्ये आपण जेव्हा कुण्या एखादया कर्मचा—याला निलंबित करतो त्यावेळेस सहा महिन्याच्या आत त्याच्याविरुध्दची खातेनिहाय चौकशी पुर्ण केली पाहिजे. कारण की बरेच असे कर्मचारी वर्षानुवर्षे निलंबित आहेत. त्यांना आपण अर्धा पगार देत असतो. महापालिकेचे ते नुकसान आहे. म्हणुन अशा कर्मचा—याविरुध्दची खातेनिहाय चौकशी सहा महिन्याच्या आत पुर्ण करुन त्याबाबतीत आपण निर्णय घेतला पाहिजे. त्यांच्या पगारावर नाहक आपण महापालिकेचा पैसा फुकट घालवत आहोत. हे बरोबर नाही. त्यासाठी सर्व सभागृहास माझे असे सांगणे आहे की, जर त्यांच्या विरुध्दची खातेनिहाय चौकशी पुर्ण झाली असेल तर

त्याचा पुढील आदेश कायम करावा. नसेल झाली तर चौकशी पुर्ण करुन जो निर्णय येईल त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

<u>आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):–</u>स्वच्छता निरिक्षक श्री. उमाळकर यांच्याकडे खाडाबदली सफाई कामगारांचे जो पगार होता त्यातील काही कर्मचा–यांना पगार वाटप करतांना काही पैसे त्यांनी कपात करुन घेतले. असा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला होता. प्राथमिक चौकशीमध्ये त्यात तथ्य असल्याचे आढळुन आल्याने त्यांना सेवेतुन निलंबित केले होते. मी सभागृहाच्या मताशी सहमत आहे की, सहा महिन्यामध्ये त्यांच्या विरुध्दची खातेनिहाय चौकशी पुर्ण होणे अपेक्षित होते. परंतु दरम्यानच्या काळात महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत आपली सर्व यंत्रणा निवडणूक कामात व्यस्त होती. आणि ही चौकशी १५ दिवसात पुर्ण करुन त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांना सेवेत सामावुन घेण्याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल.

<u>महापालिका सचिव :–</u>कामावर घ्यायचे आहे किंवा नाही?

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u> त्यांना कामावर घेतले जावे व त्यांच्याविरुध्दची खातेनिहाय चौकशी चालु ठेवली जावी.

<u>महापालिका सचिव :–</u>पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषय सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ३ :–** श्री. मधुकर उमाळकर, स्वच्छता निरिक्षक यांना आयुक्तांनी बजावलेला निलंबन आदेश कायम करणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. मधुकर रामचंद्र उमाळकर, स्वच्छता निरिक्षक, आरोग्य विभाग यांचेकडे (नाला सफाई, हंगामी सफाई कामगार) यांचे वेतन अदा करणेचे काम सोपविण्यात आले असता त्यांनी दिनांक २३/८/२००६ व दिनांक २६/८/२००६ रोजी १३ दिवसांचे वेतन अदा करतांना श्री. अनिल फासगे व श्री. मुकेश बोरकर, हंगामी सफाई कामगार यांना अनुक्रमे रु. ५५०/– व रु. ३५०/– इतकी रक्कम अदा केल्याची तक्रार दिनांक ३०/८/२००६ रोजी प्राप्त झाली होती. श्री. संतोष बाबु शेरे व इतर चार हंगामी सफाई कामगार यांनीही पगाराची पूर्ण रक्कम न दिल्याबाबत तक्रार केली होती. त्याचप्रमाणे श्री. विकास खरात, अध्यक्ष, राष्ट्रवादी युवा कॉग्रेस, उल्हासनगर शहर जिल्हा यांच्याकडून दिनांक २८/८/२००६ रोजी तक्रार प्राप्त झाली होती. सदर प्रकरणी आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या टिप्पणीनुसार श्री. उमाळकर यांना प्रथम कारणे दाखवा नोटिस बजाविली होती. सदर नोटिसीबाबत त्यांनी दिलेला खुलासा समाधानकारक नसल्यामुळे त्यांना कार्यालयीन दिनांक १९ सप्टेंबर, २००६ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असुन, त्यांची विभागीय चौकशी करणेकामी प्रकरण चौकशी अधिकारी यांचेकडे दिनांक १५/२/२००७ रोजी पाठविण्यात आले आहे. तथापि, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे पोटकलम १ (ब) अन्वये त्यांचे निलंबन कायम करणेस मान्यता मिळणेसाठी मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४ <u>दिनांक:–२०/४/२००७</u>

सुचकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता श्री.मधुकर उमाळकर, स्वच्छता निरिक्षक यांना आयुक्तांनी बजावलेला निलंबन आदेश कायम करीत नाही.

**कारण——**

त्यांच्या निलंबनाच्या (दिनांक १९/९/२००६ च्या) तारखेपासून सहा महिन्याच्या मुदतीत त्यांचे निलंबन कायम करण्यांत आले नाही म्हणून ते निलंबन संपृष्टात आले आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

—————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र.** ४ :— श्री. डी.डी. पंजाबी, नाका लिपिक यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणे कामी स्थायी समितीचा दिनांक २६/३/२००७ रोजीचा ठराव क्र. ७९ कायम करणे.

—————————————————————————————————————————

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>हा विषय कोणी आणला आहे? आयुक्तांकडुन काही गोषवारा, टिप्पणी वगैरे काही नाही?

<u>महापालिका सचिव :—</u>स्थायी समितीमध्ये जो ठराव पारीत झाला आहे तो कायम करायचा आहे.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, स्थायी समितीमध्ये ५,१४,६१९/— एवढया रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे, बरोबर आहे ना? याच्या अगोदर कुठल्या आजारी कर्मचा—यास एवढी मोठी रक्कम देण्यात आली आहे काय?

<u>महापालिका सचिव :—</u>हे पहिले प्रकरण आहे.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—</u>हे पहिलेच प्रकरण आहे तर एखादया कर्मचा—यास किंवा अधिका—यास प्रतिपुर्ती करण्यासाठी कमीत कमी किती रक्कम देता येईल याबाबत काही तरतुद आहे काय? १ लाख, २ लाख, ५० हजार? किती देता येईल? हे जर आम्हांला येथे कळले तर बरं होईल ना?

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपंचदानी :—</u>शासन निर्णयामध्ये काय आहे?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—</u>पास करा तुम्ही पण चर्चा तर होवु दया ना? पास करायची कोणाला घाई झाली आहे?

सदस्य श्री. बी.बी. मोरे :–श्री. गायकवाड बोलतात ते बरोबर आहे. सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे. जास्तीत जास्त किती रक्कमेची त्यांना प्रतिपुर्ती करायची? नाहीतर फक्त पास पास म्हणायचे? एखादया कर्मचा–याला ६ लाख दयायचे, याबाबतीत चर्चा झाली पाहिजे व त्यानुसार जास्तीत जास्त त्याला किती रक्कम दिली पाहिजे. यावर जरा चर्चा झाली पाहिजे. मग योग्य तो निर्णय सभागृहात घेतला पाहिजे.

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):–शासन निर्णयाप्रमाणे त्यांनी जी यादी दिली आहे त्यामध्ये आजाराचे ४० हजारापर्यंतचे मंजूरीचे अधिकार आयुक्तांना आहे. विभागप्रमुख म्हणुन आयुक्तांना आहे. ही केस ५ लाख ७२ हजाराची आहे. यात त्यांना अॅक्युट एब्रामिनिअल पेन आणि इंडेस्ट्रेशियन ऑपरेशन पोटावर मोठी शस्त्रक्रिया झाली होती. आणि त्यांचा जीव वाचविण्याच्या दृष्टीने ही शस्त्रक्रिया खाजगी रुग्णालयात त्वरीत लीलावती रुग्णालयात करावी लागली होती. हा प्रस्ताव माझ्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर असल्यामुळे तो प्रस्ताव मी स्थायी समितीपुढे नेला होता आणि त्याप्रमाणे स्थायी समितीने ४० हजारापेक्षा रक्कम जादा असल्याने त्यास मंजुरीसाठी येथे ठराव दिलेला आहे. त्याअनुषंगाने हा ठराव आपणासमोर येथे आलेला आहे.

सदस्य श्री. लाल पंजाबी :–मा. महापौर, उप–महापौर, माझी अशी विनंती आहे की, जर दुसरा कुणी कर्मचारी येथे आजारी पडतो तेव्हा त्यां सर्वांबरोबर एक सारखा व्यवहार केला पाहिजे. एकला दिले दुस–याला दिले नाही, जर दुसरा कुणी व्यक्ती सुध्दा असा आजारी पडतो तेव्हा त्याचे सुध्दा..............

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–मा. आयुक्त साहेब, ५,१४,६१९/– एवढी रक्कम त्यांची जी आहे ती त्यांना देण्यात आली आहे की दयायची आहे?

सदस्य श्री. रविंद्र बागुल:–पैसे दिलेले आहेत काय? पैसे दिलेले आहे की बाकी आहे? जर दिले असेल तर दुसरा कुणी कर्मचारी असेल तर त्यास सुध्दा असेच दया. असे ५–५ लाख रुपये एका कर्मचा–यास दिले तर महानगरपालिकेत काहीच उरणार नाही साहेब? वर्षापासुन तो गैरहजर आहे. आहे कुठे तो माणुस?

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):–स्थायी समितीचा ठराव झालेला आहे. अजुन त्यास पैसे दिलेले नाही.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–४० हजार दया. ४० हजार आपण जे बोलले आहात ते आम्ही मान्य करतो. बाकी ५ लाख ७२ हजार जर तो उदया लिलावती रुग्णालयात जाईल, उदया म्हणेल मी कुठल्या दुस–या हॉस्पीटला जात आहे तर हे चुकीचे आहे? बॉम्बे मध्ये बरेच हॉस्पीटल आहे, सरकारी हॉस्पीटल किंवा इतर कुठल्या हॉस्पीटलमध्ये त्याने उपचार घेतले असते. ५ लाख ७२ हजार ही जी रक्कम आहे ती फारच मोठी रक्कम आहे. सगळयांसाठी तीच रक्कम नियमित ठेवली पाहिजे. जे गायकवाड साहेबांनी सांगितले त्यास मी सहमत आहे.

सदस्य श्री. गणपत एडके :– मा. महापौर महोदया, सचिव साहेब मला एक विचारायचे आहे जर शासकिय कर्मचा–यासाठी अशी काही तरतुद असेल तर आमचे निवडून आलेले जे लोकप्रतिनिधी आहेत तर त्यांच्यासाठी अशी काही तरतुद आहे काय? इतर महापालिकेत तरतुद आहे आपल्याकडे अशी काही तरतुद आहे काय?

महापालिका सचिव :– सर्व सदस्यांसाठी एक जरुरी सूचना आहे, जो कोणी सदस्य आपले विचार मांडु इच्छित असेल कृपया त्यांने उभे राहून मा. महापौरांच्या परवानगीने बोलावे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–माफ करा, लक्षात आले नाही.

महापालिका सचिव :–विषय पास? पास? ठिक आहे? सर्वसंमतीने?

सदस्य श्री. रविंद्र बागुल:– हे चुकीचे आहे, ५ लाख रुपये देणे हे चुकीचे आहे. यास आमचा विरोध आहे.

सदस्य श्री. गणपत एडके :–कृपया माझ्या प्रश्नाचे मला उत्तर दया. मा. आयुक्त साहेब, मला ऑपरेशन व औषधोपचारासाठी आज दोन लाख रुपये खर्च आहे. जर या कामी खर्चाची तरतुद असेल तर तातडीने मला ऑपरेशन करण्याची आवश्यकता आहे. मग माझ्यासाठी काही तरतुद केली जावु शकते का?

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–मा. महापौर व आयुक्त साहेब यांना हृदयाचा त्रास आहे त्यामुळे यांना जोरात बोलता येत नाही. तर यांच्यासाठी सुध्दा दोन–सव्वादोन लाखाची तरतुद करावी.

**आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—**शासन निर्णयामध्ये महानगरपालिका, शासकिय कर्मचारी यांच्यासाठी ही तरतुद आहे. आणि त्यामुळे या कर्मचा—याला ४० हजार आणि ४० हजारापेक्षा जास्त असल्यामुळे स्थायी समिती सभेपुढे हा प्रस्ताव आणलेला आहे. आपण नगरसेवकांची जी मागणी आहे त्याचा आणि या ठरावाचा काहीही संबंध नाही. आपली जी मागणी आहे ती आपण सभागृहापुढे मांडु शकता आणि पुढे त्याप्रमाणे सभागृह त्याचा निर्णय घेईल. शासन निर्णयामध्ये आपल्यासाठी अशी कुठलीही तरतुद नाही.

**सदस्य श्री. जनार्दन ढोके:—** आयुक्त साहेब, आता स्थायी समिती ठरावान्वये एका कर्मचा—यास ५ लाख ७२ हजार रुपये प्रतिपुर्ती करण्याची तरतुद केली आहे. आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेवर पाणी पुरवठयापोटी १०० पेक्षा जास्त कोटीचे कर्ज आहे. आणि आता जर आपण प्रत्येक कर्मचा—यास औषधोपचारासाठी ५—५ लाख रुपये दिले तर आपल्या महानगरपालिकेवर कर्जाचा डोंगर उभा राहिल. म्हणुन एवढी मोठी रक्कम या कर्मचा—यास मंजुर करण्यात येवु नये म्हणुन मी माझ्या पक्षाच्या वतीने नगरसेवक या नात्याने या प्रस्तावास विरोध करतो.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**मा. महापौरजी, मा. उप—महापौरजी, हा विषय आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यांत यावा.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—**मा. महापौरजी, हा विषय पुढच्या महासभेत ठेवण्यात यावा यासाठी आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यांत यावा.

**महापौर :—** सदरचा विषय सर्वानमुते आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यांत येत आहे.

---

**विषय क्र. ४:—** श्री. डी.डी. पंजाबी, नाका लिपिक यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणे कामी स्थायी समितीचा दिनांक २६/३/२००७ रोजीचा ठराव क्र. ७९ कायम करणे.

**प्रस्तावना**

श्री.दिलीप पंजाबी, लिपिक, जकात विभाग यांना दिनांक १४.१२.२००५ ते २७.१२.२००५ या कालावधित पोटाचा विकाराचा त्रास होत असल्यामुळे रत्नदिप हॉस्पीटल, उल्हासनगर—४ येथे दाखल केले होते. दिनांक २८.१२.२००५ रोजी अधिक त्रास होउ लागल्यामुळे दिनांक २८.१२.२००५ ते दि. २६.१.२००६ लिलावती हॉस्पीटल६, मुंबई येथील खाजगी रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून दाखल केले होते व तीव्र उदर वेदनामुळे (Acute abdominal pains/ intestinal obstruction) पोटावर शस्त्रक्रिया केली आहे. सदर आजार शासनाचे निर्णय क्र. एमएजी २००५/९/प्रक्र.१/आरोग्य—३, दिनांक १९ मार्च,२००५ मधील पर्शिष्ठ ''अ'' मधील विनिर्दिष्ट केलेल्या २७ आकस्मिक आजारा मधील अ.क्र. ७ वर नमुद केलेला आहे. तेसच जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचे कडिल पत्र क्र. सीएसटी मेडिकल/एमआरबील/०६, दिनांक २६.५.२००६ अन्वये शासन निर्णयातील वैद्यकीय परतावा मिळणेसाठी शिफारस केलेली आहे. शसनाचे दिनांक १९ मार्च,२००५ च्या निर्णयातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधीन राहुन रु. ४०,०००/— पर्यतच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबधीत विभागांच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहेत. तथापि, श्री. दिलीप पंजाबी यांचे वैद्यकिय शस्क्रियचा/उपचारासाठी रु. ५,७२,०००/— (रु. पाच लाख बहात्तर हजार मात्र ) इतका खर्च झाला असुन शासनाचे निर्णया नुसार परिगणना केली असता त्यांना रु. ५,१४,६७९/— (रु. पाच लाख चौदा हजार सहाशे एकोणऐंशी मात्र ) इतकी अनुज्ञेय आहे. सदर वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम शासनाचे दिनांक १९ मार्च,२००५ च्या शासन निणर्रयातील तरतुदीनुसार विहित केलेल्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त असल्याने श्री. डी.डी.पंजाबी, लिपीक यांचे वैद्यकिय प्रतिपूर्तीचे रु. ५,१४,६७९/— (रु. पाच लाख चौदा हजार सहाशे एकोण्ऐंशी मात्र) इतक्या रक्कमेच्या खर्चाचे देयक अदा करणेसाठी सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७९ **दिनांक:—२६/३/२००७**

सुचकाचे नाव :— श्री. देवेंद्रसिंह खेमाणी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती कोमल बठिजा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे श्री.डी.डी.पंजाबी, लिपिक, जकात विभाग यांना वैद्यकिय खर्चापोटी रु. ५१४,६७९/— एवढया रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देत आहे.

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर ठरावा अंतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र: ४ अ

दिनांक:—२०/४/२००७

सुचकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

अनुमोदकाचे नाव :—श्री. गणपत एडके

ही महासभा श्री. डी.डी. पंजाबी, नाका लिपिक यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्याकामी स्थायी समितीचा दिनांक २६/३/२००७ रोजीचा ठराव क्र. ७९, कायम करण्याचा प्रस्ताव सविस्तर माहितीच्या अभावी आजच्या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यात येत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५ :—अपंगांसाठी आरक्षित मजूर व विद्युत मदतनीस या पदावर निवड समितीच्या शिफारशी अनुसार पात्र उमेदवारांची नियुक्ती करणे.**

———————————————————————————————————————

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. महापौर, मा. उप—महापौर, ही जी अपंगांसाठी जागा आहे ती निवड समितीने शिफारस केलेले आहे. यांची जी प्रमाणपत्र वगैरे आहेत ती योग्यप्रकारे तपासली जावीत. याबाबतीत पुढे काही चुकीचे आढळुन आले तर त्यास महासभा जबाबदार राहणार नाही. त्यास निवड समितीच जबाबदार राहिल.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—मा. महापौर, मा. उपमहापौरजी, मा. आयुक्त साहेब, अपंग उमेदवारांच्या मुलाखती घेवुन जी काही भरती येथे झालेली आहे ती निवड समितीद्वारे झालेली आहे. त्यामध्ये कुठलाही भ्रष्टाचार किंवा कुठलाही अपहार होवु नये तसेच त्या भरतीवर नियंत्रण रहावे म्हणुन एक समिती स्थापन करण्यात

आलेली आहे. त्या समितीने या उमेदवारांच्या अपंगात्वाच्या दाखल्याची पुर्णपणे छाननी करुन ती प्रमाणपत्रे बरोबर हाताळली आहेत किंवा नाही त्याकडे लक्ष दिले पाहिजे. याबाबतची पुर्ण जबाबदारी त्या समितीची राहिल सभागृहाची राहणार नाही. एवढे मी याठिकाणी आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो.

<u>सदस्य श्री. राजू जग्यासी :–</u>मा. महापौरजी, या निवड समितीमध्ये कोणकोणते अधिकारी होते त्याचा जरा खुलासा करा. व काही दिवसापुर्वी काही कर्मचा–यांची भरती करण्यात आली होती. त्यावेळची जी निवड समिती होती त्यांनी काही चुका केल्या होत्या. त्यामुळे त्यांनी तत्कालीन आयुक्त श्री. आर.के. सोनवणे यांच्याकडे माफी मागीतली होती. म्हणुन मी हे जाणुन घेवु इच्छितो की या निवड समितीमध्ये काय तेच अधिकारी आहेत का? कोणते अधिकारी होते त्याचा जरा खुलासा करावा.

<u>आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):–</u>अपंगाच्या अनुशेषानुसार मुलाखती घेण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली होती. त्यात अतिरिक्त आयुक्त श्री. नाना रौराळे, उप–आयुक्त (मुख्यालय) श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त (आरोग्य) डॉ. दिपक सावंत, मुख्य लेखा परिक्षक श्री. सुधीर नाकाडी अशी समिती होती. आणि जी पुर्वी भरती झाली त्या भरतीसी या लोकांचा काहीही संबंध नव्हता. त्यांनी छाननी आणि पात्रता यांचा सखोल अभ्यास करुन या समितीने निर्णय घेतलेला आहे. आणि ही निवड जी आहे तिची सर्वस्वी जबाबदारी निवड समितीची राहिल.

<u>महापालिका सचिव:–</u>पास?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे. 

---

☑

**विषय क्र. ५:–** अपंगांसाठी आरक्षित मजूर व विद्युत मदतनीस या पदावर निवड समितीच्या शिफारशी अनुसार पात्र उमेदवारांची नियुक्ती करणे.

<u>प्रस्तावना</u>

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ ची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.७०/०२ व १२९/०३ च्या संदर्भात अपंगाांसाठी आरक्षित पदांचा रिक्त अनुशेष भरती करुन त्याचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

त्यानुसार महापालिका आस्थापनेवरील अपंगांच्या अनुशेषाचह ''वर्ग–क'' व ''वर्ग–ड'' मधील रिक्त अनुशेष भरणेबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे होता.

| अ.क्र. | पदनाम | एकुण भरावयाची संख्या | जातीचा प्रवर्ग | अपंगत्वाचा प्रकार व पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ लिपिक | ०३ | अनु.जाती–०१<br>अनु.जमाती–०२ | अंध अल्पदृष्टी (पीएस)–०१<br>अंध अल्पदृष्टी (पीएस)–०१<br>कर्णबधीर (पीडी)–०१ |
| २. | शिपाई | ०१ | अनु.जमाती–०१ | कर्णबधीर (पीडी)–०१ |
| ३. | मजूर | ०२ | अनु.जमाती–०१<br>अनु.जमाती–०१ | अंध अल्पदृष्टी (पीएस)–०१<br>कर्णबधीर (पीडी)–०१ |
| ४. | विद्युत मदतनीस | ०१ | खुला–०१ | कर्णबधीर (पीडी)–०१ |

उपरोक्त अनुशेषाची रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक ११/१०/२००६ रोजीच्या वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीद्वारे दिनांक २६/१०/२००६ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे अर्ज प्राप्त झाले होते. सदर प्राप्त अर्जांची महापालिका सेवा भरती नियम व अपंगांच्या

प्रवर्गानुसार छाननी समिती मार्फत छाननी/तपासणी करण्यात येवुन पात्र उमेदवारांना मुलाखतीस बोलाविण्यात आले होते.

| अ.क्र. | पदनाम | एकुण प्राप्त अर्ज | छाननीनुसाार पात्र ठरलेले उमेदवार | छाननीनुसार अपात्र ठरलेले उमेदवार |
|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ लिपिक | २९ | –– | २९ |
| २. | शिपाई | ३१ | –– | ३१ |
| ३. | मजूर | १२ | ०३ | ०९ |
| ४. | विद्युत मदतनीस | २५ | १७ | ०८ |

तसेच सदर अनुशेषानुसार सेवा योजन कार्यालय, ठाणे व एकात्मिक विकास आदिवासी प्रकल्प, शहापूर यांचेकडे दि. १५/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये महापालिका सेवाशर्ती व अपंगाच्या प्रवर्गानुसार उमेदवारांची यादी मागविण्यात आली होती. सदर मागणीनुसार लिपिक पदासाठी ०२ उमेदवार, शिपाई पदासाठी ०३ उमेदवार, मजुर पदासाठी ०६ उमेदवार, विद्युत मदतनीस पदासाठी ०५ उमेदवार अशा उमेदवारांची यादी प्राप्त झाली होती.

जाहिरातीद्वारे प्राप्त झालेल्या अर्जातील पात्र उमेदवार व उपरोक्त कार्यालयांतर्गत प्राप्त झालेले उमेदवार यांच्या मुलाखती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये गठित करण्यात आलेल्या समितीमार्फत दि. ११/१२/२००६ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर मुलाखतीमधुन निवडसमितीमार्फत गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची संवर्गनिहाय निवड करण्यात आली आहे. त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | संवर्ग | एकुण प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|
| | –– | अनु. जमाती (कर्णबधीर) (अंधअल्पदृष्टी) | कनिष्ठ लिपिक | पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाहीत |
| १ | स्वेता पोपटलाल गायकवाड | अनु. जाती | | गैरहजर |
| २ | ज्योती देवराम साळवे | (अंधअल्पदृष्टी) | | गैरहजर |

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | संवर्ग | एकुण प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. आदेश भागिरथ ठाणेकर | अनु. जमाती (कर्णबधीर) | शिपाई | गैरहजर |
| २ | श्री. राजेंद्र एस. सोनावणे | | | गैरहजर |
| ३ | उषा भागोजी ठोकळ | | | गैरहजर |

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | संवर्ग | एकुण प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. नितीन चंदन ठाकुर | अनु. जमाती (अंध) | मजूर | ११३ |
| २ | श्री. रामदास नामदेव गवारी | | | १३५ |
| ३ | आरुन कासग तडवी | | | गैरहजर |

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | संवर्ग | एकुण प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. आदेश भागिरथ ठाणेकर | अनु. जमाती (कर्णबधीर) | मजूर | गैरहजर |
| २ | श्री. राजेंद्र एस. सोनावणे | | | गैरहजर |
| ३ | उषा भागोजी ठोकळ | | | गैरहजर |

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | संवर्ग | एकुण प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. विजय बळवंत पवार | खुला (कर्णबधीर) | विद्युत मदतनीस | ९४ |
| २. | श्री. राजेश गुलाब काटकर | | | १०२ |
| ३. | श्री. प्रमोद दत्तात्रय कदम | | | गैरहजर |
| ४. | श्री. हरिश्चंद्र सुरेश विशे | | | ९५ |
| ५. | श्रीम. नयना अरविंद निगम | | | ९९ |
| ६. | श्री. जाकिर हुसेन मेहबुब मुलानी | | | गैरहजर |
| ७. | श्री. विनोद बबन ठाकरे | | | गैरहजर |
| ८. | कु.शकुंतला बापू सोनवणे | | | ९५ |
| ९. | श्री. सचिन रमेश गायकवाड | | | १०० |
| १०. | श्री. अमोल अभिनव पाटील | | | ९९ |
| ११. | श्री. संजीव वसंत यादव | | | ९१ |
| १२. | श्री. प्रकाश लखमीचंद ज्ञानचंदानी | | | ९६ |
| १३. | कु. किरण बाबु शिंदे | | | ९४ |
| १४. | श्री. सुनिल राजनारायण सिंग | | | ८८ |
| १५. | श्री. जितेंद्र अनारसी सिंह | | | ८९ |
| १६. | श्री. सागर यशवंत काठोळे | | | ९८ |
| १७. | श्री. सुनिल वसंतराव देशमुख | | | १०४ |
| १८. | श्री. संजय आत्मराम पेडणेकर | | | गैरहजर |
| १९. | श्री. संजय आर. भारीया | | | गैरहजर |
| २०. | श्री. विक्रांत विजय दलाल | | | ८८ |
| २१. | श्री. दिनेश प्रभाकर ढाणके | | | ९१ |
| २२. | श्री. संतोष सुरेंद्र यादव | | | गैरहजर |

## अंतिम निवड यादी

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | आरक्षण | निवड झालेल्या उमेदवारांचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपिक | ०२<br><br>०१ | अनु. जमाती (कर्णबधीर) (अंधअल्पदृष्टी)<br>अनु. जाती (अंध) | पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाहीत.<br>गैरहजर |
| २ | शिपाई | ०१ | अनु. जमाती (कर्णबधीर) | गैरहजर |
| ३ | मजूर | ०२ | अनु. जमाती (कर्णबधीर)<br>अनु. जमाती (अंध) | गैरहजर<br>श्री. रामदास नामदेव गवारी |
| ४ | विद्युत मदतनीस | ०१ | खुला (कर्णबधीर) | श्री. सुनिल वसंतराव देशमुख |

महासभा ठराव क्र: ५   दिनांक:—२०/४/२००७

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावास अनुसरुन निवड समितीच्या शिफारशी प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील अपंगांच्या अनुशेषाची मजुर व विद्युत मदतनीस या रिक्त पदांवर अनुक्रमे श्री. रामदास नामदेव गवारी व श्री. सुनिल वसंतराव देशमुख यांची नियुक्ती करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६ :—** श्री. प्रकाश संपतराव सोनवणे, फायरमन, श्री. सुधाकर क्षिरसागर, शिपाई, श्री. मनोहर राजांगळे, मुकादम यांना निवड समितीच्या शिफारसी अनुसार वाहनचालक या पदावर पदोन्नती देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. ६:—** श्री. प्रकाश संपतराव सोनवणे, फायरमन, श्री. सुधाकर क्षिरसागर, शिपाई, श्री. मनोहर राजांगळे, मुकादम यांना निवड समितीच्या शिफारसी अनुसार वाहनचालक या पदावर पदोन्नती देणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. महासभा ठराव क्र. ४९, दिनांक ५/९/२००५ अन्वये ''वाहनचालक'' या संवर्गातील खुल्या प्रवर्गातील ०३ रिक्त पदावर पुढील पात्र कर्मचा—यांच्या निवडीचा प्रस्ताव मान्य करण्यात आला होता.

| अ.क्र. | खुला प्रवर्गातील रिक्त पदांची संख्या | सुधारीत सेवाजेष्ठता यादीतील अनु.क्रमांक | अर्हता प्राप्त कर्मचा—यांचे नाव | नियुक्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०३ | ०१ | श्री. प्रकाश संपतराव सोनवणे | १९/४/१९८२ |
| | | ०३ | श्री. सुधाकर क्षिरसागर | ०४/१०/१९९९६ |
| | | ०४ | श्री. मनोहर जी. राजांगळे | १९/१०/१९९६ |
| | | ०५ | श्री. शरद जी. पाटील | ०२/११/१९९६ |

निवड समितीपुढे सदर प्रस्ताव ठेवण्यापुर्वी प्रथम वर्ग—४ संवर्गातील '' वाहनचालक'' पदासाठी सेवाशर्ती नियमावलीनुसार अर्हता धारण करणा—या कर्मचा—यांचे अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जाची यादी तयार केली होती. सदर यादी निवडसमितीपुढे ठेवण्यात आली होती. तथापी, सदर निवड समितीपुढे ठेवण्यात आलेल्या अर्जदारांच्या यादीमध्ये श्री. शरद पाटील, मजूर यांची

नियुक्तीचा दिनांक ०२/११/१९९६ व श्री. सुधाकर क्षिरसागर, शिपाई यांच्या नियुक्तीचा दिनांक ०४/१०/१९९६ असा नमुद केला होता. तथापि, अर्जदारांच्या यादीमध्ये, श्री. सुधाकर क्षिरसागर यांचे नांव श्री. शरद पाटील यांच्यानंतर नजरचुकीने लिहिले गेले होते. तथापी, ही बाब निदर्शनास आल्यावर पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत. त्यानंतर ही बाब निवड समितीच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर सुधारीत निवड यादी तयार करुन निवडसमितीपुढे पुढीलप्रमाणे फेरप्रस्ताव सादर केला होता.

सद्यस्थितीत ''वाहनचालक'' या संवर्गाची पदोन्नतीने भरावयाची ०५ पदे रिक्त असून त्यांचा अनुशेष खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अनुसूचित जमाती | —०१ |
| वि.जा. (अ) | —०१ |
| भ.ज. (क) | —०१ |
| खुला | —०३ |

महापालिका सेवाशर्तीनियमावलीनुसार सदर पदावर पवदोन्नती देण्यासाठी शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे. १) जड वाहन परवाना धारक

''वाहनचालक'' या पदाची वेतनश्रेणी रूपये ३०५०—७५—३९५०——८०—४५९० अशी असून उपरोक्त अनुशेषा पैकी खुल्या प्रवर्गातील ०३ रिक्त पदावर शिफारस केलेल्या पुढील ०३ कर्मचा—यांची पुढीलप्रमाणे सुधारित निवड समितीपुढे ठेवण्यात आली होती.

| अ.क्र. | खुला प्रवर्गातील रिक्त पदांची संख्या | सुधारित निवड यादीतील अनु. क्रमांक | कर्मचा—यांचे नांव | नियुक्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०३ | ०१ | श्री. प्रकाश संपतराव सोनवणे | १९/४/१९८२ |
| | | ०३ | श्री. सुधाकर क्षिरसागर | ०४/१०/१९९६ |
| | | ०४ | श्री. मनोहर जी. राजांगळे | १९/१०/१९९६ |
| | | ०५ | श्री. शरद जी. पाटील | ०२/११/१९९६ |

उपरोक्त ०४ कर्मचा—यांपौकी उपलब्ध खुल्या प्रवर्गाचे ०३ रिक्त पदावर उक्त सुधारित निवड यादीतील अनुक्रमांक ०१, ०३ व ०४ वरील सेवाजेष्ठ व वाहनचालक या पदोन्नत्तीने भरावयाच्या पदासाठी अर्हता धारण करणा—या पात्र कर्मचा—यांना वाहनचालक या पदावर पदोन्नती देण्याची निवड समितीने शिफारस केली आहे. व अनुक्रमांक ०५ वरील श्री. शदर जी. पाटील, मजूर यांचे सोबत जेष्ठतेनुसार व सेवाशर्ती नियमावलीनुसार जड वाहन परवाना ही अर्हता धारण करणारे श्री. राजेंद्र विठ्ठल माळी, मजूर व विलास गणपत कवडे, शिपाई हे असून भविष्यात पदोन्नतीची रिक्त पदे भरतान त्यांचा जेष्ठतेनुसार विचार करण्याव यावा.

तरी उपरोक्त अ.क्र. १) श्री. प्रकाश संपतराव सोनवणे, फायरमन, ३) श्री. सुधाकर क्षिरसागर, शिपाई, ४) श्री. मनोहर जी. राजांगळे, मुकादम यांना निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे ''वाहनचालक'' या पदावर पदोन्नती देण्याचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ६ दिनांक:—२०/४/२००७

सुचकाचे नाव :— श्रीमती मिना सोनेजी (सोंडे)

अनुमोदकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावास अनुसरुन निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे १) श्री. प्रकाश संपतराव सोनवणे, फायरमन, २) श्री. सुधाकर क्षिरसागर, शिपाई, ३) श्री. मनोहर जी. राजांगळे, मुकादम यांना वाहन चालक या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ७ :— श्री. राजेश अमृता घनघाव, मजूर, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाच्या तरतुदी अन्वये खटला भरण्यास परवानगी देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र.** ७:— श्री. राजेश अमृता घनघाव, मजूर, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाच्या तरतुदी अन्वये खटला भरण्यास परवानगी देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. राजेश अमृता घनघाव, मजुर, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका या पदावर कार्यरत असुन त्यांनली तक्रारदार श्रीमती जया द्वारकादास मुलचंदानी, मुख्याध्यापिका, स्वामी विवेकानंद हायस्कुल ओ.टी. सेक्शन, उल्हासनगर—१ यांना सदरची शाळा झोपडपट्टी क्षेत्रात असल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी दिनांक ९/१/२००६ रोजी सदरच्या शाळेमध्ये तक्रारदार यांचेकडे प्रथम ४५००/— रुपये लाचेची मागणी केली. दिनांक १०/१/२००६ रोजी पुन्हा एकदा आरोपी श्री. राजेश घनघाव यांनी फोनवरुन तक्रारदार यांचेकडे ४५००/— रुपयांची लाचेची मागणी करुन ती दिनांक १२/१/२००६ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर दुपारी साडेचार वाजण्याचे दरम्यान आणुन देण्यास सांगितले.

त्या अनुषंगाने लाचेचा सापळा आयोजित केला असता आरोपी नं. १ श्री. राजेश अमृता घनघाव यांनी दिनांक १२/१/२००६ रोजी १६.४० वाजता पंच साक्षीदारांसमक्ष तक्रारदार श्रीमती मुलचंदानी यांचेकडे रुपये ४५००/— लाचेची मागणी करुन आरोपीत क्रमांक २ श्री. रविंद्र रामचंद्र पवार खाजगी इसम यांचेकरवी स्विकार केला. म्हणुन आरोपीत नं. १ ची श्री. घनघाव यांनी त्यांना सरकारी नोकर म्हणुन मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन ४५००/— रुपये लाचेचा स्विकार आरोपीत नं. २ श्री. पवार यांचेकरवी करुन एकमेकांचा आर्थिक फायदा करुन घेतला आहे. त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे येथिल अधिकारी यांनी सेंट्रल पोलिस स्टेशन, उल्हासनगर—३ यांजकडे गुन्हा रजि. नंबर II —५/२००६ ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७,१२,१३ (१)(ड) सह १३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे.

भारतीय राज्य घटनेच्या कलम ३११ नुसार लोकसेवकास नोकरीवरुन कमी करण्याचे त्यांना पुन्हा नेमणुक करण्याचे अधिकार असलेल्या सक्षम अधिकारी यांच्या परवानगीची आवश्यकता आहे. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९ (१) (क) अन्वये न्यायालयात खटला दाखल करणेस नियुक्ती प्राधिका–याची मंजुरी आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मा. पोलिस उपायुक्त /पोलिस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सीआर/८/ठाणे/२००६/४९७८, दिनांक १६/११/२००६ अन्वये श्री. राजेश अमृता घनघाव हे महानगरपालिकेचे कर्मचारी असुन लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९ (१) नुसार संबंधितांविरुध्द खटला दाखल करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ती प्राधिकारी या नात्याने सक्षम आहे. म्हणुन संबंधितांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९ (१) अन्वये खटला दाखल करणेची मंजुरी मिळणेसाठी सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित आहे.

**महासभा ठराव क्र:** ७ **दिनांक:–२०/४/२००७**

सुचकाचे नाव :– श्री. दिलीप गायकवाड

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती मालती करोतिया

ही महासभा गुन्हा रजि. नंबर **प** –५/२००६ ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७,१२,१३ (१)(ड) सह १३ (२) प्रमाणे दाखल केलेल्या गुन्हयासंबंधीची कागदपत्रे आयुक्तांनी तपासल्यानंतर व पुरावा पाहून या महासभेची प्रथमदर्शनी खात्री झाल्यानंतर श्री. राजेश अमृता घनघाव, मजूर, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका या कर्मचा–याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९ (१) अनुसार न्यायालयात खटला दाखल करण्यास मंजूरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

----------------------------------------------------------------------

⇨ **विषय क्र. ८ :–** दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वर्ष २००६–०७ करिता ४५ कामांच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

----------------------------------------------------------------------

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–**मा. महापौरजी, अनु. क्र. ८ वर येथे विषय वेगळा आला आहे. श्री. डी.डी. पंजाबी यांचा विषय आला आहे.

**महापालिका सचिव :–**श्री. डी.डी. पंजाबी यांचा विषय अनु. क्र. ९ वर आहे.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–**येथे ८ लिहिले आहे.

**महापालिका सचिव :–**गोषवा–यावर अनु.क्र. ८ आहे परंतु सभा सूचनेवर विषय क्र. ९ आहे. एक विषय सभा सूचनेवरुन ऐन वेळी वगळण्यात आल्याने व त्यानंतर विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे पुन्हा गोषवा–याच्या छायांकित प्रती काढता आल्या नाहीत म्हणुन......

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–**मुद्रण दोष असेल, जावु दया.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**मा. आयुक्त साहेब, दलित वस्ती मधील कामाचे हे जे प्राकलन आले आहे तर दलित वस्तीमधील ही जी कामे केली जातात ती ज्या ठिकाणी दलितांची वस्तीची लोकसंख्या ५० टक्के व त्यापेक्षा जास्त असते. आम्हांला शहरात काम करण्यासाठी जे बाहेरुन पैसे मिळतात, त्यात आपल्या महापालिकेचा काहीही खर्च होत नाही. तरी पुर्ण वर्ष २००६–२००७ साठी जो दलित वस्तीसाठी आमच्याकडे फंड आला होता त्याचा उपयोग केला गेला नाही. तो फंड परत गेला. आज ३१ मार्च २००७ नंतर २० एप्रिल २००७ ला हा विषय महासभेत आणला गेला आहे. तर आमचा जो फंड समाप्त झाला आहे हा विषय पास केल्यानंतर त्याचा फायदा आम्हांला मिळेल?

**सदस्य श्री. लाल पंजाबी :–**श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जो विषय केला आहे त्या संदर्भात मी एक बोलु इच्छितो. आम्हांला जो गोषवारा मिळाला आहे त्यात असे लिहिले आहे की ३१ मार्च पुर्वी हा ठराव पास करावयास पाहिजे होता. तर ३१ मार्च पुर्वी हा विषय का आणला गेला नाही? यात कोणाची चुक होती? प्रशासनाची चुक होती की शासनाची चुक होती? ते जरा सांगावे. जर आम्हांला पैसे मिळत नाही तर अडीच करोडपण आम्हांला मिळणार नाही. तर त्यासाठी जबाबदार कोण राहिल? आम्ही त्या यादीच्या बाबत चिंतीत आहोत. जर आमचे हे पैसे हा फंड जातो तर कुणाच्या चुकीमुळे जातो? तो व्यक्ती दोषी आहे. व त्याने या शहराशी धोका केला आहे. तर त्याचा सुध्दा खुलासा येथे करावा.

**आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):–**हा जो प्रस्ताव आहे तो ३१ मार्च, २००७ पुर्वी मंजुर होणे आवश्यक होते. आम्ही तत्कालीन महापौर यांच्याकडे हा प्रस्ताव पाठविला होता तसेच दोन वेळा आम्ही त्यांना आठवण सुध्दा करुन दिली होती. तो प्रस्ताव न आल्यामुळे आता हा प्रस्ताव पारीत करुन आम्ही शासनास प्रस्ताव पाठवु. यावर्षीचा निधी मिळण्यासाठी आम्ही शासनाकडे पाठपुरावा करु. मुळ स्वरुपाचे मंजुरी जर मिळाली नाही तर या योजनेमधुन पैसे येणार नाहीत. आमच्या प्रशासनाकडुन हा प्रस्ताव वेळेवर पाठविण्यांत आला होता. तो सभासूचनेवर घेणे किंवा न घेणे हा अधिकार तत्कालीन महापौरांचा होता. आणि त्याबाबतीत मी काही भाष्य करु शकत नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–** मा. आयुक्त साहेब, आपल्या सांगण्यानुसार या शहराच्या महापौर श्रीमती ज्योती कालानी यांच्यामुळे दलित वस्तीचा अडीच कोटीचा निधी व्यपगत झाला. मी आपणांस विनंती करतो की, हे जे प्राकलन आहे, ते जर आम्ही आज मंजुर केले तरी त्याचा काही फायदा होणार नाही. कारण की गोषवा–यामध्ये आपण जे लिहिले आहे त्यानुसार ३१ मार्च पुर्वी झाले पाहिजे होते आज २० एप्रिल आहे. यासाठी मी आपणांस निवेदन करतो की, जे नगरसेवक नव्याने निवडून आले आहेत त्यांच्या प्रभागात कामे करण्यासाठी दलित वस्तीचे प्राकलन पुन्हा तयार केली पाहिजेत. जसे २००७–२००८ चा निधी व्यपगत न होवो म्हणुन लवकरात लवकर नविन प्राकलने तयार करुन ती पुन्हा तपासुन घेण्यात यावीत. कारण की यातील बरीचशी कामे नगरसेवक निधीतुन किंवा महापालिका निधितुन प्राकलने मंजुर केली असतील व होवु शकते काम सुध्दा झाले असेल. म्हणुन दलित वस्तीतील ही जी प्राकलने आहेत त्यास मंजुरी न देता सुधारीत प्राकलने तयार करण्यात यावीत. जेथे दलित लोकांची लोकसंख्या ५० टक्यापेक्षा जास्त आहे तेथिल कामांची नविन प्राकलने तयार करुन आणावीत व मंजुर करुन पाठवावीत.

**आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):–**ही जी प्राकलने तयार करण्यात आली आहेत आपल्यासाठी जरी २००६–२००७ असेल तरी शासनाकडे २००७–२००८ पाठवायची होती. यासाठी आपल्या महानगरपालिकेची मंजुरी आवश्यक आहे. व आता आपण नविन प्राकलने तयार केली तर त्यामध्ये आणखी वेळ जाईल व अर्थसंकल्पात रक्कमा समायोजित करण्याअगोदर जर आपण आपला प्रस्ताव पाठविला तर व पुढील वर्षासाठी जी प्राकलने तयार करावयाची आहे ती तर आम्ही तयार करुच. या प्राकलनास जर आपली मंजुरी मिळाली तर शासनाकडे कमीत कमी प्रस्ताव पाठविता येईल व प्रयत्न केले जातील की त्यांच्या अर्थसंकल्पात रक्कमा समायोजित करतांना आपणांस हे पैसे मिळोत. आता आपल्या खात्यात, उल्हासनगर महानगरपालिकेसाठी पैश्याची काहीही तरतुद केलेली नाही.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—कित्येक ठिकाणी प्रभाग रचनेमध्ये बदल झाला आहे.

आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—आता जी नविन प्राकलने तयार केली जातील ती पुढील वर्षाची समजली जातील.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—मा. महापौरजी, आता दलित वस्तीचा हा जो मुद्दा येथे उपस्थित झाला आहे मला तर असे वाटते की, उशिर जरी झाला असेल तरी आज जर या प्रस्तावास मंजुरी दिली नाही तर हा निधी पुन्हा व्यपगत होईल. व दुसरी प्राकलने तयार करण्यामध्ये वेळ जाईल. आयुक्त साहेब जे बोलत आहेत ते बरोबर आहे. आता दलित वस्तीची जी काही ४५ प्राकलने आली आहेत त्यांना मंजूरी दिली जावी यासाठी मी सभागृहाला विनंती करतो की, दलित वस्तीमध्ये अधिकाधिक कामे झाली पाहिजेत.व ही प्राकलने मंजुर केली जावीत अशी माझी विनंती आहे.

सदस्य श्री. जनार्दन ढोके:—मा. आयुक्तजी, दलित वस्तीतील प्राकलनांना मंजुरी देण्याचा जो विषय येथे चर्चीला जात आहे त्याबाबत आमच्या बी.बी. मोरे साहेबांनी जो प्रस्ताव दिला आहे, त्यास मी समर्थन देतो. दलित वस्तीमध्ये विकास कामे झाली नाहीत, म्हणुन या प्राकलनांना ताबडतोब मंजुरी देण्यात यावी. श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या वस्तीमध्ये ५० टक्यापेक्षा जास्त दलित वस्तीचे लोक राहतात त्या वस्तीतच ही कामे करण्यात यावीत. यासाठी सम्राट अशोक नगर, हनुमान टेकडी, भैय्यासाहेब आंबेडकर नगर, रमाबाई टेकडी या ठिकाणी ६० ते ७० टक्के दलित व बहुजन समाजाचे लोक राहतात. मी असे निदर्शनास आणुन देतो की, वर उल्लेख केलेल्या ठिकाणी कोणतीही विकास कामे झालेली नाहीत. सार्वजनिक शौचालयाची कामे झाली नाहीत, सीसी पॅसेजची कामे झाली नाहीत. म्हणुन मा. महापौरांना व सभागृहाला माझी विनंती आहे की, दलित वस्तीच्या कामाचा जो निधी आलेला आहे त्या कामाला मंजुरी दिली जावी. पुढल्या वर्षी जो निधी येईल प्रत्येक विभागाला निधी वाटप करुन देण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—मा. महापौरजी, दलित वस्तीची जी प्राकलने आहेत याबाबतीत नव्याने सर्व्हे करुन नविन प्राकलने तयार करण्यात यावीत. अशी आम्ही तुम्हांला विनंती करते. तसेच दलित वस्तीतील कामांची जेव्हा प्राकलने तयार कराल त्यावेळेस सर्व दलित नेत्यांना तसेच दलित वस्तीतील जे नगरसेवक असतील ज्यांना आपल्या प्रभागामध्ये या निधीतुन कामांची आवश्यकता आहे त्यांना विश्वासात घेवुनच प्राकलने तयार करण्यात यावीत.

सदस्य श्री. गणपत एडके :—मा. महापौरजी, सचिव साहेब, आयुक्त साहेब, आता दलित वस्तीच्या कामांची जी प्राकलने तयार करण्यात आली आहेत त्यांना कोणत्या कारणांमुळे उशिर झाला आहे? कारण की माझ्या प्रभागामध्ये रमाबाई आंबेडकर नगर, भैय्यासाहेब आंबेडकर नगर आणि दुर्गा माता नगर याठिकाणी आजपर्यंत कोणतेही काम झालेले नाही. नाल्या तयार केलेल्या नाहीत. आणि या दलित वस्तीच्या कामांमध्ये माझ्या प्रभागातील बरीचशी कामे आलेली आहेत. परंतु सध्या उल्हासनगरमध्येच काय संपुर्ण ठाणे जिल्हयाचा विचार केला तर माझ्या प्रभागात तर काहीही कामे झालेली नाहीत त्यासाठी पहाणी करण्यासाठी तुम्ही कधीही वेळ दया. पहाणी करुन तुम्हीच ठरवा की हे काम करायचे आहे अथवा नाही करायचे? माझ्या प्रभागात जवळ जवळ ८० ते ९० टक्के दलित वस्ती आहे.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :— मा. महापौरजी, श्री. एडके हे सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक होते. आणि त्यावेळेस त्यांनी प्रभागातील कामे करुन घ्यावयास पाहिजे होती. परंतु त्यावेळेस त्यांच्या कामांकडे दुर्लक्ष झाले आणि आता ते पुन्हा निवडून आले आहेत. दलित वस्तीमधील कामे त्वरीत मंजुर करावीत. आणि त्या त्या वस्तीत कामे करावीत. कारण दलित वस्तीचा निधी हा काही कालांतराने येत असतो.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, जसे श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. लाल पंजाबी, श्री. बी.बी. मोरे यांनी सांगितले तर ही जी प्राकलने आहेत ती २००६—२००७ या वर्षाची आहेत. आपण एक महिन्याच्या आत ती शासनाकडे पाठविली तर या प्राकलनांनुसार त्यांनी जर मागील वर्षाचा निधी उपलब्ध करुन दिला तर योग्य होईल.आणि जर देत नसतील तर आपण श्री. चंद्रकांत हंडोरे यांना विनंती करु की, आमचा मागील वर्षाचा जो दलित वस्तीचा निधी व्यपगत झाला आहे त्यामुळे या वर्षाचा निधी आम्हांला दुप्पट करुन दिला जावा यासाठी नविन प्राकलने तयार करुन त्या हिशोबाने कामे करु.

**<u>सदस्य श्री. जनार्दन ढोके :–</u>**दलित वस्तीचा जो निधी आलेला आहे याबाबतीत बरेचसे सदस्य सभागृहात चर्चा करतात. तर आलेला हा निधी किंवा मंजूर होणारा हा निधी यातुन करावयाच्या कामांना विलंब न लावता ती त्वरीत करण्यात यावीत. यासाठी या प्राकलनांना मंजुरी देण्यात यावी व पुढल्या वर्षी येणारा जो दुसरा निधी आहे त्यांना मंजुरी देण्यात यावी अशी यासाठी मी महापौरांना व उपमहापौरांना व आयुक्त साहेबांना विनंती करतो.

**<u>महापालिका सचिव :–</u>**श्री. जमनादास पुरस्वानी व श्री. लाल पंजाबी यांच्याकडुन या विषयाबाबत प्रस्ताव आलेला आहे त्याचा प्रस्तावित ठराव याप्रकारचा आहे. ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत २००६–२००७ करीता ४५ कामांच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत नाही.

**कारण––**

१) सदर आर्थिक वर्ष २००६–२००७ संपण्यापूर्वी महासभेच्या मान्यतेनंतर मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते आर्थिक वर्ष संपल्यानंतर आता शासनाकडून निधी उपलब्ध होवू शकणार नाही.

२) सदर प्रस्तावास महासभेची मान्यता आर्थिक वर्ष २००६–२००७ संपण्यापूर्वी का घेण्यात आली नाही? व त्यास जबाबदार कोण? याबाबत आयुक्तांकडून सविस्तर अहवालाची ही महापालिका मागणी करीत आहे.

३) सदर योजने अंतर्गत सन २००७–२००८ चा प्रस्ताव शक्य तितक्या लवकरात लवकर पाठविण्याकामी प्रशासनास निर्देश देत आहे.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>महापौर :–</u>** सदरचा विषय सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ८:–** दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वर्ष २००६–०७ करिता ४५ कामांच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्रमांक विधयो–१०२००/१५९२/प्र.क्र. १८९/नवि–४, दिनांक ५/३/२००२ नुसार निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अनुसुचित जातीच्या प्रभागामध्ये व ज्या वस्तीमध्ये अनुसुचीत जातीची लोकसंख्या ५० टक्के पेक्षा जास्त आहे अशा वस्त्यामध्ये मुलभुत सोयीसुविधांची कामे जिल्हाधिकारी यांची मान्यता घेवुन त्यांचेकडे उपलब्ध करुन देण्यात येणा–या निधिमधुन करणे आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याने सोबत जोडलेल्या यादीनुसार अनुसूचित जातीचे प्रभागामधील तसेच महापालिकेच्या उपलब्ध असलेल्या दलित वस्त्यांचे यादीतील काही वस्त्यांमध्ये लोकपयोगी व स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून काम प्रस्तावित करण्यात येत आहे.

उक्त शासन निर्णयानुसार सदर प्रस्तावांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगररचनाकार यांची शिफारस घेवून महासभेची मान्यता घेणे आहे. मा. जिल्हाधिकारी यांच्या उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार प्रस्ताव तयार करण्यात आले असून सदर प्रस्ताव आर्थिक वर्ष २००६–२००७ संपण्यापूर्वी महासभेच्या मान्यतेनंतर मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत मार्च अखेरपूर्वी महासभेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे असल्याने या विषयाकरीता तातडीची महासभा बोलावून या सभेमध्ये रुपये २४८३२१९७/– खर्चाच्या ४५ कामांना मान्यता मिळणे करीता प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ८ <u>दिनांक:–२०/४/२००७</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत २००६—२००७ करीता ४५ कामांच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत नाही.

**कारण——**

१) सदर आर्थिक वर्ष २००६—२००७ संपण्यापूर्वी महासभेच्या मान्यतेनंतर मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते आर्थिक वर्ष संपल्यानंतर आता शासनाकडून निधी उपलब्ध होवू शकणार नाही.

२) सदर प्रस्तावास महासभेची मान्यता आर्थिक वर्ष २००६—२००७ संपण्यापूर्वी का घेण्यात आली नाही? व त्यास जबाबदार कोण? याबाबत आयुक्तांकडून सविस्तर अहवालाची ही महापालिका मागणी करीत आहे.

३) सदर योजने अंतर्गत सन २००७—२००८ चा प्रस्ताव शक्य तितक्या लवकरात लवकर पाठविण्याकामी प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** श्री. डी.डी. पंजाबी, नाका लिपिक, जकात विभाग यांना दिनांक १ डिसेंबर, २००६ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २००७ या एक वर्षाच्या कालावधीची प्रशासनातर्फे मंजुर करण्यात आलेल्या वाढीव विशेष असाधारण रजेस कार्योत्तर मंजुरी देणे.

---

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>मा. महापौर, उप—महापौर, श्री. डी.डी. पंजाबी यांनी या अगोदर दोन वेळा एक—एक वर्षाची रजा घेतली आहे. आणि आता तिस—यांदा रजा घेत आहे. तिस—यांदा रजा देवु शकतात का? असा काही शासन निर्णय असेल तर त्याची प्रत सर्वांना दिली जावी.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, सचिव आणि आयुक्त साहेब, श्री. डी.डी. पंजाबी, नाका लिपिक हे तेच आहेत काय ज्यांना ५ लाखाची वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करायची आहे?

<u>महापालिका सचिवः—</u>तेच—तेच......

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—</u>हे एक—एक वर्ष रजेवर जातात त्यास कारण काय? आणि याची चौकशी करा हे नक्की कोठे आहेत? दवाखान्यात आहेत की घरी बिछान्यावर आहेत? की कुठे फिरत आहेत? किंवा इतर कुठल्या कंपनीत नोकरी करत आहेत काय? की कुठे एखादया नामांकित कंपनीत कामावर आहेत किंवा जकात नाक्यावर वगैरे. याची चौकशी करण्यात यावी. हे काय चालले आहे? सावळा गोंधळ? वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी ५—५ लाख रुपये दयायचे व १—१ वर्ष रजा दयायची? त्यांच्या जागेवर दुस—या कुणाची नेमणुक करा ना? तो महापालिकेत काम करेल. आयुक्त साहेब ख—या अर्थाने याचे उत्तर मिळायला पाहिजे. ही व्यक्ती वादग्रस्त होत चालली आहे. त्यांच्या बाबतीत जास्त संशय यायला लागला आहे.५ लाख तर ते बाजुलाच राहिले परंतु १—१ वर्षाची रजा हे काय चालले आहे? अगोदर दोन वर्ष व त्यानंतर पुन्हा एक वर्ष रजा देत आहात.

**<u>सदस्या श्रीमती सुमन शेळके:—</u>**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, श्री.डी.डी. पंजाबी हे बाहेर काम करत आहेत त्यांची तुम्ही चौकशी करा. आणि त्यानंतरच त्यांना रजा मंजुर करा. श्री. दिलीप गायकवाड साहेब बोलले ते बरोबर आहे.

**<u>आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—</u>**महाराष्ट्र शासन वित्त विभाग ७ ऑक्टोंबर, २००२ चा जो शासन निर्णय आहे त्यामधील तरतुदीनुसार अशी असाधारण रजा ५ वर्षापर्यंत देता येते. त्याच अनुषंगाने त्यांना रजा देण्यात आलेली आहे. आता ही रजा मंजुर केलेली आहे. या पुढे रजा मंजुर करण्यापुर्वी सभागृहाने जे मतप्रदर्शन केले आहे किंवा आपली शंका व्यक्त केली आहे त्याची तपासणी आणि छाननी केली जाईल.

**<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>**मा. महापौरजी, आता आयुक्त साहेबांनी सांगितले की शासन निर्णय आहे हे मान्य आहे. कारण की आता येथे जे काही नगरसेवक आहेत त्यातील काही शासकिय सेवेत होते. नोकरी जर सोडायची असेल किंवा तसे काही कारण असेल तर वैद्यकीय रजा घ्यायची अशा काही गोष्टी असतात. त्यानुसार आतापर्यंत जी रजा त्यांना मंजुर झाली असेल परंतु यापुढे मंजुरी देतांना तो प्रस्ताव सभागृहापुढे आला पाहिजे. सभागृह त्यावर विचार करेल. आणि त्यानंतरच त्याची रजा मंजुर करावी.

**<u>आयुक्त (श्री. सदाशिव कांबळे):—</u>**सभागृहाच्या भावनांशी मी सहमत आहे. आतापर्यंत जेवढी रजा मंजुर केलेली आहेत तिला मान्यता मिळावी. आणि यापुढे त्यांचा कुठलाही प्रस्ताव आल्यास तो सभागृहापुढे ठेवण्याची नोंद आम्ही घेतलेली आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ९:—** श्री. डी.डी. पंजाबी, नाका लिपिक, जकात विभाग यांना दिनांक १ डिसेंबर, २००६ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २००७ या एक वर्षाच्या कालावधीची प्रशासनातर्फे मंजुर करण्यात आलेल्या वाढीव विशेष असाधारण रजेस कार्योत्तर मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. डी.डी. पंजाबी, लिपिक, जकात विभाग यांनी दिनांक ३१/१०/२००६ च्या अर्जान्वये दिनांक १ डिसेंबर, २००६ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २००७ या एक वर्षाच कालावधीची वाढीव विशेष असाधारण रजा मंजूर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे.

शासनाने वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. अरजा २४०२/२५/सेवा—८, दिनांक ७/१०/२००२ व शासन निर्णय क्र. अरजा—२४०५/प्र.क्र. २७/०५/ सेवा—८, दिनांक २० डिसेंबर, २००५ नुसार शासकिय सेवेत प्रविष्ट झालेल्या किमान ५ वर्ष इतकी सतत सेवेत असलेल्या स्थायी/अस्थायी कर्मचा—यांना विशेष असाधारण रजा मंजूर करता येईल. अशी रजा संपूर्ण सेवेच्या कालावधीत ५ वर्षाच्या मर्यादेपर्यंत फक्त एकदाच घेता येईल. ही योजना सदर आदेश दिनांक १/१/२००६ पासून ते दिनांक ३१/१२/२००६ पर्यंत अंमलात आहे. मा. शासन निर्णयातील परिच्छेद ९ मध्ये विशेष असाधारण रजा मंजूर करण्यास नियुक्ती प्राधिकारी सक्षम असतील अशी तरतुद आहे. त्यांची यापुर्वी दि. १/१२/२००४ ते ३०/११/२००५ पर्यंतची एक वर्षाची विशेष असाधारण रजा महासभा ठराव क्र ८६, दिनांक ३०/३/२००५ अन्वये व दिनांक १/१२/२००५ ते ३०/११/२००६ पर्यंतची एक वर्षाची वाढीव विशेष असाधारण रजा महासभा ठराव क्र. ९८, दिनांक २०/३/२००६ अन्वये मंजूर करण्यात आलेली आहे.

वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री. डी.डी. पंजाबी, लिपिक, जकात विभाग यांची महापालिकेतील आतापर्यंत एकुण सेवा ९ वर्षे ७ महिने इतकी झाली असुन त्यांचा विशेष असाधारण रजेचा अर्ज दिनांक ३१/१०/२००६ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला असुन शासनाच्या वरील दिनांक ७ ऑक्टोंबर, २००२ व दिनांक २० डिसेंबर, २००५ मधील शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन राहून त्यांची दिनांक १/१२/२००६ ते ३०/११/२००७ पर्यंतच्या ०१ वर्षाच्या कालावधीची वाढीव विशेष असाधारण रजा दिनांक

१४/१२/२००६ रोजीच्या आदेशान्वये मंजूर केली आहे. सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ९ <u>दिनांक:—२०/४/२००७</u>

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. तुलसीदास वसिटा

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. डी.डी. पंजाबी, नाका लिपिक, जकात विभाग यांना १/१२/२००६ ते ३०/११/२००७ या पूढील एक वर्षाच्या कालावधीची प्रशासनातर्फे मंजूर करण्यांत आलेल्या वाढीव विशेष असाधारण रजेस कार्योत्तर मंजूरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १०** :— उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 'कनिष्ठ लिपिक' या संवर्गात काही अस्थायी कर्मचा—यांस स्थायी करण्यास मान्यता देणे.

---

<u>**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**</u>मा. महापौरजी, व आयुक्त साहेब, मला असे वाटते की यानंतरचे सर्व विषय कर्मचा—यांना स्थायी पदावर सामावुन घेण्याबाबतचे आहेत. येथे जो प्रस्ताव आलेला आहे त्यामध्ये फक्त १० लोकांचीच नावे आहेत. मला महासभेला असे सुचवायचे आहे की आता महापालिकेमध्ये असे किती कर्मचारी आहेत ज्यांना स्थायी पदावर सामावुन घ्यायचे आहे. येथे तर १० लोकांचीच यादी तुम्ही दिलेली आहे. असे वाटते की निवडून निवडून या लोकांची नावे दिलेली आहेत. असे किती जण आहेत?

<u>**आयुक्त (श्री.सदाशिव कांबळे):—**</u>महानगरपालिकेमध्ये तीस वेगवेगळे संवर्ग आहेत. वैद्यकीय अधिकारी, कनिष्ठ अभियंता, अनुरेखक, कनिष्ठ लिपिक, मिस्त्री, गवंडी, वाहनचालक, रंगारी, रोड मुकादम, पहारेकरी/सुरक्षारक्षक, शिपाई आणि मजूर अशा संवर्गात ४८३ कर्मचारी अस्थायी स्वरुपी कार्यरत आहेत. त्यातील स्थायी पदावर सामावुन घेण्यात येणा—या कर्मचा—यांची संख्या आहे २९६. आणि आरक्षणाप्रमाणे जश—जशी पदे रिक्त होतील त्यानुसार भरण्यात येणा—या पदांची संख्या १८७ आहे. आरक्षण लक्षात घेवुन जी उपलब्ध पदे आहेत आणि ज्यांना शासनाने स्थायी करण्यास मान्यता दिलेली आहे ती संख्या लक्षात घेवुन सर्व संवर्गातील मग ती आरक्षित असोत किंवा खुल्या प्रवर्गातील असोत अशा सगळयांचा विचार करुन प्रत्येक संवर्गातील पदांचा आपण येथे ठराव ठेवलेला आहे.

<u>**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—**</u>मा. महापौरजी, आता आयुक्त साहेबांनी सांगितलेलेच आहे ते बरोबर आहे की जेव्हा कर्मचा—यांचा प्रश्न येतो तेव्हा त्या अस्थायी कर्मचा—यांना आपण स्थायी केलेच पाहिजे. कारण किती वर्ष त्यांना असे अस्थायी पदावर ठेवणार काहींना तर २२—२२ वर्ष झाली आहेत आणि म्हणुन आता हा जो विषय येथे आला आहे तो पारीत करण्यात यावा अशी मी सभागृहाला विनंती करतो.

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**</u>मा. आयुक्त साहेब, व सचिव साहेब, येथे १३ अस्थायी कर्मचा—यांना स्थायी करण्याचा प्रस्ताव आला आहे. आणि यानंतर सुध्दा आपण काही अस्थायी कर्मचा—यांना स्थायी करु शकतो

काय? असे किती कर्मचारी आहेत? १९९५ पासुन ते अस्थायी स्वरुपात काम करतात. सर्व सभागृहाची भावना आहे की हे सर्व लिपिक किंवा कर्मचारी स्थायी झाले पाहिजेत.

**आयुक्त (श्री.सदाशिव कांबळे):—**आपण येथे जे वेगवेगळे ठराव ठेवलेले आहेत. त्यानुसार ४८३ कर्मचा—यांना स्थायी करणे अपेक्षित आहे. त्यातील २९६ कर्मचा—यांना आपण स्थायी करत आहोत. १८७ जे आरक्षण भरलेले नाही किंवा त्यांची तेवढी सेवा झालेली नाही. अशा १८७ कर्मचा—यांना टप्पा टप्पाने स्थायी करण्यात येईल आणि जी मंजुर पदे आता आहेत त्याचा विचार करुन आता १२ संवर्गातील २९६ कर्मचा—यांना आपण स्थायी करत आहोत. आणि पुझेझजेव्हा पदे मंजुर होवुन येतील आणि जसे अनुसूचीत जाती आणि जमातीचे कर्मचारी भरलेले नाहीत अनुशेष भरतांना त्यांच्या लोकांचा सुध्दा १८७ मध्ये विचार केला जाईल. त्यांना आपणांस सामावुन घेता येईल.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** तुम्ही दिलेल्या प्रस्तावामध्ये मी थोडा बदल करत आहे तो बरोबर आहे का ते पहा. तसे केले तर लिपिक या संवर्गात आपण जास्तीत जास्त लोकांना स्थायी पदावर सामावुन घेवु शकतो. १३ कर्मचा—यांना पदोन्नती देवुन त्यांना स्थायी करण्याचे तुम्ही प्रस्तावित केले आहे. त्याऐवजी त्यामध्ये मी सुधारणा सुचवतो. त्यानुसार जवळ जवळ ३८ कर्मचा—यांना आपण स्थायी पदावर सामावुन घेवु शकतो.

**आयुक्त (श्री.सदाशिव कांबळे):—**ही पदोन्नती नाही आहे. जे अस्थायी म्हणजे तात्पुरत्या स्वरुपी कार्यरत असलेले लोक आहेत. त्यांना स्थायी करण्याचा हा प्रस्ताव आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**होय, अस्थायींना स्थायी.

**आयुक्त (श्री.सदाशिव कांबळे):—**स्थायी आणि अस्थायी हा प्रश्न जवळ जवळ २५ वर्षापासुनचा आहे. मला वाटते हा पहिल्यांदाच आपण हाताळत आहोत. आपल्याकडे जेवढया खुल्या प्रवर्गातील आणि आरक्षणातील जागा आहेत त्या आपण पहिल्या टप्यात भरुन त्यांना स्थायी करत आहोत. आणि ही प्रक्रिया नेहमीसाठी सुरु राहणार आहे. त्यामुळे एकाच वेळी सर्व कर्मचा—यांना स्थायी करणे शक्य नाही. कारण त्यांची सेवा उपलब्धता किंवा त्यांची सेवाभरती विषयक अर्हता या सर्व बाबी

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ३८ मधील पालिका सदस्य श्री. गणपत एडके यांना ह्दय विकाराचा त्रास जाणविल्याने त्यांनी वैद्यकीय तपासणी केली असता त्यांच्या हृदयाचा वाल्व निकामी झाला असल्याने तो बदली करण्याच्या सूचना वैद्यकीय अधिका–यांनी त्यांना दिल्या आहेत. त्यांच्या ह्दयाची शस्त्रक्रिया करण्यासाठी रुपये २ लाख २५ हजार इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ५१ मधुन निवडून आलेल्या पालिका सदस्या श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे यांचे पती श्री. सुनिल सुर्वे यांना सुध्दा नुकताच हृदय विकाराचा झटका येवुन गेला असून त्यांना सुध्दा शस्त्रक्रिया करणे आवश्यक असून याकामी रुपये २ लाख इतका खर्च अपेक्षित आहे.

वरील दोन्ही रुग्णांना शस्त्रक्रिया व औषधोपचारासाठी आर्थिक मदत व सहकार्य करण्याच्या हेतुने उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध राजकिय पक्षांचे सर्व पालिका सदस्यांनी आपल्या मासिक मानधनातुन प्रत्येकी रुपये २०००/– इतकी मदत देण्याची इच्छा दर्शविलेली आहे. म्हणुन महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र</u>. २१ अ                                    <u>दिनांक :— १५/५/२००७</u>

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती सुरेखा वेलकर

ही महासभा वरील प्रस्तावास अनुसरुन पालिका सदस्य श्री. गणपत एडके यांना व श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे यांचे पती श्री. सुनिल सुर्वे यांना हद्‌विकार शस्त्रक्रिया व औषोधोपचारासाठी अनुक्रमे माहे मे व जुन, २००७ च्या मासिक मानधनभत्त्यातुन प्रत्येकी रुपये २०००/— आर्थिक मदत व सहकार्य देण्याचे मान्य करीत आहे व सदरहु रक्कम दोन हप्त्यात अदा करण्यास मुख्य लेखा अधिकारी यांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्य श्री. गणपत एडके :—</u>मा. महापौर महोदया, उप—महापौर, सचिव साहेब, सर्व सदस्य, आपण हा जो प्रस्ताव ठेवला त्याबद्‌दल मी संपुर्ण सभागृहाचे आभार मानतो.

<u>महापालिका सचिव :—</u>मा. महापौरांकडुन सभा स्थगित करण्याअगोदर येथे दोन प्रस्ताव प्राप्त झाले आहे. त्यातील एक स्थगन प्रस्ताव आहे त्यातील सुचक आहेत श्री. सुरेश मधुकर जाधव व अनुमोदक आहेत श्री. प्रशांत धांडे. त्यांच्या स्थगन प्रस्तावाचा विषय असा आहे की, अन्न परवाना देण्याचा अधिकार महापालिकेस असला पाहिजे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u>मा. महापौरजी दुसरी सभा जर स्थगित करत आहात तर हे विषय पुकारण्याची आवश्यकता काय?

<u>महापालिका सचिव :—</u>आता या विषयांचे स्पष्टीकरण केले नाही तर पुढील सभेत हे विषय घेता येणार नाहीत. मा. महापौर व आपणाकडुन या विषयास स्विकृती मिळणे आवश्यक आहे. स्थगन प्रस्ताव दाखल करण्यास कुणाची हरकत आहे काय?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>स्थगन प्रस्ताव दाखल करुन घेतला जावा.

<u>महापालिका सचिव :—</u>तर सर्व संमतीने दाखल केला जावा काय?

दुसरी लक्षवेधी सुचना आहे जिचे सुचक आहेत श्री. सतिश चहाळ, अनुमोदक आहेत श्री. राजु जग्यासी त्यांच्या लक्षवेधीचा विषय असा आहे की दोन रस्त्यांची दुरुस्ती त्यातील पहिला रस्ता आहे भैया साहेब आंबेडकर नगर, रमाबाई आंबेडकर नगर, संत ज्ञानेश्वर नगर, एमआयडीसी पाण्याच्या टाकीपर्यंतचा रस्ता या दोन रस्त्यांची दुरुस्ती होत नाही. त्यामुळे या लक्षवेधीद्वारे त्यांना सभागृहाचे लक्ष वेधायचे आहे. ही लक्षवेधी मा. महापौर स्विकृत करत आहेत किंवा नाही याबाबतीत त्यांचा मला निर्णय घ्यावा लागेल.

या लक्षवेधीस स्विकृती देण्यास मा. महापौरांनी नकार दिला आहे.  ही लक्षवेधी अस्विकृत केली जात आहे.

<u>महापौर :–</u>सदरची सभा दिनांक २३/५/२००७ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.१३ वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २३/५/२००७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २३/५/२००७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## ३—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार दिनांक १५/५/२००७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु सदरची सभा स्थगित झाल्याने ती सभा दिनांक २३/५/२००७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत श्री. बच्चाराम रुपचंदानी हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | २४ | श्री.एडके गणपत गोविंद |
| २ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | २५ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ३ | श्री. यादव रामसागर जनार्दन | २६ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ४ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | २७ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ५ | श्री. मोरे भानजी भिकारी | २८ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | २९ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ३० | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ८ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ३१ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| ९ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ३२ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १० | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ३३ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| ११ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ३४ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १२ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ३५ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १३ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ३६ | श्री. किशोर जग्यासी |
| १४ | श्रीमती डॉ. निना प्रकाश नाथानी | ३७ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १५ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ३८ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ३९ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १७ | श्री. लाल पंजाबी | ४० | श्री. मोहन साधवाणी |
| १८ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ४१ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| १९ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ४२ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २० | श्रीमती शकुंतला पाटील | ४३ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २१ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ४४ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २२ | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ४५ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २३ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण
२. उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

३. श्रीमती संगीता राजेश कंडारे, ४. श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र, ५. श्री. विजय खंडु सुपाळे, ६. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, ७. श्रीमती सुजाता रमेश रिझवानी, ८. श्री. राजू जग्यासी, ९. श्रीमती जया प्रकाश माखीजा, १०. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ११. श्री. भठीजा (बब्बु) संजय, १२. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे, १३. श्री. सुखरामानी महेश पहलाजराय, १४. श्री. लालबिहारी बुझारत यादव, १५. श्री. बोडारे धनंजय बाबूराव, १६. श्रीमती बोडारे वसुधा धनंजय, १७. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, १८. श्री. शेखर केशव यादव, १९.

श्रीमती ज्योती शाम माने, २०. श्रीमती लता शांताराम निकम, २१. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, २२. श्री. ठाकूर विनोद लालसिंग, २३. श्रीमती विद्या विजय निर्मले, २४. श्रीमती मीना सोनेजी (सोंडे), २५. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), २६. श्री. मुकेश सोहन तेजी, २७. श्री. पाटील प्रधान धर्मा, २८. श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर, २९. श्री. गायकवाड दिलीप.

आयुक्त श्री. सदाशिव कांबळे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या स्थानी श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त, मुख्यालय हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

तसेच खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
२. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त, मुख्यालय
३. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त, आरोग्य
४. श्री. पठाण, उप—आयुक्त, अतिक्रमण
५. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
७. श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
८. डॉ. के. आर. खरात, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
९. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१०.श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
११.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१२.श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता, पा.पु.
१३.श्री. सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.विभाग
१४.श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी
१५.श्री. तुकाराम तारदाळकर, मुख्य लिपिक
१६.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी, लघुलेखक
२. श्री. तानाजी पतंगराव, लिपिक

सायंकाळी ४.२५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—आजच्या या सभेत मा. महापौर श्रीमती आशान लिलाबाई तसेच उप—महापौर श्री. चव्हाण रमेश हे उपस्थित नसल्याने सभेचे कामकाज चालविण्यासाठी पीठासीन अधिकारी म्हणुन वरीष्ठ नगरसेवक श्री. बच्चाराम रुपचंदानी यांची पीठासीन अधिकारी म्हणुन निवड करण्यात यावी.

सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :—सभागृह नेत्यांनी जो प्रस्ताव दिला आहे त्यास मी अनुमोदन देतो.

सर्वानुमते पीठासीन अधिकारी म्हणुन श्री. बच्चाराम रुपचंदानी यांची निवड झाल्यानंतर ते पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ झाले.

**आयुक्त, श्री. सदाशिव कांबळे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

सदस्य श्री. मोहन साधवानी :—आजच्या या महासभेत मा. महापौर व उप—महापौर हे उपस्थित नसल्याने आजची सभा पुढील सुचना देईपर्यंत स्थगित करण्यात यावी.

**<u>पीठासीन अधिकारी , श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>**आजची सभा पुढील सूचना देईपर्यंत सर्वानुमते स्थगित करण्यांत येत आहे.

**<u>महापालिका सचिव :—</u>**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.२८ वाजता पीठासीन अधिकारी श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः–२९/६/२००७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २९/६/२००७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

३–ब

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार दिनांक १५/५/२००७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित झाल्याने ती सभा दिनांक २३/५/२००७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. परंतु सदरची सभा पुन्हा स्थगित झाल्याने ती सभा शुक्रवार दिनांक २९/६/२००७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर–– श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

२. उप–महापौर–– श्री. चव्हाण रमेश महादेव

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३६ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३८ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३९ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४० | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ८ | श्री. यादव रामसागर जनार्दन | ४१ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४२ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४३ | श्री. सुंदर (बाबु) मंगतानी |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४४ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४५ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १३ | श्री. विजय खंडु सुपळे | ४६ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १४ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४७ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४८ | श्री. शेखर केशव यादव |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४९ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५० | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १८ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५१ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १९ | श्री. राजू जग्यासी | ५२ | श्री. किशोर जग्यासी |
| २० | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५३ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५४ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २२ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५५ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २३ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५६ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २४ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५७ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २५ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५९ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २७ | श्री. लाल पंजाबी | ६० | श्री. मोहन साधवाणी |
| २८ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६१ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २९ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६२ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ३० | श्रीमती शकुंतला पाटील | ६३ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| ३१ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६४ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३२ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६५ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३३ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६६ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३४ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६७ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३५ | श्री.एडके गणपत गोविंद | ६८ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| | | ६९ | श्री. पाटील प्रधान धर्मा |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, २. श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी, ३. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ४. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ५. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, ६. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री)

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. समीर उन्हाळे, आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
४. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
५. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
७. डॉ. गोपाळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
८. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
९. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१०.श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता, पा.पु.
११.श्री. सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.विभाग
१२.श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी
१३.श्री. पठाण, अतिरिक्त उप—आयुक्त

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. कु. शकुंतला गावित
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती नर्गिस खान

सायंकाळी ४.२० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे.........

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. ११ हा श्री. जमनादास पुरस्वानी यांचा आहे.

**<u>प्रश्न क्र. ११:—</u>** १) १ जनवरी, २००७ से आज तक कितने प्लान (टीपीडी) (रिव्होक) रद्द किये गये है? अनका नाम, पत्ता तथा प्लान नं. क्या है?
२) जिन बिल्डींग प्लानों को रद्द किया गया (रिव्होक) उनपर क्या कार्यवाही की गयी?
३) प्लॉन (रिव्होक) रद्द करने का कारण क्या था?
४) क्या रद्द किये गये प्लानों में से किसी ने वापर प्लान रिवाईज (सुधारीत नकाशा) किया है, तथा कितने लोंगो नें सुधारीत नकाशा करने के लिए दिया है?

<u>उत्तर :—</u> १) सोबत यादी जोडली आहे. २) एम.आर.टी.पी. ॲक्टप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. ३) बांधकाम प्रारंभ प्रमागणपत्रातील अटीचे उल्लंघन केल्यामुळे ४) होय. श्री. मनोज जगवानी यांचा सुधारीत नकाशा मंजुर करण्यात आलेला आहे व श्री. बलराम उदासी यांनी सुधारीत नकाशा सादर केलेला आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १२ हा श्री. जमनादास पुरस्वानी यांचा आहे.

प्रश्न क्र. १२:— *1* ) बॅरेक नं. १९९३, रुम नं. १०, बीपी/युएमसी/टीपीडी/७९/०६/५९ हरी एम. वाधवानी के नाम का जो नकाशा २०/४/२००७ को पास हुआ क्या इस जगह का मुआवना (देखना) आयुक्त साहब ने किया है? २) इस जगह का मुआवना करने पर वहाँ पर क्या था? ३) उस स्थान की आज की स्थिती क्या है?

उत्तर :— १) होय. बॅ.नं. १९९३, रुम नं. १० येथिल जागेवर मा. आयुक्त सो. यांच्या पहाणी नंतर बांधकाम परवानगीची मंजूरी देण्यात आली. २) मोकळी जागा होती. ३) तळमजला + १ मजलेच्या इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १३ हा श्रीमती मिनाताई सोनेजी (सोंडे) यांचा आहे.

प्रश्न क्र. १३ :— उल्हासनगर कॅम्प ४ मधील कुर्ला कॅम्प, तानाजीनगर, कैलाश कॉलनी, कालीमाता चौक इत्यादी परिसरातील तिव्र पाणी टंचाई व पाणी समस्या सोडविणेसाठी तक्षशिला विद्यालयाजवळ पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर, समाधानकारक माहिती मिळणेस विनंती आहे.

१. अ) तक्षशिला विद्यालयाजवळ बांधण्यात आलेल्या पाण्याचे उंची टाकीची पाणी भरण्याची क्षमता किती आहे? पुर्ण क्षमतेने सदरची टाकी भरण्यात येत आहे का? का टाकी पुर्ण भरली जात नाही? टाकी पुर्ण क्षमतेने भरली जात नसल्यास त्याची कारणे काय आहे? सदरची टाकी भरण्यास किती वेळ लागत आहे? सदरची वेळ क्षमतेनुसार कमी किंवा जास्त आहे का? तसेच टाकी सोडल्यानंतर खाली होण्यास किती वेळ लागतो? टाकीद्वारे करण्यात येणारे परिसरास सुरळीत पाणी पुरवठा होतो का? नागरीकांच्या पाणी पुरवठयाबाबत तक्रारी आहेत का?

उत्तर :— १) तक्षशिला टाकीची क्षमता २७ लक्ष लिटर्स आहे.
२) टाकी पुर्ण क्षमतेने भरण्यात येते. ३) विद्युत भारनियमामुळे टाकी पुर्ण क्षमतेने काही वेळेस भरत नाही त्यावेळी बायपासने पाणी देण्यात येते. ४) सदरची टाकी एका वेळेत भरली जात नाही. रात्री १२.०० ते ३.०० व सकाळी ११.०० ते १६.०० च्या वेळेत भरण्यात येते हया काळात (दिवसात) विद्युत पुरवठा बंद झाल्यास बायपास करण्यात येते.
५)सदरची वेळ क्षमतेनुसार पुर्ण आहे. ६) सदरची टाकीद्वारे चार झोनद्वारे पाणी सोडण्यात येते व टाकीपुर्ण क्षमतेने भरल्यावर २ ते २.१५ तासात टाकी खाली होते. ७) विद्युत पुरवठा सुरळीत असल्यास सुरळीत पाणी पुरवठा होतो.
८) विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास (भारनियमनामुळे)बायपास ने पाणी पुरवठा करण्यात येतो त्यावेळेस दाब कमी राहिल्याने तक्रारी येतात.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :— ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १४ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

प्रश्न क्र. १४ :— उल्हासनगर शहरातील नागरीक बांधकाम परवानगीसाठी महापालिकेकडे अर्ज सादर करीत आहेत त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक, सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) माहे जानेवारी, २००६ ते आजतागायत बांधकाम परवानगीसाठी किती नागरीकांनी अर्ज सादर केले याची तारखेनुसार, क्रमवारीनुसार यादी देणेत यावी. त्यापैकी किती नागरीकांचे बांधकाम परवानगीचे नकाशे मंजुर करण्यात आले त्याची तारखेनुसार, क्रमवारीनुसार यादी देणेत यावी. सदरची प्रकरणे प्रलंबित राहणेची कारणे काय आहेत याची माहिती मिळावी.

उत्तर :— माहे जानेवारी २००६ ते आजतागायत बांधकाम परवानगीसाठी नागरीकांनी सादर केलेल्या अर्जाची, मंजूर करण्यात आलेल्या परवानगींची यादी व प्रलंबित असलेल्या प्रकरणांची यादी सोबत जोडलेली आहे. प्रलंबित असलेल्या प्रकरणांची तांत्रिक बाबींची पूर्तता न झाल्याने ते प्रलंबित आहेत.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, माहे जानेवारी २००६ ते आजतागायत बांधकाम परवानगीसाठी नागरीकांनी सादर केलेल्या अर्जाची, मंजूर करण्यात आलेल्या परवानगींची यादी व प्रलंबित असलेल्या प्रकरणांची यादी सोबत जोडलेली आहे. प्रलंबित असलेल्या प्रकरणांची तांत्रिक बाबींची पूर्तता न झाल्याने ती प्रलंबित आहेत. याच्यामध्ये जानेवारी २००६ पासुन ते आजतागायत एकुण अर्ज किती आले आहेत याची माहिती दिलेली नाही. माझ्या माहितीप्रमाणे आतापर्यंत २९८ लोकांनी बांधकाम परवानगीसाठी अर्ज केले आहेत. आणि ११२ प्रकरणे त्यांनी मंजूर केली आहेत त्याची यादी याठिकाणी दिलेली नाही. नगररचनाकार आहेत काय? आयुक्त साहेब, २९८ पैकी फक्त ११२ प्रकरणांनाच मंजुरी दिलेली आहे. बाकीची प्रकरणे प्रलंबित का? त्याची कारणे दिलेली नाहीत. जानेवारी ०६ ची प्रकरणे प्रलंबित आहेत. आणि एप्रिल, २००७ किंवा मे २००७ मध्ये आलेली प्रकरणे मंजुर झाली आहेत. म्हणजे एप्रिल २००७ ला आलेली प्रकरणे मे, २००७ ला किंवा जुन २००७ ला मंजुर होतात. परंतु जानेवारी २००६ ची प्रकरणे अदयाप का प्रलंबित आहेत? त्याची कारणे दिलेली नाहीत. म्हणजे लोकांना बांधकाम परवानगी देण्यासाठी रखडवुन ठेवायचे. आणि बांधकाम परवानगी देतांना त्याच्यामध्ये यांचा ज्याच्यात रस आहे त्यांना बांधकाम परवानगी दयायची अशा प्रकारचे काम येथे झाले आहे. २९८ मधील सात प्रकरणे अशी आहेत की त्यांमध्ये तारीख सुध्दा नमुद केलेली नाही. बांधकाम परवानगीसाठी त्यांनी किती तारखेला अर्ज केला आहे? आला अर्ज आणि लगेच मंजुर केला अशाप्रकारची ही प्रकरणे आहेत. आयुक्त महोदय, माझ्याकडे आता ती यादी नाही आहे. परंतु जी अगोदर दिली होती तिच्यामध्ये स्पष्टपणे लिहिलेले होते. बांधकाम परवानगीसाठी अर्ज किती तारखेला केला? तिचा उल्लेख यामध्ये केलेला नाही. याचा अर्थ अर्जाची आवक आणि जावकची तारीख एकच होती. त्यानंतर तीन ते चार प्रकरणे अशी होती की आयुक्तांनी स्वत: जागेची पाहणी केल्यानंतर थोपवुन ठेवली आहेत. त्याची कारणे काय? तसेच जानेवारी, ०६ चे अर्ज अदयापपर्यंत प्रलंबित ठेवण्याची कारणे काय? नगररचना अधिनियमाच्या तरतुदीनुसार साधारणत: ६० दिवसाच्या आत आपण बांधकाम परवानगी मंजुर केली नाही किंवा त्याबाबतची कारणे दिली नाहीत तर बांधकाम परवानगी दिली आहे असे समजण्यात येते. दिड वर्षापासुन या महापालिकेने ही प्रकरणे प्रलंबित ठेवली आहेत. तर बांधकाम परवानगीसाठी ज्यांनी अर्ज केले आहेत त्यांनी करायचे काय? त्याच्यापुढे दोनच पर्याय आहेत एकतर बेकायदेशीर बांधकाम करा किंवा गैरमार्गाने या विभागाशी संधान साधुन गैरमार्गाने ती बांधकाम परवानगी मंजुर करुन घ्या. आणि अनाधिकृत बांधकामाला प्रोत्साहन दया. हे कुठेतरी थांबले पाहिजे. याबाबतीत आपण खुलासा करा की २९८ पैकी निवडून ११२ च प्रकरणे मंजुर का केली? जानेवारी, २००६ ची प्रकरणे अदयाप प्रलंबित का आहेत? त्याची कारणे दया.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—सन्माननिय महापौर, सन्माननिय उपमहापौर, सभागृह नेते, सर्व गटनेते आणि सर्व सन्माननिय सदस्य, आता सन्माननिय सदस्य महोदयांनी जो प्रश्न विचारला आहे तो बांधकाम परवानग्यासाठी जे अर्ज सादर करण्यात आले होते त्याच्यावर काय कार्यवाही केली? असा तो प्रश्न होता. त्याबाबत खुलासा जो दिला आहे त्याबाबतीत अधिक माहिती मागितली आहे. त्यावरुन मी माहिती देतो की, जे प्रस्ताव आले आहेत त्यांच्या तांत्रिक बाबींची पुर्तता झालेली नसल्यामुळे सदर अर्ज प्रलंबित असल्याचा अहवाल या विभागामार्फत सभागृहापुढे सादर करण्यात आलेला आहे. ही यादी दिलेली आहे त्यामध्ये प्रामुख्याने जी प्रकरणे असतात त्याच्यामध्ये नाहरकत दाखला, संबंधित विभागाच्या किंवा महसूल विभागाच्या परवानग्या अशी प्रमाणपत्र न दिल्यामुळे असे अर्ज प्रलंबित असतात. ज्या प्रस्तावाच्या तांत्रिक बाबीची पुर्तता झाली होती अशी ११२ प्रकरणे मंजुर करण्यात आलेली आहेत. ज्या प्रकरणांच्या तांत्रिक बाबींची पुर्तता करण्याचे राहिले आहे त्या प्रस्तावांची अजुनही छाननी चालु आहे. साठ दिवसांच्या मुदतीचा जो प्रश्न सन्माननिय सदस्यांनी विचारला होता तो कायदेशीर दृष्टया योग्य आहे. एमआरटीपी ॲक्टनुसार एखादया प्रकरणाविषयी ६० दिवसामध्ये खुलासा दिला गेला नाही तर ते सर्वसाधारणपणे मंजुर समजण्यात येते. राहिलेल्या प्रकरणांची ६७ जी यादी दिली आहे त्या संबंधी माहिती आणि अधिक खुलासे हे संबंधित विभागांकडुन मागीतले असल्याने त्याबाबत कार्यवाही झाली नसल्याचा अहवाल संबंधित विभागामार्फत आज सादर करण्यात आलेला आहे. आणि छाननीची ही जी कार्यवाही आहे ती संबंधित विभागाने तातडीने पुर्ण करावी आणि लवकरात लवकर या परवानग्याबाबत कार्यवाही करावी अशी सूचना मी संबंधित विभागास देत आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**साहेब, या बाबतीत माझे असे म्हणणे आहे की ११२ प्रकरणे मंजुर केलीत. ती फक्त निवडक अशी प्रकरणे आहेत. आणि त्यामध्ये सात अशी प्रकरणे आहेत की, बांधकाम परवानगी किती तारखेला दिली. ती तारीखच तेथे नमुद केलेली नाही. म्हणजे ही प्रकरणे सादर केल्यानंतर लगेच त्यांना बांधकाम परवानगी देण्यात आली अशी मला खात्रीशिर माहिती आहे. आणि ती तंतोतंत खरी ठरली आणि तेवढयासाठीच हा प्रश्न होता. काही लोक दिड वर्षापासुन फे—या मारत आहेत. सर्वसामान्य लोक फे—या मारत आहेत. आणि गैरमार्गाने येणा—या लोकांना ताबडतोब परवानगी दिली जाते हा प्रकार थांबला पाहिजे. आतापर्यंत जो कारभार चालला तो चुकीचा होता आणि आता कारभार पारदर्शी झाला पाहिजे त्यासाठी आवश्यक ते बदल करावेत. त्यानंतर माझे आवर्जुन एक सांगणे आहे. अजुनही उल्हासनगर महानगरपालिकेने ताब्यात न घेतलेल्या भुखंडाची सनद निघते. आणि आमच्या महानगरपालिकेचे अधिकारी बिनदिक्कत बांधकाम परवानगीचे नकाशे मंजुर करतात. महानगरपालिकेस भुखंड कमी पडतात. असलेले भुखंड महापालिकेने ताब्यात घ्यावेत म्हणुन १९९९ आणि २००२ मध्ये महानगरपालिकेने उपविभागीय अधिका—यांना एक पत्र दिले होते की महानगरपालिकेच्या भुखंडावरील जागेची सनद देतांना प्रथम महानगरपालिकेला विश्वासात घ्या. प्रथम प्राधान्य महानगरपालिकेला आहे. महानगरपालिका जर ती जागा विकसित करु शकत नसेल तर तुम्ही त्या जागेची सनद दुस—याला देवु शकता. परंतु याबाबत उपविभागीय अधिका—याने कुठलाही विचार केला नाही. आणि त्यांनी सनद दिल्यानंतर महानगरपालिकेचे अधिकारी त्यावरील बांधकाम परवानगीचे नकाशे मंजुर करतात. परंतु येथे सुध्दा अशाच प्रकारचे बांधकाम परवानगी नकाशे पुन्हा मंजुर होतात. हे कुठेतरी थांबले पाहिजे. आणि जे भुखंड आहेत ते त्वरीत ताब्यात घ्या. त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतुद करा असे मागच्या वर्षी सुध्दा आम्ही सांगितले होते. ते भुखंड ताब्यात घेवुन उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्वसामान्य लोकांसाठी त्यांचा उपयोग करता येईल. आम्हाला व्यापारीकरण करायचे नाही. सर्वसामान्य लोकांना केंद्रबिंदु मानुन विकास करण्याासाठी जी कार्यवाही करावी लागेल ती करावी. यापुर्वी आरक्षित भुखंडावर जे बांधकाम परवानगी नकाशे मंजुर केले आहेत त्यामधील २५ टक्के किंवा ३५ टक्के जी मालमत्ता आपणांस घ्यायची त्याचे नेमके काय झाले? विकास केला आहे किंवा नाही? की त्या विकासकर्त्याचे फायदयाचे जेवढे काही होते तेवढेच केले? त्या सर्व प्रकरणांची चौकशी करा. व पुढील महासभेत ठेवा. १२ प्रकरणे होती त्यापैकी महानगरपालिकेने किती ताब्यात घेतली? पुढची कार्यवाही काय? हे पुढील महासभेत ठेवले तर बरे होईल.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**उल्हासनगर महानगरपालिकेला जागेची कमतरता आहे ही वस्तुस्थिती आहे. महानगरपालिकेसाठी आरक्षण असलेल्या ज्या जागा आहेत त्या जागा महापालिकेने तातडीने ताब्यात घेतल्या पाहिजेत. ज्या जागांवर आरक्षण ठेवण्यात आली आहे ती ज्या कारणांसाठी ठेवण्यात आलेली आहेत त्याच कारणांसाठी ते भुखंड विकसीत झाले पाहिजेत. त्यासाठी नगररचना विभागाने सदरच्या जागा तातडीने ताब्यात घेण्यासाठी कारवाई करावी.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**५७/२००६ हे प्रकरण आहे आपणांस आठवत असेल. दिड वर्षापासुन बांधकाम परवानगीसाठी अर्ज केला आहे. अदयाप त्यांची बांधकाम परवानगी मंजुर होत नाही. म्हणतात की आयुक्तांना वेळ नाही. काही पेटया वगैरे पाहिजेत? माझ्या काही लक्षात आले नाही.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—** आताच मी सभागृहाला ही माहिती दिली. जी प्रकरणे प्रलंबित आहेत, त्यांची छाननी करुन लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल. जी प्रकरणे अयोग्य असतील त्यांना बांधकाम परवानगी नाकारली जाईल. हाच प्रश्न पुन्हा पुन्हा आपणाकडुन येत आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**दिड वर्षापासुन प्रकरण प्रलंबित आहे. त्यानंतरची प्रकरणे मंजुर झाली आहेत.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**मी तेच आपणांस सांगत आहे की, जी प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांची छाननी करुन लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल. एक—एक प्रकरण सांगत राहिलात तर त्याची माहिती मी देवु शकणार नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—प्रलंबित ठेवण्याचे कारण काय? ते महासभेस सांगितले जावे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—त्याचे उत्तर तर दिलेले आहे ना? तांत्रिक पुर्तता न झाल्यामुळे प्रलंबित आहे. प्रत्येक प्रकरणाचे उत्तर देणे अपेक्षित नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—उत्तर दिले पाहिजे ना? आपण काय उत्तर दिले आहे? त्या उत्तराशी मी संतृष्ट नाही. ५७/२००६ हे प्रकरण अदयाप पर्यंत का प्रलंबित आहे? मला याची माहिती पाहिजे. सन्माननिय महापौरजी याबाबतीत आदेश दया. हे प्रकरण कुठे अडुन राहिले आहे? की हे उत्तर देवु इच्छित नाहीत? हे कुणाला वाचवु इच्छितात काय? ज्यांनी अनियमितता केल्या आहेत, जे पैसे घेतल्याशिवाय बांधकाम परवानगी मंजुर करत नव्हते. त्यावर आपण पडदा टाकु इच्छित आहात काय?

नगररचनाकार (श्री. अ.पा. गुरगुळे):—मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी जो प्रश्न विचारला आहे. त्याबाबत आज संध्याकाळ पर्यंत त्यांना तपशिलवार उत्तर देईन. लेखी स्वरुपात माहिती देतो.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— लेखी स्वरुपी दया परंतु त्याचे कारण काय?

नगररचनाकार (श्री. अ.पा. गुरगुळे):—संबंधित संचिका बघुन मी आपणांस सविस्तर माहिती देईन.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—कधी पर्यंत?

नगररचनाकार (श्री. अ.पा. गुरगुळे):—आज संध्याकाळ पर्यंत.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आज संध्याकाळ पर्यंत उत्तर मिळेल? ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १५ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

६ प्रश्न क्र. १५ :— उल्हासनगर शहरातील रस्त्यांची निगा, दुरुस्ती, देखभाल, नुतनीकरण, रुंदीकरण
करणेसाठी एकात्मिक रस्ते विकास योजनेअंतर्गत कामे करण्यात येत असतात. त्याअनुषंगाने विचारलेल्या खालील प्रश्नांची सुचक, समाधानकारक, सविस्तर माहिती महासभेमध्ये चर्चा होवून मिळणेस विंनती आहे.
प्र. क्र. १ अ) त्यानुसार सन २००६—०७ मध्ये एकात्मिक रस्ते विकास निधी अंतर्गत रस्ते दुरुस्त करणेसाठी किती तरतूद करण्यात आली होती? त्यापैकी किती रक्कम खर्च करण्यात आली? सदरच्या निधी अंतर्गत किती व कोणकोणते रस्ते तयार करण्यात आले त्यांची यादी मिळणेस विंनती आहे.

उत्तर :— सन २००६—०७ मध्ये एकात्मिक रस्ते विकास निधी अंतर्गत रस्ते दुरुस्त करणेसाठी रुपये ५. ०० कोटी एवढया रक्कमेची तरतूद करण्यात आली.
रुपये २,२८,५९,७५६/— एवढी रक्कम खर्च करण्यात आली.
सोबत यादी जोडली आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :— ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १६ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

६ प्रश्न क्र. १६ :— उल्हासनगर शहरातील त्याचे प्रतीवर्षी डांबरीकरण करण्यात येते.

सन २००६—०७ मध्येही शहरातील रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले त्या अनुषंगाने विचारलेल्या खालील प्रश्नांची सुचक, समाधानकारक, सविस्तर माहिती महासभेमध्ये चर्चा होवून मिळणेस विंनती आहे.

प्र.क्र. १ अ) सन २००६—०७ मध्ये शहरातील रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी किती तरतूद करण्यात आली होती?

त्यापैकी किती रक्कम खर्च करण्यात आली?

सदरच्या निधी अंतर्गत किती व कोणकोणते रस्ते तयार करण्यात आले त्यांची यादी मिळणेस विनंती आहे.

उत्तर :— सन २००६—०७ मध्ये शहरातील रस्त्यांचे दुरुस्ती करणेसाठी रु. १.२५ कोटी एवढया रक्कमेची तरतूद करण्यात आली.

रु. १,११,३५,९०७/— एवढी रक्कम खर्च करण्यात आली.

सोबत यादी जोडली आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :– २००२ मध्ये एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प राबविण्यात आला. त्यानंतर त्याची देखभाल दुरुस्ती ज्या ठेकेदाराने ते रस्ते विकसित केले त्याच ठेकेदाराने करायची होती. परंतु मागच्या वर्षी २००६–२००७ मध्ये रस्त्यामध्ये पडलेले खडडे भरायचे होते किंवा रस्त्याची देखभाल, दुरुस्ती करायची होती त्यासाठी पाच कोटीची विशेष तरतुद करायची होती त्यासाठी निविदा मंजुर करण्यात आली. परंतु कोणत्याही रस्त्यावर या निधीतुन काम करण्यात आलेले नाही. त्याबाबतीत संबंधित विभागाशी वारंवार संपर्क साधला असता त्या ठेकेदाराला बोलावुन सांगु–सांगु असे सांगण्यात आले. परंतु काहीही काम करण्यात आलेले नाही. येथे खर्च दाखविला आहे २ कोटी २८ लाख. माझी खात्री आहे की यातील फार कमी खर्च झालेला आहे. कार्यकारी अभियंता, शहर अभियंता यांना याबाबतीत विचारणा केली तर ते सांगु शकतील की ठेकेदारास वारंवार बोलावुन सुध्दा तो येण्यास तयार नाही. नुसताच ठेका घेतला आणि रस्ते तसेच ठेवले. ''अंधळ दळतय आणि कुत्र पिठ खातय'' अशा प्रकारचा कारभार येथे चालु आहे. ५ कोटीची तरतुद आहे. काम केलेले नाही. बघायला कोण जातय? परंतु माझा असा आरोप आहे की, एक रुपया सुध्दा खर्च केलेला नाही. कुठल्या आधारावर त्यांना बिल देता? पेट्रोल पंपाच्या बाजुला मोठे खड्डे पडलेले आहेत. जेवढे रस्ते आहेत त्यातील एकाही रस्त्याची देखभाल दुरुस्ती केलेली नाही. फुटपाथ तसेच आहेत. चेकर टाईल्स निघाल्या आहेत. फुटपाथ उखडले आहेत, त्यांना रंग मारलेला नाही. रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत तर याची चौकशी व्हावी. २ कोटी २८ लाखामध्ये नक्की कुठले रस्ते केले आहेत. त्याची माहिती मिळाली तर बरे होईल. यादी दिलेली आहे परंतु तेथे कामे झालेली नाहीत. श्री. सुखरामानी साहेब, तुम्ही यादी दिलेली आहे चांगली/ उत्तम आहे. माझा एकच आरोप आहे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–प्रकल्प जे होतात ते प्रकल्प पुर्ण व्हायला पाहिजेत. अशी सभागृहाची भावना आहे ती अतिशय योग्य अशी आहे. असे जे अपुर्ण असलेले प्रकल्प आहेत त्यांची सुचीनुसार छाननी करुन ज्यांनी काम अपुर्ण सोडले आहे त्यांच्यावर कारवाई करु. दुसरे असे की, देखभाल दुरुस्ती बाबत जे सांगितले गेले. करारनाम्याप्रमाणे देखभाल दुरुस्ती करणे अपेक्षित आहे. ते देखभाल दुरुस्तीचे काम केले आहे किंवा नाही याची खातरजमा करण्यात येईल त्याशिवाय बिले अदा केली जाणार नाहीत.

महापालिका सचिव :– प्रश्न क्र. १७ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

प्रश्न क्र. १७ :– उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील मिळकतींचे कर निर्धारण करुन मिळकतींना महापालिकेच्या कर विभागामार्फत कर पावत्या देणेत येत असतात. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवुन सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) सन २००२ ते आजतागायत उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर विभागाने किती मिळकतींचे कर निर्धारण केले आहे? त्यांची वर्षवार नाव व पत्त्यासहीत यादी मिळावी. तसेच वरील कालावधी कर निर्धारण केलेल्या मिळकत धारकांत इमारतीमध्ये राहणारे मिळकत धारक किती आहेत? त्यांचीही नाव पत्त्यासहीत यादी मिळावी.

उत्तर :– सन २००२ ते आजतागायत कर निर्धारण केलेल्या रहिवाशी इमारतीची व त्यात राहणा–या रहिवाशांची नाव व पत्त्यासह यादी सोबत जोडत आहे व सीडी देण्यात येत आहे.

**यादी या अगोदर सीडीत देण्यात आलेली आहे.**

सदस्य श्री. धनंजय बोडारे :– ठिक आहे.

महापालिका सचिव :– प्रश्न क्र. १८ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

प्रश्न क्र. १८ :– उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील मिळकतींचे कर निर्धारण करुन मिळकतींना महापालिकेच्या कर विभागामार्फत कर पावत्या देणेत येत असतात. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवुन सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) आजतागायत उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर विभागाने किती व्यापारी मिळकतींचे कर निर्धारण केले आहे? व्यापारी वापरासाठीचे कर निर्धारण केलेल्या सन २००२ ते आजतागायतचे वार्षिक उत्पन्न किती आहे? त्यांची नाव व पत्त्यासहीत यादी मिळावी. तसेच वरील कालावधी कर निर्धारण केलेल्या व्यापारी मिळकत धारकांत इमारतीमध्ये व्यवसाय करणारे मिळकत धारक किती आहेत? त्यांचीही नाव पत्त्यासहीत यादी मिळावी.

उत्तर :– सन २००२ ते २००६ पर्यंत कर निर्धारण करण्यात आलेल्या मालमत्तांचा मिळकतधारकाचे नाव व पत्यासह यादी सोबत जोडत आहे व सीडीत देण्यात येत आहे.
अ) आजतागायत उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीनुसार एकुण १.५१ लक्ष मालमत्तावर कर आकारणी करण्यात आलेली आहे.
ब) २००२ ते आजतागायत कर निर्धारण केलेल्या मिळकतीचे उत्पन्न ३,५८,२५,३१२ एवढे आहे.
सन २००२–२००३ पासुन अनिवासी (व्यापारी) कर निर्धारण केलेल्या मिळकतधारकांचे नाव व पत्त्यांसह यादी सोबत जोडत आहे व सीडीमध्ये देण्यात येत आहे.
क) एखादी इमारत अनिवासी वापराकरीता कर निर्धारणात करण्यात आली त्या संपूर्ण इमारतीस अनिवासी दर कर लावण्याचे सदर इमारतीत किती गाळे वापरात आहेत किंवा नाहीत याबाबतची माहिती देता येत नाही. रिकाम्या सदर मिळकत धारकांकडुन कर आकारणी केली जाते. त्यामुळे रिकाम्या गाळयापासुन महापालिकेचे कमी होत नाही.

**यादी या अगोदर सीडीत देण्यात आलेली आहे.**

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:–** ठिक आहे.

**महापालिका सचिव :–** प्रश्न क्र. १९ हा श्री. दिलीप गायकवाड यांचा आहे.

६ **प्रश्न क्र. १९ :–** उल्हासनगर महानगरपालिके अंतर्गत कार्यालयीन कामकाज करणेसाठी संगणक खरेदी करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणे बाबत.
प्र.क्र. १ अ) कार्यालयीन कामकाज करणेसाठी आजतागायत महानगरपालिकेने किती संगणक खरेदी केले आहे? त्यापैकी किती संगणक चालू व किती संगणक बंद स्थितीत आहेत? सदरचे संगणक नादुरुस्त झाले होते का? किती वेळा? प्रत्येक वेळी दुरुस्तीसाठी किती खर्च आला? सदर संगणकांची सद्यस्थिती काय आहे? सार्वत्रिक निवडणूक–२००७ चे वेळी किती संगणक खरेदी करण्यात आले? सद्या ते संगणक कोणत्या विभागासाठी वापरण्यात येत आहेत? त्यांची सद्यस्थिती काय आहे?

उत्तर :– १) उल्हासनगर महानगरपालिकेने आजतागायत एकुण ९८ संगणक खरेदी केलेले आहेत (सोबत विभागवार यादी जोडली आहे.)
२) संगणकाची ३ वर्षे वॉरन्टी कालावधी असून वॉरन्टी कालावधी संपलेल्या संगणकाची वार्षिक देखभाल दुरुस्ती संबंधित निविदाकारामार्फत करण्यात येते.
३) संगणक नादुरुस्तीबाबत विविध विभागांकडुन येणा–या दुरुस्ती कॉलची रजिस्टरमध्ये नोंदणी पाहता संगणकाची हाताळणी योग्य पध्दतीने न केल्यामुळे, संगणकामधील वायर्स उंदिरांनी कुरतडल्यामुळे तसेच विदयुत पुरवठयातील सततच्या चढउतारामुळे संगणक नादुरुस्त होतात.
नगररचना व विदयुत विभागातील प्रत्येकी एक संगणकाच्या वायर्स उंदिरांनी कुरतडल्यामुळे व सततच्या होणा–या विदयुत प्रवाहाच्या कमी जास्त दाबामुळे संगणकामधील प्रोसेसर व मदरबोर्ड हे खराब (Physical Damage) होवून नादुरुस्त झालेले आहेत. सदर संगणकांच्या दुरुस्तीपोटी येणारा खर्च हा नविन संगणक खरेदी रक्कमेच्या तुलनेत असल्यामुळे सदरचे खराब संगणक हे भांडार विभागात डेड स्टॉक करुन ठेवण्यात आलेले आहेत. उप महापौर कार्यालयातील प्रिंटरच्या वायरी उंदरांनी पुर्णपणे कुरतडलेल्या आहेत. त्याचप्रमाणे लेखा परिक्षण विभागाचा प्रिंटर, विदयुत विभागाचा प्रिंटर, सार्वजनिक बांधकाम विभागाचा प्रिंटर, नगररचना विभागाचा प्रिंटर हे दुरुस्त होण्यापलिकडचे असल्याने भांडार विभागात डेड स्टॉक करुन ठेवण्यात आलेले आहेत. सामान्य प्रशासन विभागातील एका संगणकाचे पॉवर सप्लाय शॉर्ट सर्किट होवून नादुरुस्त झाल्यामुळे समतुल्य मॉडेलचा पॉवर सप्लाय नविन बसविणेकामी निविदाकारास कळविलेले आहे.
४) संगणकाचे ३ वर्षे वॉरन्टी असल्यामुळे व संगणकासाठी वार्षिक देखभाल दुरुस्तीचे कॉन्ट्रक्ट असल्यामुळे देखभाल दुरुस्तीचा संपुर्ण खर्च हा निविदाकारामार्फत करण्यात येतो. तथापि संगणकाचे उंदरामुळे झालेले नुकसान वार्षिक देखभाल दुरुस्तीमध्ये समाविष्ट नाही.
५) सार्वत्रिक निवडणुक २००७ साठी ४ संगणक (प्रिंटर विना) खरेदी करण्यात आलेले असुन विभागीय मागणीनुसार सदयस्थितीत ते प्रभाग समिती क्र. ३ (सा.बां.वि.) कर्मचारी नियुक्ती शाखा, लेखा परिक्षण विभाग तसेच एका संगणकावर शासनाच्या आदेशाप्रमाणे विवाह नोंदणी संगणक ॲप्लीकेशन सॉप्टवेअर व डेटाबेस शासनामार्फत लोड करण्यात आलेला आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:— ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. २० हा श्री. दिलीप गायकवाड यांचा आहे.

६ प्रश्न क्र. २० :— उल्हासनगर महानगरपालिके अंतर्गत आजारी नागरीकांना हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यासाठी रुग्णवाहिका तसेच मयत नागरीकांचे शव नेण्यासाठी शव वाहिनी खरेदी करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.
प्र.क्र. १ अ) आजारी नागरीकांना हॉस्पीटलमध्ये दाखल करणेसाठी महानगरपालिकेने किती रुग्णवाहिका खरेदी केल्या आहेत? त्यापैकी किती रुग्णवाहिका चालू व किती बंद स्थितीत आहेत? सदरच्या रुग्णवाहिका नादुरुस्त झाल्या होत्या का? किती वेळा? प्रत्येक वेळी दुरुस्तीसाठी किती खर्च आला? सदर रुग्णवाहिकांची सद्यस्थिती काय आहे?
ब) मयत नागरीकांचे शव नेण्यासाठी महानगरपालिकेने किती शववाहिन्या खरेदी केल्या आहेत? त्यापैकी किती शववाहिन्या चालू व किती बंद स्थितीत आहेत? सदरच्या शव वाहिन्या नादुरुस्त झाल्या होत्या का? किती वेळा? प्रत्येक वेळी दुरुस्तीसाठी किती खर्च आला? सदर शववाहिन्यांची सद्यस्थिती काय आहे?

उत्तर :— अ) आजारी नागरीकांना हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यासाठी तत्कालीन नगरपालिकेने सन १९८७ साली रुग्णवाहिका खरेदी केलेली आहे. ती चालु स्थितीत आहे. सदरची रुग्णवाहिका ज्या ज्या वेळी नादुरुस्त झाली त्या त्या वेळी ती दुरुस्त केली आहे. आज पर्यंत रुग्णवाहिका दुरुस्तीसाठी रुपये ७,१४,४४६ खर्च करणेत आलेला आहे.

ब) मयत नागरीकांचे शव नेण्यासाठी तत्कालीन नगरपालिकेने एक शववाहिनी सन १९८७ साली खरेदी केली आहे. शववाहिनी डिसेंबर २००३ पासुन बंद आहे. सदरची शववाहिनी ज्या ज्या वेळी नादुरुस्त झाली त्या त्या वेळी ती दुरुस्त केली आहे. शववाहिनी दुरुस्तीसाठी रुपये ६,५९,८४९/— खर्च करणेत आलेला आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:— मा. महापौर , मा. उप—महापौर, मा. आयुक्त साहेब, याठिकाणी मी अति महत्वाचा प्रश्न विचारला आहे. आजारी नागरीकांना हॉस्पीटलमध्ये दाखल करणेसाठी महानगरपालिकेने किती रुग्णवाहिका खरेदी केल्या आहेत? त्यापैकी किती रुग्णवाहिका चालू व किती बंद स्थितीत आहेत? सदरच्या रुग्णवाहिका नादुरुस्त झाल्या होत्या का? किती वेळा? प्रत्येक वेळी दुरुस्तीसाठी किती खर्च आला? सदर रुग्णवाहिकांची सद्यस्थिती काय आहे? याबाबतीत उत्तर असे देण्यात आले आहे की, आजारी नागरीकांना हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यासाठी तत्कालीन नगरपालिकेने सन १९८७ साली रुग्णवाहिका खरेदी केलेली आहे. ती चालु स्थितीत आहे. सदरची रुग्णवाहिका ज्या ज्या वेळी नादुरुस्त झाली त्या त्या वेळी ती दुरुस्त केली आहे. आज पर्यंत रुग्णवाहिका दुरुस्तीसाठी रुपये ७,१४,४४६ खर्च करण्यांत आलेला आहे. या रुग्णवाहिकेच्या बाबतीत मला असे सांगायचे आहे की, गेल्या २० वर्षापासुन रुग्णवाहिका नादुरुस्त आहे. केव्हाही कुठल्याही नागरीकांने, नगरसेवकांने फोन केला तर ती गॅरेजमध्ये आहे असे उत्तर मिळते. त्यासाठी आपल्याला अशी विनंती आहे की, २० वर्षापासुन रुग्णवाहिका नादुरुस्त आहे ती एकतर लिलावात काढण्यात यावी आणि नविन घेण्यात यावी. त्या अनुषंगाने या महापालिकेच्या हद्दीतील सर्व नागरीकांना, गोरगरीबांना त्या रुग्णवाहिकेचा फायदा कसा होईल? याची दखल या ठिकाणी घेतलेली नाही. ती दखल घेण्यात यावी. त्याचप्रमाणे शववाहिनीबाबत याठिकाणी असे उत्तर देण्यात आले आहे की, मयत नागरीकांचे शव नेण्यासाठी तत्कालीन नगरपालिकेने एक शववाहिनी सन १९८७ साली खरेदी केली आहे. शववाहिनी डिसेंबर २००३ पासुन बंद आहे. सदरची शववाहिनी ज्या ज्या वेळी नादुरुस्त झाली त्या त्या वेळी ती दुरुस्त केली आहे. शववाहिनी दुरुस्तीसाठी रुपये ६,५९,८४९/— खर्च करणेत आलेला आहे. मा. आयुक्त साहेब, याठिकाणी मला आपल्या असे निदर्शनास आणुन दयायचे आहे की, एवढया रक्कमेमध्ये नविन रुग्णवाहिका येवु शकतात. परंतु १९८७ पासुन एकही रुग्णवाहिका किंवा शववाहिका खरेदी करण्यात आलेली नाही. माझी आपणांस विनंती आहे की एक नविन रुग्णवाहिका व शववाहिका खरेदी करण्यात यावी. या दोन्ही गाडयांसाठी गेल्या काही वर्षामध्ये लाखो रुपये खर्च करण्यात आले आहेत परंतु तरीही त्या गाडया कधीही उपलब्ध नसतात. त्यांची सेवा नागरीकांना मिळालेली नाही अशी माझी याठिकाणी तक्रार आहे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—सन्माननिय सदस्याने जी सूचना दिली आहे तिचा समावेश या अर्थसंकल्पात करण्यात येईल.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—यास पुरक असा माझा एक प्रश्न आहे. काही दिवसापुर्वी साधारणत: एक वर्ष झाले असेल टाईम्स ऑफ इंडियामध्ये उल्हासनगरबाबत एक लेख छापुन आला होता. त्यामध्ये असे लिहिले होते की

ही महानगरपालिका अशी आहे जिच्याकडे शववाहिनी नाही. त्यावर विधानपरिषदेचे मा. उप–सभापती श्री. वसंत डावखरे यांनी आपल्या निधीतुन एक शववाहिनी घेण्याचा प्रस्ताव दिला होता. तो प्रस्ताव कुठपर्यंत पोहोचला? त्यावेळेस आयुक्त साहेब आपण नव्हतात परंतु उप–आयुक्त वगैरे होते. तर त्या प्रस्तावाचे काय झाले?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाशी पाठपुरावा करण्यात येईल. आणि आपण जी सुचना दिली आहे तिच्यासंदर्भातील अहवाल पुढील सभेत ठेवण्यात येईल. जिल्हाधिकारी कार्यालयाशी पाठपुरावा करावा लागतो. आमदार निधीचे जे पैसे असतात ते जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वितरित होत असतात. कदाचित पाठपुरावा झाला नसेल. आम्ही पाठ पुरावा करु आणि जिल्हाधिकारी कार्यालयातुन आलेली माहिती सभागृहापुढे सादर करु.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>आयुक्त साहेब, याच्याशी पुरक प्रश्न आहे. अर्थसंकल्पामध्ये तरतुद करण्याविषयी काल तुमच्या कार्यालयामध्ये चर्चा झाल्याप्रमाणे की अग्निशमन दलास सुध्दा आपणांस चांगल्याप्रकारे सज्ज केले पाहिजे. मी परवाच तुम्हांस अनुभव कथन केला आहे. आग लागल्यानंतर होणारी जवानांची हालत, त्यांना अवजारांची होणारी अपुरी व्यवस्था, पाण्याची बोंबाबोंब त्यासाठी प्रत्येक ठिकाणी टॅपिंग आणि टॅकरची व्यवस्था झाली पाहिजे जेणेकरुन ती गाडी पाहिजे तेथेच थांबले नाही तर तेथुन गेल्यानंतर पुन्हा आग भडकेल. त्यासाठी गाडी तेथेच उभी राहिली पाहिजे व तिला पाणी पुरवठा त्याठिकाणी झाला पाहिजे. त्यासाठी अग्निशमन दलाला टॅकरची व्यवस्था आणि चांगल्याप्रकारच्या बकेटवाली गाडीची व्यवस्था झाली पाहिजे. एखादया इमारतीला जर आग लागली असेल तर खालुन आग विझवत जावे लागते. खालुन मार्ग मिळाला तरच ते वर जावु शकतात. यासाठी सिडीवाली जर एखादी गाडी असेल तर लवकर आग विझविता येईल. आणि या गाडीबरोबर पाण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. २१ हा श्रीमती वसुधा बोडारे यांचा आहे.

६

<u>प्रश्न क्र. २१ :–</u> उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना, व्यापा–यांना, सामाजिक संस्थांना व अन्य यांना नळजोडण्या मंजुर करुन त्यांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.
प्र.क्र. १ अ) आजतागायत उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने किती नळजोडण्या मंजूर केल्या आहेत? व्यापारी वापरासाठीचे नळजोडण्या किती? सन २००२ ते आजतागायतचे सदर नळजोडण्यांचे वार्षिक उत्पन्न किती आहे?

<u>उत्तर :–</u> उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा विभागामार्फत खालीलप्रमाणे नळजोडण्या माहे मे २००७ पर्यंत मंजुर केल्या आहेत.

१. घरगुती नळजोडण्या एकुण ५२४३२
२. व्यापारी वापरासाठी मंजुर नळजोडण्या एकुण २७९०

सन २००२ ते माहे मे २००७ पर्यंतचे वार्षिक उत्पन्न खालीलप्रमाणे

| | (आकडे कोटीत) |
|---|---|
| सन २००२–०३ | रु. ११.४० |
| सन २००३–०४ | रु. ११.६९ |
| सन २००४–०५ | रु. ८.२१ |
| सन २००५–०६ | रु. ७.४० |
| सन २००६–०७ | रु. ७.३८ |

<u>सदस्या श्रीमती वसुधा बोडारे:–</u> मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त सो., यांना मला असे विचारायचे आहे की, पाण्याबद्दल त्यांनी जे वार्षिक उत्पन्न दिले आहे त्याची २००२ सालची आकडेवारी ११ कोटी ४० लाख अशी आहे. नंतर २००३ ला ११ कोटी ६९ लाख म्हणजे २० लाखांनी वाढली. परंतु त्यानंतर २००४, २००५, २००६ ला ती आकडेवारी कमी–कमी होत गेली आहे. तर त्याच्या मागची कारणे काय आहेत? निदान पाणी पट्टी वाढली नाही तर तेवढीच राहायला हवी होती. परंतु ती कमी का झाली? याचे मला उत्तर हवे. आणि व्यापारी वापरासाठी ज्या नळजोडण्या दिल्या आहेत त्या २७९० तर एमएससीबीच्या माहितीप्रमाणे व्यापारी नळजोडण्या ज्या आहेत त्या ३५२१७ आहेत. तसेच कर विभागामध्ये व्यापारी संकुलन ३२११९ आहे. म्हणजे जवळ जवळ ३० हजाराची तफावत होते? मग ते व्यापारी पाण्याचा वापर करत नाहीत काय? त्यांच्याकडे

निदान ४—५ कर्मचारी तरी असतील. म्हणजे त्यांना थोडेफार तरी पाणी लागत असेलच. मग एवढी तफावत का? म्हणजेच सर्व्हे करण्यामध्ये आपले कुठेतरी चुकत आहे. म्हणुन या अर्थसंकल्पाच्यावेळी अशा व्यापा—यांना मिळकत करामध्ये जर काही पाण्याची रक्कम समाविष्ट केली तर आपल्या अर्थसंकल्पामध्ये वाढ होवु शकेल. यासाठी त्याचा तरी सर्व्हे व्यवस्थित करावा. धन्यवाद।

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—सन्माननिय सदस्यांच्या सुचनेची या अर्थसंकल्पामध्ये दखल घेतली जाईल.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. २२ हा श्रीमती मिनाताई सोनेजी (सोंडे) यांचा आहे.

?

प्रश्न क्र. २२ :— उल्हासनगर महानगरपालिका सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत एक प्रकल्प अधिकारी व सहा समुह संघटक मानधनावर कार्यरत आहते त्यांची मुदत दि. १७.६.२००७ रोजी संपुष्ठात येत असुन प्रत्यक्ष मात्र फक्त प्रकल्प अधिकारी कृ. दिपमाला श्रीमंत गोपाळे यांनाच मुदत वाढ देण्यात आल्याचे समजते. वास्तविक पाहता सादर करण्यात आलेला कामाचा अहवाल व उद्दीष्ट, साध्य ही सर्व समुह संघटकांनी काम केल्यामुळे पूर्ण झालेले असुन मुदतवाढ ही फक्त कु. दिपमाला श्रीमंत गोपाळे व संजीवनी अमृतसागर, समुहसंघटक यांनाच देण्यात आली आहे का? की सर्व समुह संघटकाना देण्यात आली आहे? याबाबत महासभेत चर्चा होवून सुचक समाधानकारक माहिती मिळावी ही विंनती.

उत्तर :— सुवर्ण जयंती शहरी रोजगार अंतर्गत प्रकल्प अधिकारी म्हणुन कु. दिपमाला श्रीमंत गोपाळे व समुह संघटक कु. संजिवनी अमृतसागर यांची मुदत दिनांक १७/६/२००७ रोजी संपणार होती. त्यानुसार त्यांना एक दिवसाचा खंड देवुन पुढील मुदत वाढ देण्यात आली आहे. पाच समुह संघटकांना मुदत संपण्याच्या अगोदर त्यांचा प्रस्ताव मा. आयुक्त यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:— मान्यता दिली आहे काय? किती कालावधीसाठी दिली आहे? तसेच सुवर्ण जयंतीचे जे काम आहे ते समाधानकारक नाही. तर त्याचे पर्यवेक्षण कोणाच्या हातात आहे ते आम्हांला सांगा. धन्यवाद ।

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त):— सन्माननिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब हा जो प्रश्न विचारला गेला आहे तो सन २००६—०७ सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे जे काम आहे ते फक्त २२ टक्के झालेले आहे. तसेच त्याचे जे पर्यवेक्षण आहे त्यामध्ये १ प्रकल्प अधिकारी, ६ समुह संघटक आहेत. आणि त्यांच्यावर उप—आयुक्त म्हणुन मी काम पाहत आहे.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:— साहेब, हे जे २२ टक्के काम झालेले आहे ते तुम्हांला वाटते का समाधानकारक आहे म्हणुन?

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त):— नाही, त्यामध्ये जे नागरी रोजगार व मुलभुत सुविधा या घटकामधील जो खर्च आहे त्यातुन कोणताच निधी खर्च झालेला नाही. त्यामुळे हा पेंडींग बॅकलॉग जास्त दिसतो.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—मग याच्यापुढे काम कसे होणार?

श्री. (उप—आयुक्त):— ते सन २००७ आणि २००८ हे जे वर्ष आहे त्यामध्ये १०० टक्के काम कसे होईल त्यासाठी आतापासुनच नियोजन केलेले आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. २३ हा श्रीमती लता निकम यांचा आहे.

६

प्रश्न क्र. २३ :— प्रभाग क्र. ६३ मधील महात्मा फुले कॉलनी येथुन वाहणा—या नाल्यावर श्री. घाटविसावे ते श्री. टपाल यांचे घरापर्यंत अंदाजे ७०—८० फुटापर्यंत नाल्यावर स्लॅब टाकुन नाला बंदिस्त केला आहे. दरम्यान मध्ये एकही चेंबर ठेवलेले नाही. नाल्याच्या मधुन पिण्याचे पाण्याचे पाच—सहा पाईप आडवे गेले आहेत. त्यामुळे पाईपला नाल्यातुन येणारे प्लॅस्टीक, कचरा अटकुन तेथे कच—याचा ढिग तयार होतो व

पाणी पुढे सरकत नाही. पाणी मागे साचत जावुन मागे नाल्याच्या कडेला राहणारे श्री. चव्हाण, श्री. दिनेश गोगी, श्री. गंगावने, श्री. जामजिक, श्री. भंडारे व इतर यांच्या घरात पाणी साचते. पाणी बराच वेळ अडकल्याने दुर्गंधी पसरते. रोगराई होण्याची शक्यता आहे. सफाई कामगारांना स्लॅबखाली उतरावे लागते. एखादा सफाई कामगार गुदमरुन मरण्याची शक्यता आहे. या संदर्भात निर्माण होणा—या पुढील प्रश्नांची उत्तरे मिळावीत ही विनंती.

अ) पाणी पुरवठा व आरोग्य विभागातील अधिकारी—कर्मचारी यांना वारंवार सांगूनही अदयाप पाईप कापले गेले नाहीत, कुणाचा दबाव आहे का?
आ) पाईप कापल्यानंतर कचरा नाल्यातून व्यवस्थित वाहून जाईल असे आपणांस वाटत नाही का?
इ) रोगराई उद्‌भवलयास जबाबदार कोण राहील?
ई) कामगार कचरा काढतांना गुदमरुन मयत झाल्यास जबाबदार कोण राहील?
उ) नाल्याखालून आडवे गेलेले पाईप अधिकृत आहेत काय?
ऊ) असल्यास, अडथळा आल्यास महानगरपालिका ते काढु शकत नाही का?
ए) आपण पाईप केव्हा काढणार आहात?

<u>उत्तर :—</u> अ) सदर ठिकाणी असलेल्या नाल्यावर बांधकाम विभागामार्फत स्लॅब टाकण्यात आला आहे. या स्लॅब खालून जाणारे पाईप काढणेबाबत सुचना दिल्या आहेत.
आ) होय, कचरा वाहून जाईल असे वाटते.
इ) रोगराई उद्‌भवू नये या करीता सदरचे पाईप काढणेबाबत सुचना दिल्या आहे.
ई) नाला साफ करतांना अपघात होवु नये या करीता सदरच्या नाल्यावरील स्लॅबवर मॅनहोल ठेवणेबाबत संबंधीत बांधकाम विभागास पाणी पुरवठा विभागामार्फत कळविण्यात आले आहे.
उ) होय
ऊ) होय, अडथळा आल्यास महानगरपालिका ते काढु शकते.
ए) पाईप काढणेबाबत सुचना दिल्या आहेत. सदर नाल्याखालील पाईप काढण्यात आले आहेत.

**<u>सदस्या श्रीमती लता निकम :—</u>** ठिक आहे.

**<u>महापालिका सचिव :—</u>** प्रश्न क्र. २४ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

**<u>प्रश्न क्र. २४ :—</u>** उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागा अंतर्गतच्या नागरीकांना पाणी पुरवठा करणेसाठी शहरात विविध ठिकाणी पंप बसविण्यात आले असून सदर पंपावर पंपचालक पदी कर्मचारी कार्यरत आहेत. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक, सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.
प्र.क्र. १ अ) उल्हासनगर पाणी पुरवठा योजना चालविणेसाठी शहरात किती पंपींग स्टेशन बांधण्यात आली आहेत? सदर पंपाचे पत्ते व त्यात वापरण्यात आलेल्या पंपांची अश्वशक्ती किती आहे? सदर पंपींग स्टेशन किती पाळयात चालविण्यात येतात. आस्थापना सुचीप्रमाणे किती पंपचालकाची आवश्यकता आहे? किती पंपचालक कार्यरत आहेत? किती पंपचालकाची पदे रिक्त आहेत? कधी पासून सदरची पदे रिक्त आहे? सदरीच रिक्त पदे भरण्यासाठी पाणी पुरवठा विभागाने पत्रव्यवहार करुन कळविले आहे का? कळविले असल्यास सदर पत्राच्या प्रती मिळाव्यात. पंपचालकांची पदे भरणे बाबत मान्यता मिळाली आहे का? मान्यता मिळाली नसल्यास कारणे काय? उल्हासनगरमधील पंपींग स्टेशन चालविण्याचा ठेका देण्यात आला होता का? आजतागायत किती वेळा ठेका देण्यात आला आहे? कोणास ठेका देण्यात आला आहे? त्याची मुदत संपृष्टात आली आहे का? कधी संपृष्टात आली आहे? त्यानंतर त्यांना किती देयके अदा करण्यात आली आहेत? त्यांची रक्कम किती आहे? कुठल्या आधारे सदर रक्कम अदा करण्यात आली? अन्य कर्मचा—यांकडुन पंपचालकाचे काम करुन घेण्यात येत आहे का? असल्यास त्याची कारणे काय आहेत? पंपचालक कमी पडत असल्यास नविन नियुक्त्या करण्यात येतील? पंपचालक पदावर कार्यरत सर्व कर्मचा—यांची नावे देण्यात यावीत. (महापालिका कर्मचारी व ठेकेदारी पध्दतीत काम करणारे कर्मचारी)

<u>उत्तर :—</u> एकुण २२ पंपिंग स्टेशन्स बांधण्यात आलेली आहेत.
सदर सर्व पंपिंग स्टेशनची माहिती पाणी पुरवठा विभगाात उपलब्ध आहे.
आस्थापना सुचीप्रमाणे मंजुर पदे २१ आहेत.
१२ पंपचालक कार्यरत आहेत.
९ पदे रिक्त आहेत.
पाणी पुरवठा योजना हस्तांतरीत झाल्या पासुन पदे रिक्त आहेत.

नाही.
——
——
होय
पाणी पुरवठा विभागाकडे उपलब्ध असलेल्या पंपचालकांद्वारे नेताजी चौक, आनंदनगर, हिल लाईन, पटेलनगर व गांधी नगर ही पंपिंग स्टेशन चालविण्यात येतात व उर्वरीत पंपिंग स्टेशन ठेका पध्दतीद्वारे चालविण्यात येतात. उपलब्ध असलेलया माहिती वरुन योजना हस्तांतरीत करण्यापुर्वी पासुन ठेका देण्यात येत आहे.
सध्या मे. कल्पतरु इंजिनिअर्स, मुंबई यांना ठेका देण्यात आलेला आहे.
नाही.
सदर ठेकेदाराची कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दिनांक १६/९/२००५ पर्यंत होती. परंतु निविदेतील अटी व शर्तीनुसार नविन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत जुन्या ठेकेदाराकडुन काम करुन घेण्यात येत आहे.
मुळ मुदत संपल्यानंतरच्या कालावधीची देयके अदयाप अदा केलेली नाही.
——
——
नाही
महत्वाच्या पंपिंग स्टेशन करीता मंजुर पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल.
सदर सर्व कर्मचा—यांची माहिती पाणी पुरवठा विभागात उपलब्ध आहे.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:— </u>ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. २५ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

६

<u>प्रश्न क्र. २५ :—</u> उल्हासनगर शहरात अनधिकृत बांधकामे होवू देवू नयेत असे मा. उच्च न्यायालयाचे आदेश असतांना उल्हासनगर शहरात बिनदिक्तपणे अनाधिकृत बांधकामे होत आहेत. संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी अश्या अनाधिकृत बांधकामांना पाठीशी घालून संरक्षण देत असल्याचे निदर्शनास येत आहे व यामुळेच शहरात अनाधिकृत बांधकामांना पाठीशी घालून संरक्षण देत असल्याचे निदर्शनास येत आहे व यामुळेच शहरात अनाधिकृत बांधकामे होत आहेत. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक, सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.
प्र.क्र. १ अ) भगवानदास हॉस्पीटलचे मागे, तळमाळा अधिक एक माळयाचे आर.सी.सी. बांधकाम करण्यात आले असून श्री. मनोज जगवानी, भुमाफीया यास सदर बांधकामास महापालिकेने निवासी वापरासाठी बांधकाम परवानगी दिली आहे. परंतू संबंधिताने दिलेल्या बांधकाम परवानगी प्रमाणे निवासी वापर न करता बांधकामातील वरच्या मजल्याचा वापर व्यापारी तत्वासाठी करीत आहे. याचाच अर्थ अनाधिकृतपणे, बेकायदेशीरपणे महापालिकेच्या आदेशाविरुध्द संबंधित व्यक्ती बांधकामाचा वापर करीत असल्याने महापालिकेने दिलेली परवानी रद्द का केली नाही? सदरची बांधकाम परवानगी रद्द करणार आहे का? सदर बांधकामास पुर्णत्वाचा दाखला दिला आहे का?

<u>उत्तर :—</u> भगवानदास हॉस्पीटलच्या मागे तळमजला अधिक एक मजला आरसीसी चे बांधकाम उल्हासनगर महानगरपालिका नगररचना विभागाकडुन सुधारीत बांधकाम प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/११६/०२/१०३, दिनांक २७/४/२००७ नुसार चालु करण्यात आले आहे. त्यानंतर बांधकामधारक श्री. भगवानदास आगीचा यांचेमार्फत श्री. मनोज जगवानी, कुलमुखत्याधारक प्लॉट नं. १२३३,१२३४ भा १२३५ उल्हासनगर—५ यांना दिनांक ६/६/२००७ रोजी प्रभाग कार्यालयात जा.क्र. उमपा/अ.बा.निवि/यु.पो. ०४/०५/०७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२,५३ व ५४ अन्वये नोटिस बजावण्यात आली आहे. नोटिसीची मुदत संपल्यानंतर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
सदर इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर विना परवानगी वाणिज्य वापर सुरु असल्याचे निदर्शनास आल्यावर सदरची परवानगी दिनां ५/४/२००७ रोजीच्या पत्रान्वये ना मंजुर करण्यात आलेली होती. तसेच पहिल्या मजल्यावरील बांधकाम निष्कासित करण्यात आलेले होते. तद्नंतर त्याचा रिटेंशन नकाशा दि. २७/४/२००७ रोजी मंजुर करण्यात आलेला आहे. व त्यास अदयापपर्यंत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यात आलेला नाही.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:— </u>ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. २६ हा श्री. बी.बी.मोरे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २६ :–</u> प्र.क्र. १) सन २००७ च्या उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत एकुण कोणकोणत्या पक्षाचे नगरसेवक निवडुन आले आहेत?
२) कोणकोणत्या पक्षाचे गटनेते आहेत?
३) कोणकोणत्या गटनेत्यांना महानगरपालिकेने कॅबिन दिल्या आहेत?
४) कॅबिन देण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहेत की मा. महापौरांना आहेत?
५) आता अस्तित्वात असलेल्या सर्व कॅबिन मा. आयुक्तांच्या परवानगीने दिलेल्या आहेत का? तारखेनुसार तपशिल दयावा.
६) एकुण राजकिय पक्षांना अधिकृतपणे किती कॅबीन दिल्या आहेत?
७) दिनांक ५ एप्रिल, २००७ नंतर प्रत्येक कॅबीनवर किती खर्च करण्यात आला? तपशिल दयावा.

<u>उत्तर</u> :– १) सन २००७ च्या उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत एकूण ७५ पालिका सदस्य निवडून आले आहेत त्यांची नावे दिनांक ६ एप्रिल, २००७ च्या शासकिय राजपत्रात प्रसिध्द करण्यांत आली आहेत त्या राजपत्राची प्रत प्रत्येक पालिका सदस्यास महापालिका सचिवांकडुन प्रस्तृत करण्यांत आली असून ती पुन्हा प्रस्तृत करणे आवश्यक वाटत नाही.
२) लोकभारती, शिवसेना, भाजपा, कॉंग्रेस, मनसे, राकापा, आरपीआय
३) अदयापपर्यंत गटनेत्यांना कॅबिन वाटप करण्यात आलेले नाही.
४) कॅबिन वाटप करण्याचे अधिकारी मा. आयुक्तांना आहेत.
५) अदयापपर्यंत एकही कॅबिन वाटप करण्यात आलेले नाही.
६) मा. आयुक्त यांचेकडे प्रस्ताव सादर केलेनंतर मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
७) ५ एप्रिल,२००७ नंतर खाली नमुद केलेल्या केबीनवर खर्च करण्यात आला.
१) आर.पी.आय. कार्यालय (आठवले गट) – ४,०००/–
२) सभागृह नेता यांचे कार्यालय – ४०००/–
३) राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी गटनेता कार्यालय – ४०००/–
४) आर.पी.आय. कार्यालय (गवई गट) – ४,०००/–

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u> मा. महापौरजी, माझा प्रश्न असा आहे की, सन २००७ च्या उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत एकुण कोणकोणत्या पक्षाचे नगरसेवक निवडुन आले आहेत? कोणकोणत्या पक्षाचे गटनेते आहेत? कोणकोणत्या गटनेत्यांना महानगरपालिकेने कॅबिन दिल्या आहेत? कॅबिन देण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहेत की मा. महापौरांना आहेत? आता अस्तित्वात असलेल्या सर्व कॅबिन मा. आयुक्तांच्या परवानगीने दिलेल्या आहेत का? तारखेनुसार तपशिल दयावा. एकुण राजकिय पक्षांना अधिकृतपणे किती कॅबीन दिल्या आहेत? दिनांक ५ एप्रिल, २००७ नंतर प्रत्येक कॅबीनवर किती खर्च करण्यात आला? तपशिल दयावा.

<u>महापालिका सचिव :–</u>मुख्यालयातील जागा वाटपाबाबत मा. आयुक्त यांच्या तर्फे चार सदस्यीय समिती स्थापन करण्यांत आलेली आहे. उप–आयुक्त(मालमत्ता), महापालिका सचिव, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता अशा चार सदस्यीय समित्याची रचना तयार करण्यांत आली आहे. त्यांना एका आठवडयात प्लान तयार करुन अहवाल दयायचा आहे की कोणकोणती कॅबिन कोणा–कोणाला दयायची आहे. व जागेचा वापर कश्याप्रकारे करायचा आहे?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मा. सचिव साहेब, मला तर असे वाटते की या सभेचे कामकाज ठिक आहे आपण बघता चांगली गोष्ट आहे. परंतु महापौरांनी याठिकाणी उत्तर दयावे अन्यथा आयुक्त साहेबांनी दयावे. या प्रश्नाचे उत्तर आज मिळायला हवे. यासाठी मी अर्ज देखील दिलेला आहे. त्या अर्जाचे उत्तर ही समिती जी नेमली जाईल त्याच्याने माझे समाधान होते किंवा होत नाही ही पुढची गोष्ट आहे.

परंतु आज महासभेत मी जो प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाचे उत्तर मा. आयुक्तांनी किंवा मा. महापौरांनी येथे दयावे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. आयुक्त साहेब, मी येथे कॅबिन विषयी एक पत्र दिले होते की, जोपर्यंत कॅबिनचे वाटप होत नाही तोपर्यंत कॅबिन सिल करण्यात याव्यात. कारण वारंवार ही कॅबिन याची आहे, त्याची आहे असे होत आहे. आज आमच्या पत्रकार बंधुना कॅबिन देवुन त्यांची कॅबिन सिल करण्यात आली अशी चुक होवुन जाते. एक वेळ कॅबिन देवुन परत घेणे. ही मोठी खेदाची गोष्ट आहे एकतर पत्रकारांना एक कॅबिन दया नाहीतर सर्वांच्या कॅबिन बंद करा म्हणजे एक साथ कॅबिनचे वाटप करता येईल.

सदस्य श्री. बी.बी. मोरे:—मा. सदस्य, मी प्रश्न विचारला आहे, माझ्या प्रश्नाचे उत्तर त्यांना देवु दया. तुम्ही देवु नका. ज्यावेळेस तुम्हांला सांगण्याची वेळ येईल तेव्हा तुम्ही सांगा. मला जरा त्यांना विचारु दया.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):— सन्माननिय सदस्यांनी कॅबिन वाटपासंदर्भात प्रश्न विचारला आहे. खरे म्हणजे यांचे उत्तर प्रशासनाने देण्याऐवजी सभागृहाने त्यावर विचार करण्याची गरज आहे असे बोलले तर वावगे ठरु नये.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—नाही, नाही. मी सहमत नाही.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—या कामी आपण समितीची स्थापना केली आहे, सर्व जे गटनेते आहेत त्यांची संख्या किती आहे? याबाबत इतर महानगरपालिकेमध्ये कोणती कार्यपध्दती अवलंबिली जाते? याचा अभ्यास करुन समिती अहवाल देईल त्यानुसार कार्यवाही करु. आणि सात दिवसाची मुदत दिली आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे:—मान्यता कुठे आहे? समितीचे तर अदयाप अस्तित्वच नाही आहे. आपण मौखिक सांगितलेले आहे. एक समिती नेमु आणि दहा दिवसानंतर मी त्याचा उलगडा करेन. एवढेच उत्तर तुमच्याकडुन देण्यात आले होते. त्यावेळी आम्ही सांगितले होते की आम्ही तुम्हांला भेटण्यासाठी आणि अर्ज देण्यासाठी आलो आहोत. त्यावेळी या संदर्भात आम्हांला तुमच्याकडुन तेवढेच उत्तर मिळालेले आहे. मी हा जो प्रश्न विचारलेला आहे तो वर्तमानपत्रामध्ये गाजला आहे, आजच्या हमारा महानगर ......................

काही सदस्य :—हमारा सामना......

सदस्य श्री. बी.बी. मोरे :— त्या वर्तमानपत्रामध्ये एक मोठी बातमी छापुन आलेली आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :— ते गाजविण्याचे काम तुम्हीच केलेले आहे. बेकायदेशीर अतिक्रमण तुम्हीच केलेले आहे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—या संदर्भामध्ये विचारलेल्या प्रश्नाला सभागृहापुढे मा. पीठासीन अधिका—यांच्या परवानगीने उत्तर सादर करीत आहे. या संदर्भात एका समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. समितीचा अहवाल ज्यावेळेला प्राप्त होईल त्यावेळेला सर्व कार्यवाही करण्यात येईल असे उत्तर पीठासीन अधिका—यांच्या मान्यतेने सभागृहाला देत आहे.

महापालिका सचिव:—प्रश्न संपले प्रश्नोत्तराचा कालावधीही संपला.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—तुम्ही याचे उत्तर दिले पाहिजे. सचिव साहेब एक मिनिट. माझ्या प्रश्नाचे हे योग्य प्रकारे उत्तर देत नाहीत. मला माझ्या प्रश्नाचे योग्य असे उत्तर मिळालेच पाहिजे. महासभेमध्ये उत्तर का मिळत नाही?

**महापालिका सचिव :–**स्थगन प्रस्ताव ज्याचे सुचक आहेत श्री. सुरेश जाधव व अनुमोदक आहेत श्री. प्रशांत धांडे त्यांनी आपला स्थगन प्रस्ताव मांडावा.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**सचिव साहेब, मी काय म्हणत आहे?

**महापालिका सचिव :–**आपण मा.महापौरांना संबोधुन प्रश्न विचारु शकता. मी थेट आपल्या प्रश्नाचे उत्तर देवु शकत नाही.

**सदस्य श्री.बी.बी.मोरे :–**माझ्या प्रश्नाचे मा. महापौरांनी उत्तर दिले पाहिजे ना? येथे तर मी असे पाहत आहे की, सहा महिने झाले. आमच्या महापौर एक शब्द सुध्दा बोलत नाहीत.

**उप–महापौर :–**मा. महापौरांच्या परवानगीने मी बोलत आहे. आयुक्त साहेबांनी सांगितले की, सात दिवसांच्या आत तुम्हांला उत्तर मिळेल. आता प्रश्नोत्तराचा तास संपला असे घोषित करण्यात आले आहे. तरी तुम्ही बोलत आहात. सचिव साहेब, पुढील कार्यवाही चालु करा.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**उप–महापौर या नात्याने तुम्हांला विनंती आहे की ज्यावेळेला सभागृहामध्ये महापौर नसतील तेव्हाच तुम्ही उत्तर दिले पाहिजे.

**उप–महापौर :–**मा. मोरे साहेब, मा. महापौरांच्यावतीने उत्तर देण्यात आले आहे. त्यांचा मान ठेवा.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–**मा. महापौरांच्यावतीने उत्तर देण्यात आलेले आहे.

**उप–महापौर :–**मा. मोरे साहेब, मा. महापौरांच्यावतीने उत्तर देण्यात आले आहे. त्यांचा मान ठेवा.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :–**श्री. मोरे सो. तुम्हांला उत्तर दिलेले आहे. तुम्ही खाली बसा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**महापौरांच्या परवानगी उप–महापौर बोलतात. त्यांना तुम्ही थांबवु नका. त्यांना थांबविण्याचा अधिकार फक्त महापौरांना आहे. तुम्हांला ऐकायचे असेल तर ऐका.

**सदस्य श्री.बी.बी.मोरे:–**ज्यावेळी आमच्या सन्माननिय महापौर सभागृहात नसतील त्यावेळी आमचे उप–महापौर उत्तर देवु शकतील.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे:–**सन्माननिय सदस्यास मा. महापौर आणि आयुक्तांनी उत्तर दिलेले आहे.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :–**मा. महापौरांना विचारुन आपणांस उत्तर दिले आहे.

**उप–महापौर :–**मा. महापौरांच्या आदेशाने मी उत्तर दिले आहे. आणि सचिव साहेब सभेची पुढील कार्यवाही सुरु करा.

**महापालिका सचिव :–**सन्माननिय सदस्य श्री. सुरेश जाधव आपण आपला स्थगन प्रस्ताव मांडावा.

स्थगन प्रस्ताव याप्रकारे आहे......................

---

## स्थगन प्रस्ताव

सुचकाचे नाव :– श्री. सुरेश मधुकर जाधव

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रशांत धांडे

विषय :— ''अन्न विभाग शासनाकडुन महापालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत''

महाराष्ट्र शासनाने उल्हासनगर नगरपरिषदचे अन्न विभाग सप्टेंबर, १९९४ मध्ये नगरपालिकेकडुन काढून शासनाकडे देण्यात आलेले आहे.

त्यानंतर ऑक्टोंबर, १९९६ मध्ये नगरपरिषदेचे महापालिकेत रुपांतर झाल्यानंतर तत्कालीन मा. आयुक्त सो. यांनी अन्न विभाग महापालिकेकडे हस्तांतरीत करावे, यासाठी दिनांक २७/५/१९९७, २/५/१९९९, २८/४/२०००, २०/६/२००० व ४/७/२००० रोजी शासनास कळविले आहे. परंतु आजपर्यंत अन्न विभाग शासनाकडून महापालिकेकडे हस्तांतर झालेले नाही.

शहरातील दुकानदारांना अन्न परवाने मिळणे, अन्न परवाने, नुतनीकरण करणे इत्यादी कामे शासनाचे कार्यालय ठाणे येथून करण्यास त्रास होतो. अन्न व औषध विषयक तक्रारीवर त्वरीत निवारण होत नाही. शहरात मिठाईची, थंड पेये बनविणारे/विकणारे, हॉटेल्स, उपहारगृहे, चहाची दुकाने इत्यादी अंदाजे १००० पेक्षा जास्त असून अन्न विभाग महापालिकेच्या अखत्यारित असल्यास त्यापासुन अंदाजे महापालिकेस १५ ते २० लाख रुपये उत्पन्न होवू शकते.

---

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब आणि सर्व सन्माननिय सदस्य .............

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u>आणि दुसरी गोष्ट .......

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>अहो प्रश्नोत्तराची वेळ संपली आता. आता आम्हांला बोलु दया.

<u>उप—महापौर :—</u>प्रश्नोत्तराची वेळ संपली आहे. मोरे साहेब आता तुम्ही बसुन घ्या.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—</u>मा. महापौर महोदया, श्री.बी.बी. मोरे यांच्या प्रश्नाचे उत्तर दिले जावे. उप—महापौरांनी कुठपर्यंत उत्तरे दयायची? महापौरांनीही उत्तरे दयावीत ना? महापौर नसतील तेव्हा गोष्ट वेगळी आहे.

<u>उप—महापौर :—</u>महापौरांच्या आदेशानेच मी बोलतो आहे. तुम्हांला माहित आहे काय नियम काय आहेत? महापौरांनी आदेश दिल्यानंतर मी बोलत आहे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>अहो प्रश्नोत्तराची वेळ संपली आहे ना?

<u>उप—महापौर :—</u>मा. सचिव साहेब, तुम्हांला नियम काय आहे तो सांगतील.

<u>सदस्य श्री.बी.बी.मोरे :—</u>मा. महापौर जर आपले आसन सोडुन जातात तेव्हा उप—महापौर उत्तर देवु शकतात.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. आयुक्त साहेब, नगरपालिकेकडुन महाराष्ट्र शासनाने सन १९९४ मध्ये अन्न विभाग आपल्या ताब्यात घेतला आहे. त्यानंतर आपल्या महानगरपालिकेने २७/५/१९९७, २/५/१९९९७, १९/२/१९९९, २८/४/२००० त्यानंतर २०/६/२००० व ४/५/२००० रोजी शासनाकडे वारंवार पत्र देवुन अन्न विभाग महानगरपालिकेकडे देण्याकामी विनंती केली आहे. तरीही शासनाने आतापर्यंत अन्न विभाग आपल्याकडे स्वाधिन केलेले नाही. त्यासाठी मी व माझे मित्र श्री. प्रशांत धांडे यांनी महासभेपुढे स्थगन प्रस्ताव ठेवला आहे. माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की शहराच्या विकासासाठी आणि व्यापा—यांना सुखसोयी मिळण्यासाठी अन्न विभाग शासनाकडुन महानगरपालिकेच्या ताब्यात घ्यायला पाहिजे. त्यासाठी येथे सर्वानुमते ठराव पारीत करुन तो शासनाकडे पाठविला पाहिजे. यापुर्वीचे आयुक्त मा. श्री. कांबळे साहेबांनी मागील महिन्यामध्ये एक प्रस्ताव पाठविलेला आहे. यासाठी सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, हा ठराव सर्वानुमते पारित करुन अन्न विभाग शासनाकडुन महापालिकेकडे हस्तगत करावे. अशी मागणी करुन आपल्या शहरातील

जे दुकानदार आहेत, हॉटेल्स आहेत यांना सुखसुविधा मिळण्यासाठी अन्न विभाग महापालिकेकडे हस्तांतरीत झाला पाहिजे.  अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>याबाबत मा. आयुक्तांना अशी विनंती असेल की, याला पाठपुरावा झाला पाहिजे. कारण की येथिल लोकांना अन्न परवाना मिळविण्यासाठी ठाणे येथे जावे लागते. व आता आपली महानगरपालिका असल्यामुळे अन्न विभाग आपल्याकडे असला पाहिजे.  यासाठी माझी आपणांस विनंती आहे की, आपण या प्रस्तावाचा पाठपुरावा केला तर बरे होईल नाहीतर शासनाकडुन अन्न विभाग आपणांस सहजासहजी हस्तांतरीत होणार नाही.

<u>मा. महापौर :–</u> स्थगन प्रस्तावाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

**विषय :–** 'अन्न विभाग' शासनाकडून महापालिकेकडे हस्तांतरीत करणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासनाने उल्हासनगर शहर, नगरपालिका असतांना नगरपालिकेकडे असलेला 'अन्न विभाग ' शासनाने काढून घेतला आहे.

परंतु इतर महानगरपालिकेकडे महापालिकेचे स्वतंत्र 'अन्न विभाग' आहेत. स्वतःचे अन्न निरिक्षक, कर्मचारी/अधिकारी कार्यरत आहेत. त्यामुळे शहरातील हॉटेल मध्ये अन्न विषबाधा झाल्यास त्वरीत कार्यवाही करण्यात येते. तसेच सदर दुकानांचे परवाने, दाखले महापालिकेकडून दिले जात असल्याने महापालिकेचे उत्पन्नात वाढ होते.

उल्हासनगर महानगरपालिकेकडे 'अन्न विभाग' नसल्याने शहरातील नागरीकांना/व्यवसायिकांना व्यवसायाबाबतचे नविन परवाने, दाखले तसेच परवान्यांच्या नुतनीकरणासाठी ठाणे येथिल कार्यालयात जावे लागते.

तरी उल्हासनगर शहातील नागरीकांच्या/व्यवसायीकांच्या हिताच्या व सोयीच्या दृष्टीने व तसेच महापालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी 'अन्न विभाग' महापालिकेकडे हस्तांतरीत होणेसाठी शासनास पत्र व्यवहार करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरची कार्यवाही करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे. तरी 'अन्न विभाग' शासनाकडून महापालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत शासनाशी पत्रव्यवहार करण्यास अनुमती मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र</u>. २५** **<u>दिनांक :– २९/६/२००७</u>**

सुचकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :–प्रशांत धांडे

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर शहरात नागरिकांना/व्यवसायिकांना व्यवसायाबाबतचे अन्नपरवाने, दाखले तथा परवाने नुतनीकरणासाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राकरीता अन्न अनुज्ञापक प्राधिकारी नियुक्त करणे व त्यांची अधिसूचना काढणे बाबत शासनाकडे जोरदार मागणी करित आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—**मा. महापौर, मा. उप—महापौर, मा. आयुक्त साहेब, जनसंपर्क अधिकारी श्री. युवराज भदाणे यांच्या बाबतीत मागच्या महासभेत बहुमताने ठराव पारीत झालेला आहे. तो शासनाकडे आपल्या सहीनिशी पाठविला आहे किंवा नाही हे या ठिकाणी सांगितले तर बरे होईल. कारण की सात—सात महिलांचा विनयभंग केलेल्या व्यक्तीला या महासभेत ठेवु नये अशी आम्ही आपणांस विनंती केली होती. तर त्या ठरावाचे पुढे काय झाले? त्याची माहिती सभागृहाला दिली जावी.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:—**मा. आयुक्त साहेब, आता श्री. भदाणे यांचा जो विषय आहे. त्यास मागील महासभेत आम्ही विरोध केल्यानंतर यांनी पारित केला आहे. परंतु पुढील कारवाई जी आहे ती आयुक्त जाणे आणि कारवाई जाणे. तो विषय झाल्यानंतर पुन्हा महासभेत उपस्थित करणे. या शुल्लक विषयासाठी महासभेची वेळ घेणे बरोबर नाही.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—**अशा विनयभंग केलेल्या व्यक्तीला तुम्ही सहन कराल काय? या महापालिकेत अजिबात सहन केले जाणार नाही. त्याच्यावर कारवाई काय झाली आहे त्याचे उत्तर याठिकाणी पाहिजे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**त्याचा पाठपुरावा आयुक्त साहेब करतील.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—**सभागृहाला याचे उत्तर कळले पाहिजे, याची माहिती झाली पाहिजे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

**सदस्या श्रीमती मालती करोतिया:—**मा. महापौरजी, सचिव साहेब व आयुक्त साहेब, श्री. भदाणे यांचा विषय जुना झाला आहे त्याकडे आपण लक्ष का देत नाहीत? हा महिलांवर अत्याचार आहे. श्री. भदाणे यांनी जो महिलांवर अत्याचार केला आहे तो आम्ही सहन करणार नाही. त्यास कामावरुन काढुन टाकले जावे.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—**श्री. भदाणे यांनी सहा सात महिलांवर अत्याचार केला आहे.

**सदस्या श्रीमती मालती करोतिया:—**श्री. भदाणेंवर कारवाई चालु आहे का? असा कोणता अधिकारी आहे हा महापालिकेचा? हा महिलांवर अत्याचार आहे, जुलुम आहे. त्यास कामावरुन काढुन टाका. आम्ही सुध्दा महिला आहोत.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

**उप—महापौर :—**सभागृहात सुध्दा महिला वर्ग आहे. ज्या महानगरपालिकेत महिलांवर अत्याचार होतो..........

**सदस्या श्रीमती मालती करोतिया :—** श्री. भदाणे काय आहे ते आम्हांला माहित आहे. महिलांच्या साडया पाहण्याचा, त्यांची विचारपुस करण्याचा त्यांना काय अधिकार आहे. ते जनसंपर्क अधिकारी आहेत. त्यांनी त्यांचे काम करावे.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—**श्री. भदाणे यांच्या बाजूने बोलणा—यांनी त्यांच्याकडुन पैसे घेतले आहेत म्हणुन ते त्यांच्याबाजुने बोलत आहेत.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**त्यांची कुठपर्यंत चौकशी झाली याचा खुलासा व्हावा.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मागील महासभेचे दिनांक २०/४/२००७ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

---

**महापालिका सचिव :—**यामध्ये दोन चुका आहेत पुष्ठ क्र. ३० वर श्रीमती सुमन शेळके यांच्या जागी श्रीमती लता निकम यांच्या नावाची नोंद झाली आहे. त्याची दुरुस्ती करायची आहे तसेच पृष्ठ क्र. ४१ वर श्री. चंदर साधवानी असे नाव लिहिण्यात आले आहे. तेथे श्री. चंदर बेलानी अशी दुरुस्ती करायची आहे. संगणकीय चुक आहे. ठिक आहे? पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** मागील सभेचे दिनांक २०/४/२००७ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. २ :—**मागील महासभेचे दिनांक २०/४/२००७ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचक : श्री. मोहन साधवानी

अनुमोदक : श्री. राजु जग्यासी

**महासभा ठराव क्र. २५ अ** **दिनांक : २९/६/२००७**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक २०/४/२००७ रोजीच्या महासभा इतिवृत्तांताच्या पृष्ठ क्र. १ ते ६२ मधील पृष्ठ क्र. ३० वर सदस्या श्रीमती लता निकम या नावाच्या नोंदीच्या ठिकाणी सदस्या श्रीमती सुमन शेळके व पृष्ठ क्र. ४१ वरील अनु.क्र. ६ वर श्री. चंदर साधवानी या नावाच्या नोंदीच्या ठिकाणी श्री. चंदर बेलानी अशी दुरुस्ती करुन उर्वरीत इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३:—वृक्षप्राधिकरणाची पुर्नस्थापना करणे.**

---

**महापालिका सचिव :—**सर्व पक्षांच्या गटनेत्यांच्यावतीने आप—आपल्या पक्षाच्या सदस्यांची नावे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

**शिवसेनेच्या वतीने**

१. श्री.राजेश देवेंद्र वानखेडे
२. श्रीम. मीना सोनेजी (सोंडे)
३. श्री. दिलीप गायकवाड
४. श्रीम. ज्योती माने

**भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वतीने**

१. श्रीम. रजनी महाडीक

**भारतीय जनता पार्टीच्या वतीने**

१. श्री. लाल पंजाबी
२. श्री. जमनु पुरस्वानी

**आरपीआयच्या वतीने**

१. श्री. बी.बी. मोरे

**लोकभारतीच्या वतीने**

१. श्री. राजू इदनानी
२. श्री. विनोद ठाकूर
३. श्री. अंकुश म्हस्के
४. श्रीम. मोना वनवारी

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने**

१. श्री. राजू जग्यासी
२. श्रीम. सुरेखा वेलकर
३. श्रीम. निलू चांदवानी

ही पंधरा नावे आहेत. ठिक आहे?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, वृक्षप्राधिकरणाची जी पुर्नरचना झाली आहे त्याविषयाबाबत मी बोलु इच्छितो की, या अगोदर जे वृक्षप्राधिकरण होते मा. आयुक्त साहेबांनी शहरातील वृक्षांची गणना करण्याबाबत सांगितलेले होते. परंतु मागील सहा महिन्यामधील कालावधी पाहिला तर पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल किंवा वृक्षगणनेचा अहवाल महासभेपुढे आणलेला नाही. तर लवकरात लवकर वृक्षप्राधिकरणाची बैठक बोलावुन हे जे विषय अर्धवट राहिले आहेत ते पुर्ण केले पाहिजेत.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे? पास?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ३ :—** वृक्षप्राधिकरणाची पुर्नस्थापना करणे.

<u>प्रस्तावना</u>

सन—२००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७५ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. त्या सदस्यांमधुन महापालिकेच्या वृक्षप्राधिकरणावर १५ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १७ | १६ | ११ | ६ | ५ | २ | १ |

| | |
|---|---|
| ७५ / १५ | ऋ ५.०० |

वृक्षप्राधिकरणाच्या एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण— ५.०० असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | लोकभारती | १७<br>—— X १५<br>७५ | = ३.३९ | (५) | कॉंग्रेस | ६<br>—— X १५<br>७५ | = १.०२ |
| (२) | शिवसेना | १७<br>—— X १५<br>७५ | = ३.३९ | (६) | आरपीआय | ५<br>—— X १५<br>७५ | = ०.९९ |
| (३) | रा.का.पा. | १६<br>—— X १५<br>७५ | = ३.१९ | (७) | म.न.से. | २<br>—— X १५<br>७४ | = ०.३९ |
| (४) | भाजपा | ११<br>—— X १५<br>७५ | = २.१९ | (८) | अपक्ष | १<br>—— X १५<br>७५ | = ०.१९ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय खालील नेमणूका करण्यात येतील.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | कॉंग्रेस | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ३ | ३ | २ | १ | १२ |

यानंतर रिक्त राहणा—या तीन जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल.

त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

(१) लोकभारती ०.३९ (२) शिवसेना ०.३९ (३) रा.का.पा. ०.१९
(४) भा.ज.पा. ०.१९ (५) कॉंग्रेस ०.०२ (६) आरपीआय ०.९९
(७) म.न.से ०.३९ (८) अपक्ष ०.१९

वरील परिस्थिती पहाता लोकभारती, शिवसेना आणि आरपीआय या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे त्यामुळे तीन रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे वृक्षप्राधिकरणावर प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| लोकभारती | शिवसेना | रा.का.पा. | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | ३ | २ | १ | १ | ० | ० | १५ |

<u>महासभा ठराव क्र:</u> २६ <u>दिनांक : २९/६/२००७</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिका नागरी क्षेत्रासाठी खालीलप्रमाणे वृक्षप्राधिकरणाची पुर्नस्थापना करीत आहे.

आयुक्त —— सभापती
उल्हासनगर महानगरपालिका

१. श्री. राजू इदनानी सदस्य
२. श्री. विनोद ठाकूर —’’—
३. श्री. अंकुश म्हस्के —’’—
४. श्रीम. मोना वनवारी —’’—
५. श्री. राजेश वानखेडे —’’—
६. श्रीम. मीना सोनेजी (सोंडे) —’’—
७. श्री. दिलीप गायकवाड —’’—
८. श्रीम. ज्योती माने —’’—
९. श्री. लाल पंजाबी —’’—
१०.श्री. जमनु पुरस्वानी —’’—
११.श्रीम. रजनी महाडीक —’’—

१२.श्री. बी.बी. मोरे —''—
१३.श्री. राजू जग्यासी —''—
१४.श्रीम. सुरेखा वेलकर —''—
१५.श्रीम. निलू चांदवानी —''—

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :— प्रभाग समित्यांची पुर्नस्थापना करणे.**

---

काही सदस्य :—पास—पास......

महापालिका सचिव :—कोणता प्रस्ताव पास? जो प्रशासनाकडुन आला आहे तो?

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—सचिव साहेब, त्यामध्ये ब—याचशा चुका आहे. आम्हांला जो गोषवारा देण्यात आला आहे त्यात प्रभाग समिती क्र. २ व ३ मध्ये १८—१८ प्रभाग दर्शविले आहेत. व मागील महासभेत प्रभाग क्र. ५४ बाबत श्रीमती सुमन शेळके यांनी हरकत घेतली होती की त्यांचा प्रभाग, प्रभाग समिती क्र. २ मध्ये होता तो प्रभाग समिती क्र. ३ मध्ये कसा टाकला. हा त्यांचा प्रश्न बरोबर आहे. म्हणुन या गोषवा—यामध्ये काही सुधारणा केल्या पाहिजेत. यासाठी आम्ही एक समांतर प्रस्ताव दिलेला आहे. प्रभाग समिती क्र. १ जीचे कार्यालय गौल मैदान येथे आहे. त्यानुसार प्रभाग क्र. १,२, ३, ४, ५, ६, १५, १४, १६, १७, १८, १९, २०, २१, २४, २५, ३६, ३७, ३८ हे १९ प्रभाग आहेत.

प्रभाग समिती क्र. २ मध्ये सुध्दा १९ प्रभाग आहेत. या समितीचे कार्यालय यात्री निवास येथे आहे. आणि यामध्ये प्रभाग क्र. १२, १३, २२, २३, २६, ३०, ३२, ३३, ३४, ३५, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, आणि ५४, प्रभाग क्र. ५४ बाबत श्रीमती सुमन शेळके यांची जी हरकत होती की ५४ क्र. प्रभाग, प्रभाग समिती क्र. २ मध्ये होता तो प्रभाग समिती क्र. ३ मध्ये घेण्यात आलेला आहे. भौगोलिक दृष्टया तो प्रभाग समिती क्र. २ मध्येच घ्यावयास पाहिजे.

प्रभाग समिती क्र. ३ यामध्ये ७, ८, ९, १०, ११, २७, २८, २९, ३१, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५६, ५८, आणि ५९.

प्रभाग समिती क्र. ४ यामध्ये ५५, ५७, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, आणि ७६ अशा ४ प्रभाग समित्या आहेत. प्रत्येक प्रभाग समितीमध्ये १९—१९ प्रभाग भौगोलिक दृष्टया प्रत्येकाला कार्यालय जवळ पडेल आणि सलगता या दृष्टीने अगोदरच्या प्रशासनाने ज्या चुका केल्या होत्या त्या सुधारुन आम्ही पुरक प्रस्ताव देत आहोत. तो माझ्या मते सर्वानुमते मंजुर होईल त्यामध्ये कोणतेही दुमत नसावे. अगोदरच्या प्रस्तावामध्ये सुधारणा केलेली आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—श्री. सन्माननिय महापौरजी, प्रभाग समितीबाबतचा प्रस्ताव सन्माननिय बोडारे साहेबांनी वाचुन दाखविला. त्यामध्ये ५४ क्रमांकाचा जो प्रभाग आहे हा श्रीमती सुमन गजानन शेळके यांचा आहे. आणि त्यांनी मागील वेळेस मा. आयुक्त साहेबांना पत्र दिले आहे. आणि महासभेमध्ये तो प्रश्न देखील आलेला होता. त्यावर चर्चा झालेली आहे. आणि असे उत्तर देण्यात आलेले आहे की पास करु. भौगोलिक परिस्थिती न पाहता हा प्रभाग, प्रभाग समिती क्र. ३ मध्ये टाकण्यात आलेला आहे. प्रभाग समिती यासाठी तयार केली जाते की, ....................

सदस्य श्री. मोहन साधवानी:— मोरे साहेब, दुरुस्ती झालेली आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**सचिव साहेब, पहिल्या प्रस्तावामध्ये सुधारणा करुन दुस–या प्रस्तावानुसार प्रभाग रचना करण्यात यावी.

**<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:–</u>**मोरे साहेब, आपली तब्येतच बिघडली वाटते?

**<u>महापालिका सचिव :–</u>** ठिक आहे? पास? श्री. धनंजय बोडारे साहेबांनी जो प्रस्ताव प्रस्तावित केला आहे तो ठिक आहे ना? तो सर्वांना मान्य आहे?



**<u>महापौर :–</u>** सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ४:–** प्रभाग समित्यांची पुर्नस्थापना करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची पहिली सार्वत्रिक निवडणूक १९९७ मध्ये झाली होती. त्या निवडणूकीमध्ये महानगरपालिकेमध्ये ६९ पालिका सदस्य निवडून आले होते. तसेच त्यावेळी बहुसंख्य प्रभागाची रचना झालेली नव्हती. त्यावेळी त्या परिस्थितीप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) अन्वये लागुन असलेल्या प्रभागांच्या समावेश असलेल्या ४ प्रभाग समित्या महासभा ठराव क्र. ३ दिनांक २१/४/२००१ प्रमाणे स्थापन करण्यात आल्या होत्या. दुसरी सार्वत्रिक निवडणूक २००२ मध्ये झाली आहे. महापालिकेत सध्या एकंदर २५ बहुसंख्य प्रभाग आहेत आणि निवडून आलेल्या पालिका सदस्यांची संख्या ७६ आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) प्रमाणे शहरातील लोकसंख्येच्या आधारे ४ प्रभाग समित्यांची पुर्न:स्थापना करणे आवश्यक आहे. म्हणुन लागून असलेल्या प्रभागांचा समावेश असलेल्या चार प्रभाग समित्यांची पुर्न:स्थापना करणेस प्रस्तावित करणेत येत आहे.

| अ. क्र | प्रभाग समिती कार्यालय | प्रभाग क्रमांक | एकूण प्रभाग | समाविष्ट भाग |
|---|---|---|---|---|
| १ | गोल मैदान | १,२, ३, ४, ५, ६, १५, १४, १६, १७, १८, १९, २०, २१, २४, २५, ३६, ३७, ३८ | १९ | सेन्च्यूरी रेयॉन, धोबी घाट, कमला नेहरु नगर, फक्कड मंडली, रमाबाई आंबेडकर नगर, झुलेलाल मंदीर, बेवस चौक, भारत चौक, गोलमैदान, चोपडा कोर्ट, सी. ब्लॉक, शहाड स्टेशन, |
| २ | यात्री निवास | १२, १३, २२, २३, २६, ३०, ३२, ३३, ३४, ३५, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ५४ | १९ | नेहरू चौक, शिरूचौक, बालकनजी बारी, शासकीय रूग्णालय, कामगार रूग्णालय, टाऊन हॉल, राधास्वामी सत्संग हॉल, चांदीबाई कॉलेज, वडोल गाव, उल्हासनगर रेल्वे स्थानक (पश्चिम), इंदिरा गाधी भाजी बाजार, शिवाजी चौक, सपना गार्डन, महानगरपालिका |
| ३ | व्ही.टी.सी. मैदान | ७, ८, ९, १०, ११, २७, २८, २९, ३१, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५६, ५८, ५९, | १९ | सी–ब्लॉक, शांतीनगर, उद्योग विहार, विठ्ठलवाडी रेल्वे स्थानक, ॲडमिनिस्ट्रेटेड ऑफीस, पवई चौक, उल्हासनसगर रेल्वे स्थानक (पूर्व), लालचक्की चौक, सेक्शन २५ ते सेक्शन ३०, सतरामदास रूग्णालय, व्ही.टी.सी. स्पोर्टस कॉम्प्लेकस, |
| ४ | पाणी पुरवठा | ५५, ५७, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७६ | १९ | मराठा सेक्शन, सुभाष टेकडी, कानसई रोड, कुर्ला कॅम्प, कैलाश कॉलनी, स्वामी शांती प्रकाश आश्रम, दुधनाका, साई वसणशाह दरबार, निजधाम आश्रम, गांधी रोड, ओमकारानंद आश्रम, नेताजी हायस्कूल, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ७३, ७४, ७५, ७६ | | प्रभात चौक, व्हिनस सिनेमा चौक |

महासभा ठराव क्र: २७ दिनांक : २९/६/२००७

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

हीे महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या लागुन असलेल्या अंतर्भुत प्रभागांच्या समावेशाप्रमाणे ४ प्रभाग समित्यांची पुर्नरचना करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :—विशेष समित्यांची स्थापना करणे.**

---

महापालिका सचिव :—मला आपणा सर्वांना सूचना दयायची आहे. नियमानुसार ८ समित्या स्थापन करायच्या आहेत. आपणाकडुन नऊ समित्यांबाबत प्रस्ताव आला आहे. तर याबाबत आपण काय करु इच्छित आहात?

सदस्य श्री. मोहन साधवानी :—नऊ समित्या स्थापन केल्या पाहिजेत. या अगोदर सुध्दा नऊ समित्या होत्या आता सुध्दा नऊ समित्या स्थापन केल्या जाव्यात.

महापालिका सचिव:—सर्व गटनेत्यांकडुन जी नावे प्रस्तावित करण्यात आली आहेत ती मी वाचुन दाखवितो.

## राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी

सार्वजनिक बांधकाम समितीसाठी

१. श्री. सतीश चहाळ

२. श्री. अनिल विद्यार्थी

नियोजन व विकास समिती

१. श्री. प्रभूनाथ गुप्ता

२. श्रीम. मंजू पोपटानी

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

१. श्रीम. सरोजिनी टेकचंदानी

२. श्री. भरत गंगोत्री

आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

१. श्री. नरेंद्रकुमार ठाकूर

२. श्री. सतीश चहाळ

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्रीम. सुजाता रिझवानी

२. श्री. हिरानंद जग्यासी

गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

१. श्री. रविंद्र बागूल

२. श्रीम. संगीता कंडारे

<u>क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती</u>

१. श्री. गणपत एडके

२. श्री. राजू जग्यासी

<u>महिला व बालकल्याण समिती</u>

१. श्रीम. सरोजिनी टेकचंदानी

२. श्रीम. निलू चांदवानी

<u>महसूल समिती</u>

१. श्री. रविद्र बागूल

२. श्री. प्रभूनाथ गुप्ता

## लोकभारती

<u>सार्वजनिक बांधकाम समितीसाठी</u>

१. श्री. अंकुश म्हस्के

२. श्री. सुरेश जाधव

<u>नियोजन व विकास समिती</u>

१. श्री. मोहनदास रामरख्यानी

२. श्रीम. चंद्रा टेकचंदानी

<u>पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती</u>

१. श्री. अंकुश म्हस्के

२. श्री. गोविंदराम लुंड

<u>आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती</u>

१. श्रीम. चंद्रा टेकचंदानी

२. श्रीम. शिला मनसुलकर

<u>माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती</u>

१.श्री. दत्तात्रय पवार

२. श्रीम. मोना वनवारी

<u>गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती</u>

१. श्री. प्रशांत धांडे

२. श्री. भजनलाल रामचंदानी

<u>क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती</u>

१. श्रीम. ज्योती चैनानी

२. श्री. दिलीप जग्यासी

<u>महिला व बालकल्याण समिती</u>

१. श्रीम. कविता सिरवानी

२. श्रीम. निलीमा रावत

<u>महसूल समिती</u>

१. श्री. राजू इदनानी

२. श्री. विनोद ठाकूर

## आरपीआय

सार्वजनिक बांधकाम समितीसाठी

श्री. बी.बी. मोरे

नियोजन व विकास समिती

श्रीमती पंचशिला नाना पवार

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

श्रीमती लता शांताराम निकम

आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

श्रीमती सुमन शेळके

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

श्रीमती सुमन शेळके

सदस्या श्रीमती सुमन शेळके:—ही समिती नंतर घेतली जावी. श्री.बी.बी. मोरे साहेबांनी आम्हांला विश्वासात घेतलेले नाही.

गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

श्री. जनार्दन ढोके

महापालिका सचिव :—श्री.बी.बी. मोरेजी?

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

श्री. जनार्दन ढोके

महिला व बालकल्याण समिती

श्रीमती लता शांताराम निकम

महसुल समिती

श्रीमती पंचशिला पवार

तसेच महसूल समितीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस तर्फे दोन नावे सुचविण्यांत आलेली आहेत.

महसूल समिती

१. श्री. रवि बागुल
२. श्री. प्रभुनाथ गुप्ता

## भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वतीने

सार्वजनिक बांधकाम समितीसाठी

श्री. तुलसीदास वसिटा

नियोजन व विकास समिती

श्री. मोहन साधवानी

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

श्री. तुलसीदास वसिटा

आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

श्री. मोहन साधवानी

गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

श्री. सुंदर मंगतानी

महिला व बालकल्याण समिती

श्रीमती मालती करोतिया

सदस्या श्रीमती मालती करोतिया :—साहेब, मला या समित्या पसंत नाहीत. मला त्या नको आहेत.

सदस्य श्री. सुंदर मंगतानी :—मलाही नको आहे. ना मला सांगण्यात आले. ना मला या समित्या पाहिजेत.

महापालिका सचिव:— माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती:— श्रीमती इंदिरा उदासी,

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

श्रीमती रजनी महाडिक

महसूल समिती

श्रीमती मालती करोतिया

## भारतीय जनता पार्टीच्या वतीने

सार्वजनिक बांधकाम समितीसाठी

श्री. बच्चाराम रुपचंदानी

नियोजन व विकास समिती

श्रीमती शकुंतला पाटील

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

कुमारी शकुंतला जग्यासी

आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

डॉ. निना नाथानी

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

श्री. महेश सुखरामानी

गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

श्री. किशोर जग्यासी

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

श्री. जमनादास पुरस्वानी

महिला व बालकल्याण समिती

श्रीमती जया माखिजा

महसूल समिती

श्री. कुमार आयलानी

# शिवसेनेच्या वतीने

सार्वजनिक बांधकाम समितीसाठी

१. श्री. दिलीप गायकवाड
२. श्री. रामसागर यादव

नियोजन व विकास समिती

१. श्री. मुकेश तेजी
२. श्री. राजेश वानखेडे

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

१. श्री. शेखर यादव
२. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

१. श्री. विजय खंडु सुपाळे
२. श्रीमती बेबी नंदु भोईर

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्रीमती जयश्री सुर्वे
२. श्रीमती राजश्री चौधरी

गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

१. श्री. प्रधान पाटील
२. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

१. श्री. शेखर यादव
२. श्री. प्रधान पाटील

महिला व बालकल्याण समिती

१. श्रीमती मिनाताई सोनेजी
२. श्रीमती ज्योती श्याम माने

महसूल समिती

१. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे
२. श्रीमती विदया विजय निर्मले

आरपीआयच्या श्रीमती सुमन गजानन शेळके यांचे आक्षेप आहे की श्री. मोरे साहेब आपण त्यांना विचारले नाहीत.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :— त्यांना महसूल समिती दया.

सदस्या श्रीमती सुमन शेळके:—मला सार्वजनिक बांधकाम समिती पाहिजे नाहीतर कुठलीच समिती नको.

**<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>**आम्ही आमचा पक्ष बघुन घेवु.

**<u>महापालिका सचिव :–</u>**श्री. बी.बी. मोरेजी आपण लक्ष दया. आपल्या पक्षाच्या श्रीमती सुमन शेळके यांची या समितीसाठी इच्छा नाही तर आपण त्यांना जबरदस्ती करु शकत नाहीत. दुस–या कुणाचे नाव सांगा. दुस–या कुणाचे नाव सांगावे लागेल. सार्वजनिक बांधकाम समितीसाठी श्री.बी.बी. मोरे आपले नाव लिहिले आहे.

**<u>सदस्य श्री. जे.के. ढोके:–</u>**बांधकाम समितीसाठी श्री. बी.बी.मोरे साहेबांचे नाव लिहिले आहे त्याऐवजी श्रीमती सुमन शेळके यांचे नाव घेण्यात यावे. अशी मी सुचना करतो.

**<u>महापालिका सचिव :–</u>**श्रीमती सुमन शेळकेजी ठिक आहे? श्री. तुलसीदास वसिटाजी आपलेही दोन सदस्य समितीमध्ये समाविष्ट होवु इच्छित नाहीत त्याबाबत आपले काय म्हणणे आहे?

**<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया:–</u>**सार्वजनिक बांधकाम समितीमध्ये सदस्या म्हणुन जरी मला घेतले तरी चालेल. परंतु महिला बालकल्याण समिती नको आहे.

**<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>**आम्ही नंतर दुसरे नाव देवु.

**<u>महापालिका सचिव :–</u>**समिती तर आता बनत आहे ना? श्रीमती मालती करोतिया यांच्या नावात कॉंग्रेस पक्षाच्या वतीने फेरबदल करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम समितीत श्रीमती मालती करोतिया सदस्या असणार व तेथुन श्री. तुलसीदास वसिटा हे महसुल समितीवर येतील. तसेच श्री. नियोजन व विकास समितीत श्री. मोहन साधवानी आहेत त्यांच्या ऐवजी तेथे श्री. सुंदर (बाबु) मंगतानी हे येतील व ते त्यांच्या जागी जातील. ठिक आहे?

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>महापौर :–</u>** सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ५:–** विशेष समित्यांची स्थापना करणे.

<u>प्रस्तावना</u>

सन–२००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७५ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. या सदस्यांमधुन मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समित्यांची नेमणुक करता येईल व महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजाचे नियम ४ अन्वये खालील आठ समित्यांची नेमणुक करता येईल.

१. सार्वजनिक बांधकाम समिती

२. नियोजन व विकास समिती

३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

८. महिला व बालकल्याण समिती

प्रत्येक समितीत ९ सदस्यांची नियुक्ती करता येईल. महापालिकेच्या विशेष समितीवर ९ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या

किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १७ | १६ | ११ | ६ | ५ | २ | १ |

| | |
|---|---|
| ७५ | |
| ९ | ञ ८.३३ |

प्रत्येक विशेष समितीवर एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण— ८.३३ असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | लोकभारती | १७/७५ X ९ | = २.०३ | (५) | कॉंग्रेस | ५६/७५ X ९ | = ०.७२ |
| (२) | शिवसेना | १७/७५ X ९ | = २.०३ | (६) | आरपीआय | ५/७५ X ९ | = ०.५९ |
| (३) | रा.का.पा. | १६/७५ X ९ | = १.९१ | (७) | म.न.से. | २/७५ X ९ | = ०.२३ |
| (४) | भाजपा | ११/७५ X ९ | = १.३१ | (८) | अपक्ष | १/७५ X ९ | = ०.११ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय प्रत्येक समितीवर खालील नेमणूका करण्यात येतील.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | एकूण |
|---|---|---|---|---|
| २ | २ | १ | १ | ६ |

यानंतर रिक्त राहणा—या तीन जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल.

त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

(१) लोकभारती ०.०३ (२) शिवसेना ०.०३ (३) रा.का.पा. ०.९१ (४) भा.ज.पा. ०.३१
(५) कॉंग्रेस ०.७२ (६) आरपीआय ०.५९ (७) म.न.से ०.२३ (८) अपक्ष ०.१९

वरील परिस्थिती पहाता प्रत्येक समितीवर भाजपा, कॉंग्रेस व आरपीआय या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे व त्यामुळे तीन रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे विशेष समितीत प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| लोकभारती | शिवसेना | रा.का.पा. | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | २ | २ | १ | १ | १ | ० | ० | ९ |

<u>महासभा ठराव क्र:</u> २८ <u>दिनांक : २९/६/२००७</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजू जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार प्रत्येक विषय समितीवर नऊ पालिका सदस्यांचा समावेश असलेल्या खालील ९ विषय समित्यांची नेमणुक करीत आहे.

१. <u>सार्वजनिक बांधकाम समिती</u>

१. श्री. गोविंदराम लुंड

२. श्री. सुरेश जाधव

३. श्री. दिलीप गायकवाड

४. श्री. रामसागर यादव

५. श्री. बच्चाराम रूपचंदानी

६. श्रीम. मालती करोतीया

७. श्री. सतीश चहाळ

८. श्री. अनिल विद्यार्थी

९. श्रीम. सुमन शेळके

## २. नियोजन व विकास समिती

१. श्री. मोहनदास रामरख्यानी

२. श्रीम. चंद्रा टेकचंदानी

३. श्री. मुकेश तेजी

४. श्री. राजेश वानखेडे

५. श्रीम. शकुंतला पाटील

६. श्री. सुंदर मंगतानी

७. श्री. प्रभूनाथ गुप्ता

८. श्रीम. मंजू पोपटानी

९. श्रीम. पंचशिला पवार

## ३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

१. श्री. अंकुश म्हस्के

२. श्रीमती ज्योती चैनानी

३. श्री. शेखर  यादव

४. श्रीम. राजश्री चौधरी

५. कु. शकुंतला जग्यासी

६. श्री. तुलसीदास वसीटा

७. श्रीम. सरोजिनी टेकचंदानी

८. श्री. भरत गंगोत्री

९. श्रीम. लता निकम

## ४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

१. श्रीम. चंद्रा टेकचंदानी

२. श्रीम. शिला मनसुलकर

३. श्री. विजय सुपाळे

४. श्रीम. बेबी (नेहा) भोईर

५. डॉ. नीना नाथानी

६. श्री. मोहन साधवानी

७. श्री. नरेंद्रकुमार ठाकूर

८. श्री. सतीश चहाळ

९. श्रीम. सुमन शेळके

## ५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्री. दत्तात्रय पवार

२. श्रीम. मोना वनवारी

३. श्रीम. जयश्री सुर्वे

४. श्रीम. राजश्री चौधरी

५. श्री. महेश सुखरामानी
६. श्रीम. इंदीरा उदासी
७. श्रीम. सुजाता रिझवानी
८. श्री. हिरानंद जग्यासी
९. श्री. बी.बी. मोरे

## ६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

१. श्री. प्रशांत धांडे
२. श्री. भजनलाल रामचंदानी
३. श्री. प्रधान पाटील
४. श्री. राजेंद्रसिह भुल्लर
५. श्री. किशोर जग्यासी
६. श्री. मोहन साधवानी
७. श्री. रविंद्र बागूल
८. श्रीम. संगीता कंडारे
९. श्री. जनार्दन ढोके

## ७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

१. श्रीम. ज्योती चैनानी
२. श्री. दिलीप जग्यासी
३. श्री. शेखर यादव
४. श्री. प्रधान पाटील
५. श्री. जमनु पुरस्वानी
६. श्रीम. रजनी महाडीक
७. श्री. गणपत एडके
८. श्री. राजू जग्यासी
९. श्री. जनार्दन ढोके

## ८. महिला व बालकल्याण समिती

१. श्रीम. कविता सिरवानी
२. श्रीम. निलीमा रावत
३. श्रीम. मिना सोनेजी (सोंडे)
४. श्रीम. ज्योती माने
५. श्रीम. जया माखिजा
६. श्रीम. मालती करोतीया
७. श्रीम. सरोजिनी टेकचंदानी
८. श्रीम. निलू चांदवानी
९. श्रीम. लता निकम

## ९. महसूल समिती

१. श्री. राजू इदनानी
२. श्री. विनोद ठाकूर
३. श्रीम. वसूधा बोडारे

४. श्रीम. विद्या निर्मले

५. श्री. कुमार आयलानी

६. श्री. तुलसीदास वसीटा

७. श्री. रविंद्र बागूल

८. श्री. प्रभूनाथ गुप्ता

९. श्रीम. पंचशिला पवार

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** श्रीमती कल्पिता कुकरेजा दुरध्वनीचालक यांना दिनांक १/२/२००७ पासुन महापालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्तीस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ६:—** श्रीमती कल्पिता कुकरेजा दुरध्वनीचालक यांना दिनांक १/२/२००७ पासुन महापालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्तीस मान्यता देणे.

प्रस्तावना

श्रीमती कल्पिता कुकरेजा, दुरध्वनीचालक, जकात विभाग या उल्हासनगर महानगरपालिकेत दिनांक १६/७/१९८० पासुन कार्यरत असून त्यांची सेवा २६ वर्षे ०४ महिने ३ दिवस झालेली आहे. त्यांनी दिनांक ३/११/२००६ रोजीच्या अर्जान्वये तीन महिन्याची स्वेच्छा निवृत्ती नोटिस दिली आहे. त्यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार नियुक्ती प्राधिकारी सदर स्वेच्छा निवृत्ती मंजुर करण्यास सक्षम असल्यास श्रीमती कल्पिता कुकरेजा, दुरध्वनीचालक यांना दिनांक १/२/२००३ पासून महापालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्ती मंजूर करण्याचा प्रस्ताव महासभेपुढे मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: २९ दिनांक : २९/६/२००७

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावास अनुसार श्रीमती कल्पिता कुकरेजा दुरध्वनीचालक यांना दिनांक १/२/२००७ पासुन महापालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्तीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :—** श्री. केदारनाथ सुरताराम बोथ सफाई कामगार यांना फौजदारी गुन्हाप्रकरणी न्यायालयीन निर्णयामध्ये दोषमुक्त केल्याने त्यांना सेवेत पुर्नस्थापित करणे. तसेच निलंबन कालावधीतील वेतनाची थकबाकी अदा करण्यास मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. ७:—** श्री. केदारनाथ सुरताराम बोथ सफाई कामगार यांना फौजदारी गुन्हाप्रकरणी न्यायालयीन निर्णयामध्ये दोषमुक्त केल्याने त्यांना सेवेत पुर्नस्थापित करणे. तसेच निलंबन कालावधीतील वेतनाची थकबाकी अदा करण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. केदारनाथ सुरताराम बोथ, सफाई कामगार यांचेविरुध्द उल्हासनगर पोलिस स्टेशन, उल्हासनगर—१ येथे श्री. बंटी उर्फ रणजित भुले मरोठिया या इसमाचा खुन केल्याबद्दल गुन्हा रजि.नं.९३/९७, भा.द.वि. ३०२, २४ प्रमाणे दिनांक २२/६/१९९७ रोजी २०.१५ वा. अटक करुन दिनांक १९/८/१९९७ पर्यंत न्यायालयीन कस्टडीत ठेवण्यात आले असल्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक, उल्हासनगर पोलिस स्टेशन, उल्हासनगर—१ यांचेकडील क्र. ५४१९/१९९७, दिनांक १९/८/९७ चे पत्र प्राप्त झाले होते. त्या अनुषंगाने श्री. केदारनाथ सुरताराम बोथ, सफाई कामगार यांना कार्यालयीन क्र. उमपा/आ.वि./आस्था/१९७, दिनांक १८/१२/१९९७ च्या आदेशान्वये दिनांक २२/६/१९९७ पासुन निलंबित करण्यात आले आहे.

श्री. केदारनाथ सुरताराम बोथ यांचेविरुध्द मा. न्यायालय कल्याण येथे सेशन केस नं. ६०/१९९८ बाबत दिनांक ७/२/२००७ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये त्यांना दोषमुक्त करण्यात आले आहे.

शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील क्र. सी.डी.आर—१३९६/प्र.क्र.६/०६/११—अ, दिनांक २० जुलै, २००६ च्या शासन निर्णयातील ''परिच्छेद—२'' ''ड'' मध्ये शासकिय सेवकाविरुध्दच्या फौजदारी प्रकरणाबाबत पुढीलप्रमाणे तरतुद दिलेली आहे. शासकिय सेवकाविरुध्दच्या फौजदारी प्रकरणाबाबत पुढीलप्रमाणे तरतुद दिलेली आहे. शासकिय सेवकाविरुध्द गंभीर स्वरुपाच्या फौजदारी गुन्हयासंबंधी पुरावे आहेत असे सक्रतदर्शनी सिध्द झालेले आहे. तथापि, शासकिय सेवकास या गुन्हयातुन दोषमुक्त करण्यात आले असेल अशा शासकिय सेवकाविरुध्द जरी न्यायालयात अपिल पुनर्विलोकन आणि पुनरिक्षण दाखल करण्यात आले असेल तरी त्यास निलंबाधीन ठेवण्यात येवू नये. कारण संबंधीत सेवक दोषी असल्याची धारणा त्याच्या दोषमुक्तीमुळे शिल्लक राहत नाही.

सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री. केदारनाथ सुरताराम बोथ, सफाई कामगार यांचेविरुध्दच्या फौजदारी गुन्हा प्रकरणी (सेशन केस नं. ६०/१९९८) मा. न्यायालय कल्याण यांनी दिनांक ७/२/२००७ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये दोषमुक्त केले असल्याने त्यांना सेवेत पुर्नस्थापित करण्याबाबत तसेच निलंबन कालावधीतील वेतनाची थकबाकी अदा करण्याचा प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ३० दिनांक : २९/६/२००७

सुचकाचे नाव :– श्री. जनार्दन ढोके

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती मालती करोतिया

ही महासभा वरील प्रस्तावास अनुसरुन श्री. केदारनाथ सुरताराम बोथ, सफाई कामगार यांना फौजदारी गुन्हाप्रकरणी न्यायालयीन निर्णयामध्ये दोषमुक्त केल्याने त्यांना सेवेत पुर्नस्थापित करणे व निलंबन कालावधीतील वेतनाची थकबाकी अदा करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :–** महापालिका आस्थापनेवरील १२३ कर्मचा–यांना निवृत्ती वेतन व अंशदाने इत्यादी लाभ देण्यासाठी त्यांच्या रोजंदारीवरील सेवेची सरळसेवेत गणना करण्यास मान्यता देणे.

---

सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :–मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, १२३ कर्मचा–यांबरोबर बाकीचे जे ३०–४० कर्मचारी उरतात त्यांना सुध्दा अशा प्रकारचा लाभ मिळाला पाहिजे.

सदस्य श्री. लाल पंजाबी :–१२३ व्यतिरिक्त ज्या कर्मचा–यांना या प्रकारचे लाभ मिळाले नाहीत त्या कर्मचा–यांना सुध्दा या प्रकारचे लाभ मिळावेत. याकामी जे पात्र कर्मचारी आहेत त्या सर्वांना हे लाभ मिळावेत.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–मा. महापौर, व सचिव साहेब, या अगोदर श्री. मन्नु रामचंदानी व २९ कर्मचा–यांना जो न्याय देण्यात आला होता, ज्याप्रकारे त्यांची सरळसेवेत भरती केली होती ज्याच पध्दतीने या कर्मचा–यांनासुध्दा फायदे मिळावेत.

महापालिका सचिव :–त्याच प्रकारचा प्रस्ताव आपल्यासमोर आहे. प्रशासनाकडुन तसाच प्रस्ताव आलेला आहे. नियुक्तीच्या पहिल्या दिवसापासुनच्या त्यांच्या सेवेस सलगता दयायची आहे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–मा. महापौरजी आणि आयुक्त साहेब, ३०५ सफाई कामगारांचा जो प्रश्न आहे त्याबाबत सुध्दा याचप्रकारे मान्यता देण्यात यावी.

महापालिका सचिव :–पास?

काही सदस्य :–पास–पास......

<u>महापौर :—</u> सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. ८:—** महापालिका आस्थापनेवरील १२३ कर्मचा—यांना निवृत्ती वेतन व अंशदाने इत्यादी लाभ देण्यासाठी त्यांच्या रोजंदारीवरील सेवेची सरळसेवेत गणना करण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथिल रिट याचिका क्र. २८१५/१९९५ आणि मा. न्यायाधिश श्री. डी.के. देशमुख यांच्या दिनांक १५/१२/२००० च्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे श्री. मनोहर रामचंदानी, लिपिक व इतर २९ कर्मचारी यांना त्यांच्या मुळ रोजंदारीच्या दिनांकापासुन रोजंदारी सेवेत दाखल झाल्यापासुन देय होणा—या वेतनाची थकबाकी/फरकाची रक्कम अदा न करता केवळ रोजंदारीच्या दिनांकापासुन वेतनवाढ, अर्जित रजा, परावर्तित रजा व अन्य सेवकाविषयक अनुषंगिक लाभ देण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने श्री. मनोहर रामचंदानी, लिपिक व इतर २९ कर्मचारी यांच्याबाबतीत मा. न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाप्रमाणे समान न्याय तत्वानुसार महापालिकेतील विविध संवर्गात सद्यस्थितीत प्रस्तावित करण्यात आलेल्या १२३ कर्मचारी (सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे) व सदर प्रस्ताव सुरु करणेपुर्वी (माहे मार्च—२००५ पुर्वी मयत, सेवानिवृत्त झालेले कर्मचारी वगळुन) ज्या कर्मचा—यांची मुळ नियुक्ती रोजंदारी तत्वानुसार झाली आहे अशा कर्मचा—यांच्या सेवेचा दिनांक हा मुळ रोजंदारीच्या दिनांकापासुन गणण्यात येवुन त्यानुसार थकबाकीची/ फरकाची रक्कम न देता केवळ रोजंदारीच्या दिनांकापासुन वेतनवाढ व अन्य सेवाविषयक अनुषंगक लाभ दिल्यास होणा—या अतिरिक्त खर्चास सन २००६—२००७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात अंदाजे सरासरी रुपये १५ लाख मात्र इतक्या रक्कमेच्या खर्चाची तरतुद करणेस मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक तसेच मा. आयुक्त यांनी यापुर्वीच मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त खर्चाची तरतुद पुढील अंदाजपत्रकात करणेसाठी लेखा विभागास या कार्यालयाचे दिनांक ४ फेब्रुवारी, २००६ च्या पत्रान्वये कळविण्यांत आले आहे. तरी सोबत जोडलेलया यादीतील प्रस्तावित १२३ कर्मचा—यांची सेवा मुळ रोजंदारीच्या दिनांकापासुन गणण्यात येवुन त्यांना रोजंदारी सेवेत दाखल झाल्यापासुन देय होणा—या वेतनाची थकबाकी/फरकाची रक्कम अदा न करता सदर कर्मचा—यांना सेवा निवृत्ती वेतन व अंशदाने इत्यादी लाभ देण्यासाठी त्यांची रोजंदारीच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासुन सलग सेवा गणण्यात येवुन त्याप्रमाणे वेतन निश्चिती करण्याचा व सदरचा प्रस्ताव मंजुर झालेल्या दिनांकापासुन त्यांना सेवा निवृत्ती वेतन व अंशदाने इत्यादी लाभ देण्याचा प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ३१ दिनांक : २९/६/२००७

सुचकाचे नाव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजू इदनानी

ही महासभा वरील प्रस्तावास अनुसरुन सोबत जोडलेल्या यादीतील महापालिका आस्थापनेवरील १२३ कर्मचा–यांना निवृत्ती वेतन व अंशदाने इत्यादी लाभ देण्यासाठी त्यांच्या रोजंदारीच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासुन सलग सेवा गणनेस त्याचप्रमाणे वेतन निश्चितीस मान्यता देत आहे.

परंतु––

१. अशा कर्मचा–यांच्या सेवेचा दिनांक हा मुळ रोजंदारीच्या दिनांकापासुन गणण्यात येवुन त्यानुसार थकबाकीची/फरकाची रक्कम देय असणार नाही, केवळ रोजंदारीच्या दिनांकापासुन वेतननिश्चिती व अन्य सेवा निवृत्ती विषयक अनुषंगीक लाभ देता येतील.

२. त्याचप्रमाणे अशाप्रकारचे अन्य जे कर्मचारी आहेत परंतु त्यांची नावे या यादीत आलेली नाहीत अशा रोजंदारीवरील किंवा नैमित्तीक नेमणूकीवरील कर्मचा–यांनासुध्दा याच धर्तीवर त्यांचे प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून हे एकरुपी लाभ देता येतील.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९** :–उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी पुर्वीचा ठराव क्र. १६ दिनांक १९/५/२००४ यात बदल करणे.

---

सदस्य श्री. मोहन साधवानी :–मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, याविषयाबाबत गटनेत्यांमध्ये चर्चा झालेली नाही. तसा तर हा प्रस्ताव चांगला आहे. हा प्रस्ताव पारीत झाला तर महापालिकेचे उत्पन्न वाढेल. परंतु तत्पुर्वी या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे. यासाठी सध्या आम्ही या प्रस्तावास मान्यता देत नाही. सर्व पक्षांच्या गटनेत्यांशी चर्चा विचारविनिमय करुन नंतर हा प्रस्ताव महासभेत आणला जावा.

महापालिका सचिव :–हा प्रस्ताव आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळायचा काय? सर्वसंमतीने?

काही सदस्य :–सदरचा प्रस्ताव आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यांत यावा.

✂ महापौर :– सदरचा विषय आजच्या सभेच्या कामकाजातून वगळण्याबाबत सर्वानूमते पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. ९:—** उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी पुर्वीचा ठराव क्र. १६ दिनांक १९/५/२००४ यात बदल करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अनेक प्रकारचे व्यवसाय चालविण्याकरीता व इतर प्रयोजनाकरीता व्यवसाय धारकाकडुन विवक्षित वस्तुची साठवणुक करण्यात येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, ३८३ व ३८६ नुसार आयुक्तांना दिलेल्या अटी व शर्तीनुसार आणि त्यास अनुसरुन कोणत्याही नियमात विर्निदिष्ट केलेल्या कोणत्याही वस्तु कोणत्याही जागेत किंवा जागेवर परवान्यांशिवाय ठेवता येणार नाहीत.

आसपासच्या इतर महानगरपालिकांचे सदर विषयासंबंधीचे उपविधी पडताळून अधिनियमाचे कलम ४५८ (२०), ४५५ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नव्याने नियम व उपविधी तयार करण्यात आले असुन सदर विषयी वस्तु व व्यापार साठवणुकीसंबंधी संपुर्ण माहिती तसेच जागा वापरासंबंधी प्रारुप उपविधी व नियमावली तयार केलेली आहे.

सदर उपविधी व प्रारुप नियमावलीस महासभा ठराव क्र. १११, दिनांक १९/१२/२००३ नुसार प्राथमिक मंजुरी मिळाली होती. त्यानुसार ठरावात नमुद केल्याप्रमाणे स्थानिक वर्तमानपत्रामध्ये उपविधी व प्रारुप नियमावलीस आवश्यक ती प्रसिध्द देवुन दिनांक ३१/१/२००४ अखेर सुचना व हरकती मागविल्या होत्या. तसेच प्रस्तृत प्रारुप उपविधीस महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दी देण्यात आली होती. व जनतेच्या अवलोकनासाठी खुली ठेवली होती. तथापि वरील मुदतीत कोणाचे सुचना अगर हरकती प्राप्त झाल्या नाहीत.

सदर उपविधी अंतिम मंजुरीकरीता राज्य शासनाकडे पाठविणे अगोदर महासभेपुढे अंतिम मंजुरीकरीता प्रस्तावित करणे आवश्यक असल्याने महासभेपुढे प्रस्तावित करण्यात आले. परंतु महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ नुसार शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणेसाठी धंदे व व्यवसाय करणेसाठीचे परवान्यासंबंधी प्रारुप उपविध व प्रारुप नियमावलीस अंतिम मान्यता दिलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (१०) अन्वये उपद्रवकारक व धोकादायक उदयोग किंवा प्रयोग यांचे नियमन व उपशमन करणे हे महापालिकेच्या आवश्यक कर्तव्यात समाविष्ट आहे. कायदयाने महानगरपालिकेवर लादलेल्या या कर्तव्याच्या पालनासाठी वरील उपविधी करुन त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यामुळे शहरातील उदयोग व्यवसायाचे नियमन व सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता या बाबी साध्य होवु शकणार आहेत. तसेच या उपविधी अंमलात आणल्यास महानगरपालिकेस निश्चित स्वरुपाचे उत्पन्न प्राप्त होवु शकणार आहे. या बाबी विचारात घेवुन महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ नुसार घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठीचा प्रस्ताव महासभेकडे पुर्नविचारार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३१ अ <u>दिनांक : २९/६/२००७</u>

सुचकाचे नाव :— श्री. तुलसीदास वसिटा

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मीना सोंडे

ही महासभा वरील प्रस्तावास अनुसरुन पुर्वीचा महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ व ठराव क्र. १००, दिनांक २०/३/२००६ मध्ये बदल करुन उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रस्तावित शुल्क, प्रारूप उपविधी व नियमावलीस करण्याचा प्रस्ताव सविस्तर माहिती अभावी आजच्या सभेच्या कामकाजातून वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :– श्रीमती मधुरा केणी, लिपिक यांना मीरा–भाईंदर महानगरपालिकेत कायम स्वरुपी सामावुन घेण्यास परवानगी देणे.**

---

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–मा. महापौरजी, आता हा जो विषय आलेला आहे, या महिलेची जी नियुक्ती आहे ती आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेत आहे. व ती मंत्रालयात काम करते. व या महापालिकेला असे कळविले जाते की, तिला मीरा–भाईंदर महानगरपालिकेत पाठविण्यासाठी ना हरकत दाखला आपणाकडुन देण्यात यावा. तर त्याबाबत मला असे म्हणायचे आहे की जर तीची नियुक्ती येथे आहे त्यानुसार तीने येथे काम केले पाहिजे. पगार महानगरपालिका काढते. आणि ती मंत्रालयात काम करते. तर गोषवा–यामध्ये सर्व दिलेले आहे. आमचा या प्रस्तावास विरोध आहे. या महिलेची या महानगरपालिकेतुन बदली करु नये, आपल्या महापालिकेत का सामावुन घेत नाहीत? काय कारण आहे?

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–श्री. मोरे साहेब, आपण वाचला का गोषवारा?

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–मी वाचला आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:–ही लिपिक मीरा–भाईंदर महानगरपालिकेत कायम स्वरुपी जावु इच्छिते. यात आपली काही हरकत नाही, एक जागा खाली होते.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–कायम स्वरुपी जावु इच्छिते याबाबत हरकत नाही परंतु या महिलेची नियुक्ती उल्हासनगर महापालिकेत होते तसेच महापालिका पगार काढते आणि ती महिला मंत्रालयात काम करते. याचा अर्थ असा की त्या महिलेचा वसिला मंत्रालयात आहे. म्हणुनच ती येथुन बदली करुन मीरा–भाईंदरला जावु इच्छिते हे अयोग्य आहे. म्हणुन मी सर्व सदस्यांच्या असे निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, हे बरोबर नाही.

सदस्य श्री. रविंद्र बागुल:–मा. आयुक्त साहेब, आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने या प्रस्तावास समर्थन देतो. हा प्रस्ताव पारीत केला जावा.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–मा. महापौरजी, मा. उप–महापौरजी व आयुक्त साहेब, या ठिकाणी एक महिला लिपिक स्वइच्छेने मीरा–भाईंदर येथे जावु इच्छिते. ती येथुन गेल्यानंतर येथे जागा रिकामी होणार आहे. आणि उल्हासनगर शहरातील एखादी व्यक्ती त्याठिकाणी कामास लागु शकते. आणखी कोणी मीरा–भाईंदर, भिंवडी महापालिकेत जावु इच्छित असेल तर त्यांनाही जावु दया. त्यामुळे उल्हासनगर मधील नागरीकांना नोक–या मिळतील, महिलांना नोक–या मिळतील.

महापालिका सचिव:–पास?

सदस्य श्री. बी.बी. मोरे :–शासनाच्या नियमामध्ये जे बसत असेल त्याप्रमाणे निर्णय घेण्यात यावा.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–विषय कोणता चालला आहे?

महापालिका सचिव :–सर्वसंमतीने? श्री.बी.बी. मोरेजी?

सदस्य श्री. बी.बी. मोरे :–पास............

काही सदस्य :–पास–पास......

महापौर :– सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १०:—** श्रीमती मधुरा केणी, लिपिक यांना मीरा—भाईंदर महानगरपालिकेत कायम स्वरुपी सामावुन घेण्यास परवानगी देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील ''कनिष्ठ लिपिक'' या संवर्गात कार्यरत श्रीमती मधुरा केणी, लिपिक, उसनवार तत्वावर सध्या कार्यरत नगर विकास विभाग यांचेकडील दिनांक ५ ऑगस्ट, २००६ रोजीच्या पत्रान्वये, उल्हासनगर महानगरपालिकेतुन मिरा—भाईंदर महानगरपालिका आस्थानेवर कायम स्वरुपी 'कनिष्ठ लिपिक— या पदावर सामावुन घेणेबाबत या कार्यालयाकडुन अभिप्राय मागविले आहे.

श्रीमती मधुरा केणी, यांची का.आ.क्र. उमपा/साप्रवि/मुली/८६, दिनांक ३० जुलै, २००३ अन्वये ''कनिष्ठ लिपिक'' या संवर्गात रु. ३०५०—७५—३९५०—८०—४५९०/— या वेतनश्रेणीत नियुक्ती करण्यात आली आहे व त्या दिनांक ११ ऑगस्ट, २००३ रोजी सदर पदावर रुजु झाल्या आहेत. तसेच मंत्रालय, मुंबई यांचेकडील मागणीनुसार का.आ.क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/६६, दि. १२ मे, २००४ अन्वये उसनवार तत्वावर त्यांची सेवा नवि—२१, कार्यासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे दिनांक १८/११/२००३ पासुन वर्ग करण्यात आली आहे.

मा. महासभा नियुक्ती प्राधिकारी असल्याने सदर प्रकरणी शासन स्तरावरुन विचारणा केल्याप्रमाणे श्रीमती मधुरा केणी, कनिष्ठ लिपिक यांना जर मिरा—भाईंदर महानगरपालिका कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्यास तयार असेल तर उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत मान्यता देण्यास हरकत नाही. त्यानुसार सदर प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३२ <u>दिनांक : २९/६/२००७</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजू इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावास अनुसरुन श्रीमती मधुरा केणी, उल्हासनगर महानगरपालिका सेवेत लिपिक यांना मीरा—भाईंदर महानगरपालिकेत कायम स्वरुपी सामावुन घेण्यास परवानगी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११ :—** श्री. डी.डी. पंजाबी, नाका लिपिक यांना वैद्यकीय खर्चाचे प्रतिपूर्ती करणे कामी स्थायी समितीचा दिनांक २६/३/२००७ रोजीचा ठराव क्र. ७९ कायम करणे.

---

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>मा. महापौरजी आणि आयुक्त साहेब, या विषयाबाबत या अगोदर बरीचशी चर्चा झाली आहे. कायदयानुसार त्यास जेवढी रक्कम देय असेल तेवढीच रक्कम दिली जावी. मागील वेळेस आयुक्त

साहेबांनी सांगितले होते की, शासनाच्या नियमानुसार ४० हजार रुपये देय आहे. त्यानुसार त्यास ४० हजार रुपये दिले जावेत.

<u>**सदस्य श्री. रविंद्र बागुल**:–</u>मा. महापौर, व मा. आयुक्त साहेब, पाच लाख रुपये देवु नका पाच लाखाची अर्थसंकल्पामध्ये तरतुद नाही. या अगोदर इतर कर्मचा–यांना जी रक्कम दिली असेल तीच रक्कम दिली जावी.

<u>**सदस्य श्री. मोहन साधवानी** :–</u>नियमामध्ये जी रक्कम देय असेल तीच दिली जावी.

<u>**सदस्य श्री. रविंद्र बागुल**:–</u>सभागृह नेत्यांचे म्हणणे आम्हांस मान्य आहे. व आम्ही या प्रस्तावास मंजुरी देतो. आज सभागृह नेत्यांनी खुपच चांगले निर्णय घेतले आहेत. महानगरपालिकेच्या पैश्याची बचत केली आहे.

<u>**काही सदस्य** :–</u>पास–पास......

<u>**महापौर** :–</u> सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे. 

---

☑

**विषय क्र. ११**:– श्री. डी.डी. पंजाबी, नाका लिपिक यांना वैद्यकीय खर्चाचे प्रतिपूर्ती करणे कामी स्थायी समितीचा दिनांक २६/३/२००७ रोजीचा ठराव क्र. ७९ कायम करणे.

<u>**प्रस्तावना**</u>

श्री.दिलीप पंजाबी, लिपिक, जकात विभाग यांना दिनांक १४.१२.२००५ ते २७.१२.२००५ या कालावधित पोटाचा विकाराचा त्रास होत असल्यामुळे रत्नदिप हॉस्पीटल, उल्हासनगर–४ येथे दाखल केले होते. दिनांक २८.१२.२००५ रोजी अधिक त्रास होउ लागल्यामुळे दिनांक २८.१२.२००५ ते दि. २६.१. २००६ लिलावती हॉस्पीटल ६, मुंबई येथील खाजगी रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून दाखल केले होते व तीव्र उदर वेदनामुळे (Acute abdominal pains/ intestinal obstruction) पोटावर शस्त्रक्रिया केली आहे. सदर आजार शासनाचे निर्णय क्र. एमएजी २००५/९/प्रक्र.१/आरोग्य–३, दिनांक १९ मार्च,२००५ मधील पर्शिष्ठ ''अ'' मधील विनिर्दिष्ट केलेल्या २७ आकस्मिक आजारा मधील अ.क्र. ७ वर नमुद केलेला आहे. तेसच जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचे कडिल पत्र क्र. सीएसटी मेडिकल/एमआरबील/०६, दिनांक २६.५.२००६ अन्वये शासन निर्णयातील वैद्यकीय परतावा मिळणेसाठी शिफारस केलेली आहे. शसनाचे दिनांक १९ मार्च,२००५ च्या निर्णयातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधीन राहुन रु. ४०,०००/– पर्यतच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबधीत विभागांच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहेत. तथापि, श्री. दिलीप पंजाबी यांचे वैद्यकिय शस्क्रियचा/उपचारासाठी रु. ५,७२,०००/– (रु. पाच लाख बहात्तर हजार मात्र ) इतका खर्च झाला असुन शासनाचे निर्णया नुसार परिगणना केली असता त्यांना रु. ५,१४,६७९/– (रु. पाच लाख चौदा हजार सहाशे एकोणऐंशी मात्र ) इतकी अनुज्ञेय आहे. सदर वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम शासनाचे दिनांक १९ मार्च,२००५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विहित केलेल्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त असल्याने श्री. डी.डी.पंजाबी, लिपीक यांचे वैद्यकिय प्रतिपूर्तीचे रु. ५,१४,६७९/– (रु. पाच लाख चौदा हजार सहाशे एकोण्ऐंशी मात्र) इतक्या रक्कमेच्या खर्चाचे देयक अदा करणेसाठी सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>**स्थायी समिती ठराव क्र.**</u> ७९ <u>दिनांक:–२६/३/२००७</u>

सुचकाचे नाव :– श्री. देवेंद्रसिंह खेमाणी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती कोमल बठिजा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे श्री.डी.डी.पंजाबी, लिपिक, जकात विभाग यांना वैद्यकिय खर्चापोटी रु. ५१४,६७९/— एवढया रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देत आहे.

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर ठरावा अंतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र: ३३ दिनांक : २९/६/२००७

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा स्थायी समितीचा दिनांक २६/३/२००७ रोजीचा ठराव क्र. ७९ मध्ये अंशत: बदल करून श्री. डी.डी. पंजाबी, लिपिक , जकात विभाग यांना वैद्यकीय खर्चापोटी रू. ४०,०००/— एवढया रक्कमेची प्रतीपुर्ती करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**मा. महापौरांना सन्माननिय सदस्य श्री. लालबिहारी यादव यांचे पत्र प्राप्त झाले आहे. त्यांची इच्छा आहे की, त्यांच्या बैठकीची व्यवस्था सत्ताधारी पक्षाच्या बाजुला करण्यात यावी. व मा. महापौरांनी त्यास स्विकृती दिली आहे.

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.१० वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

सदस्य श्री.बी.बी. मोरे यांनी इतिवृत्ताचे कागद व्यासपिठावर महापालिका सचिवांच्या दिशेने भिरकावले.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—यांच्यावर कारवाई करुन यांचे नगरसेवक पद रद्द करावे. बेशिस्तपणाचे वागणे आहे. मा. महापौर, उप—महापौर महोदय, यांच्यावर कारवाई करुन यांचे नगरसेवक पद रद्द करावे.

काही सदस्य :— त्यांना बाहेर काढा. महापालिकेची शिस्त पाळत नसतील तर त्यांना बाहेर काढा. ज्यांना सभागृहाची शिस्त पाळता येत नाही त्यांना बाहेर काढावे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:—यांच्यावर कारवाई करुन यांचे नगरसेवक पद रद्द करावे. जे शिस्त पाळत नसतील त्यांना बाहेर काढा.

महापालिका सचिव :—आपणा सर्वांना ऐकण्यासाठी आम्ही टेप चालु करत आहोत कृपया शांतता राखा.

उप—महापौर :—मा. सदस्य श्री. बी.बी. मोरे साहेब कृपया शांत रहा. सचिव साहेब, टेप चालु करुन त्यांना त्यांचे बोलणे ऐकवा.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :— ही पध्दत चुकीची आहे.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—पुढील वेळेस प्रत्येकजण म्हणेल टेप चालु करुन दाखवा.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—यांना सहकार्य करणारे, सचिव तुम्ही, मला तुमचे काही ऐकायचे नाही. जी काही शब्द रचना असेल ती राहू दया, चला ठिक आहे, राहु दया. मला तुमचे काही ऐकायचे नाही. काय होणार आहे?

काही सदस्य :—श्री. बी.बी. मोरे यांचा यांचा रक्तदाब तपासून पाहिला जावा.
इतिवृत्त पास......

महापौर :— महासभा ठराव क्र. ३१ मध्ये १२३ कर्मचा—यांच्या नावांच्या यादीचा समावेश करून उर्वरित इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करित आहे.

---

☑

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २** :— मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक १५/५/२००७ त्यात २३/५/२००७ व दिनांक २९/६/२००७, व दिनांक २०/६/२००७ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव : श्री. लाल पंजाबी

महासभा ठराव क्र. ३६ अ — दिनांक : १३/७/२००७

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक १५/५/२००७ त्यात २३/५/२००७ व २९/६/२००७ रोजीच्या सभेच्या इतिवृतांतील पृष्ठ क्र. ६३ वरील महासभा ठराव क्र. ३१ मध्ये १२३ कर्मचा–यांच्या नावांच्या यादीचा समावेश करून उर्वरित इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास तसेच दिनांक २०/६/२००७ रोजीच्या सभेचे पृष्ठ क्र. १ ते ४१ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मा. महापौरजी, तीन वाजता विशेष महासभा होती या सभेमध्ये आपण दोन महत्वपुर्ण विषयांवर अतिशय चांगला निर्णय घेतलेला आहे. त्याची पत्रकारांना माहिती देण्यासाठी सांयकाळी ५.०० वाजता पत्रकार परिषद आयोजित केली आहे. यासाठी या सभेचे कामकाज पुढील सूचना देईपर्यंत स्थगित केले जावे.

<u>महापालिका सचिव :–</u>ठिक आहे? सभेचे कामकाज स्थगित केले जावे?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> मी एका गोष्टीची सभागृहाला आठवण करु देवु इच्छितो, मागील वेळेस आपण श्री. केदारनाथ सुरताराम बोथ, सफाई कामगार यांना पुन्हा कामावर घेणे व पगाराची थकबाकी देण्याबाबतीत एक ठराव पारीत केला आहे. प्रशासनाच्यावतीने श्री. केदारनाथ यांच्या हातावर पत्र थोपविले जाते की, तुम्ही कोर्टाकडुन लिहुन आणा. तर काय महासभेपुढे प्रस्ताव ठेवण्याअगोदर कोर्टाकडुन तसे लेखी आदेश नव्हते काय? उच्च न्यायालयात गेले किंवा नाही? अपिल केले किंवा नाही? शासनाने काय केले? कर्मचा–यास चकरा मारावयास लावायच्या आहेत काय? १० वर्षापासुन त्याचे प्रकरण न्यायालयात होते. १० वर्षानंतर कुठे त्यांना न्याय मिळालेला आहे. १० वर्ष न्यायालयीन लढाईत गेली असल्याने आता त्यास त्वरीत कामावर घेतले जावे.

<u>महापालिका सचिव :–</u>ही सभा मा. महापौरांच्या आदेशान्वये व आपणा सर्वांच्या अनुमतीने पुढील सुचना देईपर्यंत स्थगित केली जात आहे.

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.०६ वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— / /२००७

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

५—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १३/७/२००७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु सदरची सभा स्थगित झाल्याने सदर सभा दिनांक सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण
२. उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ४० | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ४१ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ४२ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४३ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४४ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४५ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४६ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४७ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४८ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४९ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १३ | श्री. विजय खंडु सुपळे | ५० | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५१ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १५ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ५२ | श्री. शेखर केशव यादव |
| १६ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५३ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १७ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५४ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १८ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५५ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १९ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५६ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| २० | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५७ | श्री. किशोर जग्यासी |
| २१ | श्री. राजू जग्यासी | ५८ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २२ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५९ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ६० | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २४ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ६१ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २५ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ६२ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २६ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ६३ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २७ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ६४ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २८ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६५ | श्री. मोहन साधवाणी |
| २९ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६६ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| ३० | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६७ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| ३१ | श्री. लाल पंजाबी | ६८ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ३२ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६९ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| ३३ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ७० | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३४ | श्रीमती शकुंतला पाटील | ७१ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३५ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ७२ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३६ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ७३ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३७ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ७४ | श्री. मुकेश सोहन तेजी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ७५ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३९ | श्री.एडके गणपत गोविंद | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
४. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
५. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
७. श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
८. डॉ. के. आर. खरात, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
९. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१०.श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
११.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१२.श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता, पा.पु.
१३.श्री. सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.विभाग
१४.श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी
१५.श्री. तुकाराम तारदाळकर, मुख्य लिपिक
१६.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. कु. शकुंतला गावित
४. श्रीमती नर्गिस खान

वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३**:– महानगरपालिका इमारत दुरुस्ती, नुतनीकरण व दोन मजले चढविणे कामास मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ४ :— तरण तलावा लगत असलेली महापालिका निहित मोकळी जागा मे. जय अंबे कन्स्ट्रक्शन यांना भाडेपट्टयाने देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 👍

---

☑

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ५:— महापालिका मुख्यालयातील जागा वाटप करणे बाबत.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 👍

---

☑

---

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— २०/११/२००७

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/११/२००७ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार दिनांक २०/११/२००७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

५. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

६. उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३५ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३६ | श्री. ढोके जनार्दन किसनराव |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३७ | श्री.एडके गणपत गोविंद |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३८ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ३९ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४० | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४१ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४२ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ११ | श्री. विजय खंडु सुपळे | ४३ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४४ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४५ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४६ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४७ | श्री. शेखर केशव यादव |
| १६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४८ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४९ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १८ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५० | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १९ | श्री. राजू जग्यासी | ५१ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| २० | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५२ | श्री. किशोर जग्यासी |
| २१ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५३ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५४ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २३ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५५ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २४ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५६ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २५ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ५७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २६ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५८ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २७ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५९ | श्री. मोहन साधवाणी |
| २८ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६० | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २९ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६१ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ३० | श्री. लाल पंजाबी | ६२ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| ३१ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६३ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३२ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६४ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३३ | श्रीमती शकुंतला पाटील | ६५ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३४ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. गायकवाड दिलीप, २. श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र, ३. श्री. सुखरामानी महेश पहलाजराय, ४. श्रीमती महाडीक रजनी मोहन, ५. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, ६. श्रीमती करोतीया मालती राधाचरण, ७. श्री. गोविंदराम डोलुमल लुंड, ८. श्री. बच्चाराम रूपचंदानी, ९. श्रीमती वनवारी मोना अशोक, १०. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), ११. श्री. पाटील प्रधान धर्मा

खालील अधिकारी सभेस हजर होते.

६७.श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
६८.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
६९.श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
७०.श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
७१.श्री. मिलिंद सावंत, उप–आयुक्त
७२.श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
७३.श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
७४.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
७५.श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
७६.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
७७.श्री. सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.विभाग
७८.श्री. रमेश काजळे, उप कर निर्धारक व संकलक.
७९.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता
८०.श्री. यु.के. रामसिंघानी, सहा. नियंत्रक
८१. श्री. व्ही.आर.गर्जे, प्र. प्रभाग अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**श्री. मोहन साधवानी :–**मा. महापौर, उपमहापौरजी, नगरपालिकेच्या कालावधीतील आपले एक माजी नगरसेवक डॉ.भगवानदास अगिचा यांचे काल निधन झाले. त्यांना श्रध्दांजली देण्यासाठी दोन मिनीटे सर्वांनी मौन धारण करावे अशी माझी विनंती आहे.

---

सुचकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. तुलसीदास वसिटा

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर नगरपालिकेतील माजी नगरसेवक डॉ. भगवानदास अगिचा यांचे दिनांक १९/११/२००७ रोजी निधन झाले.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र.    ५६ अ    दिनांकः—२०/११/२००७

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार डॉ. भगवानदास अगिचा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे.........

प्रश्न क्र. ४२ व ५२ हे दोनच प्रलंबित प्रश्न आहेत, या व्यतिरिक्त इतर कोणताही प्रश्न नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः— प्रश्न क्र.४२,व ५२ याचबरोबर ५५ क्रमांकाचा प्रश्नही प्रलंबित आहे. प्रश्न क्र. ५५ बाबत आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, याबाबत कोण कोण जबाबदार आहेत, याची चौकशी केली जाईल व त्याचे पुढील महासभेत उत्तर दिले जाईल. त्या रस्त्याचे जे काम झाले आहे त्याबाबत कोण कोण अधिकारी जबाबदार आहेत? प्रथम प्रश्न क्र. ५५ बाबतीत उत्तर दिले जावे त्यानंतर उर्वरीत दोन प्रश्नांचे उत्तर दिले जावे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—सन्माननिय महापौर महोदया, उप—महापौर साहेब, नगरसचिवजी, सर्व सन्माननिय सदस्य हा जो प्रश्न होता तो रस्त्याची जी बांधकामे झाली होती त्या संदर्भातील ठरावीक असा प्रश्न होता. यासाठी उप आयुक्त मुख्यालय यांची चौकशीसाठी नेमणुक करण्यात आलेली आहे. आणि त्यांचा चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्या संदर्भातील वस्तुस्थिती सभागृहात ठेवण्यात येईल.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सन्माननिय महापौरजी,आयुक्त साहेब, ही जी आपण समिती नियुक्त केली आहे, त्या रस्त्याचे ज्या ठेकेदाराने काम केले आहे,...कुठल्यातरी कन्स्ट्रक्शन कंपनीने , ज्या कामाची चौकशी करण्याची आपण समिती नेमली आहे, त्या रस्त्याचे जे काम झाले आहे त्याबाबत आपण मागील सभेत सांगितले होते की, या बाबत अधिका—यांवर काय कारवाई केली ते मी पुढील महासभेत सांगेन. त्या रस्त्याचे काम अतिशय निष्कृष्ट प्रतीचे झालेले आहे. त्या ठेकेदारास काही नोटिस वगैरे बजावण्यात आलेली नाही. त्यासाठी कोण कोण अधिकारी जबाबदार आहे? साहेब, कोणाच्याही खिश्यात एवढा पैसा जास्त नाही की चार लाखाचे काम करुन तो निघुन जाईल. येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी सांगतात की या रस्त्याचे काम कुणी केले ते आम्हांला माहित नाही. असा कुणी दाता नाही की जो चार लाखाचे काम करुन निघून जाईल आणि त्याची सार्वजनिक बांधकाम विभागास माहिती नाही.?

श्री. सुखरामानी (प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब..........

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मा. महापौरजी, उप—महापौरजी आणि आयुक्त साहेब हे काय मजाक करत आहेत काय? यांना उत्तर दयायला होत नाही काय? यांना तयारी करुन येता येत नाही काय? मागील चार

महासभांपासुन हा प्रश्न प्रलंबित आहे. हा अधिकारी ऑ –हूॅ करत आहे. येथे जे सदस्य बसले आहेत ते काय यांचे हे नाटक बघण्यासाठी बसले आहेत काय?

श्री. सुखरामानी (प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):–मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य, या प्रश्नाचे उत्तर आम्ही या अगोदरच दिलेले आहे. रस्त्याचे जे काम झालेले आहे ते आमच्या देखरेखीखाली झालेले नाही. कुण्यातरी व्यक्तिने ते काम केलेले आहे. ते कुणी केले आहे त्याची अदयाप आम्हांला माहिती मिळालेली नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–माहिती नाही असे कसे? आपलेच लोक, श्री. चुन्नीलाल लालवानी वगैरे हे लोक काम थांबवुन आले होते. आपला एक कनिष्ठ अभियंता, जो ते काम थांबवुन आला होता. तेथे मशिन्स वगैरे पडुन होत्या. त्या आपण जप्त का केल्या नाहीत? जेव्हा मी पत्र दिले तेव्हा त्यांच्या मशिन्स तेथेच पडुन होत्या त्यावेळेस आपण त्या जप्त का केल्या नाहीत? जर आपण आज म्हणता की ते काम कुणी केले ते माहित नाही. आपण त्यांना वाचवु इच्छित आहात का? आपण या भ्रष्टाचारामध्ये सहभागी आहात काय? माझा आपणावर उघड उघड आरोप आहे की या भ्रष्टाचारामध्ये आपण सहभागी आहात.

श्री. सुखरामानी (प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):–ज्यावेळेस आपले पत्र आले होते त्यावेळेस आमची काही माणसे तेथे गेली होती व त्यांनी काम बंद केले होते. व तेथे जे कामगार होते त्यांना काम चालु न करण्याबाबतीत ताकिद देवुन आले होते. हे काम कोण करत आहे असे त्यावेळेस त्या कामगांराना विचारले असता ते माहित नाही असे त्यांनी सांगितले .

**मा. सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीमती मंजू पोपटानी, श्रीमती सरोजनी मुरलीधर यांनी सभागृहात प्रवेश केला.**

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–आयुक्त साहेब, हे पहा हे स्वत: सांगत आहेत की ते काम कोणी केले ते माहित नाही. आणि हेच सांगत आहेत की तेथे जे काम चालु होते ते आमच्या कर्मचा–यांनी जावुन बंद केले. मग त्यावेळेस त्यांनी त्या मशिन्स जप्त का केल्या नाहीत? मिक्सर मशिन तेथे पडुन होते ते आपण जप्त का केले नाही. एखादया गरीबाचे काही बांधकाम साहित्य रस्त्यावर पडले असेल तर, टिकाव किंवा फावडे असे काही सामान उचलुन घेवुन येता मग त्यांची मशिन आपण का उचलली नाहीत? म्हणजेच या रस्त्याच्या कामामध्ये जो सात लाख रुपये खर्च दर्शविला आहे त्यामध्ये आपण सहभागी आहात असा माझा आपणावर आरोप आहे. कारण की आपण स्वत: हे कबुल करत आहात की तेथे चालु असलेले काम आपल्या कर्मचा–यांनी जावुन थांबविले व काम करण्यास त्यांना मनाई केली. तर मग ते लोक कोण होते हे आपणांस कसे माहित नाही?

श्री. सुखरामानी (प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):–नाही, आपल्या पत्रानुसार अगोदरच आम्ही आपणांस उत्तर दिले आहे. आमचे कर्मचारी जेव्हा तेथे गेले होते तेव्हा तेथे काम चालु होते. त्यानंतर काम कोणी केले आहे ते आम्हांला माहित नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–आयुक्त साहेब, यांच्यावर काय कारवाई करायची ते आपण पहा. परंतु माझा स्पष्ट आरोप आहे की, हे भ्रष्टाचारामध्ये सहभागी आहेत. रस्त्याचे काम तर खराब आहेच आहे परंतु अशी जेवढी काही निष्कृष्ट प्रतीची कामे आहेत त्यातील जवळ जवळ ७५ टक्के कामांमध्ये हे सामील आहेत. २५, ३० टक्के कामे दुसरी काही असतील परंतु ७० ते ७५ टक्के कामांमध्ये हे आरोपी आहेत.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–या संदर्भामध्ये चौकशी नेमण्यात आलेली आहे. याबाबतच्या सर्व गोष्टींचा खुलासा आम्ही प्राप्त करुन घेवु. आणि जर संबंधीत अधिकारी त्यात दोषी आढळला तर त्याच्याविरुध्द कडक कारवाई केली जाईल.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–साहेब, ६५ क्रमांकाचा जो प्रश्न आहे, मंडईसाठी आरक्षित असलेला भुखंड आहे त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने संरक्षण भिंत बांधली होती. त्याबाबत मागील महासभेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका–याने सांगितले होते की, त्याबाबत आमच्याकडे दस्तऐवज/ पुरावा उपलब्ध नाही. आता यांच्याकडे दस्तऐवज नाहीत, पुरावे नाहीत. आरक्षित भुखंडावर संरक्षण भिंत बांधली पाहिजे होती याबाबत

आजच्या सभेत सभागृह नेत्यांची लक्षवेधी सुचना आहे . या अगोदर ज्या संरक्षण भिंती बांधल्या आहेत त्याबाबतीत आपणाकडे काही पुरावा नाही. त्याबाबतीत आपण काही केले नाही तर आता संरक्षण भिंत बांधुन आपण काय करणार आहात? आपण आपले भुखंड वाचवु शकत नाहीत. त्या . १८० क्रमांकाच्या भुखंडावर आता इमारतीचे बांधकाम चालु आहे. आपण संरक्षण भिंत बांधली होती. ती कधी बांधली त्याबाबतचे दस्तऐवज/पुरावे आपणाकडे नाहीत. याबाबत मी विचारणा केली असता आपण सांगितले होते की, सरंक्षण भिंत कधी बांधली होती याबाबतीत चौकशी करुन पुढील महासभेत आपणांस सविस्तर उत्तर दिले जाईल. तर मला आता सांगा की सार्वजनिक बांधकाम विभागाकडे या कामी काय दस्तऐवज /पुरावे उपलब्ध आहेत? निष्कृष्ट प्रतिच्या प्रत्येक कामामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग सहभागी आहे. जेवढे काही आरक्षित भुखंड आहेत त्या प्रत्येक भुखंडावर बांधकामाविषयीचे नकाशे मंजुर केले जात आहेत. आपण यांना विचारणा करा यांच्याकडे दस्तऐवज उपलब्ध का नाहीत? विचारा, विचारा, ६५ क्रमांकाचा प्रश्न आहे. महानगरपालिका कधी स्थापन झाली त्याचेही यांच्याकडे दस्तऐवज उपलब्ध नाहीत...... असा हा सार्वजनिक बांधकाम विभाग आहे.

**मा.सदस्या श्रीमती संगिता कंडारे, श्रीमती निलु चांदवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

श्री. सुखरामानी (प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य, शिट क्र. ५० व ५१ हा जो आहे व ५८३,५९३,५९२,५९४,६०७, हे जे भुखंड आहेत ते आरक्षित नाहीत.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—आयुक्त साहेब, आपण यांचे निवेदन नोंदवुन घ्या. याबाबतीत नगररचनाकारांना बोलावुन घ्या. आता महासभेमध्येच आपणांस यांना निलंबित करावे लागेल. इतिवृत्तांताची जे नोंद करत आहेत त्यांनी यांच्या या वक्तव्याची नोंद करावी. हे म्हणत आहेत की ते भुखंड आरक्षित नाहीत. प्रत्यक्षात १८० क्रमांकाचा भुखंड मंडईसाठी आरक्षित आहे. त्या जागेवर बांधकामासाठी नकाशे मंजुर केले जात आहेत. तेथे इमारती बांधल्या जात आहेत. याबाबतीत स्पष्टीकरण करण्यासाठी नगररचनाकारांना बोलावुन घ्यावे. नगररचनाकारांना नव्हे, तर बांधकाम विभागातील अधिका—यांना तुरुंगात पाठविले पाहिजे. यांच्यामुळेच उल्हासनगर महानगरपालिकेचे बहुतांश भुखंड भुमाफियांनी हडप केले आहे. या भुखंडाबाबतीत माझ्याकडे सर्व कागदपत्र उपलब्ध आहेत. जो बांधकाम नकाशा मंजुर केला आहे त्याबाबतचे सर्व कागदपत्र माझ्याकडे उपलब्ध आहेत. त्यावर शेरे आहेत की, हा भुखंड मंडईसाठी आरक्षित आहे. व हे म्हणतात की, आरक्षित नाही.

श्री. सुखरामानी (प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—येथे जे लिहिले आहे त्यानुसार........

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः— तेथे लिहिल्यानुसार नाही, आपणाकडे दस्तऐवज उपलब्ध नाहीत काय? मी मागील महासभेत विचारले होते की, १८० क्रमांकाचे आरक्षण असलेला तो भुखंड मंडईसाठी आरक्षित आहे. किवा नाही.? नगररचनाकारांना न विचारता तो भुखंड आरक्षित नाही असे आपण कसे म्हणता?

श्री. सुखरामानी (प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—आपला जो प्रश्न आहे त्याचे मी उत्तर दिले आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः— मी आपणांस सांगितले आहे की, १८० क्रमांकाचे आरक्षण मंडईसाठी आरक्षित होते. व त्या भुखंडावर आपण संरक्षण भिंत बाधंली होती.

श्री. सुखरामानी (प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—याबाबतीत नगररचनाकारांना विचारणा केल्यानंतरच माहित होईल.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः— नगररचनाकारांना विचारल्यानंतरच का माहित पडेल? आताच आपण सांगितले की तो भुखंड आरक्षित नाही. मी हे प्रकरण न्यायालयात घेऊन जाईन . या सभेचे इतिवृत्त मी कोर्टात घेवुन जाईन . आपण महासभेमध्ये सांगितलेले आहे की १८० क्रमांकाचा भुखंड आरक्षित नाही. मी हे प्रकरण न्यायालयात जरुर घेवुन जाईन. आज पर्यंत महासभेचे प्रकरण न्यायालयापर्यंत गेले नाही परंतु हे प्रकरण जरुर न्यायालयात जाईल कारण की मला असे वाटत आहे की आपण हा भुखंड हडप करु दिला आहे. आणि त्यानंतर सुध्दा दोन—तीन भुखंडाची सनद निघालेली आहे. जेव्हा आपण उत्तर देत आहात की आमच्याकडे दस्तऐवज उपलब्ध नाहीत याचा अर्थ आपण त्यामध्ये पुर्णपणे सहभागी आहात. म्हणुन मी पुन्हा आपणांस सांगतो की आपण विचारपुर्वक उत्तर दया.

श्री. सुखरामानी (प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—येथे जे उत्तर लिहिले आहे त्यानुसार मी उत्तर दिले आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— माझ्या प्रश्नातील जो मुद्दा आहे त्यानुसार उत्तर दया, आपण हे पाहिले नाही काय की हा भुखंड कश्यासाठी आरक्षित आहे? अभिलेखा विभागात याबाबतीत कागदपत्रांची पडताळणी केली जात नाही काय, सार्वजनिक बांधकाम विभागात दस्तएवेज उपलब्ध नाहीत? कोणता भुखंड आरक्षित आहे वगैरे वगैरे...

श्री. सुखरामानी (प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—साहेब येथे प्लॉट क्रमांक लिहिलेला आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— ऐकुन घ्या, ऐकुन घ्या, येथे सर्व लिहिले आहे. भुखंड क्र. लिहिला आहे. १८० क्रमांकाचा भुखंड कश्यासाठी आरक्षित आहे? १८० क्रमांकाचा भुखंड मंडईसाठी आरक्षित आहे. त्याचा प्लॉट नंबर व शिट नंबर मी लिहिला आहे. उल्हासनगरमधील कोणते भुखंड आरक्षित आहेत याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दस्तऐवज उपलब्ध नाहीत काय?

श्री. सुखरामानी (प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—भुखंड क्रमांक आमच्याकडे नाही. तो नगररचनाकार साहेबांकडेच असतो. कोणता भुखंड आरक्षित आहे, आरक्षित नाही याचे दस्तऐवज नगररचनाकार साहेबांकडेच असतात.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— ही सही कोणाची आहे? प्रश्नाचे हे जे उत्तर दिले आहे त्याखाली सही कुणाची आहे?

**मा. सदस्य श्री. मोहन रामरख्यानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

श्री. सुखरामानी (प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—शहर अभियंता यांची आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— आपण उत्तर देवु शकत नसाल तर शहर अभियंता यांना उत्तर देण्यासाठी बोलवा. उल्हासनगर शहरामध्ये जेवढे काही भुखंड हडप केले जात आहेत, त्यामध्ये श्री. सुखरामानी हे पुर्णपणे सहभागी आहेत. आरक्षित भुखंड बिल्डर लोकांच्या घशात हे लोक टाकत आहेत. आणि नंतर मग झोपडपट्टयांवर आरक्षण दाखवतात. नविन विकास आराखडयामध्ये शहराच्या विकासासाठी जागा लागेल म्हणुन झोपडपट्टयांवर आरक्षणे दाखवु लागतील. असे का? १८० क्रमांकाच्या भुखंडाबाबतीत यांना उत्तर देण्यास सांगा. त्या भुखंडावर आपल्या पालिकेची संरक्षण भिंत आहे. असे असतांनाही त्या भुखंडावर बांधकाम करण्यासाठी बांधकाम नकाशा मंजुर कसा करण्यात आला? आपणच सांगितले होते की पुढील महासभेत याचे उत्तर दिले जाईल. आपल्या महापालिकेची त्यावर संरक्षण भिंत असतांना तेथे बांधकाम करण्यासाठी बांधकाम नकाशा मंजुर कसा करण्यात आला?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—सन्माननिय महापौर महोदयांच्या परवानगीने बोलु इच्छितो, सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो अतिशय महत्वपुर्ण असा आहे. प्रशासन तो अतिशय गंभीरतेने घेत आहे. तसेच आपण जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्यावर पुर्ण चौकशी करुन जर त्यामध्ये अधिकारी सामील आहे असे निदर्शनास आले तर त्यावर कठोरात कठोर कारवाई केली जाईल. आपला हा मुद्दा शहराच्या हिताचा आहे. त्यामुळे त्याबाबतीत कोणतीही निष्काळजी केली जाणार नाही असे मी आपणांस आश्वासन देतो.

**मा. सदस्या श्रीमती सुजाता रिजवानी, श्रीमती चंद्रा टेकचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— साहेब, पुढील महिन्यात हे सेवानिवृत्त झाले तर त्यांच्यावर आपण कारवाई काय आणि कधी करणार? त्यांचे पेन्शन आणि फंड आपण रोखुन धरणार काय?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—शासन सेवेतील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर तो शासकिय नियमांच्या बंधनातुन सुटत नसतो. सेवानिवृत्त झाल्यानंतरही जुन्या प्रकरणांबाबतीत शिक्षा होते. ते त्यातून सुटतील असे होणार नाही. व आपली जी सूचना आहे त्यानुसार कारवाई केली जाईल.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आपण चौकशी करा. व त्वरीत काम थांबविण्यास सांगा. त्या भुखंडावर आपल्या पालिकेची संरक्षण भिंत असतांना सुध्दा बांधकाम नकाशा मंजुर कसा झाला ? यासाठी आपण नगररचनाकारांना, प्रांत अधिकारी यांना पत्र लिहिण्यास सांगा की, तो भुखंड उल्हासनगर महानगरपालिकेचा असतांना आणि तो आरक्षित भुखंड असतांनाही आपण त्याची सनद कशी दिलीत?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—आपली जी सूचना आहे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी नगररचनाकारांना आदेश देतो.

**मा. सदस्य श्री. राजु इदनानी, श्री. रविंद्र बागुल, श्री. प्रभुनाथ गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.**

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आयुक्त साहेब, अशाच एका मुद्दयाबाबत आपण यापुर्वीच चर्चा केली आहे. महापालिकेच्या जेवढया मालमत्ता आहेत, भुखंड आहेत ते सर्व आपण ताब्यात घ्या. त्यासाठी पाहिजे तर प्रांत अधिकारी यांना पत्र दया. यापुर्वी जे झालेले आहे, ज्या सनदा दिलेल्या आहेत त्या जागांवर बांधकाम नकाशा मंजुर न करता त्याबाबतीत प्रथम प्राधान्य महानगरपालिकेला देण्यात यावे. आणि अशी जर प्रांत अधिका—यांकडे कुणी मागणी केली असेल तर प्रथम महानगरपालिकेची ना हरकत असल्याशिवाय त्या जागेची सनद देण्यात येवु नये अशा प्रकारचा पत्रव्यवहार यापुर्वी झालेला आहे त्याचा पाठपुरावा फक्त करा जेणेकरुन ....... जसे आता सन्माननिय सदस्यांनी सांगितले की, महानगरपालिकेचे भुखंड बिल्डरच्या घसात घालायचे आणि नविन विकास आराखडयामध्ये कुठल्यातरी झोपडपट्टया किंवा इमारती पाडायच्या आणि त्याठिकाणी आरक्षणे टाकायची अशी वेळ यावयास नको. म्हणुन आताच महानगरपालिकेचे जे भुखंड आपल्या ताब्यात नाहीत ते ताब्यात घेण्याची प्रक्रिया चालु करा आणि जे भुखंड मोकळे आहेत त्यांच्यावर संरक्षण भिंत टाकुन तेथे महानगरपालिकेचा फलक लावा.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मा. महापौरजी, उप—महापौरजी आणि आयुक्त साहेब, प्रांत अधिका—यांकडे जावुन आपण विचारणा केली तर ते सांगतात की सर्व भुखंड महापालिकेस हस्तांतरीत केले आहेत. त्यानंतर ते आपल्या भुखंडाची दुस—या कुणास सनद कशी देतात? आपल्या ना हरकत दाखल्याविना? खेळाच्या मैदानासाठी १६ नंबरचा भुखंड आरक्षित आहे. त्याची आता पुन्हा सनद देण्यात आलेली आहे आणि त्यावर बांधकाम करण्यासाठी बांधकाम नकाशा मंजुरीस टाकण्यात आलेला आहे. मेहरबानी करुन तेथे बांधकाम करण्यास परवानगी दिली जावु नये. कारण की त्या भुखंडावर खेळाच्या मैदानासाठीचे आरक्षण आहे.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—याबाबत कालच मी आपणांस सांगितलेले आहे. हे आज जे बोलत आहे त्याबाबतीत मी कालच आपणांस सांगितले आहे. भुल्लर साहेब हा जो भुखंड आहे हा कॅम्प नं. ५ येथिल आहे ना? मोकळा भुखंड आहे त्याची सनद देण्यात आलेली आहे. याबाबतीत परवाच मी आपल्या निदर्शनास आणुन दिलेली आहे.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—मा. महापौरजी, उप—महापौरजी व आयुक्त साहेब, याबाबतीत मी १९/९/२००७ रोजी एक पत्र दिले आहे. कैलास कॉलनी, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर येथे आपल्या जकात विभागाचा एक बुथ होता तो एक फार मोठा भुखंड आहे. त्या जागेवर एखादे उदयान विकसित होवु शकते. त्या जागेची सनद मिळविण्यासाठी काही लोक प्रयत्न करत आहेत. याबाबत मी अगोदरच आपणांस पत्र दिले असल्याने आपण त्याकडे कृपया लक्ष दयावे ही विनंती.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—तो भुखंड ट्रक टर्मिनन्ससाठी आरक्षित आहे.

महापालिका सचिव :—ठिक आहे?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—बांधकाम दुरुस्ती परवानगीचा जो प्रश्न आहे......

महापालिका सचिव :—कुठला ५२ क्रमांकाचा प्रश्न?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—होय, प्रश्न क्र. ५२. आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, नगररचनाकारांना विचारुन पुढील महासभेत सांगतो म्हणुन.

नगररचनाकार (श्री.अ.पा.गुरगुळे):—मा. महापौरजी, उप—महापौरजी, मा. आयुक्त, सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी बांधकाम दुरुस्ती परवानगी बाबत जो प्रश्न उपस्थित केला होता. जे पुरग्रस्त होते त्यांना आम्ही दुरुस्ती परवानगी दिली होती परंतु २३ पुरग्रस्ताबाबत जी दुरुस्ती परवानगी आहे ती पुरग्रस्तांसाठी नाही त्यांना आम्ही परवानगी दिली नव्हती. त्याबाबत मी ८ दिवसाच्या आत चौकशी करुन.......

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— त्यात अजुन एक आहे, एकत्रित २४ आहेत. त्यात अजुन काही राहिले तर नाहीत ना त्याबाबत आपण चौकशी करा. यामध्ये अर्ज नंतर आले होते आपण उत्तर नंतर दिले.

नगररचनाकार (श्री.अ.पा.गुरगुळे):—आठ दिवसांत चौकशी करुन तो अहवाल मी आठ दिवसांत सभागृहास देईन.

महापालिका सचिव :— ठिक आहे? प्रश्नोत्तर संपले?
कृपया लक्ष दयावे. अनेक लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत श्री. दत्तात्रय पवार व अनुमोदक आहेत श्री. जीवन इदनानी

विषय :— भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणे बाबत
यावर्षी श्वान निबिर्जीकरणाची मोहिम बंद असल्याने भटक्या कुत्र्यांची संख्या मोठया प्रमाणावर वाढली आहे अश्या वेळी मध्यवर्ती रुग्णालयात श्वान दंशावरील लस (इंजक्शन) उपलब्ध नाही त्या बाबत ही लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. दत्तात्रय पवार व अनुमोदक आहेत श्री. जीवन इदनानी

विषय :— क्रिडा संकुलाच्या वापरा बाबत.
महापालिकेने उल्हासनगर—४ येथे बांधलेल्या क्रिडा संकुलाचा उपयोग प्रभाग समिती कार्यालय, अग्निशमन स्थानक इत्यादी साठी होत असुन मुलांना खेळण्यासाठी आणि मोठया व्यक्तीना व्यायामासाठी होत नसल्या बाबत ही लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सुचना क्र. ३ जीचे सुचक आहेत श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व अनुमोदक आहेत श्री. रामसांगर यादव

विषय :— बांधकाम परवानगी देताना कमी प्रमाणात वसुल केलेल्या स्टॉकीग चार्जेसचा भरणा करण्याकामी होत असलेली जाचक वसुली रद्द करणे व सदर नाहक वसुलीस जबाबदार असलेल्या अधिका—याच्या पेन्शन/फंड वेतना मधुन वसुली करण्या बाबत ही लक्षवेधी सूचना.

लक्षवेधी सुचना क्र. ४ जीचे सुचक आहेत श्री. जमनादास पुरस्वानी व अनुमोदक आहेत श्री. जीवन इदनानी

विषय :— दारिद्र रेषेखालील कुटूंबांच्या यादीच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मा. महापौरांनी बोलाविलेल्या बैठकीस अधिकारी उपस्थित न राहिल्या बाबत ही लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सुचना क्र. ५ जीचे सुचक आहेत श्री. जमनादास पुरस्वानी व अनुमोदक आहेत श्री. जीवन इदनानी

विषय :— जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्हीव मिशन व एम.एम.आर.डी कडून निधी मिळविणे कामी प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने सदरच्या निधी पासुन महापालिका वंचित आहे.   त्या बाबत ही लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सुचना क्र. ६   जीचे सुचक आहेत श्री. मोहन साधवानी व अनुमोदक आहेत श्री. विनोद ठाकुर

विषय :— प्लॉट नं.७०५ ला कम्पाउंड का करण्यात आले नाही ? व त्याठिकाणी खाजगी मालमत्ता असा फलक कसा लावण्यात आला ? त्याबाबत ही लक्षवेधी सूचना.

एकत्रितपणे ६ लक्षवेधी सूचना असून त्यातील केवळ २ लक्षवेधी सूचनेस मा. महापौरांकडुन अनुमती मिळेल. कोणत्या २ लक्षवेधी सूचनेस मा. महापौर अनुमती देत आहेत हे थोडयाच वेळात आपणांस सांगण्यात येईल.

महापौर :— भटक्या कुत्र्याचा बंदोबस्त करणे व प्लाट नं. ७०५ ला कंपाउंड का करण्यात आले नाही? या  दोन लक्षवेधी सुचना स्विकृत करण्यात येत आहेत.

मा. महापालिका सचिव:—मा. महापौरांकडुन निर्णय घेण्यात आलेला आहे.  एक लक्षवेधी सूचना जी आहे ती भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणे बाबत. व दुसरी लक्षवेधी सूचना जी आहे प्लॉट नं. ७०५ ला कम्पाउंड का करण्यात आले नाही ? व त्याठिकाणी खाजगी मालमत्ता असा फलक कसा लावण्यात आला ? या दोन लक्षवेधी सूचनेस मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. व इतर ज्या लक्षवेधी सूचना आहेत त्यांना मा. महापौरांनी स्विकृती दिली नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, स्टॉकीग चार्जेस बाबत जी लक्षवेधी सूचना आहे ती स्विकृत करावयास पाहिजे होती. कारण लोकांना पैसे भरण्याबाबत जी नोटिस पाठविली आहे, बिल्डर बांधकाम करुन पळुन गेले, अधिका—यांनी वसुली केली नाही, आज तेथे जे लोक राहतात त्यांना पैसे भरावे लागतील.  हा दुसरा ८५५ सारखा मुद्दा उल्हासनगर शहरासाठी उभा राहिल. माझे असे म्हणणे होते की या लक्षवेधी सूचनेस आपण मान्यता दयावयास पाहिजे होती, तर बरे झाले असते.  बाकी आपली मर्जी.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे हे सभागृहातुन बाहेर गेले.**

महापालिका सचिव:—लक्षवेधी सुचना क्र. १   जीचे सुचक आहेत श्री. दत्तात्रय पवार व अनुमोदक आहेत श्री. राजु इदनानी

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सुचकाचे नाव      :—  श्री. दत्तात्रय पवार.
अनुमोदकाचे नाव :—  श्री. जिवन इदनानी.

विषय:— भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणे बाबत

**यावर्षी श्वान निबिर्जीकरणाची मोहिम बंद असल्याने  भटक्या कुत्र्यांची संख्या मोठया प्रमाणावर वाढली आहे अश्या वेळी मध्यवर्ती रुग्णालयात श्वान दंशावरील लस (इंजक्शन) उपलब्धा नाही त्या बाबत ही लक्षवेधी सूचना**

प्रभाग क्र. ९ मध्ये व इतर प्रभागांत मागील वर्षी श्वान निर्बिजीकरण करण्याची मोहिम महापालिकेमार्फत राबविली होती, परंतु या वर्षी ती पुर्णपणे बंद असल्याने भटक्या/मोकाट कुत्र्यांची संख्या फार मोठया प्रमाणात वाढल्याने नागरीकांना त्रास होत आहे.

रात्रीचे वेळी ही कुत्री रस्त्यावरुन ये—जा करणा—या नागरीकांवर हल्ला करतात/चावतात. त्यामुळे नागरीकांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. विशेषत: रात्रपाळी करणा—या कर्मचा—यांना याचा फारच त्रास होत आहे. तसेच मध्यवर्ती रुग्णालयात श्वानदंशावरील लस (औषधे, इंजेक्शन) उपलब्ध नाही. श्वानदंशावर त्वरीत इलाज न झाल्यास व्यक्ती दगावण्याची शक्यता आहे.

सदर बाब ही नागरीकांच्या सुरक्षेच्या व जीवनाशी निगडित असल्याने उपरोक्त समस्याचे निवारण करणेसाठी लक्षवेधीवर चर्चा करण्यात यावी.

---

सदस्य श्री. दत्तात्रय पवार :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मागील दोन वर्षापुर्वी भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी त्याचे निबिर्जीकरण करण्यात येत होते. परंतु या वर्षात किंवा मागील वर्षापासुन ही प्रक्रिया पुर्णपणे बंद आहे. ही का बंद करण्यात आली? यापुर्वी किती कुत्र्यांचे निबिर्जीकरण करण्यात आले आहे त्याची आकडेवारी येथे उपलब्ध झाली तर बरे हाईल. आणि उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतुन किती कुत्रे निबिर्जीकरण करण्यासाठी घेवुन गेले आहेत? आणि किती पुन्हा परत केले? याची सुध्दा येथे आकडेवारी उपलब्ध झाली तर फार बरे होईल? आणि ही प्रक्रिया का बंद झाली? ही प्रक्रिया पुन्हा तुम्ही सुरु करणार आहात का? याविषयी सविस्तर माहिती दयावी धन्यवाद।

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य) :—सन्माननिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, नगरसचिव व सर्व सन्माननिय सदस्य, आज या ठिकाणी भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी उपस्थित केलेली जी लक्षवेधी आहे त्यासंबंधी सन २००५—०६ मध्ये एनिमल वेलफेअर सोसायटी अंबरनाथ यांना एकुण २००० नर/मादी कुत्र्यांचे निबिर्जीकरण करण्याची निविदा दिली होती. त्यानुसार त्यांनी २००० कुत्र्यांचे निर्बिजीकरण केले आहे. त्यानंतर २००६—२००७ मध्ये निबिर्जीकरण करण्यात आलेले नाही.

सदस्य श्री. दत्तात्रय पवार:—त्यानंतर ही प्रक्रिया का बंद करण्यात आली आहे? कारण दिवसेंदिवस या मोकाट कुत्र्यांची संख्या वाढत आहे. आणि रात्रीपाळीवरुन येणा—या लोकांना तसेच रात्रीच्या वेळेस रस्त्यावरुन जा—ये करणा—या लोकांना या कुत्र्यांचा प्रादुर्भाव व त्रास होत असतो. आणि कुत्रा चावल्यामुळे त्यावर दयावयाच्या इंजेक्शनाची लस येथे उपलब्ध नाही. आजच्या लोकमतला याबाबतची बातमी आली आहे ती आपण सर्वांनी वाचली असेल, उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये किंवा शासकिय मध्यवर्ती रुग्णालयामध्ये याबाबतचे रेबिज नावाचे जे इंजेक्शन मिळते ते सुध्दा उपलब्ध नाही. आजच्या लोकमतची बातमी कदाचित आपण वाचली असेल. आणि म्हणुन पुन्हा तुमचे लक्ष मी येथे वेधु इच्छितो. आणि जर दिवसेंदिवस अशा या कुत्र्यांची संख्या वाढत असेल आणि त्याचा त्रास जर जनतेला होत असेल तर निबिर्जीकरण करण्याची प्रक्रिया आपण पुन्हा सुरु करावी अशी मी आपणाला विनंती करतो.

**मा. सदस्या श्रीमती निना नाथानी, श्रीमती लता निकम यांनी सभागृहात प्रवेश केला.**

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य) :—याठिकाणी लसीबाबतचा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, सन २००६—२००७ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेने शासकिय मध्यवर्ती रुग्णालयासाठी १० हजार नग लसीची मागणी केली होती. आणि त्यासाठी आरसी रेटवर अवंती फार्मा मुंबई यांना ऑर्डर दिली होती. वर्षभरात त्यांना तीन वेळा स्मरणपत्र पाठवुन सुध्दा त्यांनी लसीचा पुरवठा केला नाही. आणि त्याबाबत शासनाचा जो आरसी रेट आहे तो फारच कमी असल्यामुळे आणि आरसी फक्त अवंती फार्मा आणि दुस—या एका फार्मा कंपनीची असल्यामुळे या लसीचा सध्या बाजारपेठेत तुटवडा आहे. त्यामुळे या कंपनीला लस पुरवठा करण्याची ऑर्डर देवुन सुध्दा ती कंपनी लसीचा पुरवठा करु शकत नाही. सन २००७—२००८ साठी सुध्दा ६ हजार लसीची मागणी केलेली आहे. त्याबाबत जी प्रक्रिया आहे ती चालु करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—साहेब, कुत्रे चावल्यानंतर आपण लसीची मागणी करतो. आणि त्यानंतर लसीचा पुरवठा केला जात नाही असे आपण उत्तर देता. परंतु लोक मरतील त्याचे काय? मागच्या महिन्यामध्ये जवळ जवळ ४०० लोकांना कुत्रे चावले परंतु शासकिय मध्यवर्ती रुग्णालयामध्ये एकही इंजेक्शन उपलब्ध नाही. आपण कंपनीकडे मागणी करतो, कंपनी पुरवठा करत नाही. हे काही उत्तर नाही?

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य) :—शासकिय मध्यवर्ती रुग्णालयात ४ हजार इंजेक्शनाचा वापर करण्यात आलेला आहे.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**आज जर तुम्ही शासकिय मध्यवर्ती रुग्णालयात फोन करुन याबाबत विचारणा केली तर एकही इंजेक्शन उपलब्ध नाही असे सांगण्यात येईल. मागच्या महिन्यात ४०० लोकांना कुत्रे चावले आहेत. आपल्याकडे महानगरपालिकेत इंजेक्शन उपलब्ध आहेत काय?

**डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य) :—**आपल्याकडे इंजेक्शने उपलब्ध नाहीत.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**आपल्याकडेही नाहीत आणि शासकिय मध्यवर्ती रुग्णालयातही नाहीत मग लोक जाणार कुठे? कुत्रा चावुन माणसे मेल्यानंतर, कुठे जाणार लोक?

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—**मा. आयुक्तजी, उल्हासनगरपासुन मुरबाडपर्यंतच्या ज्या ज्या लोकांना कुत्रे चावतात त्यांना शासकिय मध्यवर्ती रुग्णालयात इंजेक्शने दिली जातात. ही इंजेक्शने फक्त उल्हासनगर महानगरपालिका पुरवत असल्याने इंजेक्शन पुरत नाहीत. यासाठी आजुबाजुच्या ज्या नगरपालिका महानगरपालिका किंवा जिल्हापरिषदेचे दवाखाने आहेत त्यांना या लसीचा पुरवठा करण्याकामी विनंती केली तर फार मोठया प्रमाणात इंजेक्शने उपलब्ध होवु शकतील.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—**साहेब, कल्याण महानगरपालिकेमध्ये या लसीचा मोठया प्रमाणावर साठा उपलब्ध आहे. आता परवाचीच गोष्ट आहे माझ्या लेटरहेडवर पत्र लिहुन माझ्या प्रभागातील एका व्यक्तीस कल्याणमध्ये पाठविले असता त्यास इंजेक्शन मिळाले. परंतु उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये हे इंजेक्शन नाही आहे. माणुस मेल्यानंतर त्यास इंजेक्शन दयायचे काय?

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**मा. महापौरजी, गल्ली बोळात जी वेडी कुत्रे फिरतात, ज्यांना त्वचेचा रोग झाला आहे, ती लोकांना चावतात त्या कुत्र्यांसाठी आपण काय बंदोबस्त केला आहे? त्या कुत्र्यांचे आपण काय करणार? २००५—२००६ मध्ये जे निबिर्जीकरण झाले होते त्याचे पेमेंट झाले आहे काय? ज्याने निबिर्जीकरण केले ते बरोबर केलेले नव्हते. त्याचा कुणाकडे रेकॉर्ड नाही आहे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**आयुक्त साहेब, या कुत्र्यांचा काय बंदोबस्त होणार आहे? यांना कुठे स्थलांतरीत करता येईल काय? हाजीमंलगला जागा मोकळी आहे, तेथे सोडा यांना.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:—**मा. महापौरजी, मा. उप—महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आज आमचे सभापती श्री. दत्तात्रय पवार यांनी आज लक्षवेधीद्वारे एक चांगला विषय आणला आहे. भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त झाला पाहिजे परंतु तो होत नाही. मला या सभागृहामध्ये आवर्जुन सांगायचे आहे की, या उल्हासनगर महानगरपालिकेचे ज्यांनी भुखंड हडप केले आहेत, जे भुखंड हडप करतात त्यांचा बंदोबस्त महापालिकेतर्फे होत नाही. मग भटक्या कुत्र्यांचा काय बंदोबस्त होणार आहे? १९६३ पासुन मी हे पाहत आलो आहे. नगरपालिका होती, महानगरपालिका झाली तरी भुखंड हडपणा—यांचा नगरपालिकेतर्फे बंदोबस्त होत नाही. तर बिचा—या कुत्र्यांचा काय बंदोबस्त होणार आहे? बंदोबस्त केला तर कल्याणचे येथे येतील. उल्हासनगर—४ चे येतील. म्हणजे कुत्र्यांचा बंदोबस्त महापालिकेतर्फे होणार नाही. यासाठी पहिला बंदोबस्त हा केला पाहिजे की महापालिकेचा एकही भुखंड शिल्लक राहत नाही ते हडपणा—यांचा बंदोबस्त केला पाहिजे. प्लॉट क्र. ७०५ बाबत आज सुध्दा लक्षवेधी आली आहे. अशाप्रकारे महानगरपालिकेत भोंगळ कारभार चालु आहे. त्याला ना सावंत साहेब काही करु शकत, ना आयुक्त साहेब काही करु शकत. तेव्हा या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी आम्हां नगरसेवकांनाच आता काठी हाती घ्यावी लागेल आणि आम्हांलाच त्यांचा बंदोबस्त करावा लागेल. त्यांचा बंदोबस्त महापालिकेतर्फे होणार नाही हे मला चांगले माहित आहे. धन्यवाद।

**सदस्य श्री. जे.के.ढोके :—**मा. महापौरजी, उप—महापौर, आयुक्त साहेब, श्री. दत्तात्रय पवार यांनी चांगली अशी लक्षवेधी मांडली आहे. तीचा विषय आहे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याबाबत. मागे २००४—२००५ मध्ये पाटील या कंपनीस भटक्या कुत्र्यांची नसबंदी करण्याचा ठेका दिला होता. त्यावेळेस त्यांनी कॅम्प नं. ४ व ५ मध्ये ब—याचशा कुत्र्यांना आटोक्यात आणले होते. परंतु त्या ठेकदाराचे पेमेंट अदा न केल्यामुळे तो आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रामधुन निघुन गेला. आणि उल्हासनगरमध्ये आज ३० ते ४० हजार कुत्रे भटकत आहेत. रात्री बेरात्री कामगार लोक कामावरुन परत येत असतांना किंवा वरीष्ठ नागरीक सकाळी ५ वाजता फिरण्यासाठी जात असतांना कुत्रा त्यांना चावा घेतो. त्यावर कोणत्याच रुग्णालयामध्ये इंजेक्शन व लस उपलब्ध नसल्यामुळे आपल्या महानगरपालिकेतर्फे त्यांना त्वरीत इंजेक्शने/ लस उपलब्ध करुन देण्यात यावी.

कारण आजच्याच लोकमत या वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी छापुन आली आहे की महिन्याला ४०० ते ५०० कुत्रे लोकांना चावा घेतात. उल्हासनगर महानगरपालिकेमध्य लस उपलब्ध नाही ही एक खेदाची गोष्ट आहे. कल्याण, ठाणे या महानगरपालिकेमध्ये इंजेक्शने उपलब्ध आहेत. भिंवडी सारख्या शहरात इंजेक्शने उपलब्ध आहेत. परंतु आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये लसीकरण/इंजेक्शने उपलब्ध नाहीत. आताच आमच्या श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी सांगितले की, उल्हासनगरमध्ये मुरबाड ते कसा–यापासुन लोक येतात, त्यांना वेळेवर लसीकरण उपलब्ध न झाल्यामुळे त्यातील बरेचसे लोक मृत्युमुखी पडतात. या लक्षवेधीबाबत श्री. सावंत साहेबांनी गंभीरतेने दखल घेवुन लसीकरण उपलब्ध करुन दयावे अशी मी आपणांस विनंती करतो.

डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–सन्माननिय सदस्य श्री. रविंद्र बागुल व श्री. ढोके साहेबांनी सांगितले की कल्याण आणि ठाणे महानगरपालिकेमध्ये रेबिज लसीकरणाचा साठा उपलब्ध आहे. त्यांनी कोणत्या प्रकारे हा साठा उपलब्ध करुन घेतला याची माहिती घेवुन त्याप्रमाणे आपल्या महानगरपालिकेत सुध्दा त्वरीत साठा उपलब्ध करुन घेतला जाईल. त्याचप्रमाणे सन्माननिय सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी सुध्दा अगोदरच्या ठेकेदाराचे पेमेंट झाले आहे किंवा नाही आणि कारवाई का थांबविली आहे याबाबत प्रश्न उपस्थित केला. अगोदरचा जो ठेकेदार आहे त्याच्या कामाबाबत शंका निर्माण झाल्या होत्या. त्याच्या कामाची चौकशी करण्यासाठी एक समिती गठित करण्यात आली होती. त्या समितीचा रिपोर्ट आलेला नसल्यामुळे त्याचे पेमेंट केलेले नाही. तसेच सन २००७–०८ साठी जी प्रक्रिया थांबली होती ती प्रक्रिया निविदा मागवुन परत चालु करण्यात येईल.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–मा. आयुक्त साहेब, आता डॉ. सावंत साहेबांनी हा जो प्रश्न केला की लसीचा साठा कुठे उपलब्ध आहे हे पाहणे हे काही नगरसेवकाचे काम नाही. आम्ही आमच्या लेटरहेडवर कल्याण महानगरपालिकेला पत्र लिहिले त्यानुसार त्यांनी आम्ही पाठविलेल्या व्यक्तीस इंजेक्शन दिले. ही एवढी माहिती आम्हांला मिळालेली आहे. आता प्रत्येक नगरपालिकेत जावुन याबाबतीत विचारणा करायची काय की साहेब तुमच्याकडे रेबिज लसीकरणाचा किती साठा आहे?

डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–सन्माननिय सदस्यांनी आता सांगितले की, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये रेबिज लसीकरणाचा साठा उपलब्ध आहे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–होय, आपल्या महानगरपालिकेत असा साठा उपलब्ध नाही.

**मा. सदस्य श्री. मुकेश तेजी, श्री. हरेश जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–ज्याप्रकारे त्यांनी लसीकरणासाठी साठा मागविला असेल आणि सध्या त्यांच्याकडे उपलब्ध आहे. त्याच धर्तीवर आपल्या महानगरपालिकेत सुध्दा साठा उपलब्ध करुन घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही केली जाईल आणि साठा उपलब्ध करुन घेतला जाईल.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–हो, घेतला जाईल?

सदस्य श्री. जे. के. ढोके:–आताच श्री. सावंत साहेबांनी सांगितले की त्या ठेकेदाराचे पेमेंट थांबविल्यामुळे आपल्याकडे लसीकरण होवु शकले नाही. तर त्या ठेकेदाराचे पेमेंट का थांबविले आपणांस काय शंका आली? कुठल्याप्रकारची शंका आली?

डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–त्याच्या कामाबद्दल शंका होती. ज्या नर/मादी कुत्र्यांची नसबंदी केली असेल त्यांना एअरटॅक किंवा मार्कींग करायची होती तर त्याबाबत काही ठिकाणी मार्किंग न झाल्याचे आढळुन आले होते. त्यामुळे तत्कालीन आयुक्तांनी याबाबतीत छाननी करण्यासाठी समिती गठित केली होती.

मा. सदस्य श्री. राजु इदनानी, श्री. अंकुश म्हस्के हे सभागृहातुन बाहेर गेले.

सदस्य श्री. जे. के. ढोके:–सन २००५–०६ मध्ये जे पेंमेंट थांबविले गेले त्यानंतर दुस–या कुणा ठेकेदारास का नेमले नाही महानगरपालिकेने?

डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–थांबलेली प्रक्रिया आहे, ती आता चालु करण्यात येईल. आणि लवकरात लवकर नविन ठेकेदाराची नेमणुक केली जाईल.

सदस्य श्री प्रशांत धांडे :–मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, मी डॉ. सावंत साहेबांना प्रश्न विचारु इच्छितो. ही जी भटक्या कुत्र्यांबाबत लक्षवेधी आलेली आहे, या पुर्वी देखील लसीकरण झाले असेल. नर व मादी या दोघांवर आपण लसीकरण करतो की फक्त नर कुत्र्यांवर लसीरकण करतो? कारण की विषय गंभीर आहे म्हणुन.

डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–नर आणि मादी अशा दोन्ही प्रकारच्या कुत्र्यांचे निबिर्जीकरण केले जाते, नसबंदी केली जाते.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–कुत्री एकाच वेळेला जवळ जवळ १० पिलांना जन्म देते. त्यामुळे कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. असे तुम्हीच म्हणत आहात. मागे आपण या विषयावर चर्चा केली होती. ही जी वाढ आहे ती कुठेतरी थांबली पाहिजे. वाढ थांबली तरच हा प्रश्न सुटु शकेल. यावर काहीतरी निर्णय लागला पाहिजे.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :–मा. आयुक्त साहेब, पुणे महानगरपालिकेने स्थानिक संस्था आणि पेटा संस्थेस काही जागा उपलब्ध करुन दिली आहे. तेथे रस्त्यावरील भटके कुत्रे ठेवण्यासाठी खोल्या बांधलेल्या आहेत. तेथे त्यांना ठेवुन स्थानिक संस्था आणि पेटा संस्था या दोन्ही संस्था त्यांची काळजी घेत आहेत. आता आपण जर कुत्र्यांच्या निर्बिजीकरणाच्या मोहिमेत कमी पडत असल्यास आपल्याकडे जे भुखंड पडुन आहेत त्यांवर पेटा सारख्या संस्था जर अशा प्रकारची योजना राबवत असतील तर फार चांगले होईल. विशेषत: आजारी असलेले जे कुत्रे आहेत त्यांच्याबाबतीत या संस्थेने विशेष लक्ष पुरविले आहे.

सदस्य श्री. तुलसीदास वसिटा :–मा. महापौर, उप–महापौर आणि आयुक्त साहेब, एकदा का एखादया वेड लागलेल्या कुत्र्यांने माणसाला चावा घेतला तर त्यावर संपुर्ण जगामध्ये उपचार उपलब्ध नाही. यासाठी लवकरात लवकर इंजेक्शनची व्यवस्था केली जावी.

सदस्य श्री. राजू जग्यासी :–मा. महापौर, उप–महापौर आणि आयुक्त साहेब, डॉ. दिपक सावंत यांच्याशी संबंधीत असा एक मुद्दा आहे. ॲन्थोनीच्या बाबतीत चौकशी करण्यासाठी या सभागृहाने एक समिती स्थापन केली होती. यावर्षीच्या दिवाळीमध्ये शहरात कच–याची काय स्थिती होती ती सर्व सदस्यांना माहित आहेच. त्याबाबत मी आपणाकडुन हे जाणुन घेवु इच्छितो की, त्या समितीचा अहवाल काय आला आहे तो आम्हां सर्व सदस्यांच्या समोर, सभागृहासमोर ठेवला जावा. व दिवाळीच्या काळात ॲन्थोनी ठेकेदाराने काम व्यवस्थीत केले नव्हते हे सर्व सदस्य मान्य करतात. तर काय ॲन्थोनीस आपण दिवाळीच्या त्या दिवसातील पुर्ण पेमेंट देणार आहात? याबाबतीत खुलासा करावा.

सदस्य श्री. मोहन साधवानी:–मा. महापौर, उप–महापौर आणि आयुक्त साहेब, भटक्या कुत्र्यांबाबत सर्व सन्माननिय सदस्यांनी आपापल्या सूचना सभागृहात मांडल्या आहेत. यास्तव याबाबतीत लवकरात लवकर कार्यवाही करावी कारण की सध्या शहरामध्ये फिरणे लोकांना मुश्कीलीचे झाले आहे. यासाठी यावर लवकरात लवकर उपाययोजना केली जावी ही विनंती. निविदेची वाट न पहाता लवकरात लवकर उपाययोजना केली तर फार बरे होईल. नगरसेवकांनाच काय सर्वसामान्य जनतेलाही रस्त्यावरुन फिरणे मुश्कीलीचे झाले आहे.

डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):– कुत्र्यांच्या निबिर्जीकरण करण्याबाबतीत आपण आता जी चर्चा केली त्यानुसार निविदेची जी प्रक्रिया आहे ती लवकरात लवकर चालु केली जाईल आणि लवकरात लवकर नविन ठेकेदाराची नेमणुक करुन निबिर्जीकरण करण्याची मोहिम सुरु केली जाईल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–रस्त्यावर जी वेड लागलेली कुत्री फिरत आहेत त्यांचा लवकरात लवकर काहीतरी बंदोबस्त केला जावा. जी गल्लोगल्ली फिरत आहेत तसेच ज्यांना त्वचेचे काही आजार वगैरे आहेत यासाठी आयुक्त साहेब आणि महासभाही आपणांस परवानगी देत आहे. आपण लवकरात लवकर कार्यवाही करावी.

डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–निविदा प्रक्रिमध्ये कुत्रे पकडण्याचा मुद्दा समाविष्ट केला जाईल.

सदस्य श्री. जे.के. ढोके:–डॉ. सावंत साहेब, लवकरात लवकर म्हणजे किती कालावधी लागेल? १५ दिवस, ८ दिवस, एक महिना?

डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–या महिन्यामध्येच कार्यवाही चालु केली जाईल.

सदस्य श्री. जे.के. ढोके:–लवकरात लवकर म्हणजे नेमके कधी? कारण की मागे आमच्या सन्माननिय सदस्या श्रीमती पंचशिला नाना पवार यांनी परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वाराचे काम लवकरात लवकर चालु करण्याबाबतीत प्रश्न विचारला होता त्यावेळेस आयुक्त साहेबांनी उत्तर दिले होते की लवकरात लवकर काम चालु केले जाईल, आठ दिवसात. परंतु आज त्यास चार महिने होवूनही ते काम चालु झाले नाही. म्हणुन लवकरात लवकर म्हणजे कधी? आठ दिवसात, चार दिवसात? त्याबाबतीत आम्हांला लेखी आश्वासन दया.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–मा. आयुक्त साहेब, उपायुक्त डॉ. दिपक सावंत यांना प्रश्न विचारते. आतच श्री. राजु जग्यासी साहेबांनी कच–याच्या बाबतीत तुम्हांला प्रश्न विचारला त्यास अदयाप उत्तर दिलेले नाही. शहरामध्ये जागोजागी कचरा पडलेला आहे त्याबाबतीत तुम्ही उत्तर दिलेले नाही. आता एवढयातच त्यांनी तुम्हांला विचारले आहे. आणि आम्हीही तेच विचारत आहोत.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–सन्माननिय महापौर महोदयांच्या परवानगीने सांगतो लक्षवेधीच्या संदर्भात प्रश्न विचारा. त्यास उत्तर दिले जाईल.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–हा पण शहराशी संबंधीत विषय आहे. लक्षवेधीच महत्वाची आहे काय?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–मा. महापौरांच्या निर्देशानुसार उत्तर दिले जाईल.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–सगळया लक्षवेधीच घेतल्या पाहिजेच का? हा पण शहराचाच विषय आहे जागोजागी कचरा पडला आहे. शहर काय म्हणत आहे ते पाहाना जरा?

सदस्य श्री. राजू जग्यासी :–काय महापौर आपणांस सांगत आहेत की कच–याच्या बाबतीत आपण बोलू नका म्हणुन? आयुक्त साहेब, मी आपणांस विचारत आहे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–मी सुध्दा आपणांस सांगत आहे श्री जग्यासीजी, या लक्षवेधीबाबत मी मा. महापौरांशी चर्चा केली आहे. व त्यांनी असे सांगितले आहे की लक्षवेधीनंतर चर्चा करा. यावर सुध्दा चर्चा करण्याची माझी तयारी आहे. आम्हांला यामध्ये काही लपवुन ठेवायचे नाही.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–ठिक आहे. लक्षवेधीच्या नंतर चर्चा करु.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :–लक्षवेधी जी आहे तीच्यावरच प्रथम चर्चा करा. त्यानंतर जी काही चर्चा करायची असेल ती करा.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–जी लक्षवेधी आहे तिच्यावरच चर्चा केली तर चांगले आहे. श्री. राजु जग्यासी आपणांस जर त्या विषयावर चर्चा करायची असेल तर आपण लक्षवेधी दया मग त्यावर आपण चर्चा करु.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :–जी लक्षवेधी आहे तिच्यावर चर्चा होवु दया. आणि चर्चा पुर्ण झाल्यानंतर जर तुम्हांला तो कच–याचा विषय आणायचा असेल तर त्याबाबतीत तुम्ही प्रश्न विचारा. त्यावर आयुक्त साहेब किंवा डॉ. दिपक सावंत साहेब तुम्हांला उत्तर देतील. डॉ. साहेब तुम्ही एक लक्षात घ्या. मागे एका कॅटल कॅचरने जर तीन जनावरे पकडुन आणली तरच त्यास पगार दिला जात होता. यासाठी आपले जे वॉचमन आहेत त्यांना ही भटकी कुत्री पकडण्यास पाठवा तीन कुत्री पकडुन आणली तरच त्यांना पगार दिला जावा. याच उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे आपल्या कामगारांना पगार दिला जात होता.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–त्यांना प्रशिक्षण दिलेले नाही.

सदस्य श्री. सतीश चहाळ :–ही जी लक्षवेधी आणली आहे त्याबातीत मी बोलु इच्छितो.

महापालिका सचिव :–पुढील लक्षवेधी सूचना.....

सदस्य श्री. सतीश चहाळ :–मला बोलायचे आहे. भटक्या कुत्रांबाबत शक्य तितक्या लवकरात लवकर बंदोबस्त केला पाहिजे. पिसाळलेला कुत्रा चावल्यानंतर त्याचा परिणाम माणसावर सुध्दा होतो माणसे सुध्दा पिसाळतात.

**महापालिका सचिव:—**लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. मोहन साधवानी व अनुमोदक आहेत श्री. विनोद ठाकुर

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी.
अनुमोदकाचे नाव :— श्री. विनोंद ठाकुर.

**विषय :— प्लॉट नं.७०५ ला कम्पाउंड का करण्यात आले नाही ? व त्याठिकाणी खाजगी मालमत्ता असा फलक कसा लावण्यात आला ? त्याबाबत ही लक्षवेधी सूचना.**

अमन टॉकीज रोड, रिझर्व प्लॉट नं. ७०५ येथिल अनाधिकृत बांधकाम मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये तत्कालीन मा. आयुक्त यांनी निष्कासीत केले होते. सदरचे अनाधिकृत बांधकाम हे ८५५ च्या अनधिकृत बांधकामात येते.

उपरोक्त ठिकाणचे अनधिकृतम बांधकाम महानगरपालिकेमार्फत निष्कासित केल्यानंतर त्या ठिकाणी महापालिकेने ''आरक्षित भुखंड (रिझर्व प्लॉट)'' असा फलक लावण्यात आला होता व सदर ठिकाणी अतिक्रमण होवू नये म्हणून महापालिकेने या प्लॉटला कंपाउंड करणे अनिवार्य होते. परंतु श्री. लोहाना यांनी महापालिकेचा सदर फलक काढुन त्याजागी त्यांचे खाजगी मालमत्ता (प्रायव्हेट प्रॉपर्ट्री) चा फलक लावला आहे.

उपरोक्त ठिकाणचा ''आरक्षित भुखंड (रिझर्व प्लॉट)'' महापालिकेने ताब्यात घेतल्यानंतर सदर प्लॉटला कंपाउंड का करण्यात आले नाही? उपरोक्त ठिकाणचा भुखंड हा आरक्षित भुखंड आहे, तरी त्याठिकाणी खाजगी मालमत्ता (प्रायव्हेट प्रॉपट्री) चा फलक कसा काय लावण्यात आला? याबाबत येणा—या सर्वसाधारण महासभेत चर्चा करण्यात यावी व सदर बाबत योग्य ती कारवाई करणेसाठी योग्य तो निर्णय घेण्यात यावा, ही विनंती.

---

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, श्री. आर.के. सोनावणे हे आयुक्त असतांना अमन टॉकीज रोड, रिझर्व प्लॉट नं. ७०५ येथिल अनाधिकृत बांधकाम मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये तत्कालीन आयुक्त श्री. आर.के. सोनावणे यांनी निष्कासित केले होते. त्यावेळेस तेथे उल्हासनगर महानगरपालिकेचा नामफलक लावण्यात आला होता. सदर ठिकाणी अतिक्रमण होवु नये म्हणुन महापालिकेने त्यावर कंपाउंड करणे आवश्यक होते. परंतु श्री. लोहाना यांनी महापालिकेचा नामफलक काढुन तेथे ही खाजगी मालमत्ता आहे असा फलक लावला आहे. त्याकडे कुणाचेही लक्ष गेले नाही. आता काही दिवसापुर्वी आमच्या समन्वय समितीची बैठक झाली त्यावेळेस बैठक झाल्यानंतर याबाबतीत आम्ही आपणांस पत्र सुध्दा दिले आहे. आजच्या इंडियन एक्सप्रेस, नवभारत टाईम्स या वर्तमानपत्रामध्ये सुध्दा याबाबतची बातमी आली आहे. उदया कुणी महानगरपालिकेत येवुन फलक लावेल की ही आमची खाजगी मिळकत आहे. तसे ही महानगरपालिकेची जागा दुस—या कुणाच्यातरी नावे आहे. यासाठी आपल्या महानगरपालिकेचे जे अधिकारी आहेत त्यांचे महानगरपालिकेच्या भुखंडाकडे लक्ष गेले पाहिजे परंतु त्यांचे लक्ष कुठे विटा उतरविल्या जात आहेत. त्याकडे त्यांचे लक्ष जाते. तेथे ते त्वरीत पोहचतात. आज एवढया मोठया भुखंडावरील आपल्या महापालिकेचा फलक काढुन तेथे ही खाजगी मालमत्ता आहे असा फलक लावला आहे. आणि त्याकडे कुणा अधिका—याचे लक्ष गेले नाही. त्यादिवशी आमच्या समन्वय समितीची सभा झाली त्यावेळेसच मी आपले या बाबीकडे लक्ष वेधले आम्ही आपणांस पत्र सुध्दा दिले. आजच्या उल्हास विकास, नवभारत या सर्व वर्तमानपत्रांमध्ये बातमी आली आहे. एवढा मोठा हा भुखंड आहे. मागील महासभेत आपण सांगितले होते की, याबाबतीत ज्या कोणी ही कार्यवाही केली आहे त्याच्यावर आम्ही कारवाई करु. यामागे कोण आहे? त्याचा शोध घेवुन त्याच्यावर आपण एफआयआर दाखल करावयास पाहिजे होता. सतनाम साकी या इमारतीबाबत सुध्दा हीच अडचण आहे. इमारत निष्कासित झालेली आहे. भुखंड मोकळा पडला आहे. तेथे जीन्स पॅन्ट कारखानेवाले त्या भुखंडाचा वापर करत आहेत. त्या भुखंडावर सुध्दा लवकरात लवकर संरक्षण भिंत बांधुन तो आपल्या ताब्यात घेतला पाहिजे. नाहीतर

तो भुखंड सुध्दा कुणी तरी हडप करुन जाईल. व ज्या कोणत्या ठेकेदाराला कार्यादेश दिलेला आहे तो ठेकेदार का काम सुरु करत नाही? जर तो काम करत नसेल तर त्याला काळया यादीमध्ये टाकुन लवकरात लवकर दुस—या ठेकेदाराला हे काम देवुन काम सुरु केले पाहिजे. मी त्या साईडवर आता जावुन पाहुन आलो तेथे एका झाडावर उल्हासनगर महानगरपालिकेचा आरक्षित भुखंड असा एक छोटासा फलक लावलेला आहे. तो कुणीही काढुन घेवुन जावु शकेल. यासाठी दोन पोल उभे करुन त्यावर एक चांगल्या प्रकारचा फलक लावावा. यासाठी आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेकडे पैसे नाहीत का? तो लहानसा फलक रातोरात कुणीही काढुन घेवुन जावु शकेल. आपल्या माहितीसाठी मी ही कागदपत्र आपणांस देत आहे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, उल्हासनगरमधील कोणताही कारखानदार, व्यापारी, नोकरी करणारा व्यक्ती किंवा एखादा सर्वसामान्य व्यक्ती यामधील असा कुणी व्यक्ती नसेल की ज्यास ७०५ नंबरच्या प्लॉट बाबत माहिती नसेल, शहरातील प्रत्येक व्यक्तीस ७०५ क्रमांकाच्या प्लॉट बाबत माहिती आहे. या प्लॉट बाबत २५ ते ३० लोक तुरुंगात गेले होते. आजसुध्दा लाचलुचपत विभागामार्फत दाखल केलेल्या केसेस न्यायालयात चालु आहेत. त्या प्लॉट बाबत एवढा मोठा घोटाळा झाल्यानंतर सुध्दा आपली उल्हासनगर महानगरपालिका त्या प्लॉट संबंधी पत्र पाठवुन अशी मागणी करते की, आपण अनाधिकृत बांधकाम नियमाधीन करुन घेण्यासाठी पैसे भरा. असे वाटते की महानगरपालिकेने आपले स्वत:चे प्लॉट विकणे चालु केले आहे. जर त्यांना माहित आहे की यावर केस झाली आहे, माजी महापौरांवर केस झाली आहे, अजुन सुध्दा त्यांच्यावर केस चालु आहे. तरी सुध्दा आपल्या महापालिकेच्या एका विभागाकडुन पत्र जाते की आपण एवढे पैसे भरा. हे कोणाच्या सांगण्यावरुन जाते, यामागे कुणाचा हात आहे? शासनाकडुन जमिनीची रक्कम भरण्यासाठी इतका पैसा आला आहे, आजच्या तारखेला बाजारभावमुल्यानुसार त्या प्लॉटची किंमत जवळ जवळ १० ते १५ करोड रुपये आहे. त्या प्लॉटवर सर्वांची नजर आहे. महापालिकेस ते प्लॉट घेण्याची इच्छा नाही आहे असे दिसते. जेवढे काही रिजर्व प्लॉट आहेत त्यावर महापालिका ना बोर्ड लावते, ना कंपाउंड बांधते. चतु:सिमा निश्चित करण्याबाबत अशी काही पध्दत तर उल्हासनगर महानगरपालिकेत आहेच नाही असे दिसून येते. खुल्या जागेवर कुणाची तरी नजर जाते व त्याची सनद काढली जाते, सनद काढल्यानंतर तो प्लॉट आपल्या ताब्यात घेवुन टाकतात व त्यावर परत प्लॅन पास केला जातो. खर्च आम्ही करणार व बिल्डर प्लान पास करेल. बिल्डींग तो बनविणार? प्लॉट आमचे, पैसे तो कमविणार? उल्हासनगर महानगरपालिकेने सर्व प्लॉट विकणे चालु केले आहे असा आमचा आरोप आहे. आज कैलास कॉलनी येथे आरक्षित प्लॉट आहे त्याची सनद काढणे चालु आहे. श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी त्याबाबत पत्र दिले आहे. परंतु या आरक्षित प्लॉटची सनद काढली जावु नये याबाबत कारवाई झाली पाहिजे. याबाबत मंत्रालयात, जिल्हाधिकारी यांच्याकडे कुणी पत्रव्यवहार करतच नाहीत. अधिका—यास याबाबत काही घेणे देणेच नाही? अधिकारी फक्त आपले पॉकिट भरले म्हणजे काम झाले बस्स? शहरात काय चालले आहे याबाबत त्यांना काही घेणे देणे नाही. त्यांना याबाबत काही रस नाही. आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे असतांना सतनाम साकी इमारतीचे दोन महिन्यात निष्कासन केले होते. दोन महिने तेथे एसआरपी लावुन निष्कासन केले गेले. त्या इमारतीचे बांधकाम नियमाधीन करण्यासाठी अर्ज आलेत व पैसे सुध्दा भरलेत. कोण आहे त्यामागे? कुणातर्फे हे पैसे भरण्यात आले? कोण असे करत आहे? म्हणजेच उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिका—यांना याबाबत काहीच रस नाही असे आम्हांला वाटते. मा. महापौरांना व आयुक्तांना अशी विनंती आहे की जेवढे काही आरक्षित प्लॉट आहेत त्यांची यादी बनविली जावी. जे प्लॉट आजच्या तारखेला खुले आहेत त्यांच्यावर कुंपण लावले जावे व बोर्ड लावले जावेत. यांना सनद दिली जावू नये म्हणुन एसडीओ, कलेक्टर व माळी साहेब यांना पत्र लिहिले जावे. धन्यवाद ।

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :</u>—आजची ही जी लक्षवेधी सूचना आमचे सभागृह नेता श्री. मोहन साधवानी व श्री. विनोद ठाकुर यांनी दिली आहे त्याबाबत जसे श्री. मोहन साधवानी यांनी सांगितले की, आम्ही बरेचसे लोक याबाबतीत आयुक्त साहेबांना सुध्दा भेटलो होतो व त्यांनी त्वरीत कार्यवाही करण्यासाठी आपल्या संबंधीत अधिका—यांना सांगितले परंतु हे प्रकरण येथेच संपत नाही. हा अतिशय गंभीर असा विषय आहे तो गेल्या अनेक वर्षापासुन चालत आलेला आहे. जसे श्री. विनोद ठाकुर यांनी सांगितले की काही वर्षापुर्वी हे प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे गेले होते. त्यांनी स्वत: रेट टाकली होती आणि शहरातील मोठ मोठया व्यक्तींना कित्येक दिवसापर्यंत तुरुंगात रहावे लागले होते. तर हा एक गंभीर विषय आहे. त्याच बरोबर हा विषय महत्वपुर्ण यासाठी आहे की आमच्या शहरामध्ये फारच कमी भुखंड शिल्लक राहिले आहेत. त्यातील काही भुखंडांवर आपण काही प्रकल्प राबवु शकतो. बरेचसे भुखंड भुमाफियांनी हडप केले आहेत. परंतु जे थोडे फार भुखंड राहिले आहेत ते जर आपण वाचवु शकलो नाहीत आणि ते जर भुखंड माफियांना हडप करु दिले तर मला असे वाटते की यापेक्षा शहरवाशियांची जास्त फसवणुक अन्य दुसरी कुठली नसेल. यासाठी माझे आपणांस असे निवेदन आहे की, श्री. भुल्लर साहेबांनी सांगितले तसेच खेळाच्या मैदानाचा जो भुखंड आहे

ज्याची सनद कुणीतरी काढली आहे व या भुखंडाबाबतीत एखादया व्यक्तीची एवढी हिम्मत होते की हे प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे असतांना आणि त्या भुखंडावर महापालिकेचा फलक लागलेला असतांना तो उतरवुन तेथे खाजगी मालमत्तेचा फलक लावणा—या व्यक्तींना मकोका कायदा लावण्यासाठी आयुक्त साहेबांनी पोलिसांना पत्र लिहिले पाहिजे. जर ते लोक आपल्या शहरातील असतील तर ते लोक आपल्या शहरात राहण्याच्या लायकीचे नाहीत. तर यासाठी महानगरपालिकेने सतर्क राहिले पाहिजे. मला असे वाटते की, व कधी कधी माझ्या मनामध्ये असा विचार येतो की, जर आपला नगररचना विभाग सतर्कतेने काम करत नसेल तर आपण येथे एक ठराव पारीत करुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे असा प्रस्ताव सादर करावा की, आपल्या नगररचना विभागाचे प्रमुख जे नगररचनाकार आहेत त्यांची चौकशी करावी. अदयाप महानगरपालिका सतर्क झाली नाही तर एक दिवस लाचारीने आपणांस असे करावे लागेल. दोन दिवसापासुन याप्रकरणी आपण आवाज उठविला आहे. त्याबाबत आपणाकडुन आमच्या अशा अपेक्षा आहेत की, आपण त्वरीत त्यावर कार्यवाही करावी. व होवु शकत असेल तर अशा लोकांवर कारवाई करुन तो भुखंड वाचविला जावा. यासाठी आपणांस नगरविकास विभाग किंवा महसूल विभाग यापैकी जेथे कुठे जायचे असेल तेथे जाण्यासाठी आम्ही आपणांस पुर्णपणे सहकार्य करु. परंतु शहरातील ज्या भुखंडांवर सर्वांच्या आशा अपेक्षा अवलंबुन आहेत ज्यांवर शहरातील काही विकास कार्य होवु शकते असे भुखंड कृपया वाचविले जावेत धन्यवाद।

**मा. सदस्य श्री. राजु इदनानी, श्री. अंकुश म्हस्के यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:</u>—सन्माननिय महापौरजी आणि आयुक्त साहेब, दुस—या लक्षवेधीवर भरपुर चर्चा होत आहे. आणि चर्चेअंती जर लवकर निर्णय घेतला नाही तर महानगरपालिका कुठेतरी अपयशी ठरते. असे आम्हां सर्व नगरसेवकांना म्हणावे लागेल. प्लॉट क्र. ७०५ च्या बाबतीत मला तरी असे वाटते की संपुर्ण शहरातील जनतेचे लक्ष त्या प्लॉट कडे आहे. आणि तो प्लॉट अतिशय प्रख्यात प्लॉट आहे. त्या ७०५ क्रमांकाच्या प्लॉटवर किती वेळा बांधकाम निष्कासीत केले असेल आणि कितीवेळा बांधकाम केले असेल? परंतु महानगरपालिकेकडुन काहीच कार्यवाही झालेली नाही. या प्लॉट क्र. ७०५ वर काही मोठया हस्तींनी त्या ठिकाणी इमारत बनविली होती. आणि ती इमारत जेव्हा ८५५ अनाधिकृत इमारतींचा प्रश्न उपस्थित झाला त्यावेळेस ती निष्कासीत करण्यात आली. निष्कासीत करण्यात आल्यानंतर काही दिवस असेच काम थांबुन होते आणि मग त्याठिकाणी पुन्हा अनाधिकृत बांधकाम झाले. आता त्या ठिकाणी महापालिकेने संरक्षण भिंत बांधावयास पाहिजे होती. महापालिका लवकरात लवकर संरक्षण भिंत बांधत नाही ही महापालिकेची पीहिली चुक आहे. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की उल्हासनगर शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी उदयाने आहेत, मोकळे भुखंड आहेत की जे महापालिकेचे आहेत. १९९७ मध्ये मी नगरसेवक असतांना आम्ही कित्येक वेळेला ठराव करुन घेतलेले आहेत, त्याच प्लॉट बाबत नाही उल्हासनगर शहरामध्ये जेवढे काही प्लॉट असतील आणि ते जर महापालिकेच्या आखत्यारीतील असतील त्याच्यावर कंपाउंड मारण्यात यावे. परंतु एकाही प्लॉटवर कंपाउंड मारण्यात आलेले नाही. ते का मारण्यात आलेले नाही? जर कंपाउंड मारायला गेले तर तिकडुन मोठया हस्तीचा फोन येतो, ठेकेदार उल्हासनगरमध्ये राहायचे आहे ना? तर मग ७०५ प्लॉटवर महापालिकेच्या वतीने काही काम करु नये. ती मोठी हस्ती ठेकेदारास सांगते की या कामातुन तुम्हांला किती पैसे मिळणार आहेत? त्याच्या दुप्पट पैसे माझ्याकडे येवुन घेवुन जा. तेथे काही करु नका, नाहीतर तुम्हांला वर जावे लागेल. असे मोठया हस्तीचे फोन येतात हे मला माहित आहे कारण तो प्लॉट माझ्या ऑफिसच्या बाजुला आहे. म्हणुन मी सर्व सदस्यांना सांगतो त्या प्लॉटवर कित्येक वेळा कारवाई करण्यात आली परंतु काहीही होत नाही आहे. आम्ही ही बाब महापालिकेच्या निदर्शनास ब—याच वेळा आणलेली आहे आणि आज देखिल मला वाटत होते ती इमारत निष्कासीत झालेली आहे त्यावर महापालिका काहीतरी करेल. तेथे साफसफाई झाली, महापालिकेने बोर्ड लावला परंतु तो बोर्ड का पाडण्यात आला? कोणी काढला? कधी काढला ? का काढला? त्यावर काय कारवाई झाली पाहिजे याबाबतीत महापालिकेची काही दहशत नाही. मला आयुक्त साहेबांना सांगायचे आहे की जर उल्हासनगर महापालिकेत आपल्याला आयुक्त म्हणुन काम करायचे असेल तर आपण एक खबरदारी घेतली पाहिजे. जेवढे महापालिकेचे प्लॉट असतील त्यावर सरंक्षण भिंत बांधण्याचे धाडस केले पाहिजे जसे तुम्ही ८५५ इमारत तोडण्याचे धाडस करत आहात. तसे उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे जेवढे प्लॉट असतील, मोकळया जागा असतील त्यांच्यावर कंपाउंड मारण्यासाठी धाडस केले पाहिजे. त्याठिकाणी आवश्यक तेवढा पोलिस बंदोबस्त घेतला पाहिजे त्याचबरोबर तो विभाग ज्या ज्या नगरसेवकाच्या प्रभाग क्षेत्रांतर्गत येत असेल त्या नगरसेवकाची मदत घ्यावी. आम्ही ७६ नगरसेवक याकामी मदत देवु. कारण उल्हासनगर महानगरपालिकेची काळजी आम्हांला यासाठी वाटते की उदया आम्हां नगरसेवकाची घरे कुणी काबिज करेल की काय? तळमजल्याला आम्ही राहतो. वरच्या मजल्यावर दुसरा कुणी राहिल? अशा पध्दतीने येथे लोक आहेत म्हणुन तुम्हांला आवर्जुन सांगायचे आहे. काही मोठया हस्ती गेल्या आहेत. नाहीतर मला तर असे वाटते की सेंच्युरी

गार्डन जे आहे तेथे सुध्दा प्लॉट पडणार होते. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे निवडुन आल्यामुळे सपना गार्डन हे तेवढे तरी गार्डन होवु शकले. बाकीची जी उदयाने आहेत ती पत्ते खेळणा–यांसाठी, चोर लोकांसाठी ठेवलेली आहेत? तुम्ही त्यांचा आराखडा तयार केला पाहिजे, तुम्ही चाचणी केली पाहिजे. तुम्ही नुसते महापालिकेत आलात आणि महापालिकेचे कर्मचारी, अधिकारी हे काय करतात याकडे जर लक्ष दिले नाही तर श्री. उन्हाळे साहेब तुम्ही तर अयशस्वी व्हालच व्हाल. परंतु आम्ही निवडून आलेले जे सदस्य आहे त्यामधील काही सदस्य वर्षानुवर्षे निवडुन येत आहेत काही नव्याने निवडुन आलेले आहेत. त्यातील जे तरुण आहेत ते तुम्हांला आणि आम्हांला साथ देतील आणि सर्व सन्माननिय सदस्यांच्या वतीने अशी एक विनंती आहे की आमचे जे काही झोपडे वगैरे असेल ते सुध्दा गिळंकृत करायचा भुमाफिया लोक प्रयत्न करतील. आम्हांला चालायला सुध्दा जागा राहणार नाही. आणि म्हणुन आपण चांगली योजना आखावी. आणि जे कुणी बिल्डर किंवा मोठ मोठे हस्ती असतील त्यांच्याकडे वर्कदृष्टी केली पाहिजे त्यांची जी शक्ती आहे ती कमी केली पाहिजे. कारण पोलिस यंत्रणा तेथे सज्ज होते, पोलिस यंत्रणा कमी पडत नाही पण महापालिका कमी पडते कारण महापालिकेला ताबडतोब मंत्रालयातुन फोन येतो की जावु दया तो अमुक अमुक याचा प्लाट आहे त्याकडे लक्ष देवु नका असे आयुक्त साहेबांना पत्र येते व फोन येतात. हे मी माझ्या डोळयाने पाहिजे आहे आणि ऐकलेलेही आहे. काही व्यक्ती तर अशा आहेत की येथे राहुन तेथे अतिक्रमणे करतात. परंतु आयुक्तांनी त्याबाबतीत काही केलेले नाही. १९९७ मध्ये मी या सभागृहात सांगितले होते की जोपर्यंत ते अनाधिकृत बांधकाम तोडत नाहीत व तो प्लॉट खाली करत नाहीत तोपर्यंत मी महासभा चालु देणार नाही. अशा पध्दतीने मी येथे कामकाज केले होते. व त्यावेळेला ते बांधकाम निष्कासीत झाले होते. तर सांगायचे तात्पर्य असे की जर सन्माननिय सदस्य एवढी बाजु उचलत असतील तर आमच्या सन्माननिय आयुक्त साहेबांनी ही खबरदारी घेतली पाहिजे व महापालिकेच्या प्रशासकिय अधिका–यांना तशा सूचना दिल्या पाहिजेत. नाहीतर १७ वेळेला निलंबित झालेला माणूस, ...... श्री. जमनादासजी आपण ऐकत आहोत ना? शहरातील अतिशय महत्वपुर्ण विषयावर मी बोलत असतांना तुम्ही आपसामध्ये चर्चा करत आहात. यामुळेच तर हे सारे चालले आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:</u>–या प्लॉटमध्ये तेच भागीदार आहेत म्हणुन काही ऐकत नाहीत?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:</u>–या प्लॉटच्या बाबतीतच नव्हे तर इतर प्लॉटच्या बाबतीत देखील हीच पध्दत चालु आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:</u>–सन्माननिय महापौरजी, कुण्या सदस्याने म्हटले की, त्या प्लॉट मध्ये ते भागीदार आहेत? तो सिध्द करेल काय? ही काय मस्करी आहे काय? मस्करी करण्याचा प्रकार आहे काय? एका सदस्याने या विषयावर लक्षवेधी आणली आहे आणि एक सदस्य म्हणतो त्या प्लॉटमध्ये ते भागीदार आहेत? तर ते सिध्द करतील काय?

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>महाराजजी, भागीदारीचे सोडुन दया.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:</u>– ७०५ मध्ये कोण कोण भागीदार आहेत ते सांगा. आमच्याकडे पुरावे आहेत कोणा कोणाला अटक झाली होती त्याबाबतीत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:</u>–लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कोणा कोणाला अटक केली होती? कोणा कोणाला अटक केली होती, त्या यादीतील एकेकाची नावे वाचुन दाखवा.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:</u>–या प्लॉटमध्ये कोण कोण हस्ती आहेत ते सर्व दुनियेला माहित आहे. सर्व नगरसेवकांना माहित आहे. कुणाचे नाव घेणे किंवा बदनाम करणे हे चांगले नाही. परंतु एक गोष्ट आहे, आयुक्त साहेबांनी चौकशी केली पाहिजे. ती फाईल उघडली पाहिजे. व त्याचबरोबर आपल्या अधिका–यांची बैठक घेवुन एक समिती तयार केली जावी. व त्या समितीने उल्हासनगरमधील भुखंडाबाबतीत महानगरपालिकेने काय केले पाहिजे? याबाबतीत सूचना केल्या पाहिजेत. येथे आता आमचे नगरसेवक श्री. धनंजय बोडारे उपस्थित नाहीत. १९९७ मध्ये आम्ही कित्येकवेळा कंपाउंड बांधण्यासाठी ठराव केले आहेत. समिती सुध्दा गठित केली होती. परंतु काहीही झाले नाही. यासाठी श्री.उन्हाळे साहेब आमची विनंती आहे. उल्हासनगर शहराच्या वतीने आम्ही आपणांस दिपावली निमित्त भेट देत आहोत. दिपावली तर होवुन गेली आहे परंतु ती भेट नंतर देत आहोत. आपण शहराकडे लक्ष दया. लक्षवेधी चालु असतांना कच–याच्या बाबतीत एका सदस्याने विचारणा केली त्याबाबीकडे जरा आपण लक्ष दया. व उल्हासनगर शहर गुंडापासुन, कुञ्यांपासुन या सर्वांपासुन वाचवा. तेव्हा कुठे आपणांस प्राधान्य मिळेल धन्यवाद ।

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी** :—मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, ७०५ प्लॉटचा हा जो एक विषय येथे उपस्थित झाला आहे. त्याअगोदर आम्ही आयुक्त साहेबांची भेट घेतली होती. परंतु काही मुद्दयांबाबत मी माहिती देवु इच्छितो की, त्या प्लॉटवर जो श्री. लोहाना यांचा जो बोर्ड लावलेला आहे, त्यावर असे लिहिले आहे की, या बाबतीतील प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. जेवढी मला माहिती आहे त्यानुसार कल्याण कोर्टाने त्याबाबतीत असा आदेश दिला आहे की, जशी स्थिती आहे ती तशीच ठेवण्याकामी सांगण्यात आलेले आहे. व त्याने महापालिकेचा बोर्ड काढुन फेकुन दिला व आपला बोर्ड लावला आहे. यामुळे एकतर न्यायालयाचा अवमान झाला आहे. आणि दुसरे म्हणजे महापालिकेचा बोर्ड महापालिकेला न विचारता काढुन टाकला आहे. जोपर्यंत दुसरी कारवाई होईल दुस—या कारवाया तर वर्षानुवर्षे चालुच राहतील. परंतु त्या व्यक्तीवर एफआयआर दाखल झाला पाहिजे. त्याने महापालिकेला न विचारता महापालिकेचा बोर्ड का काढला? त्याचबरोबर आपणाकडुन न्यायालयात एक अर्ज गेला पाहिजे. न्यायालयाने जर त्यांना जैसे थे स्थिती राखण्याकामी सांगितले आहे. तर मग त्याने त्या प्लॉटबाबत ही कारवाई का केली? तर याबाबतीत त्याच्यावर एफआयआर दाखल झाला पाहिजे. बाकीच्या कारवायांना जर वेळ लागत असेल तर ही कार्यवाही त्वरीत झाली पाहिजे.

**सदस्य श्री. जे.के. ढोके**:—महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, प्लॉट नं. ७०५ बाबतीत जी लक्षवेधी आलेली आहे, त्या प्लॉटमध्ये श्री. लोहाना यांनी बोर्ड लावलेला आहे. श्री. आर.के. सोनावणे हे आयुक्त असतांना त्या इमारतीचे निष्कासन करण्यात आले होते. त्यास आज जवळ जवळ दोन ते अडीच वर्ष होत आली आहेत. आजपर्यंत महापालिकेने तेथे पत्र्याचे कंपाउंड किंवा तारेचे कुंपन का केले नाही? त्यास कोणता अधिकारी जबाबदार आहे? अधिका—याने जर तेथे कंपाउंड टाकले असते तर श्री. लोहाना यांनी महापालिकेचा बोर्ड काढुन तेथे आपल्या नावाचा बोर्ड लावला नसता. कुण्या एखादया गोर गरीबाने झोपडी बांधली किंवा एखादे कच्चे बांधकाम केले तर महापालिकेचे अधिकारी तेथे आपला ताफाच्या ताफा घेवुन जावुन त्या घराची, झोपडीची तोडफोड करतात. या महापालिकेचा तो करोडो रुपयाचा प्लॉट असून त्यावर श्री. लोहाना यांनी बोर्ड लावला आहे. आपल्या महापालिकेचे अधिकारी झोपी गेले आहेत काय? गेले असतील तर का गेले आहेत? ते त्यामध्ये सहभागी आहेत काय? सहभागी असतील तर त्यांची नावे घोषित करण्यात यावीत? कुण्या एखादया व्यक्तीने लोडबेअरींगचे बांधकाम केले तर महापालिकेचे अधिकारी तेथे आपला ताफा घेवुन जातात आणि ते बांधकाम निष्कासीत करतात. आपल्या महापालिकेचे जे मोठ मोठे भुखंड आहेत ते सांभाळण्याची जबाबदारी आपल्या महापालिकेची आहे. त्या भुखंडावर त्वरीत संरक्षण भिंत बांधण्यात यावी किंवा त्याठिकाणी रात्रीच्या वेळी सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात यावा. भुखंडांचे संरक्षण करण्याची जबाबदारी महापालिकेने स्विकारावी, धन्यवाद ।

**मा. सदस्या श्रीमती निना नाथानी, श्रीमती जया माखिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे)**:—सन्माननिय महापौर महोदया, उप—महापौर साहेब व सर्व सन्माननिय सदस्य, आता ब—याच सदस्यांनी .........

**सदस्य श्री. मोहन साधवानी** :—साहेब, कृपया हिंदीत बोलाल तर बरे होईल.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे)**:—दोन्ही भाषेत बोलतो. या लक्षवेधीबाबत ब—याचशा सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. महापालिकेच्या जेवढया जमिनी आहेत त्या सर्व जमिनीचे आपण सर्व ट्रस्टी आहेत, आम्ही राहु ना राहु महापालिका राहिल, ही जमिन राहिल. याबाबत सर्व पक्षांचे एक शिष्ट मंडळ माझ्याकडे आले होते, महापालिकेच्या वतीने या प्लॉट बाबत कोणतीही दिरंगाई करण्यात आलेली नाही. जसे आमच्या हे निदर्शनास आले त्वरीत तेथिल बोर्ड उचलुन फेकुन देण्यात आला. व उल्हासनगर पोलिस स्टेशन मध्ये ट्रेस पासींग व महापालिकेची मिळकत हटविल्याबाबत गुन्हा दाखल केला आहे. व त्या तक्रारीबाबत पोच सुध्दा आलेली आहे. ७०५ प्लॉटबाबत जी चर्चा चालु आहे ही मिळकत महापालिकेकडे राहिली पाहिजे यासाठी सर्वांनी मिळुन प्रयत्न करणे आवश्यक आहे. व त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा ढिलाई होणार नाही याबाबतीत प्रशासनाच्यावतीने सर्व प्रयत्न केले जातील. दुसरा एक मुद्दा होता की महापालिकेच्या इतर ज्या काही मिळकती आहेत, कदाचित हे विषयांतर आहे. कारण की पुढील दोन वर्षानंतर महानगरपालिका चालविण्यासाठी मासिक किंवा वार्षिक उत्पन्न मिळवुन देण्यासाठी ही मिळकत महापालिकेकडे असणे आवश्यक आहे. आणि जर ती का राहिली नाही तर कदाचित दोन तीन वर्षानंतर महानगरपालिकेचे कामकाज चालविणे सुध्दा अतिशय जिकरीचे होवुन जाईल. या प्रकारे इतर ज्या मिळकती आहेत भुखंड आहेत त्यांचे सर्व्हेक्षण करुन त्यांच्यावर कंपाउंड वॉल बांधण्यासाठी जो निधी पाहिजे तो निधी मिळेल असे आपणाकडुन आश्वासीत करण्यात आले आहे. मी या

सभागृहास अश्वस्त करु इच्छितो की, महानगरपालिकेच्या जमिनी विषयक ज्या ज्या मिळकती आहेत त्यांची ओळख पटवुन त्यांच्यावर सरंक्षण भिंत बांधण्यासाठी जी काही कार्यवाही करायची आहे ती परवापासुन नाही तर आम्ही उदयापासुन चालु करु. त्यामध्ये काही ठिकाणी सिटी सर्व्हे कडुन करावयाची कारवाई असेल. बांधकाम विभागाकडुन करावयाची कारवाई असेल. तर या सर्व मिळकतींवर संरक्षण भिंत बांधणे जरुरीचे आहे. जेव्हा आपण महानगरपालिकेमध्ये काम करत असतो तेव्हा आपल्या कार्यवाहीने ६ लाख लोकांवर प्रभाव पडत असतो. यासाठी या सभागृहाच्या वतीने जो काही आपण निर्णय घेतो त्याचा थेट प्रभाव उल्हासनगरमधील ६ लाख लोकांवर पडतो. त्याबाबतीतील जबाबदारीची भावना लक्षात घेवुन महानगरपालिकेच्या जेवढया काही जमिनी व मिळकती आहेत त्यांची ओळख पटविणे त्यांचे संरक्षण करणेकामी कोणतेही प्रयत्न करण्याचे आम्ही सोडणार नाही. व आपणा सर्वांच्या सहकार्याने महापालिकेच्या या जमिनी व मिळकतींचे आम्ही संरक्षण करु. एवढे मी आपणांस सांगु इच्छितो.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :</u>—मा. आयुक्त साहेब, भुखंड क्र. ७०५ वर संरक्षण भिंत बांधण्यासाठी कुण्या एका ठेकेदाराला कार्यादेश दिलेला आहे. तो ठेकेदार काम का चालु करत नाही त्याला काय अडचण आहे याबाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागास आपण विचारणा करा. दुसरा सतनाम साकीचा जो प्लॉट पडुन आहे या दोन्ही प्लॉटला प्राधान्यक्रम देवुन त्यांच्यावर लवकरात लवकर संरक्षण भिंत बांधण्यात यावी. कारण की अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करुन घेण्यासाठी अर्ज सादर करण्यात आले आहेत. यासाठी या दोन्ही भुखंडावर लवकरात लवकर संरक्षण भिंत बांधण्यात यावी. तसेच ७०५ प्लॉटवर सरंक्षण भिंत बांधण्यासाठी ज्या ठेकेदाराला कार्यादेश देण्यात आलेला आहे तो तेथे काम का चालु करत नाही? त्यास काय अडचण आहे? तो करत नसेल तर दुसरा ठेकेदार नेमला जावा. तसेच दोन्ही प्लॉटवरील अनाधिकृत बांधकामे अधिकृत करुन घेण्यासाठी जे अर्ज सादर करण्यात आले आहेत त्यामागे कोण आहे? त्या लोकांवर आपण काय कारवाई करणार आहात? सतनाम साकी वाल्यांनी पैसे सुध्दा भरले आहेत फक्त डी फॉर्म थांबविला आहे. आमच्या लोकांचे लक्ष गेले म्हणुन ते थांबले. यास्तव या प्रकरणांमागे कोण आहे? याची चौकशी करुन त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात यावा. संबंधित अधिका—यांवर / कर्मचा—यांवर आपण कारवाई का करत नाहीत. यामध्ये तर आपल्या महापालिकेचे अधिकारी/कर्मचारी समिल आहेत. जिल्हाधिकारी साहेबांनी जे कर्मचारी दिले आहेत ते सुध्दा यामध्ये सामिल आहेत. त्यांच्यावर कारवाई का होत नाही?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):</u>—पहिले तर ७०५ प्लॉट वर कंपाउंड वॉल बांधण्याची कार्यवाही झालेली नाही असे जे निदर्शनास आलेले आहे त्याबाबतीत त्या ठेकेदारास अंतिम नोटिस दिली जाईल. त्यानंतरही त्याने काम केले नाही तर त्यास काळ्या यादीमध्ये टाकुन आपली मुळ जी कार्यवाही आहे ती चालु करु. याबाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागास मी आजच आदेश देत आहे. परवा पर्यंत हे काम करुन पाहिजे. बांधकाम नियमाधिनतेबाबतचा आपला जो दुसरा मुद्दा होता, बांधकाम नियमाधिन करुन देण्याबाबत पध्दसिध्द प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली जी काही कारवाई झालेली आहे, त्याबाबत ही सर्व माहिती आम्ही पध्दसिध्द प्राधिकरणाच्या निदर्शनास आणत आहोत त्यानंतर जी उचित कारवाई करावी लागणार आहे ती त्यांच्या सल्ल्याने आम्ही जरुर करु.

**मा. सदस्य श्री. नरेंद्र दवणे, श्री. गोविंदराम लुंड, श्री. अंकुश म्हस्के हे सभागृहातुन बाहेर गेले.** 

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:</u>—मा. आयुक्त सहोब, आणखी एक आक्षेप असा आहे की, सतनाम साकी इमारतीबाबत, सतनाम साकी इमारत नियमाधिन करुन घेण्यासाठी येथे जे पैसे भरण्यात आले आहेत त्याची जी पावती आहे त्या पावतीनुसार ते सांगु शकतील की ही मिळकत आमची आहे. त्या आधारावर कदाचित ते लोक न्यायालयात दाद मागु शकतात. यासाठी महापालिकेच्या वतीने न्यायालयात कॅवेट फाईल करणे जरुरीचे आहे. नाहीतर न्यायालय एक तर्फी निर्णय देईल. यासाठी त्यांनी न्यायालयात जाण्याअगोदर आपण कॅवेट फाईल करणे आवश्यक आहे. महापालिकेचे म्हणणे ऐकुन घेतल्याशिवाय न्यायालयाकडुन कोणताही निर्णय दिला जावु नये. ते न्यायालयात जातील याची शक्यता आहे हे लक्षात घेवून कॅवेट फाईल केले जावे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:</u>— माझे असे म्हणणे आहे की, असे काही विषय आहेत ज्याबाबत श्री. विनोद ठाकुर यांनी आता सांगितले. न्यायालयात जेवढी काही प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी आपला एखादा कार्यक्षम अधिकारी नेमला जावा. कारण की आपल्या प्रकरणांबाबतीत न्यायालयापुढे योग्य त्याप्रकारे सादरीकरण होत नाही. उल्हासनगरमधील भुखंड माफियांचे असे स्वरुप आहे की ते कनिष्ठ स्तरावरील

न्यायालयास मॅनेज करुन स्थगिती आदेश मिळवतात. यासाठी आपला जो विधी विभाग आहे तो सर्तक असला पाहिजे. त्यांनी चांगल्यातला चांगला वकिल उभा करुन त्याप्रकरणाचा पाठपुरावा केला पाहिजे अशी आपणांस सूचना आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. आयुक्त साहेब, मी आता ७०५ बाबतीत आपणांस जे कागदपत्र दिले त्यामध्ये तर एक महानगरपालिकेचे पत्र आहे. त्यात अमुक एवढी रक्कम भरा असे स्पष्टपणे लिहिले आहे तर प्लॉट कसे नियमाधिन केले जात आहेत? मी दिलेले पत्र आपण वाचले असेल. ते महापालिकेचेच पत्र आहे. त्यामध्ये बांधकाम नियमाधीन करण्यासाठी दोन लाख ऐक्काहत्तर हजार रुपये व जमिनीची किंमत म्हणुन एक कोटी दहा लाख रुपये भरण्याबाबतीत लिहिलेले आहे. त्यानंतर त्यांनी एक विनंती पत्र दिले आहे की ही जी रक्कम आहे ती खुपच जास्त आहे. आता आम्ही एक लाख रुपये भरत आहोत. त्या लोकांनी एक लाख रुपये भरले आहेत. डीडी क्रमांक दिला आहे व महापालिकेने त्याची पावती सुध्दा दिली आहे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—हा जो आदेश आहे तो पदसिध्द प्राधिकरणामार्फत काढण्यात आलेला आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—परंतु पत्र तर महानगरपालिकेचे आहे ना?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—आपला जो मुद्दा आहे तो माझ्या लक्षात आलेला आहे, तो बरोबर आहे, ही सर्व बाब पदसिध्द प्राधिकरणाच्या आम्ही निदर्शनास आणुन देत आहोत. महापालिकेचे लेटरहेड असले तरी खाली जी स्वाक्षरी केली आहे ती पदसिध्द प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतची कार्यवाही आहे ती महानगरपालिकेकडुन केली जात नसुन ती पदसिध्द प्राधिकरणाकडुन होत असते. व आपला जो मुद्दा आहे की त्याने भरलेले पैसे परत करणे किंवा प्रतिज्ञापत्र करणे ती कार्यवाही आम्ही जरुर करु.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—परंतु आपले महापालिकेचे जे अधिकारी आहेत ते सुध्दा साईट व्हिजिट करण्यासाठी जातात ना? बांधकाम जे असते ते नियमाधीन केले जाते मोकळा भुखंड थोडाच नियमाधीन केला जातो? हे लोक संपुर्ण प्लॉटचे पैसे मागत आहेत. आणि तंज्ञ समितीमध्ये आपल्या महापालिकेचे सुध्दा काही अधिकारी, कर्मचारी आहेत.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—जे अधिकारी यामध्ये समिल असतील त्यांना आम्ही कारणे दाखवा नोटिस बाजावु. परंतु ही जी प्रक्रिया झालेली आहे ती पदसिध्द प्राधिकरणाच्या तज्ञ समितीकडुन झालेली आहे. म्हणुन ही बाब आम्ही पदसिध्द प्राधिकरणाच्या निदर्शनास आणु.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—परंतु महानगरपालिकेच्या लेटरपॅडचा उपयोग केला जात आहे. पत्राखाली स्वाक्षरी ते लोक करत आहेत.

.

सदस्य श्री. विनोद ठाकुर:—साहेब, आपण म्हटले की, पदसिध्द प्राधिकरणाच्या अधिका—यांची त्या पत्रावर स्वाक्षरी आहे. पत्र त्यांच्याकडुन पाठविले जाते. लेटरहॅड आपले असते. परंतु त्यांनी हे जे दोन—अडीच लाख रुपये शुल्क वसुल केले आहे ते कोण घेणार? महानगरपालिका घेईल ना? ते तर जिल्हाधिकारी घेणार नाहीत ना? ते येथे आपल्या महापालिकेत जमा केले जातील ना? म्हणजे आपले लोक त्यामध्ये सामिल आहेत ना?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—जे लोक त्यामध्ये सामिल असतील त्यांना कारणे दाखवा नोटिस बाजावुन त्यांची चौकशी आम्ही जरुर करु. त्यामध्ये कुणाला सोडण्याचा प्रश्नच नाही. महापालिकेची एवढी मोठी मिळकत जर जात असेल तर कुणाचीही मी गय करणार नाही. मी असो किंवा कुणी असो सोडणार नाही.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—साहेब, सतनाम साकी इमारत निष्कासित झाली आहे तेथिल भुखंड मोकळा पडला आहे तेथे जिन्स पॅन्टचे कारखानदार त्या प्लॉटचा वापर करत आहेत यासाठी लवकरात लवकर त्या प्लॉटवर संरक्षण भिंत बांधली जावी.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—त्याचबरोबर बोर्ड सुध्दा लावला जावा.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—प्लॉट नं. ७०५ आणि सतनाम साकी त्यानंतर जेवढे काही आपले भुखंड असतील त्यांच्या संरक्षणासाठी संरक्षण भिंत बांधण्याची कार्यवाही आम्ही चालु करु.

**महापालिका सचिव:—** ठिक आहे?

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मागील दिनांक २०/१०/२००७ (त्यात दि. ३१/१०/२००७) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे व दिनांक ५/११/२००७ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जी १२४ अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करण्यात आली होती, ती बांधकामे अनाधिकृत होती म्हणुन तोडण्यात आली होती ती ज्यांच्या आखत्यारीत झाली त्यांचे काय केले? त्या अधिका—यांवर काय कारवाई केली?

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**त्या संदर्भात उच्च न्यायालयात आम्ही प्रतिज्ञापत्र सादर केले आहे की यामध्ये जे अधिकारी सामिल असतील त्याबाबत आम्ही विभागीय चौकशी प्रस्तावित करत असून त्या चौकशीच्या आधारे जे निष्कर्ष निघतील त्याप्रमाणे संबंधीत अधिका—यावर कारवाई करु असे आम्ही प्रतिज्ञापत्र उच्च न्यायालयात कालच सादर केले आहे. आणि त्या अनुषंगाने जे अधिकारी व कर्मचारी त्यात सामिल आहेत त्यांच्यावर विभागीय चौकशीची प्रक्रिया चालु करुन आम्ही उचित कारवाई करु.

**सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—**सचिव साहेब, दिनांक ५/११/२००७ रोजीच्या सभेत आमचा या प्रस्तावास विरोध नाही आहे. असे मी म्हटले होते. दिनांक ५/११/२००७ रोजीच्या विशेष महासभेच्या इतिवृत्तांतातील पृष्ठ क्र. ५ वर आमचा या प्रस्तावास विरोध आहे अशी नोंद आलेली आहे. आहेच्या अगोदर नाही हा शब्द आलेला नाही. तो कृपया समाविष्ट करुन घेण्यात यावा.

**महापालिका सचिव :—**श्रीमती सुरेखा वेलकर, दिनांक ५/११/२००७ रोजीच्या इतिवृत्तांतातील पृष्ठ क्र. ५ वर आपण जी दुरुस्ती सुचविली आहे ती करत आहोत. आपण म्हटले आहे आमचा विरोधी नाही आहे. इतिवृत्तांतात आमचा विरोध आहे अशी नोंद आलेली आहे. ठिक आहे? बाकी उर्वरीत इतिवृत्त सर्वानुमते कायम?

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** मागील सभेचे दिनांक २०/१०/२००७ (त्यात दि. ३१/१०/२००७) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे व दिनांक ५/११/२००७ रोजीच्या विशेष महासभेच्या इतिवृत्तांतात सन्माननिय सदस्या श्रीमती सुरेशा वेलकर यांनी सुचविलेली दुरुस्ती करुन उर्वरित इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. २ :—** मागील महासभेचे दिनांक २०/१०/२००७(त्यात दि.३१/१०/२००७) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे व दि. ५/११/२००७ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री मोहन साधवानी.

अनुमोदकाचे नाव : श्री कुमार आयलानी

<u>महासभा ठराव क्र. ५६ ब</u> <u>दिनांक : २०/११/२००७</u>

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक २०/१०/२००७ (त्यात दि. ३१/१०/२००७) रोजीच्या महासभेचे पृठ क्र. १ ते ६९ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे व दि.५/११/२००७ रोजीच्या विशेष महासभेच्या इतिवृत्तांतील पृष्ठ क्र. ५ वर सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर यांनी सुचविलेली दुरूस्ती करून उर्वरित इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ३:–** नवीन कर आकारणी पुस्तक तयार करण्यासाठी महसूल समितीचा दिनांक ९.१०.२००७ चा ठराव क्र. ३ कायम करणे

---

<u>**सदस्य श्री. मोहन साधवानी:–**</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, जसे की जीआयएस जॉग्रापीकल इन्फोरमेशन सिस्टम विषयीच्या प्रस्तावास स्थायी समितीने स्थायी समिती ठराव क्र. ९२ अन्वये १० लाख रुपये खर्चाच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये आपल्या शहरातील सर्व बांधकामांची छायाचित्र येतीलच यासाठी या विषयास येथे चर्चेस घेण्याची आवश्यकता नाही. हा विषय पुढे ढकलण्यात यावा.

<u>**सदस्य श्री. बी.बी. मोरे :–**</u>पुढे ढकला, पुढे ढकला.

<u>**महापालिका सचिव :–**</u>या विषयाबाबत जो ठराव तयार करण्यात आलेला आहे तो आपल्या माहितीसाठी वाचुन दाखवितो. ही महासभा जी.आय.एस. संगणक प्रणालीच्या वापरा बाबत स्थायी समितीने दि.२६/१०/२००७ रोजी पारीत केलेल्या ठराव क्र.९२ ची अंमलबजावणी झाल्यावर नविन कर आकारणी पुस्तक तयार करण्यासाठी महसुल समितीचा दि. ९/१०/२००७ रोजीचा ठराव क्र.३ कायम करण्याचा निर्णय घेईल. ठिक आहे ना?

<u>**सदस्य श्री. मोहन साधवानी :–**</u>ठिक आहे.

<u>**काही सदस्य :–**</u>पास,पास......

<u>**महापौर :–**</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३:–** नवीन कर आकारणी पुस्तक तयार करण्यासाठी महसूल समितीचा दि.९/१०/२००७ रोजीचा ठराव क्र.३ कायम करणे

<u>**प्रस्तावना**</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या अंदाजे १.५० लक्ष (निवासी १.१८.६२७ + वाणिज्य ३२,८७०) मिळकतींवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९ नुसार कर विभागाकडुन कर आकारणी करण्यात आलेली आहे.

सन २००३ पासुन महानगरपालिकेने कर आकारणी दरात वाढ केलेली आहे. महानगरपालिका मालमत्ता कर मागणी व वसुलीत खालील दोषांमुळे परिणाम होतो.

१. ज्या मालमत्तांची पुर्नबांधणी झालेली आहे किंवा नविन बांधकाम केलेल्या आकारणी योग्य असलेल्या परंतु आकारणी न केलेल्या मिळकती.
२. कायम स्वरुपी घर क्रमांक नाही.
३. ज्या मालमत्तांच्या क्षेत्रात/बांधकामात/वापरात बदल झालेला आहे.
४. अस्तित्वात नसलेल्या मालमत्तांची नोद.
५. मिळकत निष्कासित करुन त्या जागेवर इमारत बांधण्यात आली परंतु जुन्या निष्कासित करण्यात आलेल्या मिळकतीवर चालु असलेली आकारणी रद्द करण्यात आली नाही.
६. मागील वर्षापर्यत मिळकतीचा कर भरण्यास प्रथम जबाबदार व्यक्ती म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नोंद करण्यासाठी दुय्यम निबंधक उल्हासनगर–५ यांचेकडुन नोंदणीकृत दस्तऐवज सादर करणे आवश्यक होते. या बाबींमुळे कर निर्धारणाच्या वेळी काही नागरीकांनी स्वत:चे नावावर दुसरे मालमत्ता कर देयक काढुन घेतले.
३. काही मिळकत धारक त्यांच्या मिळकतीची खरेदी विक्री करतात. अशावेळी मिळकतीचे भाग पाडुन विक्री करण्यात आलेल्या भागाचे स्वतंत्र देयक तसेच उर्वरीत भागाचे स्वतंत्र देयक न काढता विक्री केलेल्या मिळकतीचे स्वतंत्र देयक व मुळ मिळकतीचे (विक्री केलेल्या भागासह) असे दोन देयके काढण्यात आली आहेत.
४. मिळकतीची दुबार नोंद झाल्यामुळे महानगरपालिका कर तसेच शिक्षण कर व रोजगार हमीकराचे मागणीत सतत वाढ होत आहे. वास्तविक पाहता सदरची मागणी वसुल न होण्याजोगी आहे.

१९९६ नंतर नविन कर आकारणी पुस्तक तयार करण्यांत आले नाही त्यामुळे वसुली कमी होत आहे. वरील कारणे विचारात घेता दर ४ वर्षांनी अधिनियमाचे तरतुदीनुसार सर्वसाधारण कर निर्धारिक करणे गरजेचे आहे.
तरी उक्त बाबी संदर्भात चर्चा करुन निर्णय घेणेकामी मा. महसुल समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

महसूल समिती ठराव क्र. ३ दिनांक :– ९/१०/२००७

सुचकाचे नाव :– श्री. विनोद ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महसूल समिती महापालिकेच्या मंजुरी अधिन राहून वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे महापालिकेच्या वसुलीत वाढ होण्याच्या प्रयोजनार्थ प्रशासनास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ''ड'' मधील प्रकरण ८ च्या कराधान नियमामधील नियम–२१ (२) अन्वये नविन मालमत्ता कर आकारणी पुस्तक तयार करणे व मुल्य निर्धारणाविरुध्द सर्व तक्रारी निकालात काढल्यानंतर प्रत्येक प्रभाग निहाय आकारणी पुस्तक ३१ मार्च, २००८ पर्यंत प्रमाणित करण्यास निर्देशित करीत आहे.

तसेच इतिवृत्त पुढील सभेत कायम होण्याची वाट न पहाता सदर ठरावा अंतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सूचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

एकमताने

सभापती / पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र. ५७ दिनांक : २०/११/२००७

सूचकाचे नाव : श्री मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव : श्री लाल पंजाबी.

ही महासभा जी.आय.एस. संगणक प्रणालीच्या वापरा बाबत स्थायी समितीने दि.२६/१०/२००७ रोजी पारीत केलेल्या ठराव क्र.९२ ची अंमलबजावणी झाल्यावर नविन कर आकारणी पुस्तक तयार करण्यासाठी महसुल समितीचा दि. ९/१०/२००७ रोजीचा ठराव क्र.३ कायम करण्याचा निर्णय घेईल.

सूचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**मा. महापौरांकडुन ही सभा समाप्त केल्याची घोषणा केली जात आहे. कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.०० वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— २०/१२/२००७

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/१२/२००७ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१०

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार दिनांक २०/१२/२००७ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

७. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | २९ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३० | श्री. लालबिहारी बुझारत यादव |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | श्री. गायकवाड दिलीप | ३१ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३२ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३३ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| ७ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ३४ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ८ | श्री. मोरे भानजी भिकारी | ३५ | श्री. शेखर केशव यादव |
| ९ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ३६ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १० | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ३७ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| ११ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ३८ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १२ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ३९ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १३ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४० | श्री. किशोर जग्यासी |
| १४ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ४१ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १५ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ४२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४३ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १७ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ४४ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १८ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ४५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १९ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ४६ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २० | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ४७ | श्री. मोहन साधवाणी |
| २१ | श्री. लाल पंजाबी | ४८ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २२ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ४९ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २३ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ५० | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २४ | श्रीमती शकुंतला पाटील | ५१ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २५ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ५२ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २६ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ५३ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| २७ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ५४ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २८ | श्री.एडके गणपत गोविंद | ५५ | श्री. पाटील प्रधान धर्मा |

तर,

उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

२. श्री. रामसागर जनार्दन यादव, ३. श्री. दत्तात्रय नारायण पवार, ४. श्री. विजय खंडु सुपाळे, ५. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, ६. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज), ७. श्री. राजू जग्यासी, ८. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे, ९. श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा, १०. ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी, ११. श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा, १२. श्रीमती महाडीक रजनी मोहन, १३. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, १४. श्रीमती करोतीया मालती राधाचरण, १५. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, १६. श्री. बोडारे धनंजय बाबूराव, १७. श्रीमती लता शांताराम निकम, १८. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), १९. श्री. मुकेश सोहन तेजी, २०. श्रीमती जया प्रकाश माखिजा, २१. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी

आयुक्त, श्री. समिर उन्हाळे हे सभेस अनुपस्थित होते त्यांच्या जागी मुख्यालयाचे उप—आयुक्त श्री. अशोक बागेश्वर हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

८२.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
८३.श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
८४.श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त
८५.श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
८६.श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
८७.डॉ. जी.टी. जिंदे , वैद्यकीय आरोग्य अधिकारी
८८.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
८९.श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
९०.श्री. सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.विभाग

९१. श्री. गंगारामानी, उप–अभियंता, विद्युत
९२. श्री. सेल्वन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९३. श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी
९४. श्री. यु.के. रामसिंघानी सहा. नियंत्रक
९५. श्री. व्ही.आर.गर्जे, प्र. प्रभाग अधिकारी
९६. कु. दिपमाळा गोपाळे, प्रकल्प अधिकारी, सु.ज.श.रो.यो.

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.०० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :–**सभेचे कामकाज चालु होण्याअगोदर मी एक श्रध्दांजली प्रस्ताव मांडु इच्छितो. उल्हासनगरचे महान संत श्री. साई लच्छीरामजी यांचे नुकतेच काही दिवसापुर्वी निधन झाले आहे. तसेच आरपीआयचे नेते श्री. अशोक बच्छाव यांच्या पत्नी श्रीमती अनिता बच्छाव यांचे नुकतेच काही दिवसापुर्वी निधन झाले आहे. या दोघांना श्रध्दांजली दिली जावी.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:–**सचिव कार्यालयात कार्यरत असलेले शिपाई श्री. वसंत निकम यांचे दिनांक ११/१२/२००७ रोजी निधन झाले आहे. त्यांनाही श्रध्दांजली दिली जावी.

**महापालिका सचिव :–**होय, होय. श्री. वसंत निकम हे काही दिवसापुर्वी सचिव कार्यालयात शिपाई म्हणुन कार्यरत होते त्यांचे नुकतेच काही दिवसापुर्वी निधन झाले आहे.

---

सुचकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. बी.बी. मोरे

**शोक प्रस्ताव**

सिंधी समाजातील एक थोर संत लच्छीराम (श्री. लक्ष्मणदास सिरवानी) यांचे नुकतेच काही दिवसापुर्वी निधन झाले. तसेच भारतीय रिपब्लीकन पार्टीचे नेते श्री. अशोक बच्छाव यांच्या पत्नी श्रीमती अनिता बच्छाव यांचे सुध्दा काही दिवसापुर्वी निधन झाले.

तसेच उल्हासनगर महानगरपालिका सचिव कार्यालयात शिपाई पदावर कार्यरत असलेले श्री. वसंत निकम यांचे दिनांक ११/१२/२००७ रोजी निधन झाले आहे.

वर उल्लेखीत कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ५७ अ** **दिनांक:–२०/१२/२००७**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार संत लच्छीराम(श्री. लक्ष्मणदास सिरवानी), श्रीमती अनिता बच्छाव व श्री. वसंत निकम यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या

कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>**आपल्या महानगरपालिकेचे उपायुक्त श्री. बागेश्वर साहेब व श्री. मिलींद सावंत यांना मुख्याधिकारी संवर्ग—१ मध्ये पदोन्नती मिळाली आहे. ते कोणत्याही महानगरपालिकेत आयुक्त होवु शकतात. संपुर्ण सभागृहाच्या वतीने आम्ही त्यांचे अभिनंदन करु इच्छितो.

---

## <u>अभिनंदन प्रस्ताव :—</u>

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

उल्हासनगर महानगरपालिकेतील मुख्यालयाचे उप—आयुक्त श्री. अशोक बागेश्वर तसेच कर विभागाचे उप—आयुक्त श्री. मिलिंद सावंत यांना मुख्याधिकारी संवर्ग—१ मध्ये पदोन्नती मिळाली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात नव्याने स्थापन झालेल्या कोणत्याही महानगरपालिकेमध्ये त्यांची महापालिका आयुक्त म्हणुन नेमणुक होवु शकते. त्यांना मिळालेल्या पदोन्नतीमुळे महापालिकेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ५७ ब</u> <u>दिनांक:—२०/१२/२००७</u>

ही महासभा श्री. अशोक बागेश्वर व श्री. मिलींद सावंत यांना मुख्याधिकारी संवर्ग—१ मध्ये पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे......... यावेळेस सायंकाळचे ४.०० वाजले आहेत.

प्रश्न क्र. ७० हा श्री. सतीश चहाळ यांचा आहे. ते यावेळेस सभागृहात उपस्थित नाहीत म्हणुन त्यांच्या प्रश्न व उत्तराची केवळ इतिवृत्तांतात नोंद केली जाईल.

मा. सदस्या श्रीमती नेहा बेबी भोईर, श्रीमती सुजाता रिजवानी, श्रीमती मोना वनवारी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>प्रश्न क्र. ७० :—</u> १) २००७—२००८ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा विभागाने केलेल्या विकास कामांची कोणकोणत्या ठेकेदारांची किती किती रक्कमांची देयके अदा करण्यात आली आहेत? (कृपया यादी दयावी)
२) चालू आर्थिक वर्षात कोणकोणत्या टॅकर ठेकेदारांची किती किती रक्कमांची देयके अदा करण्यात आली आहेत? (कृपया यादी दयावी.)
३) त्यातील मागील टॅकर ठेकेदार व विद्यमान टॅकर ठेकेदार यांची किती किती रक्कमांची देयके अदा करण्यात आली आहेत?
४) लेखा विभागाने बनविलेल्या ठेकेदारांच्या यादीतील अनुक्रमां नुसारच देयके अदा करण्यात आली आहेत काय?

मा. सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीमती शिला मनसुलकर यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>उत्तर :—</u> सोबत यादी जोडली आहे.
सोबत यादी जोडली आहे.
सोबत यादी जोडली आहे.

मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्र. उमपा/आका/३२७, दिनांक २६/९/२००७ अन्वये विहित करण्यात आलेल्या पध्दतीनुसार देयकांची अदायगी करण्यात येते.

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्र. ७१ हा श्री. सतीश चहाळ यांचा आहे. ते यावेळेस सभागृहात उपस्थित नाहीत म्हणुन त्यांच्या प्रश्न व उत्तराची केवळ इतिवृत्तांतात नोंद केली जाईल.

**प्रश्न क्र. ७१ :—** १) २००७—२००८ या आर्थिक वर्षातील १ एप्रिल ते ३१ जुलै या चार महिन्यात उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रत्यक्ष उत्पन्न किती?
२) सदर कालावधीतील उल्हासनगर महापालिकेचा प्रत्यक्ष एकूण खर्च किती?
३) सदर कालावधीत प्रत्यक्ष झालेल्या खर्चाव्यतिरिक्त भविष्यात होणा—या किती खर्चाच्या प्रकरणांना मंजूरी देण्यात आली?
४) वार्षिक अंदाजपत्रकास महासभेने मंजुरी देण्यापूर्वी पहिल्या चार महिन्यात प्रशासनाने केलेला खर्च कायदेशीर दृष्टया योग्य आहे काय?

मा. सदस्या श्रीमती निलम रावत, श्रीमती सरोजीनी टेकचंदानी, श्रीमती मंजु पोपटानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**उत्तर :—**
१. रुपये ४६,२१,९०,७८८/—
पाणी पुरवठा विभागाचे उत्पन्न रुपये ३५,०२,६३९/— असुन महानगरपालिकेच्या उर्वरित उत्पन्नाबाबत माहिती लेखा शाखेशी संबंधित आहे.

२. रुपये ४१,५१,३७,९५८/—

३. रुपये ७१,४६,३०२/— रक्कमेच्या १८ कामांना मंजुरी देण्यात आली.

सदर कालावधीत भविष्यात होणा—या खर्चाच्या मंजुरी देण्यात आलेल्या प्रकरणांची माहिती खालीलप्रमाणे आहे

| कार्याचे नाव | कामाकरीता मंजुर रक्कम |
|---|---|
| उल्हासनगर १ ते ५ मधील विदयुत दिवांच्या खाबांची निगा व दुरुस्ती वर्ष ०७—०८ करिता | ९,९६,५००/— |
| पथ दिवे व महापालिकेच्या ईमारतींच्या निगा व दुरुस्तीसाठी वायर/केबल वर्ष ०७—०८ करिता | ९,३५,३६५/— |
| पथदिव्यांसाठी स्वयचलित संच वर्ष ०७—०८ करीता | १६,१२,१००/— |

४. होय

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्र. ७२ हा श्री. रविंद्र बागुल यांचा आहे. ते यावेळेस सभागृहात उपस्थित नाहीत म्हणुन त्यांच्या प्रश्न व उत्तराची केवळ इतिवृत्तांतात नोंद केली जाईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**प्रश्न क्र. ७२ :—** केंद्र, राज्य शासन पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना, उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येत असून सदर योजने अंतर्गत दारिद्र रेषेखालील महिलांचे ३३२ बचत गट कार्यरत आहेत. या बचत गटांचे माध्यमातून महिला बचत गटांना आर्थिक स्वावलंबी बनविणे त्यांना व्यवसायाची संधी उपलब्ध करुन देवून त्यांचे जिवनमान उंचावणे हे महापालिकेचे कर्तव्य व मुख्य उद्देश्य आहे. शहरातील अनेक महिला घरगुती स्तरावर व्यवसाय करुन उपजिविका चालवित आहेत. महापालिका अश्या महिलांसाठी बाजारपेठेचे आयोजन करीत असते त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सूचक, सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.
१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या सुवर्ण जयंती विभागामार्फत खाद्यजत्रा, बाजारपेठेचे आयोजन करण्यात येते का? खाद्यजत्रा, बाजारपेठेचे आयोजन करण्यात येत असल्यास कधी पासून करण्यात येत आहे? कुठे करण्यात येत आहे? कोणत्या सणानिमित्त वा कालावधीत करण्यात येत आहे? प्रतीवर्षी करण्यात येते का? चालू वर्षी अश्या खाद्यजत्रा? बाजारपेठेचे आयोजन करण्यात आले आहे का? आयोजन केले असल्यास कुठे व कधी केले? आयोजन केले

नसल्यास का केले नाही?  आयोजन न करण्यामागची कारणे कोणती आहेत?  खाद्यजत्रा? बाजारपेठेचे आयोजन करण्यासाठी महापालिका सदस्यांनी संस्थांनी, बचत गटांनी लेखीपत्र देवून गोल मैदान, उल्हासनगर–१ येथे बाजारपेठे भरविण्याची विनंती केली आहे का?  कोणी?  सदर पत्रावर महापालिकेने कोणती कारवाई केली?

<u>उत्तर :–</u> १) होय.
२) दिवाळी, नाताळ दिनानिमित्त, जागतिक महिला दिनानिमित्त.
३) महापालिकेच्या क्षेत्रात करण्यात येते.
४) होय.
५) होय.
६) प्रस्ताविक आहे.  जागा निश्चित केलेली नाही.
७) बाजारपेठ नाताळ निमित्त लावण्याचे प्रस्तावित आहे.

**<u>महापालिका सचिव :–</u>** प्रश्न क्र. ७३ हा श्री. प्रभुनाथ गुप्ता यांचा आहे. ते यावेळेस सभागृहात उपस्थित नाहीत म्हणुन त्यांच्या प्रश्न व उत्तराची केवळ इतिवृत्तांतात नोंद केली जाईल.

इ

**<u>प्रश्न क्र. ७३ :–</u>** प्र.क्र. १ अ) प्रभाग समिती क्र. २ में संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान के अंतर्गत कितना कितना फन्ड आया था । और कौन से पॅनल में क्या काम हुआ है । और कौनसी एरिया में लोकेशन क्या है ? (पीडब्ल्युडी रिपोर्ट में)
ब) संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान के अंतर्गत कितने (वार्ड) पॅनल आते है । और कौनसी सोसायटी कौनसा ठेकेदार ने काम किया था?  काम क्या था?  कौनसे डिपार्टमेंट का था?

<u>उत्तर :–</u> १. अ) हर वर्ष पुरे उल्हासनगर के लिए १२ लाख की राखी का बजेट मे समावेश किया जाता है । कामो की सुची साथ जोडी गई है ।

ब) संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान अंतर्गत वर्षनिहाय कोणकोणते प्रभागांना बक्षिसे मिळाले होते याची माहिती आरोग्य विभागाकडुन मिळु शकते.  सार्वजनिक बांधकाम खात्याने या योजने अंतर्गत आतापर्यंत केलेल्या कामांची यादी सोबत जोडलेली आहे.  त्यामध्ये कोणते काम ठेकेदाराचे नाव व दिनांक नमुद आहे.

महापालिका सचिव :– प्रश्न क्र. ७४  हा श्री. प्रभुनाथ गुप्ता यांचा आहे. ते यावेळेस सभागृहात उपस्थित नाहीत म्हणुन त्यांच्या प्रश्न व उत्तराची केवळ इतिवृत्तांतात नोंद केली जाईल.

प्रश्न क्र. ७४ :– प्र.क्र. १ अ) उल्हासनगर–२ गौल मैदान परिसर रोड, कॅम्ब्रीज शो रुम के पास,

कल्व्हर्ट के बाजु में, कौन से साल में दुकान बना है? पहले किस ठेकेदार ने?

क्या सामान रोड बनते समय रखने के लिए बनया था?

प्र.क्र. १ ब) पहले इस दुकान का सर्वसाधारण महासभा में मुद्दा कौन से नगरसेवक ने उठाया था?  क्या बहस हुई और महापौरजी ने और आयुक्त ने फायनल जबाव क्या दिया?  उस जवाब पर यह दुकान कायम है क्या?

प्र.क्र. १ क) अभी वर्तमान समय में इस पर कब्जा किसका है और क्या धन्दा चालु है । दुकान पर बोर्ड किसका किस काम से लगा है?  मालक कौन है?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी, श्री. बच्चाराम रुपचंदानी, श्री. कुमार आयलानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

उत्तर :– १ अ) हा मुद्दा सार्व.बांध. विभागाशी संबंधीत आहे.

ब) सदरचा मुद्दा सार्व.बांध. संबंधीत आहे.

क) श्री. हरेश थदानी दुकान मालक आहेत तसेच दुकानावर ''महाराष्ट्र शासन पुरस्कुत झुणका भाकर केंद्र'' असे फलक लावलेले आहे.  सदर ठिकाणी भजी वडापाव धंदा आहे.

महापालिका सचिव :– प्रश्न क्र. ७५ हा श्री. विनोद ठाकुर यांचा आहे.

प्रश्न क्र. ७५ :– प्र. क्र. १ अ) गेल्या अनेक वर्षापासून लेखा विभागात किती वरीष्ठ अधिकारी व

कोण कोणते कार्यरत आहेत?  त्यांना कोणकोणते जबाबदारी सोपविण्यात आली आहे?

मा. सदस्य श्री. महेश सुखरामानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

उत्तर :– सोबत कार्यकारी अधिकारी व कर्मचारी यांचे नाव व त्यांचेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी याची तपशिलवार माहिती जोडलेली आहे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर</u> :– ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. ७६ हा श्री. विनोद ठाकुर यांचा आहे.

मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता, श्री. गणपत एडके यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>प्रश्न क्र. ७६:–</u> प्र.क्र. २) कोण कोणत्या विभागात किती वर्षापासुन एकाच ठिकाणी उप अभियंता व कनिष्ठ अभियंता म्हणून कार्यरत अशा अधिका–यांची नावे व किती वर्षापासून कार्यरत आहेत? त्यांनी वर्षाभरात केलेल्या कामाचा आढावा घेण्यात येतो का?

<u>उत्तर :–</u> **सार्वजनिक बांधकाम विभागात** कार्यरत उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांची नावे व ते सदर विभागात किती वर्षापासुन कार्यरत आहेत त्याची माहिती खालीलप्रमाणे:–

१. श्री. के.जे. पारीख, उप–अभियंता (साबांवि):– २८ वर्षे
२. श्री. बी. जे. भटिजा, उप–अभियंता (साबांवि):– ११ वर्षे
३. श्री. आर.बी. शिर्के, उप–अभियंता (साबांवि):–११ वर्षे
४. श्री. पी.आर. डिंग्रेजा, उप–अभियंता (साबांवि):–२७ वर्षे
५. श्री. महेश सितलानी, कनिष्ठ अभियंता (साबांवि):–१८ वर्षे
६. श्री. विजय रिझवानी, कनिष्ठ अभियंता (साबांवि):–८ महिने
७. श्री. संदिप जाधव, कनिष्ठ अभियंता(साबांवि):– ४ वर्षे
८. श्री. अनिल जयसिंघानी, कनिष्ठ अभियंता(साबांवि):–६ महिने

त्यांनी वर्षभरात केलेल्या कामाचा आढावा बैठकीच्या स्वरुपात घेण्यात येतो.

मा.सदस्या श्रीमती नीना नाथानी या सभागृहातुन बाहेर गेल्या.

**विदयुत विभागात** उप–अभियंता व कनिष्ठ अभियंता म्हणुन कार्यरत अशा अधिका–यांची नावे व कार्यकाल खालीलप्रमाणे आहे.

१. श्री. आर.एन. गंगवानी, उप–अभियंता (विद्युत), कार्यकाल १५ वर्षे
२. श्री. यु.के. नारवानी, उप–अभियंता (स्थापत्य), कार्यकाल ०५ दिवस
३. श्री. वि.आर. गंगारामानी, कनिष्ठ अभियंता (विद्युत) व प्रभारी उप अभियंता (विद्युत) कार्यकाल १५ वर्षे
४. श्री. एच.आर. खरात, कनिष्ठ अभियंता (विद्युत) कार्यकाल ०४ वर्षे
५. श्री. एम.व्ही. दिंडे, कनिष्ठ अभियंता, (विद्युत), कार्यकाल ०३ वर्षे

केलेल्या कामांचा आढावा दरवर्षी घेण्यात येतो.

मा. सदस्य श्री. संजय बठिजा, श्री. राम पारवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**प्रभाग समिती क्र. १ मध्ये**

१.श्री. भरत भटिजा उप अभियंता सार्व.बांध. विभाग प्रभाग समिती क्र. १ येथे वर्षे २००२ पासुन कार्यरत आहेत.

२. श्री. विजय रिजवानी, कनिष्ठ अभियंता सार्व.बांधकाम विभाग हे गेले आठ महिन्यापासुन प्रभाग समिती क्र. १ येथे कार्यरत आहेत.

३. श्री. तरुण शेवकानी कनिष्ठ अभियंता (अ.बां.नि.वि.) हे गेली दोन वर्षापासुन प्रभाग समिती क्र. १ येथे कार्यरत आहेत.

**प्रभाग समिती क्र. २**

१. श्री. आर.बी. शिर्के उप अभियंता दिनांक २/५/२००३ ते ३०/११/२००४ पर्यंत

२. श्री. संदिप जाधव कनिष्ठ अभियंता दिनांक १/४/२००४ ते १५/१२/२००७

३. श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता दिनांक १७/५/२००५ ते १५/१२/२००७.

साप्ताहिक अहवाल देण्यात येत आहे.

दिनांक १/१/२००५ ते १४/१२/२००७ या कालावधीत **प्रभाग समिती क्र. २** या कार्यालयात कार्यरत असलेले प्रभाग अधिकारी व कनिष्ठ अभियंता यांची माहिती खालीलप्रमाणे.

| कालवधी | नाव |
|---|---|
| १. १/१/०५ ते ८/७/०५ | श्री. युवराज भदाणे |
| २. ८/७/०५ ते १५/६/०६ | श्री. अ.म. काटे |
| ३. १५/६/०६ ते ११/७/०७ | श्री. रमेश काजळे |
| ४. ११/७/०७ ते १४/१२/०७ | श्री. व्ही.आर. गर्जे |

**प्रभाग समिती क्र. ३** कनिष्ठ अभियंता श्री. जितु चोईथानी हे दिनांक १७/५/२००५ पासुन कार्यरत आहेत.

श्री. जितू चोईथानी कनिष्ठ अभियंता यांचे वार्षिक गोपनिय अहवाल दरवर्षी प्रभाग अधिकारी यांचे स्वाक्षरीने सामान्य प्रशासन विभाग मुख्यालयात पाठविण्यात येतात.

अ) दिनांक १७ मे, २००५ रोजी प्रभाग समिती क्र. ४ ची स्थापना करण्यात आली होती.
१. कनिष्ठ अभियंता श्री. तरुण शेवकानी, दिनांक १७/५/२००५ ते ६/३/२००६
२. कनिष्ठ अभियंता श्री. अश्वीनी अहुजा दिनांक २७/३/२००६ ते आजतागायत
प्रभाग समिती स्थान झाल्यापासुन अदयापपर्यंत या प्रभागात उप अभियंता यांची नेमणुक करण्यात आली नाही.
ब) होय

टीपः— **प्र.स. क्र.** ४ मधील सार्व बांधकाम विभागाच्या अखत्यारीखाली सध्या उप अभियंता या पदावर श्री. पी. डी. डिंगरेजा व कनिष्ठ अभियंता पदावर श्री. अनिल जयसिंघानी कार्यरत असून या दोन्ही अधिका—यांची माहिती संबंधीत विभागाकडुन उपलब्ध केली जाईल.

पाणी पुरवठा विभाग प्रतिनियुक्तीवर कार्यरत उप विभागीय अभियंता व शाखा अभियंता यांची माहिती सोबतच्या प्रपत्रकात जोडण्यात आली आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मला उत्तर देण्यात आले आहे त्यामध्ये असे लिहिले आहे की, लेखा विभागामध्ये लेखापाल यांचे पद अदयाप रिक्त आहे. ते पद का भरले नाही? आणि काही लोक लिपिक म्हणुन लेखा विभागामध्ये १५—१५ वर्षापासुन कार्यरत आहेत. त्यांना कायम स्वरुपी एकाच पदावर ठेवणार आहात काय? श्री. हरेश वाधवानी १९८४ पासुन लिपिक म्हणुन तेथे कार्यरत आहेत. २३ वर्षे एकाच विभागात कार्यरत आहेत. श्रीमती हेमा मुलचंदानी लिपिक १९८५ पासुन एकाच विभागात कार्यरत आहेत. श्री. सुरेश मुलपानी हे १९९३ पासुन एकाच विभागात कार्यरत आहेत. मा. आयुक्त साहेब, १५ वर्षापासुन, २० वर्षापासुन, २५ वर्षापासुन एकाच पदावर कार्यरत असलेल्या या कर्मचा—यांसाठी आपल्या महानगरपालिकेत पदोन्नतीची पदे नाहीत काय? लिपिकांना दुसरी काही पदोन्नती नाही का ? असा काही कायदा आहे का की एकाच विभागामध्ये एकाच पदावर, एकाच टेबलवर त्या माणसाने काम केले पाहिजे? मग आयुक्त का नाही राहत आमच्याकडे २० वर्ष? उपायुक्त का नाही राहत २०—२० वर्ष आपणाकडे? लेखा विभागात पाहिले तर तेथे कुणी १० वर्षापासुन, १५ वर्षापासुन २० वर्षापासुन कामे करत असल्याचे दिसुन येत आहेत. याचे कारण काय?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी, श्री. लाल पंजाबी, श्री. राम पारवानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

श्री. अशोक बागेश्वर(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री. विनोद ठाकुर यांनी जो प्रश्न विचारला आहे, त्यानुसार जे कर्मचारी एकाच ठिकाणी तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुन कार्यरत असतील त्यांची बदली करण्याचे शासनाचे धोरण आहे आणि शासनाचे धोरण आपल्यावर बंधनकारक आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मग हे कर्मचारी २०—२० वर्षापासुन एकाच ठिकाणी का आहेत? २० वर्ष, २३ वर्ष एकाच खुर्चीवर बसलेले आहेत. म्हणजेच याचा अर्थ यांची तेथे मक्तेदारी चालते. ते आपल्या मर्जीने कामे करतात. म्हणजे या कर्मचा—यांच्या हाती त्या विभागाची नस आणि नस आहे. ते आपल्या मर्जीने तो विभाग चालवितात काय?

श्री. अशोक बागेश्वर(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्याने जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, सदरच्या मुद्दयाबाबत मा. आयुक्त साहेबांबरोबर चर्चा करुन बदली प्रस्तावित करण्यात येईल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—आयुक्त साहेब, जे तांत्रिक अधिकारी किंवा कर्मचारी आहेत जसे की कनिष्ठ अभियंता, वैदयकीय अधिकारी यांच्या आपण बदल्या करु शकतो काय?

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. महापौरजी, १९८२ पासुन हे कर्मचारी एकाच टेबलवर काम करत आहेत.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—एक—एक कर्मचारी २८—२८ वर्षापासुन एकाच ठिकाणी काम करत आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर:—आता २००७ हे वर्ष चालु आहे. आतापर्यंत ते कर्मचारी एकाच ठिकाणी कामे करत आहेत असे का?

श्री. अशोक बागेश्वर(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सन्माननिय महापौरजी, सदरचा जो मुद्दा आहे त्याबाबतीत नियम तपासुन त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—कार्यवाही कधी पर्यंत होईल?

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—नियम काय म्हणतो? तीन वर्षानंतर बदली करायची असा आपल्या कायदयात नियम आहे ना?

श्री. अशोक बागेश्वर(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी आता जो मुद्दा उपस्थित केला की, जी तांत्रिक पदे आहेत जसे कनिष्ठ अभियंता व

वैदयकीय आरोग्य अधिकारी यांच्या बाबतीतील व लेखा विभागातील कर्मचा—यांचे बदली संदर्भात शासनाचे आदेश व कुठल्या नियमानुसार बदली करणे शक्य आहे हे सर्व तपासुन नियमानुसार त्यांच्या बदल्या करण्यात येतील. त्याबाबतीत तात्काळ आयुक्त साहेबांना प्रस्ताव सादर करण्यात येईल.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—जे लिपिक आहेत?

श्री. अशोक बागेश्वर(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—होय, होय. त्यासाठीच नियमानुसार म्हटले आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—प्रभाग समितीमध्ये कनिष्ठ अभियंत्यांची जी नेमणुक करण्यात आली आहे त्या अभियंत्यांचे त्या ठिकाणी काय काम आहे? ते काय काम करतात? गेले चार—पाच वर्ष ते लोक तेथे कामास आहेत.

श्री. बी. सुंदरेश्वरन (शहर अभियंता) :—सन्माननिय महापौरजी, कनिष्ठ अभियंता प्रभाग समितीमध्ये बसुन टिप्पणी वगैरे सादर करतात त्याचबरोबर प्राकलने तयार करतात. व ज्या ठिकाणी विकास कामे चालु आहेत त्या ठिकाणी पर्यवेक्षण करतात.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—विकास कामे चालु असलेल्या ठिकाणी जावुन कनिष्ठ अभियंता पहाणी करतच नाहीत. फक्त कोणत्या ठिकाणी बांधकाम चालु आहे, प्लास्टरचे काम चालु आहे त्याचा तपास काढुन त्या ठिकाणी फक्त ते लोक जातात. एक एक कनिष्ठ अभियंता पाच—पाच, सहा—सहा वर्षापासुन एकेक प्रभाग समितीमध्ये कार्यरत आहे. पाच—पाच वर्ष त्यांना एकाच ठिकाणी का ठेवले आहे? सार्वजनिक बांधकाम विभागामधील कनिष्ठ अभियंता स्वतंत्रपणे पहाणी करतात आणि प्रभाग समितीतील कनिष्ठ अभियंता स्वतंत्रपणे पहाणी करतात. आपण कोणत्या विभागातर्फे उत्तर देत आहात? सार्वजनिक बांधकाम विभागाबाबतीत की प्रभाग समितीबाबतीत?

श्री. बी. सुंदरेश्वरन (शहर अभियंता) :—जेथपर्यंत कनिष्ठ अभियंता यांचा संबंध आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—दोन—दोन ठिकाणी कनिष्ठ अभियंते व उपअभियंते बसलेले असतात. एक आपल्या सार्वजनिक बांधकाम विभागात व दुसरे प्रभाग समित्यामध्ये.

श्री. बी. सुंदरेश्वरन (शहर अभियंता) :—या लोकांना खुप काम असते. आजकाल माहिती अधिकारान्वये मागविण्यात आलेल्या माहितीबाबतचे फार मोठया प्रमाणावर काम असते. त्याचबरोबर टिप्पणी सादर करणे, प्राकलने तयार करणे, विकास कामांची पहाणी करणे. अशी बरीचशी कामे असतात.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :— साहेब, आपण काय म्हणत आहात ते माझ्या लक्षात येत नाही.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—आयुक्त साहेब, आपण उत्तर दया. शहर अभियंता उत्तर देवु शकत नाहीत. यासाठी एकतर आपण उत्तर दया किंवा ज्यास याबाबतीतील ज्ञान आहे त्यास उत्तर देण्यास सांगा.

सदस्य श्री.बी.बी. मोरे:—सन्माननिय महापौरजी, शहर अभियंता जर उत्तर देवु शकत नसतील तर कार्यकारी अभियंता श्री. सुखरामानी यांना उत्तर देण्यासाठी बोलवा. कारण ते या महानगरपालिकेत ब—याच वर्षापासुन काम करत आहेत. शहर अभियंता हे नविन आहेत ते जर महासभेत सदस्यांच्या प्रश्नांना बरोबर उत्तर देवु शकत नसतील तर श्री. सुखरामानी यांना बोलवा ना? कारण श्री. सुखरामानी यांना सेवानिवृत्त होता होतांना आम्हांला त्यांना काही आहेरही दयायचा आहे. ते आता सेवानिवृत्त होणार आहेत. तर त्यांना बोलवा ना?

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मा. महापौरजी, आयुक्तां साहेबांनंतर दुस—या क्रमांकाचे पद शहर अभियंता यांचे असते. शहर अभियंता यांनी सभागृहात उत्तरे देण्यासाठी तयार होवुन यावयास पाहिजे. ते उत्तर देण्यास समर्थ नसतांनाही आपण त्यांची बदलीही करत नाहीत. प्रत्येक वेळेस ते सभागृहात उत्तर देवु शकत नाहीत. ज्याच्यावर संपुर्ण शहराची जबाबदारी आहे. प्रत्येक वेळेस उत्तर देण्यासाठी आपण श्री. सुखरामानी यांना बोलवता. श्री. सुखरामानी ३१ तारखेला सेवानिवृत्त होत आहेत. त्यांनतर कोण उत्तर देईल?

श्री. सुखरामानी(प्र. कार्यकारी अभियंता):—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सदस्य, श्री. विनोद ठाकुर यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागा तर्फे आम्ही उत्तर दिलेले आहे. उपअभियंता त्यानंतर कनिष्ठ अभियंता यांच्या वेळोवेळी विभागातर्फे बदल्या केल्या जातात. प्रभाग समिती क्र. १ ते ४ मध्ये त्यांच्या बदल्या केल्या जातात.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—माझ्या प्रश्नाला उत्तर दिले आहे प्रभाग समिती स्थापन झाल्यापासुन आजपर्यंत या प्रभाग समितीत उप अभियंता यांची नेमणुक झालेली नाही.

श्री. सुखरामानी(प्र. कार्यकारी अभियंता):—सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत जो प्रश्न आहे त्याबाबतीत मी उत्तर दिले आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—माझा प्रश्न प्रभाग समिती आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या दोन्ही विभागांशी संबंधीत आहे.

श्री. सुखरामानी(प्र. कार्यकारी अभियंता):—सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत आपला जेवढा प्रश्न आहे त्याचे उत्तर देण्यात आलेले आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :— प्रभाग समिती स्थापन झाल्यापासुन प्रभाग समिती क्र. ४ येथे आजपर्यंत उप अभियंता यांची नेमणुक झालेली नाही.

श्री. अशोक बागेश्वर(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—प्रभाग समितीमध्ये जे अभियंते कार्यरत आहेत त्यामध्ये कनिष्ठ अभियंता हे पद अनाधिकृत बांधकामे नियंत्रीत करण्यासाठी कार्यरत आहे. बाकीचे जे उपअभियंता मुख्यालयामध्ये कार्यरत आहेत त्यांची सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रभाग समितीमध्ये नेमणुक केलेली आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—आपल्या आजुबाजुच्या महानगरपालिकांमध्ये म्हणजेच कल्याण—ठाणे वगैरे महापालिकांमध्ये प्रभाग समिती कार्यालयांमध्ये उप अभियंत्यांचे पद आहे. तिथे त्या पदावर अधिकारी कार्यरत आहेत. आपल्याकडे ते नाहीत त्याचे कारण काय? आपल्याकडे माणसे नाहीत की कामे नाहीत? प्रभाग समितीची स्थापना का झाली? महानगरपालिकेच्या कामाचे विकेंद्रीकरण करण्यासाठी लोकांना लोकांच्या सोयीसाठी झाली आहे ना? तर मग त्या ठिकाणी उप अभियंता हे पद का नाही? तेथे पद आहे परंतु त्या पदावर नेमणुक का केली नाहीत? कल्याण महानगरपालिकेमधील प्रभाग समितीमध्ये उप अभियंत्याचे पद आहे. आपल्याकडे ते का नाही? या प्रश्नाच्या उत्तरात लिहिले आहे की, उप अभियंत्याची नेमणुक करण्यात आलेली नाही ती का करण्यात आली नाही?

श्री. अशोक बागेश्वर(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री. विनोद ठाकुर यांनी प्रश्न विचारला आहे की प्रभाग समितीमध्ये उप अभियंता का कार्यरत नाही? त्याबाबतीत मी सांगु इच्छितो की, सध्या आपल्याकडे जी आस्थापना आहे त्या आस्थापनेमध्ये प्रभाग समितीसाठी उप अभियंता हे पद अदयापपर्यंत निर्माण केलेले नाही. तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. तो प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर त्या ठिकाणी त्या पदावर नेमणुक करण्यात येईल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—मा. महापौरजी, मा. आयुक्त, सचिव व आमचे सर्व सदस्य, श्री. विनोद ठाकुर यांनी विचारलेल्या या प्रश्नाबाबतीत जे उत्तर दिले जात आहे त्याबद्दल मला खुपच दु:ख होत आहे कारण की, अधिका—यांचे आपसामध्ये जे समन्वय असले पाहिजे ते नाही. प्रभाग अधिका—यांनी लेखी उत्तर दिले आहे. मात्र महासभेमध्ये उत्तर देण्यासाठी व्यासपिठावर शहर अभियंता यांना तसेच कार्यकारी अभियंता यांना बोलावले जात आहे. ज्या अधिका—याने प्रश्नाचे लेखी उत्तर दिले आहे तो अधिकारी उत्तर देण्यासाठी महासभेमध्ये उपस्थित का नाही? आता सभागृहात हे जे काम चालले आहे त्यावरुन असे वाटते की आम्ही सभागृहात नाही तर कुठल्यातरी मच्छी मार्केटमध्ये बसलो आहोत असे वाटते. अशा प्रकारे जर प्रशासन चालत असेल तर आम्ही ज्या काही सूचना केल्या आहेत त्यांची अंमलबजावणी होईल किंवा नाही याची मला खात्री वाटत नाही. कारण की नेहमी असे होते की सदस्याने प्रश्न विचारला, आपण त्याची नोंद घेतली. अधिकारी व्यासपिठावर आले आणि उत्तर देवुन निघुन गेले. परंतु प्रत्यक्षात कार्यवाही काहीच होत नाही. आजचे हे वातावरण पाहून असे वाटत आहे की अधिका—यांमध्ये समन्वय नाही. यासाठी मा. महापौरांना माझी एक विनंती राहिल की,

येणा—या महासभेमध्ये असे होवू नये याबाबत आपण आदेश दयावेत. व प्रश्नाचे जो कोणी अधिकारी लेखी उत्तर देत असेल त्यानेच उत्तर देण्यासाठी येथे उपस्थित राहिले पाहिजे. उत्तर देण्यासाठी आपण शहर अभियंता यांना बोलवतात परंतु ते उत्तर देवु शकत नाहीत. त्यानंतर आपण कार्यकारी अभियंत्यांना बोलावता. ते जर उत्तर देवु शकले नाही तर म्हणाल नगररचनाकारांना बोलवा. आणि तेहि उत्तर देवु शकले नाही तर कनिष्ठ अभियंतांना बोलवा. ही जी प्रथा आहे ती योग्य नाही. यासाठी माझी आपणांस विनंती आहे की, प्रश्नाचे जो कोणी अधिकारी लेखी उत्तर देत असेल त्यानेच त्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी महासभेत उपस्थित राहिले पाहिजे. आणि ते जर उपस्थित राहु शकत नसतील तर आयुक्तांनी समाधानकारक असे उत्तर दिले पाहिजे. अर्ध्या तासापासुन एकच प्रश्नावर चर्चा चालु आहे. एक अधिकारी उत्तर देण्यास येतो तो जातो दुसरा येतो नंतर तिसरा येतो असे चालु आहे. यावरुन असे वाटते की, आपण सभागृहात बसलेलो नाहीत. अधिकारी आपणा सर्वांची वेळ व्यर्थ घालवत आहेत. यासाठी माझी आपणांस विनंती आहे की येणा—या महासभेत असे होवू नये. यासाठी प्रश्नाचे जो अधिकारी लेखी उत्तर देत असेल त्यानेच महासभेत उत्तर देण्यासाठी उपस्थित असले पाहिजे.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, माझा प्रश्न थोडासा वेगळा आहे. सफाई बाबतीत माझ्याकडे ब—याचशा तक्रारी आलेल्या आहेत व येत आहेत. मध्यंतरी खाडाबदली सफाई कामगारांबाबत लक्षवेधी सूचना दिली होती. प्रत्येक प्रभागासाठी जे ५ सफाई कामगार दिलेले होते ते बंद का करण्यात आले? त्या लोकांनी कामे केली आहेत. त्या कामगारांना अदयापपर्यंत पगार सुध्दा मिळालेला नाही. याबाबतीत उत्तर दिले तर बरे होईल.

<u>श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>सन्माननिय महापौरजी, दिवाळीच्या सणाच्या वेळेस तातडीच्या सफाई कामासाठी आपण प्रत्येक प्रभागामध्ये ५ सफाई कामगारांची नेमणुक केली होती. खाडा बदली सफाई कामागारांचा जो प्रस्ताव आहे तो मा. आयुक्त महोदयांकडे सादर करण्यांत आलेला आहे. त्यावर निर्णय झाल्यानंतर पुन्हा सफाई कामगारांची नेमणुक करण्याबाबतीत निर्णय घेण्यात येईल. तसेच त्यांना जर पगार दिलेला नसेल तर तो देण्याबाबतीत एक दोन दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. ७७ हा श्रीमती संगिता कंडारे यांचा आहे. यावेळेस कदाचित त्या सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात केवळ नोंद केली जाईल.

मा. सदस्या श्रीमती शकुंतला पाटील यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>प्रश्न क्र. ७७:—</u> उल्हासनगर महानगरपालिका वार्ड क्रमांक ०४ येथे साफ सफाईचा अभाव जाणवत आहे. साफसफाई बाबत महापालिका प्रशासनाबरोबर दिनांक १९/५/२००७ व २७/७/२००७ रोजी पत्रव्यवहार करुन, प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. परंतू प्रशासनाने माझे पत्रांची दखल न घेतल्याने साफसफाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे वार्डातील साफसफाईची समस्या गंभीर बनली आहे. येथिल नाल्या, नाले, शौचालये यांची अवस्था दयनीय व बिकट बनली आहे. साफसफाईचा बोजवारा उडाला आहे. सर्वत्र कच—याचे ढिग साचले आहेत. नाल्या, नाले, शौचालये घाणीचे व दुर्गंधीचे साम्राज्य बनले आहेत. यामुळे वार्डातील नागरीक त्रस्त झाले आहेत. त्यांना नाहक अडी अडचणी व समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने माझ्याकडे वारंवार तक्रारी करीत आहेत. वार्ड क्र. ४ मधील साफसफाई बाबत महापालिकेच्या आरोग्य विभागाने काय उपाययोजना केली याबाबत महासभेत चर्चा होवून खुलासा होणस व माहिती मिळणेस विनंती.

<u>उत्तर :—</u> मा. संगिता कंडारे, नगरसेविका यांचे दिनांक १९/५/२००७ व २७/७/२००७ रोजी प्राप्त झालेल्या पत्रानुसार शौचालयांची सफाई व दुरुस्ती करणेबाबत कळविले होते. त्यानुसार प्रभाग क्र. ४ व ५ मधील शौचालयांची सफाई संबंधीतांकडून करुन घेण्यात आली असून ज्या ठिकाणी दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. त्याची पाहणीकरुन दुरुस्ती करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास सादर करण्यात आले होते. त्यानुसार संबंधीत विभागाकडुन ईस्टीमेट बनवून पुढील कार्यवाही सुरु असल्याचे इकडील विभागास कळविले आहे.
तसेच प्रभाग क्र. ४ मधुन नाल्या, गटारी, शौचालये नियमितपणे साफ केल्या जातात. कचरा उचलणेबाबतच्या तक्रारींचे निवारण वेळोवेळी करण्यात येते.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. ७८ हा श्री. रविंद्र बागुल यांचा असून तो प्रश्न नाकारण्यातं आला आहे.

प्रश्न क्र. ७९ हा श्री. मोहन साधवानी यांचा आहे.

६ प्रश्न क्र. ७९ :— १. महापालिकेचे बोधचिन्ह (मोनोग्राम) हे खाजगी अथवा महापालिकेच्या वाहनावर वापरण्याची अनुमती महापालिका नियमान्वये कोणाकोणास आहे? याची सविस्तर माहिती मिळावी.
२. महापालिकेचे बोधचिन्ह (मोनोग्राम) हे वाहनावर वापरण्याची अनुमती असलेली व्यक्ती सदर वाहनाचा वापर महापालिका नियमान्वये कोणकोणत्या कारणांसाठी करु शकते? याबाबत सविस्तर माहिती मिळावी.

उत्तर :— १. महापालिकेचे बोध चिन्ह (मोनोग्राम) वापरणेबाबत महापालिकेतर्फे स्वतंत्र नियमावली तयार करण्यात आलेली नाही. तसेच महापालिकेचे बोध चिन्ह नोंदणी करणे आवश्यक आहे. परंतू ती प्रक्रिया अदयाप पूर्ण करण्यात आलेली नाही. तोपर्यंत कोणालाही आपल्या गाडीवर बोध चिन्ह लावता येणार नाही. बोध चिन्हाची नोंदणी झाल्यानंतर त्याचा वापर नियमावली नुसार करता येईल.
२. वरीलप्रमाणे.

सदस्य श्री. मोहन साधवानी:— मा. महापौरजी व आयुक्त साहेब, मी असा प्रश्न विचारला आहे की, महानगरपालिकेचे जे बोधचिन्ह आहे, ते कोण कोणते अधिकारी व निवडून आलेले सदस्य आपल्या वाहनावर लावु शकतात? याबाबतीत जे उत्तर दिले आहे त्यानुसार असे समजते की, याबाबतीत कोणतेही उप विधी तयार करण्यात आलेले नाहीत तसेच कुणीही महापालिकेचे बोध चिन्ह आपल्या वाहनावर लावु शकत नाहीत. मी आपणांस एक उदाहरण देतो प्रभाग क्र. ६७ मधुन निवडुन आलेले सदस्य श्री. भारत गंगोत्री ते आपल्या वाहनावर महापालिकेचे बोधचिन्ह लावून फिरतात. तर त्याबाबतीत आपण त्यावर काय कारवाई कराल? वाहनावर महापालिकेचे बोधचिन्ह लावण्यासाठी आपण मा. महापौरांना, उप—महापौरांना, आयुक्तांना परवानगी देत नसतांना व त्याबाबतीत कोणतेही उप विधी तयार केलेले नसतांना एक नगरसेवक महापालिकेचे बोधचिन्ह आपल्या वाहनावर लावुन तो कसा फिरत आहे? याबाबतीत उत्तर दया किंवा ज्या अधिका—याने या प्रश्नाचे उत्तर दिले आहे त्यास व्यासपिठावर बोलवा.

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्याने जो प्रश्न विचारला आहे, त्यानुसार महापालिकेचे बोधचिन्ह वापरण्याबाबतीत अदयापपर्यंत कोणतेही उपविधी तयार करण्यात आलेले नाहीत. यासाठी ते कोणी वापरले पाहिजे आणि कोणी वापरले नाही पाहिजे याबाबतीत अदयाप निर्णय झालेला नाही. आताच त्यांनी जे एक उदाहरण निदर्शनास आणुन दिले की अमुक एक नगरसेवक महापालिकेचे बोधचिन्ह आपल्या वाहनावर लावुन फिरत आहे तर त्याबाबतीत त्यांना योग्य त्या सूचना दिल्या जातील.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—जे महापालिकेचे बोधचिन्ह वापरत आहेत त्यांच्यावर आपण काय कारवाई कराल? उत्तरामध्ये तर असे लिहिले आहे की, बोधचिन्हाचा कोणीही वापर करु शकत नाही.

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—मा. महापौरजी, जोपर्यंत उपविधी तयार होत नाहीत तोपर्यंत याबाबतीत कारवाई करणे उचित होणार नाही. जे सदस्य महापालिकेचे बोधचिन्ह वापरत आहेत त्यांनी ते वापरु नये असे त्यांना सूचित केले जाईल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—वर्तमानपत्रामध्ये मी असे वाचले आहे की, ठाणे महानगरपालिकेमध्ये महापालिकेचे बोधचिन्ह आपल्या वाहनावर लावण्यासाठी मा. महापौर, उप—महापौर आणि आयुक्त यांना परवानगी आहे. अन्य कुणास याकामी परवानगी नाही. तर ठाणे महानगरपालिका महाराष्ट्रापासुन वेगळी आहे का? आपण म्हणता की, आपण उपविधी तयार केले नाहीत. ठाणे महानगरपालिकेत याबाबत उप विधी तयार केले आहेत म्हणुनच तर याबाबतीत आयुक्तांनी उत्तर दिले आहे ना?

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सन्माननिय महापौरजी, याबाबतीत ठाणे महानगरपालिका, कल्याण महानगरपालिका तसेच नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडुन आठ दिवसामध्ये माहिती घेतली जाईल. व योग्य जी कार्यवाही असेल ती केली जाईल.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :–**जो सदस्य महापालिकेचे बोधचिन्ह वापरत आहे त्याच्यावर कारवाई करण्यात यावी.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:–** सन्माननिय महापौरजी, सभागृह नेत्यांनी आता जो प्रश्न विचारला आहे की, महापालिकेचे जे बोधचिन्ह आहे ते फक्त मा. महापौर, उप–महापौर व आयुक्त साहेब, हेच आपल्या वाहनावर लावु शकतात. अन्य कुणीही महापालिकेचे बोधचिन्ह आपल्या वाहनावर लावु शकत नाहीत. याबाबतीत मी सांगु इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये जेव्हा एखादा उमेदवार महापालिका सदस्य म्हणुन निवडून येतो, व तो जेव्हा केव्हा आपल्या शहरातुन वाहनाने बाहेर जातो, त्यावेळेस यदाकदाचित जर काही दुर्घटना घडली तर काय करणार? ते कोण होते हे कसे माहित पडेल? यासाठी महापालिकेचे बोधचिन्ह जर वाहनावर लावलेले असेल तर तो महापालिका सदस्य आहे एवढे तरी माहित पडेल. याबाबतीत असे सांगण्यात आले आहे की, ठाणे महानगरपालिकेने उपविधी तयार केले आहेत किंवा नाहीत परंतु हे उल्हासनगर आहे, ही उल्हासनगर महानगरपालिका आहे. आता याचाच विचार करा की, ठाणे महानगरपालिकेस नगरसेवकास किती मानधन मिळते? व उल्हासनगरमध्ये नगरसेवकांना किती मानधन मिळते? याकडे कुणाचे लक्ष जात नाही. समजा, येथिल काही नगरसेवक सहलीला वगैरे कुठे जात असतील आणि त्यांच्या वाहनाला जर कुठे अपघात वगैरे झाला.....

**सदस्य श्री. मोहन साधवानी:–**ओळखपत्र दिलेले आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:–**मी बोलत आहे, मला बोलु दया त्यानंतर आपण बोला. महापालिकेचे बोधचिन्ह वापरण्यामध्ये गैर काही नाही. सर्व सन्माननिय सदस्यांच्या वतीने विनंतीपुर्वक मी असे सांगतो की, यामध्ये गैर काही नाही. यामध्ये गैरफायदा घेण्याचा प्रश्न नाही. समजा, श्री.बी.बी. मोरे हे सदस्य आहेत परंतु ते जर उप आयुक्त किंवा एखादया समितीचे सभापती असा वाहनावर फलक लावुन फिरत असतील तर तो कायदेशीर गुन्हा आहे. तसा फलक लावता कामा नये. जर मी माझ्या वाहनावर श्री.बी.बी. मोरे नगरसेवक उल्हासनगर महानगरपालिका असा फलक लावला तर त्यात गैर काय? आजच्या सभेमध्ये आपले जे आयुक्त साहेब आहेत, त्यांना सुध्दा मी सांगु इच्छितो की, याबाबतीत आपण काय उपविधी पाहु इच्छितात? जे निवडुन आले आहेत ते महापालिका सदस्य आहेत. त्यांचा तर हक्क आहे त्यांनी महापालिकेचे बोधचिन्ह वाहनावर लावले पाहिजे. सर्व सदस्यांच्या वतीने श्री. मोहन साधवानी यांना विनंती आहे की त्यांनी आपला प्रश्न मागे घ्यावा व सांगावे की वाहनावर महापालिकेचे बोधचिन्ह लावण्यासाठी परवानगी दयावी किंवा नाही? परवानगी नाही दिली तरी आम्ही आमच्या वाहनावर महापालिकेचे बोधचिन्ह लावणारच? काय कारवाई करणार? ज्यांनी उल्हासनगर महानगरपालिकेचा सत्यानाश केला आहे, त्यांच्यावर काही कारवाई केली जात नाही. व आम्ही सदस्य म्हणुन निवडुन येतो आणि वाहनावर महापालिकेचे बोधचिन्ह लावतो तर म्हणे कारवाई करा. हा कोणता न्याय आहे? वाहनावर महापालिकेचे बोधचिन्ह लावणे हा काही गुन्हा आहे? आमच्या सन्माननिय सभागृह नेत्याने तरी हा प्रश्न विचारावयास नको होता.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :–**मला काही हरकत नाही. याबाबतीत महाराष्ट्र शासनाने उपविधी तयार केले आहेत. जेव्हा शासन उपविधी तयार करते तेव्हा ते सर्वांसाठी तयार करते.

**सदस्य श्री. बी.बी.मोरे :–**तर मग ऐकुन घ्या. याकामी उपविधी तयार करण्याचे आपण बोलत असाल तर आमचे सन्माननिय सदस्य श्री. विनोद ठाकुर यांनी विचारलेल्या प्रश्नानुसार मी सांगु इच्छितो की, या महापालिकेत एक शिपाई एकाच ठिकाणी १८–१८ वर्ष कार्यरत राहतो. दुस–या शिपायाने त्याच्याकडुन त्याबाबतीत शिकले पाहिजे. एक लिपिक २०–२० वर्ष एका विभागात कार्यरत राहतो. तो जर आवक किंवा जावक बारनीशीचे काम करत असेल तर २० वर्ष तो तेच काम करत राहतो, दुस–या लिपिकाने सुध्दा ते काम शिकले पाहिजे. यांनी उपविधी तयार केले आहेत की तीन वर्ष एका विभागात कार्यरत असलेल्या शासकिय कर्मचा–याची दुस–या विभागात बदली झाली पाहिजे. परंतु तसे होत नाही. काय हे उपविधीत नाही? त्याबाबतीत आमचे सभागृह नेता काही बोलत नाहीत. यासाठी सर्वांच्या वतीने सभागृह नेत्यांना आम्ही विनंती करु की, आपण हा प्रश्न मागे घ्या. ज्या कुणाला आपल्या वाहनावर महापालिकेचे बोधचिन्ह लावायचे आहे ते लावु दया.

**महापालिका सचिव :–**ठिक आहे? प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :–**मा. महापौरजी, व आयुक्त साहेब, आपल्या महानगरपालिकेचे आयुक्त श्री. समीर उन्हाळे साहेब व विदयुत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मुकेश आयलानी साहेब हे पुणे येथे गेले आहेत.

उर्जा व्यवस्थापन व संवर्धना अंतर्गत राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कारासाठी आपल्या महापालिकेची निवड झाली आहे. यासाठी आम्ही संपुर्ण सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करु इच्छितो. त्यासाठी सर्वांनी उभे राहून त्यांना मानवंदना दयावी.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—उभे रहा. सन्मान करा. विदयुत विभागाची कारकिर्द व त्यांचे कार्य उत्कृष्ट असल्यामुळे आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळालेले आहे.

यावेळी सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व पालिका सदस्यांनी अधिका—यांनी उभे राहुन त्यांच्या कार्यास मानवंदना दिली.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौर महोदया, उल्हासनगर महानगरपालिकेच्या विदयुत विभागाने, विजेची बचत कशी करावी याबाबतचा सन २००३—०४, २००४—०५, २००५—०६ या वर्षांचा प्रस्ताव तयार करुन महावितरण कंपनीकडे पाठविला होता. त्याचे त्यांनी अवलोकन केल्यानंतर त्यांना तो प्रस्ताव अतिशय चांगला वाटला. आणि त्यामुळे शासनाच्या वतीने उल्हासनगर महानगरपालिकेस राज्यस्तरीय द्वितीय पारीतोषिक प्राप्त झाले आहे. आणि ते स्विकारण्यासाठी मा. आयुक्त श्री. समीर उन्हाळेजी व विदयुत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मुकेश आयलानीजी पुणे येथे गेले आहेत. तेथे मा. उर्जामंत्री/ अपारंपारिक उर्जामंत्री महोदयांच्या हस्ते पारीतोषिक मिळणार आहे. अशा या आनंदाच्या प्रसंगी श्री. मुकेश आयलानी व त्यांच्या विभागातील सर्व अधिकारी व कर्मचा—यांचे मी हार्दिक अभिनंदन करु इच्छितो. त्याचबरोबर त्यांनी यापुढे सुध्दा आपल्या महानगरपालिकेसाठी, राज्यासाठी व राष्ट्रासाठी असेच कार्य करावे अशी शुभकामना देतो. त्याचबरोबर आमच्या अन्य विभागातील जे अधिकारी येथे उपस्थित आहेत त्यातील सचिव कार्यालयास भारतीय मानक संघाकडुन आयएसओ हे मानांकन प्राप्त झाले आहे. त्यामुळे सुध्दा आमच्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या नावलौकीकात भर पडली आहे. त्याचबरोबर सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग, आरोग्य विभाग यांनी सुध्दा अशाच प्रकारचे चांगले कार्य करावे जेणेकरुन आपल्या महानगरपालिकेचे सर्वत्र नावलौकिक व्हावे. धन्यवाद ।

सदस्य श्री. बी.बी. मोरे:— सन्माननिय महापौरजी, आपल्या विदयुत विभागाचे कामकाज पाहून राज्यस्तरीय द्वितीय पारीतोषिक आपणांस जाहिर केले आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. आणि म्हणुन या सभागृहामध्ये त्यांचे कौतुक तर झालेच, अभिनंदनाचा ठराव झाला. परंतु मी असेही या सभागृहास सांगु इच्छितो की, श्री. आयलानी साहेबांना शाल आणि श्रीफळ देवुन त्यांचा महापालिकेतर्फे यथोचित नागरी सत्कार केला पाहिजे. कारण अशा अधिका—याच्या कार्याची नोंद महानगरपालिकेत कायम स्वरुपी रहावी. जेणेकरुन त्यांच्या नंतर येणा—या अधिका—यास त्यांच्या या कार्यापासुन प्रेरणा मिळाली पाहिजे. पारितोषिक स्विकारण्यासाठी ते पुणे येथे गेले आहेत. नाहीतर आजच त्यांचा येथे चांगल्याप्रकारे गौरव व्हावयास पाहिजे होता. एवढेच मी सभागृहास विनंती करुन सांगतो धन्यवाद।

सदस्य श्री. मोहन साधवानी:—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आपल्या महानगरपालिकेस राज्यस्तरीय द्वितीय पारितोषिक मिळाल्याबाबत मा. आयुक्त, विदयुत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मुकेश आयलानी व त्यांच्या संपुर्ण विभागास शुभेच्छा देतो. तसेच जसे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग, आरोग्य विभाग यांनी सुध्दा यातुन प्रेरणा घेतली पाहिजे. त्याचबरोबर एक खेदाची गोष्ट ही आहे की, श्री. मुकेश आयलानी व त्यांच्या विभागातील कर्मचा—यांना अतिरिक्त वेतनवाढी देण्याबाबत सन २००५ मध्ये जो ठराव पारीत झाला होता त्यानुसार दोन अतिरिक्त वेतनवाढी अदयाप त्यांना मिळालेल्या नाहीत. त्या अदयाप का मिळाल्या नाहीत ते सांगितले जावे व त्यांना त्या दोन अतिरिक्त वेतनवाढी लवकरात लवकर देण्यात याव्या. कारण की एवढया प्रामाणीकपणे व कार्यक्षमतेने तो विभाग कार्य करत असतांना त्यांना दोन अतिरिक्त वेतनवाढी अदयाप का देण्यात आल्या नाहीत?

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य महोदय श्री. साधवानी साहेब यांनी आता जो मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबत आठ दिवसामध्ये सर्व तपासणी करुन मा. आयुक्त साहेबांकडे प्रस्ताव सादर करेन.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—त्यांना लवकरात लवकर वेतनवाढी देण्यात याव्यात.

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—आठ दिवसामध्ये वेतनवाढी देण्यात येतील.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—**मा. महापौरजी, विदयुत विभागाने केलेल्या अति उत्कृष्ट कामगीरीबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो, त्याचबरोबर इतर विभागाचे जे काम आहे जसे की मालमत्ता विभाग आहे, कर विभाग आहे, येथे उप—आयुक्त साहेब बसलेले आहेत ते लोकांची कामे करत नाहीत. प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विदयालय यांना गोल मैदान येथिल लॉन दिलेले आहे. त्याचे ॲग्रीमेंट करण्यासाठी कमीत कमी तीन महिन्यापासुन मी वरीष्ठ नगरसेवक या नात्याने जात आहे. ते नेहमी सांगतात की बस्स थोडया वेळाने पाठवितो, पाच मिनिटांनी पाठवितो. अशा अधिका—यास पदोन्नती मिळाली आहे त्याबद्दल मला आनंदही होत आहे. आता ते येथे उप आयुक्त आहेत परंतु त्यांची अन्य एखादया ठिकाणी आयुक्त म्हणुन जर नेमणुक झाली तर कुणी नगरसेवक त्यांच्याकडे जाणारच नाही. कारण की ते नेहमी होच म्हणतात प्रत्यक्षात काम मात्र करत नाहीत. यासाठी मा. महापौर महोदयास माझी विनंती आहे की, त्यांनी अशा अधिका—यांना लोकांची कामे करण्याबाबतीत आदेश दयावेत. आपण स्वत: पहावे कर विभागामध्ये किती गंभीर स्थिती आहे. मिळकतीवरील नाव हस्तांतरीत करुन घेण्यासाठी ते किती फे—या मारावयास लावतात. कधी सांगतात की अमुक हा कर्मचारी आला नाही, कधी म्हणतात की तमुक हा कर्मचारी आला नाही. एक ॲग्रीमेंट ज्यावर त्यांना फक्त सही करावयाची आहे, ज्याबाबतीत महासभेने ठराव पारीत केलेला आहे, त्या बाबतच्या ॲग्रीमेंटवर सही करण्यास त्यांनी तीन महिन्याचा कालावधी घेतला तर सर्व सामान्य जनतेचे काम काय होईल? यासाठी मी मा. महापौर महोदयांना विनंती करतो की, अशा अधिका—यास जनतेची कामे करण्याबाबतीत आदेश दया. जे लोक चांगली कामे करतात त्यांचे आम्ही अभिनंदन करतो. जर त्यांनी जनतेची कामे केली नाहीतर, चालते व्हा असे आम्ही पुढील महासभेमध्ये त्यांना सांगु. यासाठी आपणांस विनंती आहे की आपण त्यांना आदेश दया की, लोकांची त्यांनी कामे करावीत.

---

## अभिनंदन प्रस्ताव :—

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

उल्हासनगर महानगरपालिकेच्या विदयुत विभागाने वर्ष २००३—०४, २००४—०५ व २००५—०६ मध्ये केलेल्या यशस्वी उर्जा संवर्धनाबाबतचा सविस्तर प्रस्ताव महाउर्जाकडे सादर केलेला होता. त्या प्रस्तावाची पाहणी करुन महाउर्जा ने वर्ष २००६ सालाकरीता उर्जा व्यवस्थापन व संवर्धना अंतर्गत राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कारासाठी आपल्या महानगरपालिकेची निवड झाली आहे, असे महाउर्जेचे महाव्यवस्थापक यांनी दुरध्वनिद्वारे दिनांक १७/१२/२००७ रोजी कळविलेले आहे. या पुरस्काराचे वितरणाचा कार्यक्रम मा. उर्जामंत्री/मा. अपारंपारिक उर्जामंत्री यांचे हस्ते दिनांक २०/१२/२००७ रोजी पुणे येथे संपन्न होणार आहे. माहितीसाठी दिनांक २०/१२/२००७ रोजी होणा—या महासभेच्या पटलावर सादर.

महासभा ठराव क्र. ५७ क दिनांकः—२०/१२/२००७

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या विदयुत विभागाने उर्जा व्यवस्थापन व संवर्धना अंतर्गत सन २००६ मध्ये राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कार मिळविल्याबद्दल आयुक्त श्री. समीर उन्हाळे, विदयुत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मुकेश आयलानी व विदयुत विभागातील सर्व अधिका—यांचे व कर्मचा—यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

तसेच——

यापुर्वी म्हेडाच्या वतीन राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त करुन दिल्याबद्दल महासभा ठराव क्र. १८ दिनांक २०/५/२००५ अन्वये श्री. मुकेश आयलानी यांना दोन आगाऊ वेतनवाढी व त्यांचे विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना अगाऊ एक वेतनवाढ देण्याचा जो प्रस्ताव पारीत झाला आहे त्याची अदयाप अंमलबजावणी झाली नसल्याने ती त्वरीत करण्यांत यावी व त्यांना वेतनवाढीचा लाभ देण्याकामी प्रशासनास निर्देश देत आहे.

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिवः—एक लक्षवेधी सुचना आहे जीचे सुचक आहेत श्री. सुंदर बाबु मंगतानी व अनुमोदक आहेत श्री. दिलीपकुमार जग्यासी परंतु त्यांची सूचना घेतली जाणार नाही कारण ते सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे ही लक्षवेधी सूचना वगळण्यांत येईल.

तसेच दुसरे म्हणजे महाउर्जाने वर्ष २००६ साठी उर्जा व्यवस्थापन व संवर्धन अंतर्गत राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कार मिळविल्याची माहिती सादर करणेबाबतचा गोषवारा आला आहे तो फक्त माहितीसाठी आहे. याअगोदरच आपण याबाबत अभिनंदन प्रस्ताव सादर केला आहे. हे फक्त माहितीसाठी आहे.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. २ :— मागील सभेचे दिनांक २०/११/२००७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. महापौरजी, मागील महासभेत आरोग्य विभागाचे उपायुक्त श्री. दिपक सावंत यांना मी प्रश्न विचारला होता की, कुत्रांचे नसबंदी बाबत ठेकेदारास पेमेंट अदा करण्यात आले आहे किंवा नाही. त्यांनी मला उत्तर दिले ज्याची इतिवृत्तात सुध्दा नोंद आलेली आहे की त्यास पेमेंट अदा करण्यात आलेले नाही. परंतु मला अशी माहिती मिळाली आहे की, १३/८/२००७ रोजी ३ लाख १ हजार रुपयाचे संबंधीत ठेकेदारास पेमेंट अदा केले आहे. ६/११/२००७ रोजी त्यास ५ लाख ८४ हजाराचे पेमेंट अदा करण्यात आलेले आहे. पुन्हा ६/११/२००७ रोजी त्यास २ लाख ३९ हजाराचे पेमेंट अदा केले आहे. म्हणजेच नोव्हेंबर मध्ये त्यास पेमेंट अदा करण्यात आले आहे. व डॉ. दिपक सावंत सांगत आहेत की पेमेंट झालेले नाही. त्या ठेकेदारास एकुण ११ लाख २४ हजाराचे पेमेंट अदा करण्यात आलेले आहे. व आमचे उपायुक्त सांगतात की त्यास पेमेंट अदा केलेले नाही. याबाबतीत आपणांस काय सांगायचे आहे?

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—तर मग हे पेमेंट कुणाला देण्यात आले?

मा. सदस्य श्री. जे.के. ढोके यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>ॲनीमल वेलफेअर सोसायटीस्. महासभेमध्ये उप—आयुक्त दर्जाचा अधिकारी असे उत्तर देतो की, याबाबतचे पेमेंट अदा झालेले नाही. व लेखा विभागातुन मला माहिती मिळाली की त्यास ११ लाख २४ हजाराचे पेमेंट झाले आहे. तर याबाबतीत आपण काय कराल?

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>सावंत साहेब कुठे आहेत त्यांना बोलवा ना?

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>त्याचे एवढे पेमेंट झाले आहे तरी आपण म्हणता नाही झाले म्हणुन?

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>श्री. साधवानीजी इतिवृत्त कायम करण्याचा विषय वेगळा आहे परंतु आरोग्य विभागाच्या उपायुक्तांनी संपुर्ण सभागृहाला चुकीची माहिती दिली आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>संपुर्ण सभागृहाला त्यांनी चुकीची माहिती दिली आहे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:—</u>हा पैसा मग कुणाला दिला?

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>आरोग्य विभागाचे उपायुक्त सभागृहास चुकीची माहिती देतात त्याबद्ल त्यास काय शिक्षा करणार?

<u>श्री. अशोक बागेश्वर(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>ठेकेदाराचे जे पेमेंट झाले आहे ते आधीची जी बिले मंजुरी झाली होती त्यांचेच ते पेमेंट दिले गेले आहे. नविन जी बिले आहेत ती त्यांनी तयार केलेली नव्हती. त्यामुळे होवु शकते की त्यांचा गैरसमज झाला असेल.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>असे बोलुन आपण त्यांचा बचाव करत आहात. श्री. मोहन साधवानी यांनी जो प्रश्न विचारला होता तो बिल्कुल स्पष्ट होता. आता आपण उत्तर देत आहात की कदाचित त्यांनी असे केले असेल तसे केले असेल असे म्हणुन आपण त्यांचे संरक्षण करत आहात. ते स्वत: येथे उपस्थित नाहीत. ते उपस्थित असते तर आम्ही त्यांना विचारले असते.

<u>श्री. अशोक बागेश्वर(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>सन्माननिय महापौरजी, अगोदर जी बिले मंजुर झालेली होती त्यांचेच पेमेंट झालेले होते. उप आयुक्त श्री.सावंत साहेबांनी येथे जी माहिती दिलेली आहे ती माहिती चुकीची आहे असे मी मान्य करतो. व सभागृहाची माफी मागतो. त्याबद्दल आपण माफ करा. त्याचबरोबर त्यांनी सभागृहात जी चुकीची माहिती दिली त्याबद्दल माफी मागतो.

<u>महापालिका सचिव:—</u>इतिवृत्त कायम?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> मागील सभेचे दिनांक २०/११/२००७ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा. सदस्या श्रीमती संगिता कंडारे यांनी सभागृहात प्रवेश केला.

---

☑

**विषय क्र. २ :—**मागील दिनांक २०/११/२००७ रोजीच्या सर्वसाधारण इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. मोहन साधवानी
अनुमोदकाचे नाव : श्री. लाल पंजाबी

महासभा ठराव क्र. ५७ ड                                        दिनांक : –२०/१२/२००७

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक २०/११/२००७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते २६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

एकमताने

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:– महिला व बालकल्याण समितीतर्फे विविध प्रकारच्या योजना राबविणेस मंजुरी देणे.**

---

**सदस्य श्री. लाल पंजाबी :–**या प्रस्तावात काही सुधारणा करायच्या आहेत.

**सदस्य श्री. मोहन साधवानी:–**मा. महापौरजी...........

**सदस्य श्री. लाल पंजाबी:–** भलेही सभागृह नेता आपण सांगा.

**सदस्य श्री. मोहन साधवानी:–**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब,.....

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:–**मा. महापौरजी,.......

**सदस्य श्री. मोहन साधवानी:–** श्री. बी.बी. मोरेजी आपणांस बोलायचे आहे काय?

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :–**आमच्या लाडक्या आणि वयाने लहान असलेल्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती या वेळोवेळी चांगल्या प्रकारे प्रस्ताव मांडतात. त्यांनी आणलेल्या आजच्या सभा सूचनेवरील तिस–या क्रमांकाचा हा जो विषय आहे त्यास सभागृह मंजुरी देईल. परंतु मागे काही दिवसापुर्वी शहरातील गरीब नागरीकांना ब्लॅकेट वाटप करण्याचा जो एक ठराव पारीत करण्यात आला होता. त्यानुसार आम्ही प्रभागातील काही महिलांना सांगितले होते की दिवाळी मध्ये महापालिकेच्यावतीने तुम्हांला काही सप्रेम भेट मिळणार आहे. परंतु आजपर्यंत काहीही मिळालेले नाही. महिला व बालकल्याण समितीच्या सभापतींनी हे लक्षात घेवुन या कामीचा कार्यक्रम त्वरीत आयोजित करावा किंवा प्रत्येक नगरसेवकाकडे ब्लॅकेट वाटप करण्यासाठी दयावेत एवढेच मी सांगु इच्छितो, आणि आमच्या रिपब्लीकन पक्षातर्फे या प्रस्तावास काही विरोध नाही. तो पारीत करावा असे मी सभागृहास विनंती करतो.

मा. सदस्या श्रीमती पंचशिला पवार, श्रीमती जयश्री सुर्वे यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—**४ वॉटर फिल्टर, ४ ब्लॅकेट आणि ४ प्रेशर कुकर प्रत्येक प्रभागात वाटप करणार आहोत. त्यासाठी आपल्यातील ३६ नगरसेवकांनी अजुन फॉर्म भरुन दिलेले नाहीत. त्यामुळे उशिर झालेला आहे. कार्यक्रमासाठी मी दोन तारखा निश्चित केल्या होत्या. आज पुन्हा मी त्यांना शेवटची तारीख देते की, त्यांनी ३० तारखेपर्यंत फॉर्म भरुन दयावेत. ३ जानेवारी या दिवशी सावीत्रीबाई फुले यांची जयंती आहे त्यादिवशी आपण या साहित्याचे वाटप करु या.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:—**सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्यांना मी सांगु इच्छितो, श्रीमती सोनेजी सभापती आहेत. त्यांनी म्हटले की काही सदस्यांनी अदयाप फॉर्म भरुन दिलेले नाहीत. काही सदस्यांना असे वाटत असेल की, काय ब्लॅकेंट दयायचे? चार—पाचशे रुपयाचे ब्लॅकेट असेल. आमच्या श्री. ठाकुरसारखे, श्री. पंजाबीसारखे, श्री. राम चार्लीसारख्यांना असे वाटत असेल की काय एवढीशी वस्तु दयायची त्यापेक्षा न दिलेली बरे. आम्ही झोपडपट्टींमधुन निवडुन आलेलो आहोत, झोपडपट्टीच्या लोकांना चारपाचशेचे का होईना ब्लॅकेट दिले तर बरे होईल. आमच्या सभापती महोदया ते ब्लॅकेट काय उन्हाळयामध्ये देतील? आणि उन्हाळयामध्ये त्याचा काही फायदा होईल? आता थंडीच्या दिवसामध्ये जर ब्लॅकेट मिळाली तर त्यांना फायदा होईल.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—**३ जानेवारीला आपण हे साहित्य वाटपाचा कार्यक्रम करु या.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:—**३ जानेवारीला थंडी कमी होईल. आणि त्यानंतर त्या म्हणतील आता ब्लॅकेट वाटपाचा कार्यक्रम पुढच्या वर्षी ठेवा.

**सदस्य श्री. लाल पंजाबी :—**मा. महापौरजी, व सर्व नगरसेवक सहकारी मित्रहो, महिला व बालकल्याण समितीच्या ज्या सभापती आहेत त्यांचे व महिला व बालकल्याण समितीच्या सर्व सदस्यांचे मी अभिनंदन करु इच्छितो. या ज्या योजना आहेत त्या अतिशय चांगल्या आहेत व त्यांची जेव्हा अंमलबजावणी होईल तेव्हा आपणांस वाटेल की ज्या कार्यासाठी आपण निवडून येतो ते काम आता ख—या अर्थाने पुर्ण होत आहे. त्याच बरोबर माझी सूचना आहे की, गरीब, गरजु व विधवा महिलांना ज्या शिलाई मशिन देणार आहोत त्या प्रत्येक प्रभागात ५ ऐवजी १० शिलाई मशिन देण्यात याव्यात. त्याचबरोबर जे नामनिर्देशित सदस्य आहेत त्यांना सुध्दा १०—१० शिलाई मशिन वाटप करण्यासाठी दिल्या जात होत्या. यासाठी येथे प्रस्तावित केलेल्या ५—५ शिलाई मशिन ऐवजी १०—१० शिलाई मशिन दिल्या जाव्यात. त्याचबरोबर या विषयामध्ये ७ व्या क्रमांकावर जो विषय आहे की, दारिद्रय रेषेवरील (एपीएल) महिला व मुलींना बालवाडीचे प्रशिक्षण देणेबाबत त्यामध्ये ५० महिलांना प्रशिक्षण देण्याची तरतुद आहे. आपल्या महापालिकेमध्ये ७६ प्रभाग आहेत, मला असे वाटते की, प्रत्येक नगरसेवक आपापल्या प्रभागामधुन या कामी एक—एक महिलेचे नाव शिफारस करु शकेल. यासाठी ५० महिलांऐवजी ७६ महिलांना प्रशिक्षण दिले जावे त्यामुळे प्रत्येक नगरसेवकास या योजनेचा लाभ उठविता येईल. तर या दोन सूचना या प्रस्तावामध्ये देवु इच्छितो. कृपया त्यांचा समावेश करावा.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—**मा. महापौरजी, सन्माननिय आयुक्त व सचिव साहेब, आणखी एक सूचना देवु इच्छिते की, या विषयातील अनु.क्र. ३ वर जो विषय आहे विधवा महिलांचे पूर्नविवाह करिता अनुदान देणेबाबतचा जो विषय आहे त्यामध्ये एक अट टाकण्याचे आम्ही विसरुन गेलो आहोत. प्रत्येक प्रभाग समिती क्षेत्रामधुन ५—५ महिलांचे अर्ज घेतले जावेत. जेणेकरुन संपुर्ण शहरासाठी ही योजना लागु केल्यासारखे होईल नाहीतर एकाच प्रभाग समिती क्षेत्रातुन २० अर्ज आले तर शहराच्या एकाच विभागातील आम्ही काम करत आहोत असे होईल. यासाठी शहराच्या सर्व विभागातुन अर्ज आले पाहिजेत. त्याचबरोबर विवाह नोंदणी करणे बंधनकारक केले पाहिजे. तसेच १० हजार रुपये जे अनुदान देणार आहोत ते मुदतठेवीच्या स्वरुपात दिले जावेत. जेणे करुन त्या बचत करु शकतील. किंवा त्यांच्या व्यवसायामध्ये या पैश्याचा उपयोग करुन व्यवसाय वाढवु शकतील. त्याचबरोबर अनु.क्र. ५ वर जो विषय आहे, निराधार/अनाथ ( १ ते १० वर्षाच्या आतील) मुला/मुलींना दत्तक घेतलेल्या पालकांना अनुदान देणेबाबतचा त्यांना जं २००० रुपयांचे मानधन दिले जाते त्या ऐवजी अडीच हजार रुपये मानधन देण्याचे आम्ही प्रस्तावित केले आहे. कालच्या समन्वय समितीच्या बैठकीमध्ये असा एक प्रस्ताव आला की आपण हे जे २५०० रुपये अनुदान देतो ते दत्तक घेतलेल्या मुलाच्या नावे १८ वर्षापर्यंत मुदत ठेवीवर ठेवले जावे. याचबरोबर सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी ज्या दोन सूचना केल्या त्यांचा या प्रस्तावामध्ये समावेश केला जावा.

**<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–</u>**सन्माननिय महापौरजी................

**<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u>**श्री. दिलीप गायकवाडजी आपण नंतर बोला, कारण तुम्ही विरोधी पक्ष नेता आहात. मा. महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्यांना मी एक विनंती करतो की, महाराष्ट्र शासन शासकिय कर्मचा–यांना ५ वे वेतन आयोग किंवा ६ वे वेतन आयोग असे काही लाभ जाहिर करते. परंतु जोपर्यंत ते लाभ त्यांच्या पदरात पडत नाहीत तोपर्यंत ते शासनाशी भांडत राहतात. त्याप्रमाणे सन्माननिय सभापती महोदयांना माझी एक विनंती आहे, याठिकाणी काही नगरसेवक हे वरिष्ठ नगरसेवक असुन सुध्दा त्यांनी असे वाक्य वापरले आहे की, मी अशी एक सूचना देवु इच्छितो. आता सन्माननिय सदस्याला नव्हे तर मी सभापतींना सांगु इच्छितो की, या सभागृहामध्ये श्री. लाल पंजाबी, श्री. राम (चार्ली) पारवानी, श्री.बी.बी. मोरे हे सर्वात वरीष्ठ नगरसेवक आहेत या सदस्यांनी सभागृहात मी सूचना करतो असे म्हणता कामा नये. महिला व बालकल्याण समितीतर्फे मी अमुक अमुक हे मी देवु शकते. परंतु त्यांनी एक वाक्य वापरले की, मी एक सूचना करते, सूचना कुणाला करतात?

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–</u>** हरकतीचा मुद्दा, मी दिलगीरी व्यक्त करते. माझ्या कडुन जर काही चुक झाली असेल तर क्षमा करा. तुम्हांला माहिती आहे मी नॉन महाराष्ट्रीयन असून माझ्याकडुन मराठीत काही चुका होतात. त्याबद्दल मी क्षमा मागते.

**<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>**एखादया घरामध्ये वडील मुलांना सांगतात की, मी तुला हे आणेल, ते आणेल. आणि त्याने जर ते आणले नाही तर त्या घरामध्ये वादविवाद होतात. तसेच या महानगरपालिकेमध्ये सन्माननिय सदस्यांना तुम्ही जे काही दयायचे घोषित केले आहे ते जोपर्यंत देत नाहीत तोपर्यंत आम्ही असे म्हणत राहणार की, सभापती आम्हांला चॉकलेट देतात? तर असे चॉकलेट देण्याचे काम सभापती महोदया तुम्ही करु नका. आमच्या प्रभागातील लोकांच्या पदरात काहीतरी लवकर तुम्ही टाकावे अशी मी त्यांना विनंती करतो.

**<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–</u>**सन्माननिय महापौर आणि आयुक्त साहेब, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती यांनी याठिकाणी जो प्रस्ताव मांडला आहे, शहरातील गरीब, गरजु व विधवा महिलांसाठी अनेक योजना त्यांनी याठिकाणी मांडल्या आहेत. महिलांबद्दलची त्यांची कळकळ आणि काम करण्याची पध्दत आमचे सन्माननिय गटनेता श्री. धनंजय बोडारे साहेब जे आज या सभेत उपस्थित नाहीत त्यांनी व मी स्वत: जवळुन पाहिली आहे. गेल्या दोन महिन्यांपासुन त्या या विषयाचा पाठपुरावा करत आहेत. त्यामध्ये त्यांनी आम्हांला सुध्दा सहभागी करुन घेतले आहे. गरीब, गरजु व विधवा महिलांना शासनाकडुन जास्तीत जास्त अनुदान मिळविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यांना मराठी येत नसले तरी त्यांनी या प्रस्तांवासाठी बरेच प्रयत्न केलेत. आणि मराठी बोलण्यामध्ये जी चुक झाली त्याबद्दल त्यांनी दिलगीरीही व्यक्त केली त्याबद्दल मी श्री.बी.बी. मोरे यांना सांगु इच्छितो की, त्यांना मराठी येत नसली तरी त्यांनी मराठीत बोलण्याचा प्रयत्न करुन शहरातील गोर गरीब, विधवा व निराधार महिलांसाठी त्यांनी जी मेहनत केली या महिलांसाठी त्यांनी महिला नगरसेविकांबरोबर मला व आमचे गटनेते श्री. धनंजय बोडारे साहेबांना पुणे येथे घेवुन जावुन माहिती गोळा केली. त्यावेळेस शिवसेना भाजपाच्याच नगरसेविका नव्हत्या तर इतर पक्षांच्या नगरसेविकाही त्यांच्याबरोबर होत्या. पुणे येथे आम्ही यासाठी गेलो होतो की तेथे मोठ मोठे मॉल्स आहेत, त्याठिकाणी सुवर्ण जयंती योजनेमधुन निराधार महिलांसाठी, बचत गट महिलांसाठी काही योजना, मोठ–मोठे स्टॉलस् उभे केले आहेत. त्यातुन महिलांनी स्वंयरोजगार कसा करावा याचे प्रशिक्षणच नव्हे तर त्याठिकाणी ज्या महिला स्वंयरोजगार करतात त्यांना हजारो रुपयांचे उत्पन्न कसे मिळत आहे ही माहिती गोळा करण्यासाठी संपुर्ण दिवस पुण्यामध्ये तळ ठोकला. त्यासाठी त्यांचे मी याठिकाणी आवर्जुन अभिनंदन करतो. त्याचबरोबर चॉकलेट देवु नका असे सन्माननिय मोरे साहेबांनी जे सांगितले त्याबद्ल त्यांना मी सांगु इच्छितो, तुम्ही आमचे सन्माननिय आणि जेष्ठ नगरसेवक आहात त्यांना आमच्या सन्माननिय सभापती श्रीमती मिनाताई सोनेजी ३ तारखेला कॅडबरी खाऊ घालतील त्याची त्यांनी काळजी करु नये. परंतु काही सदस्यांनी अदयापपर्यंत फॉर्म भरुन दिलेले नाहीत. त्याबाबतीत त्यांनी आमच्याकडे सुध्दा तक्रारी केल्या आहेत. दोन दोन वेळेस कार्यक्रमाच्या तारखा निश्चित केल्या. त्यामध्ये झोपडपट्टयांमधील सुध्दा काही नगरसेवक आहेत, त्यामध्ये माझी सुध्दा गणना केली तरी चालेल, मी सुध्दा उशिरा फॉर्म भरला आहे, माझा सुध्दा झोपडपट्टीचा विभाग आहे. परंतु मी याठिकाणी मनापासुन सांगेन की महिलांसाठी त्यांनी जी तडप व्यक्त केली त्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो. आमचे सन्माननिय गटनेते श्री. बी.बी. मोरे साहेब, यांनी अगोदरच सांगितले की हा विषय पारीत करण्यासाठी आम्ही संमती देतो परंतु त्यांनी काही त्रुटी काढल्या आहेत, त्यामागचे कारण आपणच आहोत. त्यामध्ये श्रीमती मिनाताई सोनेजी यांची काही चुक नाही. त्याचबरोबर आमचे

सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी साहेब यांनी सांगितले की, ५ शिलाई मशिन ऐवजी १०–१० मशिन देण्यात याव्यात, त्यासही माझी संमती आहे. मी विरोधी पक्ष नेता जरी असलो, वादग्रस्त नाही. अशा चांगल्या विधायक कामाला मी सहमती देईल. आणि त्याच बरोबर आमचे सन्माननिय सदस्य यांनी वारंवार सभेत सांगितले आहे, आमची नेहमीच संमती राहिल म्हणुन. सर्व नगरसेवकांचे मानधन वाढविण्याची त्यांची मनापासुन इच्छा आहे. त्यास सुध्दा माझी संमती आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u>सन्माननिय महापौरजी, आपल्या विरोधी पक्ष नेत्याने म्हणजेच ज्याला आपण म्हणतो वादविवादातुन विरोधी पक्ष नेते झालेले आहेत. मला त्याच्याबद्दल काही म्हणायचे नाही. ते विरोधी पक्ष नेता आहेत. परंतु मी काय म्हणत होतो की आमच्या सन्माननिय सदस्यांनी, सभापतींनी पारीत झालेल्या ठरावांची अंमलबजावणी करावी. मी असे म्हणत नाही की त्या काम करत नाहीत. त्या चांगले काम करत आहेत. मुर्ती लहान जरी असली तरी किर्ती महान आहे. हे मी सभागृहाला आवर्जुन सांगत आहे. परंतु त्यांनी अंमलबजावणी करावी. आणि लवकरात लवकर आम्हां नगरसेवकांच्या पदरात ते लाभ टाकावेत. नाहीतर आज आमचे आयुक्त साहेब नाहीत. तेही सांगतात की काही करोडोने एमएमआरडीए कडुन पैसे येणार आहेत. हा रोड बनवणार आहे. तो रोड बनवणार आहे. परंतु अजुन कुठल्याही कामाची कार्यवाही सुरु झालेली नाही. म्हणुन आम्हांला असे वाटते की कार्यवाही कधी होणार?

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–</u> हरकतीच्या मुद्दयांवर बोलतो श्री. मोरे साहेब, एमएमआरडीएच्या माध्यमातुन सार्वजनिक शौचालयाचे काम आज सुरु झाले आहे. कदाचित तुम्हांला माहित नसेल.

<u>सदस्य श्री. बी.बी.मोरे:–</u>पाहिजे तर तुम्ही नंतर बोला. मला काय म्हणायचे आहे आम्ही विरोध करत नाही. जे सभापती काम करतात त्यांना आम्ही प्रोत्साहन देतो. आणि आरपीआयचे या सभापतींना प्रोत्साहन आहेच. परंतु एक लक्षात घ्या. आम्हांला विचारणारे प्रभागात काही कार्यकर्ते आहेत. प्रभागातील जनता आहे. ते म्हणतात की केव्हा पासुन तुम्ही फॉर्म भरुन घेवुन गेलात, फोटो घेवुन गेलात कुठे काय आहे? तुमच्या महापालिकेतर्फे देतात की नाही देतात? हे सांगण्याचे कारण एवढेच आहे की, मागच्या कार्यकालावधीपासुन सायकली येवुन पडल्या आहेत. मला तरी असे वाटते की तेथिल सायकली गहाळ झाल्या आहेत, काही कुजल्या आहेत हे ही मला अजुन माहित नाही. म्हणुन मला एक सांगायचे आहे की तुम्ही वाईट वाटुन घेवु नका. कारण ही कामे जर झाली तर त्या सभापतींचे नाव होईल. जसे आता श्री. मुकेश आयलानी यांनी चांगले काम केल्याबद्दल शासनाने त्यांचा गौरव केला. आपणही गौरव करत आहोत. म्हणजेच अशा पध्दतीने कार्यवाही होणे महत्वाचे आहे. एवढेच मी सांगु इच्छितो आणि आम्ही आरपीआयचे सर्व नगरसेवक या प्रस्तावाशी सहमत आहोत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>सचिव साहेब, या प्रस्तावावर बरीच चर्चा झाली आहे हा प्रस्ताव पारीत केला जावा.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी हा जो प्रस्ताव या सभेपुढे आणला आहे आणि त्यामध्ये जी दुरुस्ती सुचविलेली आहे ती दुरुस्ती करुन हा प्रस्ताव सर्व संमतीने पारीत केला जावा.

<u>महापालिका सचिव :–</u>सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी प्रस्तावात सुधारणा करण्याची जी सूचना दिलेली आहे तिला सर्व सदस्यांची अनुमती आहे. त्यामुळे हा प्रस्ताव सर्व संमतीने पारीत करण्यास मला वाटते कुणाची काही हरकत दिसत नाही. हा प्रस्ताव सर्व संमतीने पास?

एक हरकतीचा मुद्दा श्रीमती मंजु पोपटानी यांच्या कडुन आला आहे तो असा आहे की त्यांच्या प्रभागात कामे होत नाहीत. परंतु सभागृहात काम करत असतांना जर चुकीचे काम झाले, दिशाबदल झाली तर त्यावर हरकतीचा मुद्दा मांडता येईल. जर प्रभागातील कामाविषयी यांना प्रश्न विचारायचा असेल तर प्रश्नाच्या स्वरुपात त्यांनी सभेत मांडावा.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :—** महिला व बालकल्याण समितीतर्फे विविध प्रकारच्या योजना राबविणेस मंजुरी देणे.

प्रस्तावना

राज्य शासनाचे मार्गदर्शक तत्वानुसार महिला व बालकल्याणाच्या विविध योजना राबविण्यात येतात. सदरच्या योजना उल्हासनगर महापालिकेच्या महिला व बालकल्याण समिती मार्फत खालील योजना राबविण्यात येणार आहे.

विषय क्र. १:— दारिद्रय रेषेखालील गरीब, गरजु, विधवा महिलांना शिवणयंत्र वाटप

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती मार्फत उल्हासनगर शहरातील दारिद्रय रेषेखालील उत्पन्न असणा—या गरीब, गरजु, विधवा महिलांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविणेकरीता महापालिकेच्या ७६ महापालिका सदस्यांना प्रत्येकी ५ नग प्रमाणे एकुण ३८० शिवणयंत्राचे वाटप करण्यासाठी अंदाजे रुपये आठ लाख खर्च अपेक्षित असुन सदरच्या प्रस्तावास महिला व बालकल्याण समितीच्या दिनांक २५/९/२००७ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १ अन्वये मंजुरी देण्यात आली असुन मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिली आहे. सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

विषय क्र. २ :— दारिद्रय रेषेवरील (एपीएल) महिलांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देणे बाबत.

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीमार्फत उल्हासनगर शहरातील दारिद्रय रेषेवरील (एपीएल) महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन त्यांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीने मेणबत्ती, अगरबत्ती, रांगोळी, पेंटीग, ज्वेलरी बनविणे इत्यादी विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येणार असुन महापालिकेच्या १ ते ४ प्रभाग समिती कार्यालयात घेण्यात येणा—या प्रशिक्षणास प्रत्येकी रुपये एक लाख प्रमाणे एकुण चार लाखाचा खर्च अपेक्षित आहे. सदरच्या प्रस्तावास महिला व बालकल्याण समितीच्या दिनांक २५/९/२००७ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. २ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

विषय क्र. ३ :— विधवा महिलांचे पूर्नविवाह करिता अनुदान देणेबाबत.

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीमार्फत उल्हासनगर शहरातील विधवा महिलांना समाजात मानाचे स्थान मिळवून दणे, त्यांची भावी जिवनाला आधार मिळवून देण्यासाठी शहरातील ३५ वर्षाखालील २० महिलांना पुर्नविवाह करणेसाठी प्रत्येकी रुपये दहा हजार रोख याप्रमाणे एकुण दोन लाख रुपयाचे अनुदान वाटप करण्यात येणार आहे. सदरच्या प्रस्तावास महिला व बालकल्याण समितीच्या दिनांक १२/१०/२००७ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ४ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

विषय क्र. ४:— बालकामगार प्रथा निर्मुलन जनजागृती सप्ताह साजरा करणे बाबत.

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती मार्फत उल्हासनगर शहरात अनेक बालकामगार कार्यरत असुन अश्या बालकामगारांचे शोषण रोखणे, त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देवून त्यांचे भविष्य उज्वल करण्याच्या दृष्टिने बालकामगार प्रथा निर्मुलन करणे आवश्यक बनले असल्याने उल्हासनगर महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीमार्फत बालकामगार प्रथा निर्मुलन जनजागृती सप्ताह साजरा करण्याचे ठरविले आहे. सदरच्या प्रस्तावास महिला व बालकल्याण समितीच्या दिनांक १/११/२००७ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ६ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. सदर सप्ताह साजरा करणेसाठी रुपये पन्नास हजार खर्च अपेक्षित असुन, सदर खर्चात बॅनर्स बनविणे, टी शर्ट वाटप करणे, अल्पोपहार वाटप करणे तसेच अन्य साहित्य खरेदी करण्यात येणार आहे.

विषय क्र. ५ :— निराधार/अनाथ ( १ ते १० वर्षाच्या आतील) मुला/मुलींना दत्तक घेतलेल्या पालकांना अनुदान देणेबाबत.

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती मार्फत उल्हासनगर शहरातील निराधार/ अनाथ ( १ ते १० वर्षाच्या आतील) मुला/मुलींना मा. न्यायालयामार्फत दत्तक घेतलेल्या २० पालकांना रुपये २५००/— प्रमाणे मुदत ठेवीच्या स्वरुपात प्रोत्साहानात्मक अनुदान देण्यात येणार आहे. यामुळे मुला/मुलींना दत्तक घेण्याचे प्रमाण वाढणेस मदत मिळेल. सदरचे अनुदान वाटप करणेसाठी एकुण पन्नास हजाराचा खर्च अपेक्षित असुन सदरच्या प्रस्तावास महिला व बालकल्याण समितीच्या दिनांक १/११/२००७ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ५ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

विषय क्र. ६ :—उल्हासनगर शहरातील बालसुधार गृहांना इनव्हर्टर देणेबाबत.

सद्यस्थितीत उल्हासनगर शहरात महाराष्ट्र राल्य विद्युत महावितरण कंपनी मार्फत करण्यात येणारा पुरवठा वारंवार दिर्घ काल खंडित करण्यात येत असल्याने बालसुधार गृहात राहणा—या मुला/मुलींना गैरसोय होत असल्याने उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती मार्फत उल्हासनगर शहरातील अनाथ/अपंग मुला/मुलींच्या ०३ बालसुधारगृहांना इनव्हर्टर देण्याचे ठरविले आहे. याकामी रुपये पन्नास हजार खर्च आहे.

विषय क्र. ७ :— दारिद्रय रेषेवरील (एपीएल) महिला व मुलींना बालवाडीचे प्रशिक्षण देणेबाबत.

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती मार्फत उल्हासनगर शहरातील दारिद्रय रेषेवरील (एपीएल) महिला व मुलींना स्वंयरोजगारीची संधी उपलब्ध करुन देवुन स्वावलंबी बनविण्याकरीता ५० महिला व मुंलींना बालवाडीचे प्रशिक्षण देण्याचे योजिले आहे. सदर प्रशिक्षणासाठी खर्च प्रती प्रशिक्षणार्थी रुपये २२००/— असुन रुपये १२००/— प्रशिक्षणार्थींनी खर्च करावयाचे असुन उर्वरीत प्रशिक्षणाची फी रुपये १०००/— प्रमाणे एकुण पन्नास हजार उल्हासनगर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समिती मार्फत करण्यात येवुन ५० महिला व मुलींना प्रशिक्षणाचा लाभ देण्यात येणार आहे.

वरील सर्व योजना उल्हासनगर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सन २००७—०८ चे महापालिका अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष Part I –C-4 (ii) मधुन खर्च करण्यात येणार आहे.

सदर बाब धोरणात्मक निर्णय घेण्यासंदर्भात मा. महासभेपुढे सविनय सादर.

महासभा ठराव क्र: ५८ दिनांक : —२०/१२/२००७

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिनाताई सोनेजी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या महिला व बालकल्याणाच्या ७ विविध योजना राबविण्यास मान्यता देत आहे.

तसेच——

१. उल्हासनगर शहरातील दारिद्रय रेषेखालील उत्पन्न असलेल्या गरीब, गरजू व विधवा महिलांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविणे करीता महापालिकेच्या नवनिर्वाचीत व नामनिर्देशित महापालिका सदस्यांचे शिफारशीने प्रत्येक प्रभागात १० नग शिवणयंत्राचे वाटप करण्यांत येईल.

२. उल्हासनगर शहरातील विधवा महिलांना समाजात मानाचे स्थान मिळवुन देणे त्यांचे भावी जिवनाला आधार मिळवून देण्यासाठी शहरातील ३५ वर्षी खालील प्रत्येक प्रभाग समिती क्षेत्रातील —५ महिलांना पुनर्विवाह करणेसाठी रुपये १०,०००/— अंशदान वाटप करण्यात येईल.

३. उल्हासनगर शहरातील निराधार मुला—मुलींनी दत्तक घेतलेल्या २० पालकांना प्रत्येकी रुपये २५००/— (१८ वर्षापर्यंत मुदत ठेवीच्या स्वरुपात) प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यांत येईल.

४. उल्हासनगर शहरातील दारिद्र रेषेवरील महिला व मुलींना स्वंयरोजगाराची संधी उपलब्ध करुन स्वावलंबी बनविण्याकरीता प्रत्येक प्रभाग एक याप्रमाणे ७६ महिला /मुलींना बालवाडीचे प्रशिक्षणाचा लाभ देण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. रविंद्र बागुल यांनी सभागृहात प्रवेश केला.

---

**विषय क्र. ४ :— दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी मान्य करणे.**

---

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीस मान्यत देण्याबाबतचा हा जो विषय आहे एकतर याबाबतची आपणाकडे यादी नाही. ब—याचशा नगरसेवकांना हे माहित नाही की त्यांच्या प्रभागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे या यादीमध्ये नाव आहे किंवा नाही? यासाठी हा विषय एक महिन्यासाठी पुढे ढकलुन तो पुढील महासभेत जरुर आणला जावा. सर्व सदस्यांस अशी विनंती आहे की त्यांच्या प्रभागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे फॉर्म भरुन त्यांची नावे या यादीमध्ये समाविष्ट केली जावीत.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे सर्व्हेक्षण केल्यानंतर तयार केलेली जी यादी आहे ती यादी असलेली सीडी प्रत्येक नगरसेवकास दिली जावी. तसेच दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे सर्व्हे करतांना संबंधीत प्रभागातील नगरसेवकास बरोबर घेवुन सर्व्हे केला जावा तसेच संबंधीत नगरसेवकाशी विचार विनिमय करुन सर्व्हे केला जावा. आमच्या प्रभागामध्ये सर्व्हे केला आहे किंवा नाही हे आम्हांला माहित नाही. व दुसरी गोष्ट मी आयुक्तांना सांगु इच्छितो की, दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या सर्व्हेक्षणाच्या यादीवर विचार विनिमय करण्यासाठी मा. महापौरांनी त्यांच्या दालनात बैठक बोलावली होती. त्या बैठकीस एकही अधिकारी उपस्थित राहिला नाही. त्याबाबतीत आपण आज येथे उत्तर दया की त्या बैठकीस अधिकारी का आले नव्हते?

<u>श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी) :—</u>मा. महापौर महोदयांनी बोलावलेल्या बैठकीस उपस्थित राहणे सर्वांवर बंधनकारक आहे. आपण ज्या सभे बाबत बोलत आहात त्या सभेत जर अधिकारी उपस्थित राहीले नसतील तर त्याबाबतीत मी दिलगीरी व्यक्त करतो. त्याचबरोबर सर्वांना असे निर्देशही देतो की यापुढे सर्वांनी बैठकीस हजर राहण्याची खबरदारी घ्यावी. आणि त्याप्रमाणे खबरदारी घेतली जाईल.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>हा तर आमच्या मा. महापौरांचा सारासर अपमान आहे. मा. महापौरांनी आपल्या दालनामध्ये बैठक बोलावली आणि त्या बैठकीत एकही अधिकारी उपस्थित राहिला नाही. यासाठी फक्त दिलगीरी व्यक्त करुन चालणार नाही तर त्या अधिका—यांवर कारणे दाखवा नोटिस बजावली पाहिजे.

<u>श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी) :—</u>तशा सुचना मी दिलेल्या आहेत. कारणे दाखवा नोटिसा बजावल्या जातील.

सदस्य श्री. विनोद ठाकुरः—हा काय आमचा वैयक्तीक लाभाचा विषय नाही. संपुर्ण शहरासंबंधीत विषय आहे.

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी) :—महापौर महोदया, तशा कारणे दाखवा नोटिसा बजावल्या जातील.

सदस्य श्री. गणपत एडके:—मा. महापौर महोदया, या विषयाबद्दल मला असे विचारायचे आहे की, दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे सर्व्हेक्षण २००५ साली झाले आहे. आज २००७ हे वर्ष आहे. दारिद्रय रेषेचा दाखला मिळविण्यासाठी गरीब, विधवा महिलांना ज्या अडचणी येतात, अडचणी येत असतांना आपण हा विषय आणखी एक महिना पुढे ढकलत आहोत मग या लोकांना दाखले कधी भेटणार? संजय गांधी निराधार योजना कार्यालयामध्ये गरीब, विधवा महिला फे—या मारतात त्यांना सांगितले जाते की महापालिकेमधुन दारिद्रय रेषेचा दाखला आणा. दाखला नसल्यामुळे त्यांना जे अनुदान मिळायचे असते ते मिळत नाही. इतर काही सुविधा मिळत नाही. वेळ निघुन जाते. तीन वर्षाच्या कालावधीच्या आत किंवा शासनाने ठरवुन दिलेल्या कालावधीच्या आत हे अनुदान दिले जाते. हा विषय आणखी एक महिना पुढे गेला तर सर्व्हे करण्यासाठी आणखी किती दिवस लागतील? वेळोवेळी सर्व्हे केलेला आहे. पुन्हा पुन्हा सर्व्हे केल्याने जनतेला या सर्व्हेचे काही महत्व वाटणार नाही. नेहमी नेहमी हा काय सर्व्हे चालु आहे? ज्या कुटुंबांचा सर्व्हे झालेला आहे त्यांना दाखले वितरीत करण्यात यावेत. व बाकीचे जे राहिलेले आहेत त्यांनाही दयावेत. कारण ब—याचशा लोकांची कामे संजय गांधी निराधार योजनेमध्ये प्रलंबित आहेत.

मा. सदस्य श्री. महेश सुखरामानी, श्री. मोहन रामरख्यानी, श्री. गोविंदराम लुंड, श्री. राजु इदनानी, श्री. प्रशांत धांडे हे सभागृहातुन बाहेर गेले.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजीः—सन्माननिय महापौरजी, सन्माननिय आयुक्तजी, दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा सर्व्हेक्षणाचा हा जो विषय आहे तो आपण विषद करावा. कारण रेशन कार्डयामध्ये ज्यांचे उत्पन्न १२,००० च्या खाली आहे ते आहे की, नविन सर्व्हेक्षणानुसार तो कोणाला लागु होत आहे? याबाबत मी आयुक्त साहेबांना विनंती करते की, याबाबत जरा खुलासा करावा.

सदस्य श्री.बी.बी. मोरेः—सन्माननिय महापौरजी, आता जो दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचा जो विषय आलेला आहे, यावर मी म्हणणार होतो, प्रकल्प अधिकारी कु. गोपाळे मॅडमना बोलवा, त्या या सभागृहात आलेल्या आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेत दारिद्रय रेषेखालील किती कुंटुंबे आहेत? याचा सर्व्हे चांगल्या पध्दतीने झाला पाहिजे. हा सर्व्हे बरोबर झालेला नाही आहे. याबाबत प्रकल्प अधिकारी कु. गोपाळे मॅडमना ब—याच वेळा विचारलेले आहे की या सर्व्हेबाबत नक्की काय झाले आहे? या दारिद्रय रेषेखाली किती कुटुंबे येतात व किती झोपडपट्टयांचे सर्व्हेक्षण झालेले आहे? याबाबत सभागृहाला माहित झाले पाहिजे. मला असे म्हणायचे आहे की जर सर्व्हे करायचा राहिला असेल तर त्याला एक किंवा दोन महिन्याची मुदत दयावी. सन २००८ मध्ये याबाबत सर्व्हेक्षण झाल्यानंतर प्रकल्प अधिकारी कु. गोपाळे यांनी या सभागृहात जाहिर केले पाहिजे की, मी काम करत असतांना या उल्हासनगर शहराचा सर्व्हे या पध्दतीने केलेला आहे. सर्व्हे करत असतांना एवढी एवढी कुटुंबे दारिद्रय रेषेखाली येतात. कारण ब—याच नगरसेवकांना हे माहित नाही की, कुटुंब दारिद्रय रेषेखाली येण्यासाठी त्याचे उत्पन्न किती असते? प्रकल्प अधिकारी कु. गोपाळे मॅडमने कुणाला तरी सोबत घेवुन एक दोन महिन्यात याचे सर्व्हेक्षण करावे व जाहिर करावे. एवढेच मी सांगु इच्छितो.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकरः—दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे नव्याने सर्व्हेक्षण झाले आहे काय? कारण ही जी यादी आहे ती गेल्या १० वर्षापासुन प्रलंबित पडलेली आहे. यासाठी नविन सर्व्हेक्षणाचे काम चालु आहे काय? आणि चालु असेल तर ते रितसर आहे काय? घरोघरी जावुन सर्व्हे केला आहे काय? याची मला माहिती दयाल काय? कारण ही जी यादी आहे ही शेवटची व अंतिम यादी आहे तिला प्रशासनाकडुन अंतिम स्वरुप दिल्यानंतर मग ती सर्वांकडे जाईल. असे नको व्हायला की जुनी यादी सर्वांकडे जाईल आणि नविन यादीसाठी पुन्हा तिन वर्ष वाट पहावे लागेल. यासाठी याबाबतीत जरा खुलासा करावा.

कु. दिपमाला गोपाळे (प्रकल्प अधिकारी, सु.ज.श.रो.यो):—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आणि सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य, शासनाच्या नियमानुसार हा जो सर्व्हे झालेला आहे, तो २००५ मध्ये

झालेला आहे. त्यावेळेस घरोघरी जावुन सर्व्हे केलेला होता. लोकांनी जी काही माहिती सांगितली ती आपण नोंद करुन घेतली आहे.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:–</u> १० वर्षापुर्वीची ही यादी आहे. १० वर्षानंतर जी कुटुंबे दारिद्रय रेषेखाली येतात, कुणी अपघातामध्ये निधन पावले असेल कुणी गरीब असेल, कुणी असे गरजु असतील तर त्यांचा तुम्ही सर्व्हे केला आहे काय? जी यादी तुमच्याकडे तयार आहे तीच तुम्ही शासनाकडे दयाल काय? नविन सर्व्हेसाठी तुम्ही काही तरतुद केली आहे काय?

<u>कु. दिपमाला गोपाळे (प्रकल्प अधिकारी, सु.ज.श.रो.यो):–</u>सुरवातीला ही योजना १९९७ साली सुरु झाली.

<u>श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>सन्माननियम महापौरजी,..........

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>आयुक्त साहेब, एक सेकंद आम्हा सर्वांचा मुळ मुद्दा असा आहे की, ज्या बाबत श्री. विनोद ठाकुर व इतर सदस्यांनी सांगितले. येथे विषय असा आहे की, दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी मान्य करणे. आमच्याकडे, कुणाही नगरसेवकाकडे दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी नाही.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:–</u>मलाही तेच म्हणायचे आहे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>तर आम्ही कशास मान्यता दयायची? यासाठी माझी अशी सूचना आहे की, जर यादी मोठी असेल तर मागील वेळेस कर विभागाचा जेव्हा प्रश्न महासभेत उत्तरासाठी दाखल करण्यात आला होता, तर त्यावेळेस उत्तरादाखल दयावयाची यादी सीडीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आली होती. समजा, २० हजार कुटुंबांच्या नावांचीयादी असेल तर कमीत कमी त्या नावांच्या यादीची सीडी देण्यात यावी. त्यासाठी फार मोठा काही खर्च नाही. ती सीडी सर्व नगरसेवकांना दिली जावी.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–</u>प्रभाग निहाय........

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>आता जे नगरसेवक येथे बसलेले आहेत त्यातील बरेचशे नगरसेवक २००५ मध्ये नगरसेवक नव्हते. यावेळेस बरेचसे नगरसेवक नव्याने निवडुन आले आहेत. यासाठी आम्हांला असे वाटते की, जे नविन नगरसेवक निवडुन आले आहेत त्यांच्या प्रभागातील काही कुटुंबांची नावे दारिद्रय रेषेखालील यादीत आली नसतील तर ती नावे समाविष्ट करण्यासाठी वेळ देवुन ती नावे समाविष्ट करण्याची संधी दिली जावी. तोपर्यंत हा विषय पुढे ढकलला जावा. हा विषय जास्त काळ प्रलंबित न ठेवता एक महिन्याच्या आत यादी तयार करुन आम्हांला दिली जावी. आम्ही सर्वजण या यादीस मंजुरी देणारच आहोत. आम्हांलाही वाटते की समाजाला याचा फायदा मिळावा. परंतु मी सुचविलेल्या दोन सुचनांबाबतीत जोपर्यंत कार्यवाही होत नाही तोपर्यंत हा विषय पुढे ढकलला जावा व एक महिन्यानंतर तो विषय पुन्हा महासभेपुढे आणला जावा.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, संबंधीत नगरसेवकांशी संपर्क साधून विचारविनिमय करुन सर्व्हे केला जावा.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:–</u>घरोघरी जावुन याची चौकशी करा. कारण की आता काही महापालिकांमध्ये यादया रिजेक्ट झालेल्या आहेत. आपण यादी पाठवायचो आणि लोकांची फसगत व्हायची. एखाद दुस–या नावामुळे त्यांचेही नुकसान व्हायचे. असे होवु नये म्हणुन दारिद्रय रेषेखालील जे आहेत त्यांनाच लाभ मिळावा आणि प्रशासनाचे ते कर्तव्य आहे. प्रशासनाने घरोघरी कर्मचारी पाठवुन सर्व्हे केला पाहिजे. टेबलवर सर्व्हे कागदावरच येईल आणि तसेच तुम्ही पाठवुन दयाल. असे व्हायला नको. कारण असे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत झालेले आहे म्हणुन मी बोलत आहे. आपण त्या लोकांची फसवणुक केल्यासारखे होईल.

<u>कु. दिपमाला गोपाळे (प्रकल्प अधिकारी, सु.ज.श.रो.यो):–</u>आपण आक्षेप घेण्यासाठी वेळ ठेवलेली होती. ज्या कुणाला आक्षेप घ्यायचा होता त्याने त्या विहित वेळेत आक्षेप घ्यावयास पाहिजे होता.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:—मी तुमच्या फायदयासाठी सांगते आहे. आपण ठरविले आहे की दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना विविध योजनांचा फायदा देवु या त्यासाठी ही यादी प्रशासनाकडे पाठवु या. त्यामुळे अर्ध्याच लोकांना फायदा झाला व अर्ध्या लोकांना फायदा झाला नाही तर खोटी माहिती दिली म्हणुन यादीच रद्द झाली तर काहीच फायदा होणार नाही. त्यामुळे जे अर्धे गरजु लोक आहेत त्यांनाही त्याचा फायदा मिळणार नाही. यासाठी घरोघरी जावुन सर्व्हे केला जावा. जे लोक दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळविण्यास पात्र असतील त्यांना लाभार्थी करा. जास्त मुदत घ्या परंतु योग्य ती यादी पाठवा.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—प्रत्येक घरोघरी जावुन सर्व्हे केला पाहिजे. जर शिधावाटप कार्डावरुन सर्व्हे केला जात असेल तर जी महिला विधवा झाली आहे तिच्या शिधावाटप पत्रिकेत जर उत्पन्न जास्त लिहिले असेल आणि तिच्या घरामध्ये कमावती व्यक्ती नसेल तर हा मुद्दा लक्षात घेवुन सर्व्हे केला जावा व सर्व्हेक्षणाच्या यादीची प्रभागनिहाय सीडी सर्व नगरसेवकांना दिली जावी. आपण आम्हांला या १०—१५ दिवसात सीडी उपलब्ध करुन दिलीत तर तीची पडताळणी करुन आम्ही आपणांस नविन यादी तयार करुन देवु शकु. सर्व्हेच्या कामामध्ये आम्ही आपणांस मदत करु शकु.

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सन्माननियम महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी आता येथे जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबतीत श्री. लाल पंजाबी व श्री. विनोद ठाकुर यांनी सुध्दा आपले विचार मांडले आहेत त्याचबरोबर श्री. बी.बी. मोरे व श्रीमती मिनाताई सोनेजी यांनीही आपले विचार मांडले आहेत. त्यानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे सर्व्हेक्षण करुन तयार केलेली यादी असलेली सीडी सर्व सदस्यांना प्रस्तृत केली जाईल. त्याचबरोबर त्या सर्व्हेक्षणाविषयी दरडोई उत्पन्नाबाबतचे जे निकष आहेत त्यांची यादी सुध्दा दिली जाईल. व त्यानंतर सभागृहाचा जो निर्णय होईल मग तो एक महिन्यानंतर किंवा आपण जसा निर्णय घ्याल त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

सदस्य श्री. रविंद्र बागुल:—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब व सचिव साहेब, हा प्रश्न मी विचारला होता. राज्य व केंद्र शासन पुरस्कृत सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत गोल मैदान येथे दरवर्षी प्रदर्शन आयोजित केले जाते. परंतु यावर्षी आता जो दिवाळीचा सण येवुन गेला त्या सणानिमित्त प्रदर्शन भरावयास पाहिजे होते परंतु ते भरले नाही. प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष का केले? बचत गटातील महिला वेगवेगळे स्टॉल गोल मैदान येथे लावु इच्छित होत्या त्यासाठी आम्ही गोलमैदानची मागणी केली होती मग याकामी गोल मैदान का देण्यात आले नाही? नाताळच्या सणामध्ये सुध्दा आम्ही यासाठी परवानगी मागितली होती. ती का देण्यात आली नाही? मी माझ्या लेटरपॅडवर पत्र दिले होते की दरवर्षी गोल मैदान येथे विविध प्रदर्शने आयोजित केली जातात. त्यासाठी बचत गटातील महिलांना विविध प्रकारचे स्टॉल लावण्यासाठी परवानगी दिली जावी. त्यानुसार यावर्षी ती परवानगी का देण्यात आली नाही?

सदस्य श्री. मोहन साधवानी :—हा विषय पुढे ढकलण्यात यावा व सभेचे कामकाज स्थगित केले जावे. व दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे सर्व्हेक्षण करुन यादी असलेली सीडी १५ दिवसाच्या आत सर्व सदस्यांना प्रस्तृत केली जावी. ज्या नगरसेवकाच्या प्रभागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची नावे या यादीत नसतील ती नावे समाविष्ट केली जावीत व त्यानंतर हा विषय महासभेत आणला जावा.

महापालिका सचिव:—आपण हा विषय पुढे ढकलु इच्छित आहात की याबाबत निर्देश देवु इच्छित आहात?

सदस्य श्री. लाल पंजाबी :—दुरुस्तीसह पुढे ढकलण्यात यावा.

महापालिका सचिव :—जर आपण काही निर्देश देवु इच्छित असाल तर निर्देश देवुन हा विषय निर्णयीत काढा. आणि जर पुढे ढकलु इच्छित असाल तर हा विषय सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यात यावा.

सदस्य श्री. विनोद ठाकुर:—आम्ही काही निर्देश देवु इच्छित आहोत.

महापालिका सचिव :—कृपया आपण हा विषय पुढे ढकलु नका.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—दुरुस्तीसह निर्देश दिले जावेत.

महापालिका सचिव :—ज्या सूचना दिल्या आहेत त्या सूचनांसह हा विषय पास?

**<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>**हा विषय पुढे ढकलला जावा व यादीत आलेली नावे पाहुन आम्ही तिला अंतिमत: मंजुरी देवु.

**<u>महापालिका सचिव:—</u>**जर आपण हा विषय पुढे ढकलु इच्छित असाल तर तो कार्यसूचीवरुन वगळण्यात येईल. आपले म्हणणे आहे की ज्यांनी याबाबतचे सर्व्हेक्षण केलेले आहे त्यामध्ये ब—याचशा चुका आहेत त्यांमध्ये दुरुस्ती करुन नविन यादी तयार केली जावी. तर याप्रमाणे नविन यादी तयार करण्याकामी निर्देश देण्यात येतील.

**<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>**बरोबर, बरोबर सर्वांच्या भावना त्याच आहेत.

**<u>महापालिका सचिव :—</u>**यासाठी आपण एक महिन्याची मुदत देत आहात, या मुदतीत सर्व्हे करुन यादी मंजुरीसाठी सादर केली जावी. असेच ना?

**<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>** होय, होय....

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:—</u>**महापौर महोदया, दोन मिनिटं मी जो प्रश्न विचारला त्याचे उत्तर मिळाले नाही.

**<u>महापालिका सचिव :—</u>**मा. महापौरांचे म्हणणे आहे की, यावेळेस हा विषय नाही आहे. कृपया आपण रितसर प्रश्न विचारा.

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:—</u>**महापौरांचे काय म्हणणे आहे?

**<u>महापालिका सचिव :—</u>**मा. महापौरांचे म्हणणे आहे की, यावेळेस हा विषय नाही आहे.

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>**मी हा प्रश्न विचारलेला आहे.

**<u>महापालिका सचिव :—</u>**प्रश्न विचारला असेल तर प्रश्नोत्तराचा कालावधी समाप्त झालेला आहे. यासाठी आपण आता हा प्रश्न विचारु शकत नाहीत.

**<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>**जेव्हा एखादया सदस्याचा महासभेपुढे उत्तरासाठी प्रश्न असतो तेव्हा त्याने महासभेत उपस्थित राहिले पाहिजे. आणि जर तो उपस्थित नसेल तर तो प्रश्न चर्चेस न येता पुढील प्रश्न पुकारला जातो.

**<u>महापालिका सचिव :—</u>**जेव्हा आपला प्रश्न उत्तरासाठी पुकारण्यात आला होता तेव्हा आपण सभागृहात उपस्थित नव्हता. त्यामुळे सर्व प्रश्न वगळण्यांत आले.

**<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u>**होय, पुढील प्रश्नाच्या वेळेस तुम्ही सभागृहात उपस्थित रहा.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ४:—** दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी मान्य करणे.

<u>प्रस्तावना</u>

नगरपरिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र शासनाने सन २००५ रोजी दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची यादी सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेतील दारिद्रय रेषेखालील

कुटुंबाचे सर्वेक्षण करुन १५५३० कुटुंबाची प्रारुप यादी दिनांक १०/८/२००७ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती व त्यानुसार नागरीकांकडून १५ दिवसांत हरकती व आक्षेप मागविण्यात आले होते.

परंतु मा. नगरसेवक व लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीचा विचार करुन मा. आयुक्त सो. यांनी दिनांक ५/९/२००७ पर्यंत नागरीकांच्या हरकती व आक्षेप घेण्यासाठी मुदत वाढ देण्यात आली होती.

तरी सदरच्या कालावधीत ६२०० कुटूबांनी आक्षेप घेतला असून त्यांनी दारिद्रय रेषेखाली असल्याचा अर्ज भरलेला आहे. त्यानुसार दारिद्रय रेषेखाली कुटूंबाची एकुण संख्या २१,७३० होत आहे. तसेच सदरची यादी नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सादर करावयाची आहे, तरी सदर यादीस मा. महासभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, मा. महासभेने सदर यादीस मान्यता देण्याची शिफारस आहे.

महासभा ठराव क्र: ५९          दिनांक : —२०/१२/२००७

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी
अनुमोदकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिकेतील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे सर्व्हेक्षण करुन प्रशासनाने तयार केलेल्या १५,५३० कुटुंबाच्या यादीस अंतिम करीत नाही.

कारण——

१. दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांची नावे असलेली प्रभाग निहाय यादी सीडी स्वरुपात पुरविलेली नाही. ती प्रत्येक सदस्यास पुरविण्याकामी प्रशासनास निर्देश देत आहे.

२. नगरसेवक / लोकप्रतिनिधी यांच्याशी संपर्क न साधता सदरहु यादी तयार करण्यांत आल्याने त्याबाबतीत नागरीकांच्या फार मोठया प्रमाणावर हरकती व आक्षेप आहेत. त्यामुळे प्रत्येक प्रभागात पालिका सदस्यांचे सहकार्याने पुनर्सर्व्हेक्षण करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

३. पुनर्सर्व्हेक्षणाचे प्रयोजनार्थ व तद्नंतरचे प्रारुप यादी वर सूचना व हरकती घेण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ देण्यांत येत असून सदरहु मुदत संपल्यानंतर त्वरीत महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्यांस प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—मा. महापौरांच्या आदेशानुसार या सभेचे कामकाज समाप्त होत असल्याचे घोषित करण्यात येत आहे. कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.३० वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका